**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

चर्चा पुढे सुरु...

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्यावरील एकत्रित चर्चा पुढे सुरु होईल.

1.मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ए-1,ए-4,ए-6,एफ-3,जे-1,जे-2, एन-1,क्यू-1,क्यू-2,क्यू-3, आणि क्यू-4

2) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-5,एच-8,

3) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एल-1 व एल-2

4) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-3, जी-5, जी-6, जी-10, ओ-7, ओ-8, आणि ओ-9

5) पणन, रोजगार हमी योजना, संसदी कार्य, महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एक्स-1 व एक्स-2

6) कृषि, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-4, डी-9 व एल-3

7) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आर-1 व आर-2

8) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी-1, टी-2, टी,-3, टी-4,टी-5 व टी-6

9) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3 व एम-4

चर्चा पुढे सुरु......

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि त्यावरील उत्तराचे भाषण यासाठी आज सभागृहाची विशेष बैठक घेण्यात आलेली आहे. सदरहू बैठक 11 वाजून 45 मिनिटांपर्यंत आपल्याला संपवावयाची आहे. माझी कळकळीची विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी बाबीपूरतेच विचार मांडावेत. सदरहू चर्चेस वेळ कमी असल्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी पाच ते सात मिनिटांचा वेळ देण्यात येईल. कोणाही सदस्यांना जास्त बोलण्याची संधी दिली जाणार नाही. या चर्चेच्या अनुषंगाने अजून 9 ते 10 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळे कमी वेळेत व बाबींच्या अनुषंगानेच सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडावेत अशी माझी पुन्हा विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचे या विषयावरील भाषण अपूर्ण आहे ते त्यांनी सुरु करावे.

श्री. मधुकर चव्हाण : पुरवणी मागण्यांवर फक्त पाच ते सात मिनिटेच बोलावे अशी काही नियमात तरतूद आहे काय?

**तालिका सभापती** : आपण ठरवून दिलेल्या वेळेचे बंधन पाळत असतो.

डॉ. सुनील देशमुख : या पुरवणी मागण्या आहेत. मूळ अर्थसंकल्प पुढे सादर होणार आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्यांना भरपूर प्रमाणात बोलण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**तालिका सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी भाषणात सुरुवात करावी.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या चर्चेच्या वेळी काल माननीय मंत्री श्री.रणजित कांबळे उपस्थित होते. ते आमच्या सूचनेची नोंद घेत होते. या चर्चेच्या निमित्ताने आज ज्या सूचना केल्या जातील त्या सूचना उपस्थित असलेल्या माननीय मंत्र्यांनी लिहून घ्याव्यात अशी माझी प्रथम विनंती आहे.

सभापती महोदय, काल मी एका मुद्याचा उल्लेख केला होता. या राज्यात मलेरियाची साथ पूर्णपणे संपलेली आहे असे चित्र शासनाकडून उभे केले जात आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. याबाबतीत एक भयानक स्थिती निर्माण झाली आहे. 2005-06 या वर्षी " हाय रिस्क डिस्ट्रीक्ट फॉर मलेरिया " संपूर्ण राज्यापत 12 टक्के होती. मुंबई शहरात त्याचे प्रमाण 26 टक्क्यांपर्यत होते. 2006-07 मध्ये 33 टक्के प्रमाण मलेरियाचे आहे. मलेरियाच्या साथीचे कारणे शासकीय अहवालात दिलेली आहेत. ती कारणे फारच चिंता करण्यासारखी आहेत. "Factors responsible for increasing Malaria Trend in Mumbai Corporation- Increase in Population from 55 lakhs (1961) to 1.30 crores (2006)" सभापती महोदय, मुंबईत 1961 साली 55 लाख लोकसंख्या होती. 2006-07 या वर्षापर्यंत ती लोकसंख्या 1 कोटी 35 लाख एवढी झाली आहे. हे एक मलेरिया वाढीचे कारण त्यात सांगितले आहे. दुर्देवाची गोष्ट अशी की, 1961 साली मलेरिया विभागामध्ये 374 कर्मचारीवृंद होता. आणि आज देखील या विभागात 374 एवढाच कर्मचारीवृंद आहे. मुंबई शहराची 1961 साली लोकसंख्या 55 लाख होती. आता मुंबईची लोकसंख्या 1.25 कोटी पेक्षा जास्त झाली आहे. मलेरिया विभागात कर्मचारीवृंद वाढविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एकूण लोकसंख्येच्या 50 ते 60 टक्के लोक मलेरियाने पिडीत आहेत. शासकीय अहवालानुसार हे रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी जातात. मलेरियासंबंधीची कारणे दिलेली आहेत, त्यात महत्वाचे कारण असे दिले आहे की, "Increase in construction activity on account of real estate boom and Slum Rehabilitation Authority Scheme." म्हणजे या मुंबई शहरात ज्या ॲक्टीव्हीटीज् चालल्या आहेत त्यामुळे मलेरियाची साथ मोठया प्रमाणात पसरते आहेञ कन्स्ट्रक्शनच्या ठिकाणी मोठया प्रमाणात डेब्रीज पडलेले असतात, त्यामुळे मलेरियांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात असतो हे

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

देखील एक महत्वाचे कारण आहे. "Construction activities attract migratory labourers who are chronic carriers of Malaria and they come from highly malaria endemic areas." सभापती महोदय, मला असे वाटते् की, ही अतिशय चिंतेची बाब आहे. यावर ठोस अशी उपाययोजना शासनाने तातडीने करणे गरजेचे आहे. सन्माननीय मंत्री महोदय डॉ. सुनील देशमुख साहेब, मी आपणाला सांगू इच्छितो की, मलेरिया होऊ नये म्हणून शासनाने मुंबईतील लोकांना काय सुचविले आहे त्याबाबतची मी थोडक्यात माहिती देऊ इच्छितो. "Expected Anti Malarial Measures- Use of bed nets." त्यांनी सुचविले आहे की, मच्छरदाण्या वापरा. मुंबईतील 65 ते 70 टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. ते लोक फाटकी गोधडी आणि फाटकी चादर पांघरुन झोपतात. मलेरिया रोगापासून दूर राहण्यासाठी, मलेरियांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शासनाने लोकांना मच्छरदाण्या वापरण्याचा सल्ला दिला आहे. "Insecticide treated bed nets." हे वापरा असा देखील सल्ला शासनाने लोकांना दिला आहे. "Use of mosquito repellants." लोकांमध्ये जागृती निर्माण करणे ही गोष्ट बरोबर आहे. माझे असे म्हणणे आहे की, या ठिकाणी मलेरियाच्या आजारांच्या अनुषंगानी चर्चा केली जाते. परंतु मलेरियाच्या आजाराचे निर्मूलन करण्यासाठी वेगवेगळया कार्यक्रम राबविण्यासाठी अर्थसंकल्पात जेवढी तरतूद करण्यात आलेली असते, तेवढी तरतूद कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी खर्च केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, शेवटचे दोन मुद्दे सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. Long term उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये "Implementation of Prevention of Mosquito Breeding Act, Enumeration and coding of Breeding Places and use of Guppy Fish for elimination of mosquito larvae, IEC activities for community Participation." गेली चार वर्षे शासन हेच सांगत आहे. त्याबाबत काय प्रगती झाली याचे मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे. शासनाने हा कायदा केला काय ?गेल्या 5/6 वर्षापासून हा कायदा सुचविला जात आहे परंतु तो करण्यात आला नाही. मला असे वाटते की, या मुंबई शहराची लोकसंख्या जवळजवळ सव्वाकोटीच्या घरात गेली आहे. वेळोवेळी असे दिसते की, मलेरिया आणि डेंग्यूचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मुंबई शहरामध्ये मोठया प्रमाणात वाढते आहे. मुंबई शहरामध्ये कोणीही यावे आणि कोणीही जावे अशी परिस्थिती आहे......

**तालिका सभापती** (श्री. अरविंद सावंत) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आता संपवावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, वेळ वाढवून द्यावी अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : वेळ वाढविणे आता शक्य होणार नाही. मंत्रीमहोदयांच्या उत्तरासहित 11.45 वा. याविषयावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी आम्हांला वेळ दिला जात नसेल तर पुरवणी मागण्यांमध्ये दाखविण्यात आलेले विषय रद्द करण्यात यावेत. आम्हांला जर चर्चेसाठी 2/3 मिनिटांचा वेळ मिळत असेल तर आम्ही याठिकाणी सकाळी 10.00 वा. यायचे कशाला ?

**तालिका सभापती** : सभागृहाची ही विशेष बैठक आहे. त्यामुळे वेळेनुसारच आपल्याला कामकाज संपवावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांच्या संदर्भातच आपले विचार व्यक्त करावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे प्रोसिडींग काढून पाहिले तर तो एक संशोधनाचा विषय होईल आणि त्यावर एक पी.एचडी होईल. याठिकाणी मी माझे विचार थांबवितो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्र.34,पृष्ठ क्रमांक 37 यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अनेक वेळेला स्टाफींग पॅर्टन नव्याने करण्याबाबत चर्चा झालेली आहे. मंत्रिमहोदयांनी उत्तर सुध्दा दिला होते की याबाबत विचार करु. परंतु अजूनही सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये स्टाफींग पॅटर्न बदललेला नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 34, पृष्ठ क्रमांक 37. वित्त विभागाशी संबंधित असा विषय आहे. संगणकीकरण सोबतच स्टाफींग पॅटर्नसुध्दा बदलणे आवश्यक आहे. संगणकीकरणामुळे मॅन पॉवर कमी होऊ शकते. अनेक वेळा आम्ही सदनामध्ये प्रश्न विचारल्यानंतर मंत्रिमहोदय होय असे उत्तर देतात. परंतु याबाबत शासन पुढे विचार करते काय असा प्रश्न निर्माण होतो. याची शासनाने गंभीरपणाने दखल घ्यावी. सहावा वेतन आयोगा येणार आहे. याचा बोजा कमी करीत असतानाच स्टाफींग पॅटर्नबाबत शासनाने गंभीरपणाने विचार करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग बाब क्रमांक 37, पृष्ठ क्रमांक 44 बाबत मी सांगू इच्छितो की, कोकणामध्ये अनेक छोटे-मोठे नाले आणि नद्या आहेत. त्यावर साकव घालण्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत असे. परंतु गेल्या 5/6 वर्षापासून यासाठी निधीच येत नाही. त्यामुळे साकवाची कामे ठप्प आहेत. यासाठी निधीची तरतूद करण्याची गरज आहे. विशेषत: पावसाळयामध्ये विद्यार्थ्यांना वाडया-वस्त्यावरुन शाळेत जाताना अडचण निर्माण होते. वैद्यकीय सुविधा देखील मिळत नाहीत. म्हणून यासाठी तातडीने निधी उपलब्ध करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 37,पृष्ठ क्रमांक 44 यामध्ये पूरहानी निधी हा विषय येतो. यामध्ये भरपूर कामे झालेली आहेत. परंतु आता निधी कमी पडत आहे. अनेक ठिकाणी कामांसाठी पैसा उपलब्ध नसल्यामुळे कामे ठप्प पडली आहेत. झालेल्या कामांचे देखील पैसे मिळत नाहीत. म्हणून पूरनिधीतून घेण्यात येणाऱ्या कामांसाठी शासनाने तात्काळ पैसा उपलब्ध करुन द्यावा अशी माझी विनंती आहे.

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.........

महोदय, बाब क्र. 56, पृ.क्र.61-विधि व न्याय विभागाच्या संदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, पनवेल येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी ही तरतूद करण्यात आली आहे. मी यासंदर्भात अनेक वेळा सभागृहात बोललो होतो. पनवेल परिसरात मोठया प्रमाणात नागरिकरण वाढत आहे तसेच गुन्हेगारी देखील मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यादृष्टीने न्यायालयाने काम मात्र एका अंधाऱ्या कोठडीत चालू आहे. त्यामुळे या निधीमध्ये तरतूद करुन न्यायालयाची इमारत अद्ययावत कशी होईल याकडे शासनाने लक्ष द्यावे, एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात काही बाबींवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. बेसिक मुद्दा असा आहे की, या वर्षातील पुरवणी मागण्यांचा विचार केला तर या वर्षात जुलै, नोव्हेंबर आणि मार्च या तीन वेळच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या त्यामध्ये जवळपास 9927 कोटीच्या मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या व मान्य करुन घेतल्या. मी समजू शकतो की, काही ठिकाणी शासनाचे अंदाज चुकले असावेत किंवा वाढीव खर्च तातडीने करणे आवश्यक आहे, अशाच बाबतीत पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सभागृहाकडून मागण्या मान्य केल्या जाणे आवश्यक असते. पण या ठिकाणी तर पूर्णपणेच अंदाज चुकलेले आहेत. चुकीच्या पध्दतीने अंदाज करुन हा खर्च भागविण्यासाठी या मागण्या सभागृहासमोर येत आहेत, ही गंभीर बाब आहे. खरे म्हणजे अंदाज समितीची याबाबत शिफारस आहे व समितीने जे निदेश दिलेले आहेत त्यांचे पालन केले जात नाही, तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी वेळोवेळी शासनाला याबाबत सूचित करुनही त्याचे पालन होत नाही, ही बाब मला सभागृहाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे, त्याचा विचार व्हावा अशी मागणी मागणी आहे.

महोदय, बाब क्र. 3, पृ.क्र.5, परिवहन सेवेतील वाहन चालकांना अतिकालिक भत्ता म्हणजेच ओव्हर टाईम देण्यासाठी 41.46 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. त्याला संदर्भ देताना असे म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण गेले व सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला म्हणून हा भत्ता देण्यासाठी ही तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयात जाईपर्यंत हे प्रकरण शासनाने ताणून धरले परंतु त्यापूर्वीच या कर्मचाऱ्यांचा विचा का करण्यात आला नाही ? याचे स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे. काही कर्मचाऱ्यांना न्यायालयापर्यंत फरपटत नेले व त्यांना नाईलाजाने न्यायालयात याचिका दाखल करण्याची वेळ आली. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्याचे स्वरुप काय ? तसेच न्यायालयाने निकाल केव्हा दिला याचीही माहिती उत्तरातून मिळणे आवश्यक आहे.

त्यानंतर याच विभागाच्या पुरवणी मागण्यांमधील बाब क्र. 53, पृ.क्र.37 मध्ये एका कर्मचाऱ्याला 5.51 लाखाची देणी देण्यासाठी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत व त्यासाठी ही

यानंतर श्री. खर्चे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ........

तरतूद या ठिकाणी करण्यात आली नाही. न्यायालयाने आदेश देईपर्यंत शासकीय अधिऱ्याने या कर्मचाऱ्याला देय असलेली देणी का दिली नाही ? तसेच यासंदर्भात न्यायालयाने जो निकाल दिला तो काय आहे ? तसेच या कर्मचाऱ्याची कोणत्या प्रकारची देयके होती आणि त्यासाठी त्याला न्यायालयात जाण्याची वेळ का आली ? या सर्व गोष्टींचा खुलासा होण्याची गरज आहे.

महोदय, बाब क्र.87, पृ.क्र.93-सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात सन 2005-06 आणि सन 2006-07 या दोन वर्षातील प्रलंबित अनुदान देण्यासाठी 5 कोटीची तरतूद केली आहे. पण म्हणतांना असे म्हटले आहे की, हा तातडीचा खर्च भागविण्यासाठी ही तरतूद केली आहे. जर तातडी होती तर सन 2005-06 व सन 2006-07 मध्ये पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद का करण्यात आली नाही ? किंवा यासाठी मूळ अर्थसंकल्पात तरतूद का केली नाही, पुरवणी मागण्यांच्याच माध्यमातून हे अनुदान देण्याची गरज काय होती, याचा खुलासा झाला पाहिजे.

यानंतर बाब क्र. 89, पृ.क्र.94, सार्वजनिक आरोग्य विभाग या ठिकाणी एका कंत्राटदाराला 74.10 लाखाची रक्कम देण्यासाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून ही तरतूद केलेली आहे. रुग्णालयाच्या कामाच्या संदर्भातील हा विषय आहे. या ठिकाणी श्री. मालपानी नावाचा कंत्राटदार न्यायालयात का गेला, त्यावर न्यायालयाने काय निदेश दिले ? कारण यामध्ये काही तरी गडबड असावी म्हणूनच न्यायालयाने निर्णय दिला. एका बाजुला कर्मचाऱ्याला सुप्रिम कोर्टापर्यंत खेचण्यात येते तर दुसऱ्या बाजुला कोटयावधी रुपये आपण अशा प्रकारे व्याजापोटी देत असतो. खरोखरच यामध्ये गडबड असेल तर यासंदर्भात शासन अपिलात का गेले नाही ? सुप्रिम कोर्टापर्यंत का गेले नाही ? या सर्व बाबींचा खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदय, बाब क्र. 96, पृ.क्र. 110, आदिवासी विकास विभागावरील तरतुदीबाबत मी बोलणार आहे. आदिवासी विभागाने ठेवींवरील व्याज देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने 34.18 लाखाची तरतूद केली आहे. या कोणत्या प्रकारच्या ठेवी आहेत त्याबाबतची माहिती खुलाशामध्ये देण्यात यावी. त्यावर साधारपणे कॅलक्युलेशन केले तर या वर्षात किती व्याज द्यावे लागेल ? याबाबतचे अंदाज चुकू शकतात कारण कधी कर्मचाऱ्यांची संख्या वाढते. खरे म्हणजे 35.30 लाखाइतके अंदाज चुकत असतील तर यामध्ये गडबड नक्कीच असावी, म्हणून याचा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

खुलासा होणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागाने व्याज देण्यासाठी जी तरतूद केली आहे त्यासाठी ही मागणी आली आहे. लाखो रुपयाची तरतूद या ठिकाणी करण्यात येते आणि कोटयवधी रुपयांचा खर्च शासनाचा अशा प्रकारे होतो. दुसऱ्या बाजुला सांगावयाचे झाले तर आदिवासी विकास विभागातील ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा आपण घेत आहोत त्या भागात काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांना मात्र मर्यादित स्वरुपात सवलती देण्यात येतात. आदिवासी भागातील शिक्षकच फक्त या उच्च श्रेणी वेतनश्रेणीपासून वंचित राहिले आहेत. ग्रामविकास विभागाने सन 2000 पासून ही वाढ देऊन टाकलेली आहे, शालेय शिक्षण विभागाने देखील सन 2000 पासून दिलेली आहे आणि आदिवासी विकास विभागाने मात्र सन 2006 पासून दिलेली आहे. यासंदर्भात वित्त विभागाकडे पाठपुरावा का केला जात नाही ? कारण शिक्षकांना जी उच्च वेतनश्रेणी मान्य केली आहे ती अद्यापही दिलेली नाही, ती का देण्यात आली नाही ? याचा खुलासा झाला पाहिजे.

महोदय बाब क्र. 110, पृ.क्र.111, 3 कोटी 25 लाख 87 हजार औषध खरेदीची देयके प्रलंबित आहेत ती देण्यासाठी ही तरतूद करण्यात आल्याचे म्हटले आहे. ही तरतूद पूर्वीच का करण्यात आली नाही ? तसेच मूळ अर्थसंकल्पात हा खर्च विचारात घेणे आवश्यक होते पण तो का करण्यात आला नाही याचाही खुलासा व्हावा.

महोदय, बाब क्र. 26, पृ.क्र. 25, ग्रामविकास विभागाने पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या व तो खर्च भागविण्यासाठी 68.23 लाखाची ही तरतूद आहे. मला माहिती पाहिजे की, पशुधन विकास अधिकाऱ्यांना नियुक्त्या किती व केव्हा व कोणत्या पध्दतीने करण्यात आल्या? पशुधन विकास अधिकारी हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने तसेच ग्रामीण भागातील कृषी विभागाचा महत्वाचा घटक आहे त्यांच्या नियुक्तीबद्दल माझी हरकत नाही. परंतु ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेने पशुधन विकास अधिकारी नेमले त्यांना काढून टाकण्यात येते, त्यांना पगार व इतर सुविधा दिल्या जात नाही तर दुसऱ्या बाजुला अशा प्रकारे नव्याने नियुक्त्या करण्यात येतात. ठाणे जिल्ह्यातील अशाच प्रकारची दोन प्रकरणे आहेत व त्यांच्या बाबतीत औद्योगिक न्यायालयानेही निकाल दिला आहे. उच्च न्यायालयाने निकाल दिलाआहे. जिल्हापरिषदेकडून ग्रामविकास विभागाकडे याबाबत 29 पत्रे

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .........

पाठविलेली आहेत, मी देखील 9 महिन्यापूर्वी पत्रव्यवहार केलेला आहे, परंतु त्याचे अद्यापही उत्तर मिळाले नाही. या दोन प्रकरणांचा कुठल्याही प्रकारे शासन पातळीवर निर्णय होत नाही आणि दुसऱ्या बाजुला अशा प्रकारे नियुक्त्या केल्या जातात व त्यासाठी शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. यासंदर्भात ठाणे जिल्ह्यातील या दोन प्रश्नांचाही विचार व्हावा, एवढे बोलून व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, बाब क्र. 4,सामान्य प्रशासन विभागाची ही मागणी आहे. या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, माहितीचा अधिकार कायद्यान्वये माहिती आयुक्त कार्यालयासाठी नवीन कार्यालय स्थापन करण्यासाठी 18 पदांची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मी सूचित करते की, माहितीचा अधिकार या कायद्याची व्याप्ती ग्रामीण भागातील तळागाळातील माणसापर्यंत माहितीचा अधिकार पोहचलेला आहे. सर्वसामान्य माणसाला जसे या कार्यालयाच्या माध्यमातून माहिती मिळते त्याबाबत मी असे सूचित करु इच्छिते की, तहसीलदार, पंचायत समिती आणि जिल्हाधिकारी या ठिकाणी जर आपण ही कार्यालये सुरु केली तर प्रथमदर्शनी या लोकांना ही कार्यालये शोधण्यासाठी भटकावे लागते, तसे भटकावे लागणार नाही आणि या आवारात सर्व सोयींनी उपलब्ध असे हे कार्यालय असावे, अशी मी विनंती करते.

त्यानंतर बाब क्र. 5, माहिती व प्रसिध्दी, सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून माहिती व प्रसिध्दी या कार्यालयातील महत्वाच्या बाबीवर खर्च करण्यासाठी 1 कोटी 33 लाख 33 हजाराची तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, आपल्या देशात व राज्यात एवढे चॅनल्स निघालेले आहेत. त्या चॅनल्सवर विश्लेषण देणारे व उत्साही मंडळी आलेली आहेत. त्यांचा पत्रकारिता व प्रसिध्दी माध्यमातील अनुभव प्रकर्षाने जाणवतो. अपुरा अभ्यास, विषयाचे कमी ज्ञान असलेले अनेक चॅनल्सचे प्रतिनिधी ज्येष्ठ आणि मोठया व खोलवर विषयाची चर्चा व माहिती विचारण्याची पध्दती त्यांना अवगत नसल्याने सर्वसामान्य माणसांना त्यांच्या विचारातून किती प्रबोधन होत असेल हे प्रकर्षाने जाणवते. यासाठी पूर्वी दूरदर्शन, आकाशवाणी आणि वृत्तपत्रे या ठिकाणी काम करणाऱ्या अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी अतिशय चांगल्या प्रकारचे प्रबोधन या राज्याला केलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मंदाताई म्हात्रे.....

पत्रकारितेला एक वारसा आहे. पत्रकारितेचा प्रभाव राज्यभरातील तळागातील लोकांपर्यंत सहजगत्या पोहचत असतो. त्यामुळे पत्रकारितेच्या संदर्भात नव्या चॅनलेने विचार विचार करावा, त्यांच्यात योग्य प्रकारच्या नियमावलीच्या बातम्या प्रसिध्द कराव्यात तसेच बातम्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी. समाजात प्रक्षोभक विचार जाणार नाही व जातीय दंगली होणार नाही, उद्रेक होणार नाही यासाठी शासनाने सर्व चॅनलसाठी आचार संहिता करण्याची आवश्यकता आहे. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्याचा दर्जा ऊंचावणे गरजेचे आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या संदर्भात राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागाने गरजेचे आहे. अनुभवी माणसांच्या अभावामुळे समाजामध्ये विकृती निर्माण होते म्हणून अशा प्रकारची विकृती निर्माण होणार नाही यासाठी शासनाने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 23, खार जमिनीच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. ठाणे, रायगड जिल्हयामध्ये गेल्या 26 जुलै रोजी आलेल्या महापुरामध्ये समुद्राचे पाणी जमिनीत शिरल्यामुळे फार मोठया प्रमाणात शेतक-यांचे नुकसान झालेले आहे, पिकांची नासाडी झ ालेली आहे. समुद्राच्या पाण्यामुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे मच्छीमारांचे कर्ज शासनाने माफ केलेले आहे परंतु अशा प्रकारे कर्ज माफ करुन प्रश्न मच्छीमारांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्या ठिकाणच्या मच्छीमारांना, शेतक-यांना शासनाने जोडधंदे उपलब्ध करुन दिले तरच या ठिकाणच्या जनतेचे प्रश्न ख-या अर्थाने सुटू शकतील. पूर्वी मोठया प्रमाणात या ठिकाणी मच्छी उपलब्ध होत असे परंतु आता या ठिकाणी मच्छी मिळण्याचे प्रमाण सुध्दा फार अल्प झालेले आहे. त्यामुळे मच्छिमार आणि शेतक-यांच्या संदर्भात शासनाने गंभीरपणे विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 25 वर विचार व्यक्त करणार आहे. केंद्रशासनाने राज्यातील शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हे कर्ज माफ करण्यासाठी शासनाला 60 हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा व शेतक-यांना दिलासा देण्याचा शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. परंतु त्याच बरोबर शेतक-यांना चांगल्या प्रकारचे बी-बियाणे कसे मिळतील याचाही विचार करण्याची गरज आहे. परंतु आज शेतक-यांना निकृष्ट प्रकारचे तसेच भेसळयुक्त बि-बियाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्रीमती मंदाताई म्हात्रे ....

तसेच बोगस किटक नाशके मिळाल्यामुळे शेतक-यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे बोगस बि-बियाणे तसेच बोगस किटक नाशके पुरवतात त्यांच्यावर कठोरपणे शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तसेच कीटक नाशकांच्या किमती जास्त प्रमाणात असल्यामुळे कीटक नाशकांच्या किंमती कमी झाल्या तरच शेतक-यांना आपण काही तरी दिलासा देऊ शकू.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 39,40,41,42 वर विचार व्यक्त करणार आहे. नवी मुंबई येथे चांगल्या प्रकारचे तसेच सर्व सोयी युक्त कारागृह बांधले असल्यामुळे मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन करते. तसेच औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर व पुणे येथे पर्यायी इमारती उभ्या करणे गरजे आहे तसेच सर्व जिल्हा कारागृह चांगल्या करण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी इमारती मोडकळीस आलेल्या आहेत, खराब अवस्थेत आलेल्या आहेत त्या ठिकाणी चांगल्या प्रकारच्या इमारती बांधण्याची आवश्यकता आहे. राज्यातील सर्व रग्णालयांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. तसेच रुग्णालयाजवळ डॉक्टर, नर्स आणि इतर कर्मचा-यांना राहण्यासाठी चांगल्या प्रकारचे निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 69,70 वर विचार व्यक्त करणार आहे. गत अधिवेशनात सुध्दा मी महिला सरपंचाना एस.टी.ने मोफत प्रवास करता येईल यासाठी पास उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे यासंदर्भात विचार व्यक्त केले होते. आपण महिलांना सक्षमीकरण करीत आहोत. म्हणून महिला सरपंचाना ग्रामपंचायतीच्या कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते त्यामुळे महिला सरपंचांना एस.टी. प्रवास मोफत करण्याची आवश्यकता आहे. तसेच सरपंच व सचिव तसेच अशासकीय सदस्य इत्यादिना प्रशिक्षणासाठी तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे यासंदर्भात तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 22 वर विचार व्यक्त करणार आहे. बेलापूर किल्ल्याला अंदाज समितीने भेट दिलेली आहे. या किल्ल्याची अवस्था फार खराब आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूचे जतन तसेच सौदर्य करणासाठी शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

आपण या ठिकाणी मी विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करते.

-------------- (नंतर श्री. गायकवाड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, 2007-2008 सालच्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, 2007-2008 सालच्या पूरक मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत.या पूरक मागण्या राज्याची आर्थिक शिस्त मोडणाऱ्या आहेत असे मला सुरुवातीलाच सांगावयाचे आहे. या ठिकाणी संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत तेव्हा त्यांनी याबाबतीत खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. विधिमंडळाची जी परंपरा आणि जी शिस्त आहे तिला फाटा देऊन या ठिकाणी पुरवणी मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत. दर वेळी पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडण्यात येतात आणि त्या मंजूर केल्या जातात. वास्तविक पाहता मूळ अर्थसंकल्पातील तरतुदीच्या 25 टक्यापेक्षा जास्त पुरवणी मागण्या असता कामा नयेत परंतु काही विभागाच्या पुरवणी मागण्या मूळ अर्थसंकल्पातील तरतुदीच्या 30 टक्के आहेत तर काही विभागाच्या पुरवणी मागण्या मूळ अर्थसंकल्पातील तरतुदीच्या 37 टक्के एवढया आहेत. खरे पाहिले तर ज्या पुरवणी मागण्या या ठिकाणी सादर करण्यात आलेल्या आहेत त्याचा समावेश मूळ अर्थसंकल्पात व्हावयास पाहिजे होता परंतु मूळ अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद न करता पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत तेव्हा या पुरवणी मागण्या कशासाठी मांडण्यात आल्या आहेत याचे उत्तर सन्माननीय मंत्री महोदयांनी द्यावे असे मी त्यांना आपल्या मार्फत सांगू इच्छितो.

सभापती महोदय,यानंतर मला सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 4 पान नंबर 6 संबंधी बोलावयाचे आहे. बृहन्मुंबई क्षेत्रासाठी राज्य माहिती आयुक्त कार्यालय स्थापन करण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. बृहन्मुंबईमध्ये माहिती आयुक्तांच्या कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करता आली असती परंतु त्या कामासाठी मूळ अर्थसंकल्पात तरतूद न करता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. माहितीचा अधिकार हे एक महत्वाचे हत्यार सगळयां लोकांच्या हातामध्ये गेलेले आहे. माझ्या या मताशी किती सन्माननीय सदस्य सहमत होतील हे मला माहीत नाही. कदाचित माझे हे वक्तव्य सभागृहाच्या परंपरेशी साजेसे नसेल तर ते आपण कृपया कामकाजातून काढून टाकावे. माहितीच्या अधिकाराचा वापर केवळ एक्सप्लॉयटेशनसाठी केला जात आहे. तेव्हा त्या संदर्भात निर्बध आणणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.एखाद्या व्यक्तीचे एक्सप्लॉयटेशन दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला करावयाचे असेल तर तो दहा रुपयाचा स्टॅम्प लावून त्याला जी काही माहिती हवी आहे ती माहिती मिळविण्याचा

2..

प्रयत्न करतो. लोकप्रतिनिधी विषयी जर कोणाला काही माहिती हवी असेल तर ती माहिती मिळविण्याचा त्यांना अधिकार आहे परंतु शिक्षण संस्था चालकाबद्दल किंवा सामाजिक कार्यकर्त्याबद्दल देखील अशा प्रकारची माहिती कोणीही मिळवू शकतो. म्हणजेच कोणतीही व्यक्ती कोणत्याही व्यक्तीसंबंधीची माहिती या अधिकाराचा वापर करुन मिळवू शकते. केवळ पर्सनल ग्रिव्हन्सेससाठी त्याचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो ही खेदाची बाब आहे असे मला या निमित्ताने नमूद करावयाचे आहे. सभापती महोदय, आपण एखादा कायदा केल्यानंतर काही वर्षानी त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करीत असतो. त्यानुसार माहितीच्या अधिकारासंबंधी जो कायदा करण्यात आलेला आहे त्यात योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक आहे असे मला वाटते. माहिती मागविणाऱ्या व्यक्तीचे स्टेटस काय आहे आणि कोणत्या कारणासाठी तो ही माहिती मागवत आहे याबाबतची माहिती त्याने दिली पाहिजे अशा प्रकारची कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक असून त्याचा पुनर्विचार वरिष्ठ सभागृहामध्ये होणे आवश्यक आहे असे मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर मला अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाची बाब क्रमांक 76 पान नंबर 78 सबंधी बोलावयाचे आहे. वैध वजनमापशास्त्र कार्यालयाकरिता अंकाधिष्ठित प्रमाण वजनकाटे खरेदी करण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये व्यापाऱ्यांकडे जी काही वजनमापे आहेत ती बरोबर आहेत की नाहीत हे पाहिले जात नाही. त्यामुळे एखाद्या ग्राहकाने दोन किलो गहू विकत घेतला तर तो खरोखरच दोन किलो आहे की त्या पेक्षा कमी आहे हे समजत नाही. वजन मापे बरोबर नसल्यामुळे ग्राहकांना कमी गहू दिला जातो आणि त्याची फसवणूक होत असते.15 मार्च हा ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात आला आहे, ग्राहक पंचायतीच्या शाखा सर्व गावा गावा पर्यंत आणि जिल्हया जिल्हयापर्यंत पोहोचविल्या पाहिजेत परंतु आज ग्राहक पंचायतीच्या शाखा गावा गावामध्ये पोहोचलेल्या नाहीत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयात वजन मापांचे आणि फुड क्वालिटीचे परीक्षण करण्यात यावे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 87 पान नंबर 93 संबंधी मला बोलावयाचे आहे. नवरोसजी वाडिया प्रसुतीगृह, मुंबई यांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी 4 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही पुरवणी मागणी करीत असतांना असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगण्यात आलेले आहे की, "राज्य शासन आणि नवरोसजी वाडिया प्रसुतीगृह,मुंबई यांच्यात करण्यात आलेल्या " न्यास विलेख,1926 " या अनुसार, वर्ष 2005-2006 व 2006-2007 यासाठी प्रलंबित असलेले अनुदान या रुग्णालयाला देण्याचे ठरविण्यात आले आहे." या रुग्णालयाला चार कोटी रुपये कशासाठी देण्यात येत आहे याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. हे रुग्णालय आता बंद होणार आहे .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

या रूग्णालयाचा सौदा होणार आहे अशी माझी माहिती आहे. आजच्या वर्तमानपत्रामध्ये देखील या बाबत बातमी आलेली आहे. तेव्हा या न्यासाच्या माध्यमातून चालणारी या मुंबईतील जवळपास 4 हॉस्पिटल्स आज बंद होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. त्यातील एक रूग्णालय म्हणजे हे नवरोसजी वाडिया रूग्णालय, दुसरे आशा पारेख हॉस्पिटल,सांताक्रूझ ज्याला बीसीजी हॉस्पिटल असेही म्हणतात. आणि तिसरे हॉस्पिटल म्हणजे राधाबाई वटूमल हॉस्पिटल आणि चौथे हॉस्पिटल म्हणजे कोठारी हॉस्पिटल. सभापती महोदय, यातील आशा पारेख हॉस्पिटलचा सौदा झालेला आहे. राधाबाई वटूमल हॉस्पिटल बंद आहे. या सगळ्या जागा ज्या आहेत त्या मॉलला विकल्या जात आहेत. मी यासाठी चॅरिटी कमिशनरकडे देखील तक्रार केली होती. त्यांनी मला सांगितले की, ही बाब आमच्या अखत्यारीत येत नाही. पण जर तुम्ही त्यासाठी एक न्यास म्हणून जागा दिली तर मग ही बाब तुमच्या अखत्यारित कशी काय येत नाही ? मी माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्याकडे देखील याबाबत तक्रार दिली होती. सार्वजनिक आरोग्य खात्याने याकडे लक्ष देऊन, या रूग्णालयांचा सौदा खरोखरी होणार असेल तर मी जबाबदारीने येथे सांगतो आहे. मी स्वत: सांताक्रूझला राहतो त्यामुळेच मी अधिक खात्रीने सांगतो की, आशा पारेख हॉस्पिटलचा सौदा झालेला आहे तसेच राधाबाई वटूमल हॉस्पिटल सध्या बंद असून तेही त्याच मार्गावर आहे. माझ्याकडे या संबंधातील सगळे पेपर्स आहेत. मी याबाबतचा प्रश्न देखील सभागृहात उपस्थित केला होता. त्यांची बँकेची खाती फ्रीज केलेली आहेत. डॉ. चुलानी सध्या हे हॉस्पिटल चालविण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही सगळी माहिती मंत्री महोदयांनी घ्यावी. मी सांगितलेली ही तिन्ही हॉस्पिटल्स सध्या विकली जाण्याच्या मार्गावर आहेत. एक तर त्यांनी न्यास म्हणून राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेकडून जागा घ्यायची, 20-20 वर्षे हॉस्पिटल्स चालवायची आणि ती अचानक बंद करायची. असे होऊ लागले तर त्या भागातील लोअर मिडल क्लास वर्ग आहे तो कोठे जाणार ? आता तुम्ही या वाडिया हॉस्पिटलसाठी आज 4 कोटी रूपये दिले आणि उद्या-परवा हे हॉस्पिटल बंद झाले तर तुम्ही काय करणार आहात ? माझी तर भीती अशी आहे की, या एक दीड महिन्यातच या हॉस्पिटलचा सौदा होत आहे. आजच्या वर्तमानपत्रात देखील याबाबतची बातमी आहे. वाटल्यास, आपण याची शहानिशा करून घ्यावी. या विषयी आपण सर्व संबंधितांची बैठक बोलवावी, त्यात चॅरिटी कमिशनरला देखील बोलवावे आणि त्यात या 3-4

...... जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सावंत...

हॉस्पिटल्सविषयी माहिती घ्यावी व त्या आधारे योग्य ती कारवाई करावी अशी माझी या निमित्ताने आपल्याकडे आग्रही मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 90, पृष्ठ 94 - मराठवाड्यातील उपजिल्हा रूग्णालय येथील फिरत्या पथकांच्या कर्मचाऱ्यांचा हा आयटेम आहे. या संदर्भात मला मंत्री महोदयांकडून माहिती पाहिजे की, राज्यामध्ये अशी किती फिरती पथके आज अस्तित्वात आहेत ? त्यासाठी किती ॲम्ब्युलन्सेस आहेत ? आणि किती डॉक्टरांची त्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे ? आपण दरवेळी यासाठी आपण पैसा देतो पण प्रत्यक्षात ही फिरती रूग्णालये जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध नसतात हा अनुभव आहे, ही खेदाची बाब आहे. या विषयावर अनेकदा या सभागृहातदेखील प्रश्नोत्तरे झालेली आहेत, चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागाची बाब क्रमांक 101, पृ.112 - ग्रामीण रूग्णालयांसाठी साधनसामग्री खरेदी करण्यासाठी ही बाब आणली आहे. सभापती महोदय, फ्रॉलिक ॲसिडच्या गोळ्या, डी जीवनसत्त्वे, कॅल्शिअमच्या गोळ्या, सिरप वगैरे खरेदी करण्यासाठी या रकमेची तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, कुपोषणावर नामदार श्री.हर्षवर्धन पाटील यांनी या सभागृहात आश्वासन दिलेले होते की, आपण कुपोषणावर श्वेतपत्रिका काढणार आहोत. तर त्या श्वेतपत्रिकेचे काय झाले ? ही श्वेतपत्रिकेची प्रोसेस नेमकी कोठवर आलेली आहे ? याची माहिती या निमित्ताने आपल्याकडून आम्हाला पाहिजे. बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी या ज्या गोळ्या व औषधे दिली आहेत त्या 12 कोटी रूपयांच्या सरबतासारख्याच आहेत का ? नेमके आपण यामध्ये काय काय देणार आहात ? याची माहिती द्यावी तसेच कोणकोणत्या भागामध्ये ही औषधे जाणार आहेत हेही सांगावे. सभापती महोदय, आणखी एक मुद्दा म्हणजे ही जी प्रोटीन्स सिरप आहेत ती अल्फाबीट कंपनी बनविते. पण आपण त्या कंपनीपेक्षाही चढ्या भावाने हे सिरप खरेदी करीत आहात. या खरेदीकडे आपण थोडे लक्ष द्यावे अशी माझी आपणास सूचना आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर 3 गोष्टीकडे मी या निमित्ताने मी आपले लक्ष वेधू इच्छितो. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या या गोष्टी आहेत. कराड कॉटेज हॉस्पिटल हे आज 90 टक्के बंद आहे, तेथील आयसीयू मध्ये भंगार कचरा जमा झालेला आहे, तेही बंद आहे. मेघदूत स्त्री कॉटेज

......जी 3 ...



KBS/ KTG/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 10:30

डॉ.सावंत ....

हॉस्पिटल हे प्रसूतीगृह म्हणून प्रसिद्ध आहे पण तेथे प्रसूतीच होत नाही. ही दु:खाची गोष्ट आहे आणि चाळीसगाव प्राथमिक हॉस्पिटल आहे, जे जिल्हा परिषदेच्या रूग्णालयाच्या बाजूलाच आहे, तेही 100 टक्के बंद आहे. या तिन्ही हॉस्पिटल्स विषयी माहिती आपण या निमित्ताने सदनाला द्यावी. एवढे बोलून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

***

( यानंतर श्री.सरफरे ....एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभी आहे. सुरुवातीला ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 70 कडे माननीय ग्राम विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. या मागणीमध्ये पंच, सरपंच, सचिव, अशासकीय सदस्य इत्यादींना प्रशिक्षण देण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. ही प्रतिकात्मक अशी तरतूद करण्यात आली आहे असे जर सरकारचे म्हणणे असेल तर ही गोष्ट वेगळी. परंतु बऱ्याच प्रमाणामध्ये महिला ग्रामपंचायत सदस्या, पंचायत समितीच्या सदस्या व विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधी यांची संख्या प्रचंड वाढली आहे याकडे मी आपले लक्ष वेधते. महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य प्रशिक्षण केंद्रे 17 ते 18 ठिकाणी निर्माण करण्यात आली आहेत. या स्थानिक स्वराज्य प्रशिक्षण संस्था प्रत्येक जिल्हयामध्ये निर्माण केल्या पाहिजेत. या संस्थांचे काम चांगल्या प्रकारे चालले आहे. परंतु त्यांना जिल्हा स्तरावर एक टारगेट ठरवून दिले पाहिजे, आणि ते एक वर्षाच्या आत पूर्ण केले पाहिजे. नाहीतर बहुतेक ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांची अडीच ते तीन वर्षे पूर्ण झालेली असतात. अनेक वेळा मी ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम पाहिले आहे. गेली दहा ते बारा वर्षे मी अनेक कार्यक्रमांना जात आहे. त्याठिकाणी सही केल्यानंतर आणि त्या दिवसाचा भत्ता घेतल्यानंतर सदस्य निघून जातात. सकाळी मंत्रिमहोदयांतर्फे होणाऱ्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला सर्व सदस्य उपस्थित असतात. आणि दुपारी जेवण झाल्यानंतर एकही प्रशिक्षणार्थी उपस्थित रहात नाही. आणि म्हणून ट्रेनिंग इंस्टिटयूटमध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत असे दोन-तीन दिवसांचे प्रशिक्षण दिल्यानंतर ते सदस्य निघून गेले तरी चालतील. परंतु रहाती प्रशिक्षण केंद्रे निर्माण केली तर त्यामधून काहीही हेतू साध्य होत नाही. त्याऐवजी त्याच जिल्हयामध्ये आपण प्रशिक्षण इंस्टिटयूटसाठी तरतूद केली तर महिला सदस्यांना त्याचा उपयोग होईल. तसेच, या प्रशिक्षणामुळे सदस्यांच्या कामकाजामध्ये किती फरक पडला याचे मूल्यमापन केले पाहिजे . आपल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मूल्यमापनाची यंत्रणा असेल असे मला वाटत नाही. आज यशदा सारख्या संस्थेचे यामध्ये चांगले काम सुरु आहे. परंतु ही संस्था संपूर्ण महाराष्ट्रामध्ये असलेल्या सदस्यांना प्रशिक्षण देऊ शकत नाही. म्हणून आपण या प्रशिक्षण केंद्राच्या चांगल्या कार्यपध्दती निवडल्या पाहिजेत.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या संदर्भात एक बाब याठिकाणी मांडू इच्छिते. विधानसभेमधील माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्या आमदार निधीबाबत एक प्रश्न निर्माण झाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होता. त्याबाबत आपण तरतूद केली आहे. या विषयाकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्या जानेवारी महिन्यापासून मी पुणे, बीड व नगर इत्यादी पाच-सहा जिल्हयामध्ये गेले आहे, व तेथील अनुभव स्वत: घेतला आहे. या जिल्हयांमध्ये आमदार निधीमधून काम करण्याबाबत पत्र दिल्यानंतर सुध्दा त्या कामाचे एस्टिमेट तयार करण्यामध्ये बराच वेळ घालविला जातो. गेल्या 1 फेब्रुवारीपासून मला यासंबंधी सूचना करण्यात येत आहे. वित्त व नियोजन विभागाच्या अशा सूचना आहेत की, जर तुमच्या कामाचे एस्टिमेट वेळेवर झाले नाही तर ते पैसे लॅप्स होतील असे जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आम्हाला सांगत आहेत. माझा असा प्रश्न आहे की, मुद्दामहून एस्टिमेट तयार करण्यासाठी उशीर झाला आणि त्यामुळे हे पैसे लॅप्स झाले तर ती आमची जबाबदारी नाही. नगर जिल्हयामध्ये मोहटादेवीच्या कामासाठी मी माझ्या आमदार निधीमधून अडीच लाख रुपये उपलब्ध करुन दिल्यानंतर मला विभागाकडून सांगण्यात आले की, मोहटादेवीच्या कामामध्ये टेक्निकल प्रॉब्लेम येऊ शकतो. त्यामुळे आपण हे पैसे आम्हाला दुसऱ्या कामावर वापरण्यासाठी द्यावेत. आमदार निधीच्या कामाचे एस्टिमेट करण्यामध्ये वेळ वाया घालवून ते पैसे लॅप्स करावयाचे ही गोष्ट योग्य नाही. हे पैसे शिल्लक राहिल्यानंतर ते जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दुसऱ्या कामांसाठी वापरले जातात, असे पैसे अनेक जिल्हयांमध्ये वापरण्यात आले आहेत. त्या जिल्हयामध्ये गेल्यानंतर लोक आमचे आभार मानतात आणि सांगतात की, तुम्ही आम्हाला स्वच्छतागृहे बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला. अशावेळी स्मितहास्य करुन आम्हाला ती वेळ मारुन न्यावी लागते. अशाप्रकारे उरलेले एक-दोन लाख रुपये आमदारांची परवानगी न घेता आपण कसे काय वापरता? किमानपक्षी त्या जिल्हयातील जिल्हाधिकारी यांनी आम्हाला कळविले पाहिजे की, तुमचे पैसे शिल्लक आहेत ते कोणत्या कामांसाठी वापरावेत? हा केवळ एका आमदारांच्या निधीचा प्रश्न नाही तर सर्वच आमदारांच्या निधीच्या वापराबाबत अनेक समस्या निर्माण होत असतात.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 73 मध्ये ग्राहक संरक्षणासंबंधीचा मुद्दा मांडू इच्छिते. यामध्ये ग्रामधान्य कोश याकरिता तरतूद करण्यात आली आहे. प्रश्न असा आहे की, कोणते धान्य, कोणत्या कामासाठी आणि किती साठविण्यात येणार आहे? जर ते धान्य नाशिवंत असेल तर त्या गावामध्ये किती वापरले जाणार आहे? जर एका गावामध्ये एकाच प्रकारचे धान्य साठविले तर दुसऱ्या धान्याची कमतरता निर्माण होते त्यावेळी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणत्या प्रकारचे धान्य वापरणार? या ग्रामधान्य कोशाचे नियोजन आपण कशाप्रकारे केले आहे? याबाबत आपण त्या त्या तालुक्यांमध्ये कशाप्रकारच्या सूचना दिल्या आहेत याची आम्हाला कल्पना नाही. नाही तर धान्यांच्या कोठारांमधील धान्य उंदीर नष्ट करतात, त्यामुळे शेवटी भुसभुशीत भुसा शिल्लक रहातो. ही एक चिंतेची बाब मला वाटत आहे.

सभापती महोदय, पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला बाल विकास मंत्री यांच्या मागण्यांवर माझे विचार मांडते. संबंधित मंत्रिमहोदय हे सांगली येथील कार्यक्रमाला काल उपस्थित होते, त्यामुळे ते आज सभागृहामध्ये आले नसावेत. माननीय रोजगार हमी योजना राज्यमंत्री आज उपस्थित आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पटलावरुन रोजगार हमी योजना गायब होईल की काय? अशी शंका निर्माण झाली आहे. आम्हाला याबाबत नेहमी उत्तरे देण्यात आली की, आम्ही जॉब कार्ड तयार करु. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे जास्तीत जास्त पैसे या राज्यामध्ये आणू असे सांगितले गेले. करदात्यांकडून पैसे घेऊन ते गरीब लोकांसाठी वापरण्याचा जो शासनाचा उदात्त हेतू होता तो संपूर्ण निधी शासनाच्या गंगाजळीमध्ये सामील झाल्यानंतर रोजगार हमी योजनेच्या मजुरांकरिता कशी कामे निघणार आहेत? त्यादृष्टीने कमीत कमी कामे कशी निघतील यादृष्टीने नोकर शाही काम करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही एक काळी कृती आहे, ब्लॅक ॲक्ट आहे. ज्यामुळे रोजगार हमी योजनेच्या चांगल्या भावनेला हरताळ फासला गेला आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सभापती महोदय, मला राज्य माहिती आयोगाच्या संदर्भात लक्ष वेधावयाचे आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, माहितीच्या आधाराचा उपयोग चुकीच्या पध्दतीने केला जात आहे. जर एखाद्या गोष्टीचा उपयोग चुकीचा केला जात असेल तर जिल्हा स्तरावर लोकांना कळावयास पाहिजे की, आपण माहितीच्या आधाराचा उपयोग कसा करु शकतो आणि कसा करु शकत नाही. तसे करणे आवश्यक आहे. म्हणून जिल्हा स्तरावर दक्षता समित्या केल्या पाहिजेत याकडे मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, माझा सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात शेवटचा मुद्दा आहे. पान क्र.5, बाब क्र.2 बाबत सांगावयाचे आहे, परंतु सामान्य प्रशासन विभागाचे माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत आणि हा प्रकार नेहमीचाच आहे. इतर माननीय मंत्री महोदय सांगतात की, आम्ही नोटस् घेत आहोत. पण प्रत्यक्षात त्या नोटस् कोणीही वाचलेल्या नसतात. नागपूर अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बोलत असताना जे मुद्दे मांडलेले आहेत, त्याची अजूनही लेखी उत्तरे आलेली नाही. तीन-चार महिने झाले तरी अजूनही ही लेखी उत्तरे का येत नाहीत ? असा प्रश्न आहे. समजा लेखी उत्तरे देण्यात आली तरी ती अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी येतात. म्हणजे आम्ही अधिवेशनासाठी गावावरुन निघतो, तेव्हा ती आमच्या घरी पोहोचलेली असतात. त्यामुळे पुरवणी मागण्यांच्या संदर्भात वेळेवर उत्तर मिळत नाहीत, याबाबतीत आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. सामान्य प्रशासन विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत. पण बाब क्र.2 मध्ये असे म्हटलेले आहे की,"माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे कार्यालय मंत्रालयाच्या 7 व्या मजल्यावर स्थलांतरित करण्याचे ठरविले आहे."म्हणजे माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या कार्यालयासाठी 7 व्या मजल्यावरील जागा वापरण्यात येणार आहे.हा चुकीचा प्रघात आहे. आपण जर गावागावामध्ये लोकांना माहिती आहे की, मंत्रालयामध्ये सहाव्या मजल्यावर माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यालय आहे.गावातील लोक असेच म्हणतात की,आम्ही सहाव्या मजल्यावर जाऊन दाद मागणार आहोत.पूर्वी मंत्रालयातील सातवा मजला रिकामा होता.परंतु आपण त्याठिकाणी नवीन कार्यालय निर्माण करुन कोणते औचित्य साधले आहे ? एखादा माणूस मंत्रालयामध्ये आल्यानंतर असे म्हणणार आहे की,"आता मी सातव्या मजल्यावर जात आहे."म्हणजे या मजल्यावर माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा कोणी मोठा आहे काय ? तसेच महिला आर्थिक विकास ....

. . . .आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

महामंडळ, राज्य महिला आयोग आणि इतर काही विभाग यांची कार्यालये म्हाडाच्या इमारतीमध्ये हलविण्यात आली, कारण मंत्रालयामध्ये जागा शिल्लक नाही. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय हा असा विभाग आहे की, "Think Globally Act Locally". माहिती व तंत्रज्ञान संचालनालयातील कर्मचारी महाराष्ट्रात कुठेही बसून काम करु शकतात, संगणक वापरु शकतात, त्यांच्या कार्यालयासाठी सातवा मजला देण्यात आला आणि बाकीचे विभाग म्हाडा, सामान्य प्रशासन इमारत इ.ठिकाणी गेले ते महामूर्ख ठरले. त्यामुळे माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे कार्यालय सातव्या मजल्यावर सुरु करण्याबाबत माझा गंभीर आक्षेप आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यालय सहाव्या मजल्यावर असताना, त्याच्यावर जर मजले तयार करुन त्याचा इतर विभागांच्या कार्यालयांसाठी वापर करणार असाल तर त्यासाठी काहीतरी औचित्य ठरविले पाहिजे, त्याचा प्रोटोकॉल ठरविला पाहिजे. जागा रिकामी आहे म्हणून कधी तेथे नमाज पढण्यासाठी पत्रा लावला, कधी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे कार्यालय सुरु केले, तर यातून आपण सहाव्या मजल्याचे औचित्य ठेवत नाही असे वाटते. याठिकाणी कोण मुख्यमंत्री आहेत ? या पक्षाचे आहेत की त्या पक्षाचे आहेत ? हा प्रश्न नाही. पण एवढया वर्षाची जी परंपरा आहे, त्यामध्ये आपण सहजरित्या बदल करण्यात आला आणि सातव्या मजल्यावर माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे कार्यालय केले आहे. तर त्यांच्याबाबतीत एवढी अर्जन्सी काय आहे ? याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाने सामान्य विचार सुध्दा केलेला नाही असे एकंदर त्यांच्या सगळया कृतीवरुन दिसत आहे.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या बाबतीत समर्थन नावाची संस्थो असून गेल्या तीन वर्षापासून अर्थसंकल्प अध्ययन केंद्रामार्फत अनेक मुद्दे मांडतात. मी माननीय वित्त मंत्र्यांना अर्थसंकल्पाच्या वेळी विनंती करते. विधानसभेमध्ये सुध्दा माननीय विरोधी पक्षनेते श्री.रामदास कदम यांनी याबाबत मुद्दा मांडलेला आहे. गेल्या वर्षी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनीही या मुद्यांकडे लक्ष वेधले होते. आमची एकच विनंती आहे की, त्यांनी जे काही आक्षेप घेतलेले आहे, ते कदाचित तुमच्या मतानुसार चुकीचे असतील. तर ते कशा प्रकारे चुकीचे आहेत आणि तुम्ही जे काही करीत आहात ते कसे बरोबर आहे ? यासंबंधात आम्हाला लेखी स्वरुपामध्ये उत्तर द्यावयास पाहिजे. म्हणून मी ही बाब सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे. आपण एका बाजूला असे म्हणतो की, आम्ही सहभागी पध्दतीने काम करावयास पाहिजे. प्लॅनिग कमिशन पासून राज्य नियोजन आयोगा

. . . .आय-3

पर्यंत प्रत्येकाच्या सूचना आहेत की, लोकांचे काय म्हणणे आहे ते ऐकून घ्यावे. मग ज्यावेळेला एखादी संस्था पाच-पाच, सहा-सहा वर्षे काम करुन त्यासंबंधात त्यांनी केलेला अभ्यास आपल्या समोर ठेवते, त्यावेळी त्याची दखल घेणे आवश्यक आहे आणि त्यांना सांगितले पाहिजे की, तुमचा अमुक आक्षेप टेक्नीकली चुकीचा आहे. त्यामध्ये आम्ही बदल करीत आहोत. पण शासन एवढे सुध्दा वैचारिक औदार्य दाखवत नाही याचा मला अतिशय खेद वाटतो. अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने केलेल्या सूचना सदनाच्या पटलावर ठेवत असतानाच, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करते की, अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने घेतलेल्या आक्षेपांच्या बाबतचे लेखी उत्तर पुढील अधिवेशनाच्या पूर्वी आम्हाला मिळाले पाहिजे. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना मला प्रथम सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 4 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये बृहन्मुंबई क्षेत्रासाठी राज्य माहिती आयुक्त कार्यालय स्थापन करणे यासंदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. राज्य माहिती आयोगाच्या संबंधात तसेच माहितीच्या अधिकारासंबंधी अनेक विषय सांगण्यात आले आहेत. यामध्ये माहितीच्या अधिकाराचा उपयोग होतो तसेच दुरुपयोग सुध्दा होतो. काही ठिकाणी सामान्य माणूस माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करतो त्यावेळी काही ठिकाणी जे अनुभव येतात त्यामध्ये कल्याणच्या जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे ज्यावेळी एका नागरिकाने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला तेव्हा त्याला असे सांगण्यात आले की, माहिती अधिकाऱ्याचा एक दिवसाचा पगार आणि झेरॉक्सचा खर्च भरावा, तरच आपल्याला माहिती मिळेल. ही माहितीच्या अधिकारावर गदा आहे. हा अधिकारी कोण आहे याची संपूर्ण चौकशी करुन त्यासंबंधी कारवाई झाली पाहिजे. अशा पध्दतीने सामान्य नागरिकांना सांगितले गेले तर सामान्य नागरिक माहिती घेण्यासाठी जाणारच नाहीत. अशा प्रकारची भूमिका त्या अधिकाऱ्याने घेतली त्यामुळे त्यांच्यासंबंधी निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 4 च्या संदर्भात मला आणखी असे सांगावयाचे आहे की, निरनिराळ्या ठिकाणी विभागीय स्तरावर माहिती आयुक्त कार्यालयात कर्मचारीवर्ग नाही. कार्यालयाकरिता जागा नाही. आयुक्तांना राहण्यासाठी जागा नाही, त्यांना गाडी नाही. त्यामुळे काम करणे कठीण आहे. या सर्व बाबींचा शासनाने विचार करावयास पाहिजे. याबाबतीत शासनाने त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर विधि व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 60 वरील बाब क्रमांक 54 बाबत मला बोलावयाचे आहे. यामध्ये कार्यालयीन खर्चाकरिता पुरवणी मागणी केलेली आहे. या खर्चाबद्दल आमचा कोणताही आक्षेप नाही. परंतु शहरी भागाला सुविधा पुरविण्याबरोबरच ग्रामीण भागाचाही सरकारने विचार केला पाहिजे. न्यायदानाच्या बाबतीत ग्रामीण भागामध्ये मूलभूत सुविधांचाच अभाव आहे. मी अनेक ठिकाणच्या न्यायालयांना भेटी दिलेल्या आहेत. अनेक ठिकाणी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. संजय केळकर ......

अशा मूलभूत सुविधा नाहीत हे लक्षात आले. मला एकच उदाहरण सांगावयाचे आहे. कल्याणच्या कोर्टात ज्यावेळी भेट दिली त्यावेळी मॅजिस्ट्रटची जी रुम आहे त्या ठिकाणी ज्या दरवाजातून बाकीचे सगळे लोक प्रवेश करतात त्याच भागातून मॅजिस्ट्रेट प्रवेश करतात. त्या ठिकाणी एक पडदा टाकून मॅजिस्ट्रेट कोट घालतात आणि मग कोर्टाच्या कामकाजाला सुरुवात करतात. ग्रामीण भागातील तालुका न्यायालयांमध्ये अडचणी आहेत. रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात तीन चार वर्षापासून इमारत तयार आहे परंतु त्या ठिकाणी न्यायाधीशांचे निवासस्थान नसल्यामुळे त्या इमारतीचा उपयोग होत नाही. त्या ठिकाणी कोर्टाचे काम सुरु झालेले नाही. 6 तालुक्यातील लोकांना त्या कोर्टाचा फायदा होणार आहे. त्या ठिकाणी तातडीने न्यायाधीशांच्या निवासस्थानाच्या व्यवस्थेकरिता तरतूद केली पाहिजे. गेल्या काही वर्षापासून त्या ठिकाणी इमारत तयार असेल आणि केवळ एका निवास्थानाची तरतूद नाही म्हणून न्यायालय सुरु होत नसेल तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून यासाठी तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला विधि व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 62 वरील बाब क्रमांक 58 बाबत बोलावयाचे आहे. भाडेपट्टी व करासंबंधी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या ठिकाणी सुध्दा शासनाने ग्रामीण भागातील जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. जे नवनिर्मित तालुके आहेत, उदा. मंडणगड तालुका निर्माण होऊन 20 वर्षे झाली. इतका कालावधी लोटल्यानंतर देखील त्या ठिकाणी न्यायदानाची मूलभूत सुविधा देण्यात आलेली नाही. सरकारचे मंत्रीच सांगतात की, गेल्या 15 वर्षात मंडणगड सारख्या छोट्या गावात जागा मिळू शकत नाही. सरकार ग्रामीण भागामध्ये किती कार्यतत्पर आहे हे यावरुन दिसून येते. त्यामुळे केवळ शहरातच नाही तर या भागामध्ये देखील अशा प्रकारच्या न्यायालयांना जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर विधि व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 63 वरील बाब क्रमांक 60 बाबत मला बोलावयाचे आहे. राज्यातील धर्मादाय आयुक्तांची जी कार्यालये आहेत त्या ठिकाणी

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. संजय केळकर ......

अनेक पदे रिक्त आहेत. अनेक प्रकारच्या सहकारी संस्था निर्माण होतात तसेच धर्मादाय आयुक्तांच्या अंतर्गत येणारी निरनिराळी मंडळे निर्माण होतात. परंतु त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. विभागीय स्तरावर आयुक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. आजही त्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे सध्याच्या कर्मचाऱ्यांवर मोठा बोजा पडून लोकांची कामे वेळेवर होत नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने तातडीने कार्यवाही करावी.

सभापती महोदय, यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 81 वरील बाब क्रमांक 77 बाबत मला बोलावयाचे आहे. निराधिसूचित व भटक्या जमातीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनुदान देणे यासंदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये भटक्या व निराधिसूचित गृहनिर्माण संस्थांचे कार्य व्यवस्थित चालावे यासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य अपेक्षित असते. परंतु ठाण्यामध्ये हरिजन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दैनंदिन कामकाजात शासनानेच अडथळे निर्माण करुन संस्थेच्या सभासदनांना एकमेकांच्या विरोधात झुंजवत ठेवल्याने आता सदर गृहनिर्माण संस्थेत गत 50 वर्षात प्रथमच अस्तित्वासाठी लढाई असा प्रसंग निर्माण झाला आहे. शासनाच्या सर्व खात्यांमध्ये योग्य समन्वय नसल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांना न्याय मिळत नाही. त्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला जावा आणि त्यांना न्याय द्यावा अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर......

सभापती महोदय, पान क्रमांक 44, बाब क्रमांक 37 मार्ग व पुलांची दुरुस्ती याकरिता मागणी करण्यात आलेली आहे.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : माननीय सदस्यांनी केवळ मुद्दे मांडावेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मागण्यांच्या संदर्भात सभागृहाला माहिती दिली पाहिजे या दृष्टीकोनातून मी बोलत आहे. मागण्यांच्या व्यतिरिक्त मी दुसरे काहीही बोलत नाही. आपण लवकर संपविण्यास सांगत आहात, परंतु त्याला इलाज नाही. आम्ही मागण्यांच्या संदर्भातील मुद्दे आठवडाभर लिहिले आहेत, त्याचा काही उपयोग होणार नाही. मी आहे ते बोलत आहे, वायफळ बोलत नाही. मी केवळ मागणी करीत आहे.

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्या वेळेमध्ये संपविण्याचा सभागृहाने निर्णय घेतलेला आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मार्ग व पुलांची दुरुस्ती या मागणीसंबंधी मी दोन मुद्दे मांडणार आहे. ठाणे ग्रामीण भागातील वासुन्द्री (टिटवाळा) या पुलाचे काम 8 जानेवारी, 2008 पर्यंत पूर्ण होईल असे मला मंत्रिमहोदयांनी पत्राद्वारे कळविलेले आहे. या पुलाच्या आजुबाजूला अनेक गावे आहेत. पावसाळा तोंडावर आलेला आहे. या गावातून वाहने जाऊ शकत नाहीत. त्यामुळे त्या गावांतील नागरिकांना दैनंदिन व्यवहारासाठी, शाळकरी मुलांना शाळेसाठी होडीतून जावे लागते. या पुलाच्या कामाबाबत मंत्रिमहोदयांनी मला पत्र पाठवून कळविल्यानंतरही काम होत नाही. ते काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, चिपळूण तालुक्यातील बौध्दवाडी-पोसरेवाडी-ब्राम्हणवाडी हा रस्ता झ ााल्यास 13 गावांना त्याचा लाभ होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता नियोजनबाहय असल्याने आम्ही करु शकत नाही, तर नियोजन विभागाने अशा रस्त्यासाठी नियोजन करण्यास असमर्थता दर्शविली आहे. ग्रामीण भागातील जनतेस दळणवळणाची सुविधा मिळावी म्हणून या रस्त्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 131, बाब क्रमांक 115 या मागणीवर माझे विचार मांडतो. महिला व बालकल्याणासाठी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा यांना जो निधी दिला जातो तो त्याच कामासाठी खर्च होत नाही. मी एक वर्षापासून पत्र पाठवून यासंबंधीची माहिती

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

मागविली होती, परंतु अद्याप मला ती प्राप्त झालेली नाही. हा निधी खात्यामध्ये वर्ग केला जातो. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. लाभार्थी त्या लाभापासून वंचित होतात. शासनाने अशाप्रकारे होणा-या खर्चाला पायबंद घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 110, बाब क्रमांक 97, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. या मागणीसंबंधी मी थोडक्यात बोलणार आहे. वसतिगृहांमध्ये मुलभूत सुविधांची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आरोग्य सेवेपासून त्याची सुरुवात होते. ठाण्याच्या आदिवासी मुलींच्या वसतिगृहाला मी भेट देऊन या मुलींसोबत भोजन घेतले आहे. त्या भोजनाचा दर्जा अतिशय निकृष्ट दर्जाचा होता. तेथील विद्यार्थीनींवर कायम वसतिगृह व्यवस्थापिकेचा दबाव जाणवत होता. तेथील 45 पैकी केवळ 7 विद्यार्थीनींची आरोग्य तपासणी करण्यात आल्यावर ओ.के.रिपोर्ट देण्यात आला. उर्वरित विद्यार्थीनींची तपासणी झ ालेली नाही. त्यांच्या निर्वाह भत्त्याची बाब तर फार दूरची झाली. त्यामुळे शासन खरोखरच आदिवासी मुलींचे कल्याण करीत आहे काय असा माझ्यासारख्याला प्रश्न पडतो. शासनाने घेतलेल्या निर्णयाची योग्यरितीने अंमलबजावणी झाली पाहिजे. ज्या विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये राहतात, त्यांच्यासाठी ज्या काही सुविधा असतील त्यापासून त्यांना वंचित ठेऊ नये. अन्यथा विद्यार्थीनी वसतिगृहांमध्ये येण्याचे बंद करतील आणि त्यामुळे वसतिगृहे देखील बंद होतील, असे मी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, पान क्रमांक 25, बाब क्रमांक 26 वर मी बोलणार आहे. ठाणे जिल्हयात पशु चिकित्सालयाची फार मोठया प्रमाणात कमतरता आहे. पशु वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे मोखाडा या आदिवासी भागात शेकडो जनावरे अज्ञात रोगाने मृत्यू पावली आहेत. या जनावरांना वेळेवर वैद्यकीय सुविधा मिळाली असती तर हे पशुधन वाचले असते. आदिवासी, दुर्गम भागातील जनावरांसाठी पशु चिकित्सालयाची स्थापना करण्यात यावी अशी यानिमित्ताने मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. मागणी क्रमांक 36, पान क्रमांक 39 यावर मी पॉईन्टेड बोलणार आहे. चितळी आसवनी मर्यादित यांच्या कर्मचा-यांच्या स्वेच्छानिवृत्ती योजनेवरील खर्च आणि त्यांचे वेतन व इतर खर्च भागविण्यासाठी व लायसन्सचे नुतनीकरण करण्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत पुढे सुरु....)

सभापती महोदय, अनेक पुरवणी मागण्यांमध्ये ही बाब सातत्याने आलेली आहे. त्यामुळे या मागणीबद्दल मला आश्चर्य वाटते. चितळी आसवनी मर्यादित या कंपनीच्या बाबतीत शासन निर्णय घेणार आहे की नाही ? काम न करता फुकट वेतन तुम्ही किती वर्षे देत राहाणार आहात ? ही कंपनी बंद आहे. आपण डिसइन्व्हेस्टमेंट करीत नाही आणि कंपनीची विक्रीही करीत नाही. तेव्हा या कंपनीच्या संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. उत्पादन निर्मिती न होता शासनाचा पैसा वाया जात आहे. तेव्हा या कंपनीमध्ये उत्पादन सुरु करुन पैसे वाचविता येतील.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र.45 वरील बाब क्रमांक 39कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधित आहे. तळोजा, नवी मुंबईचा उल्लेख या बाबीमध्ये करण्यात आलेला आहे. या निमित्ताने मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, गृह खाते आणि सार्वजनिक बांधकाम खाते यांच्यामध्ये समन्वय असण्याची आवश्यकता आहे. नवी मुंबई येथे पोलिस कर्मचा-यांसाठी जी वसाहत बांधण्यात आली ती इतकी घाणेरड्या अवस्थेमध्ये आहे, डिलॅपिडेटेड कंडिशनमध्ये आहे की त्या ठिकाणी कोणीही पोलीस कर्मचारी राहात नाही. या गोष्टीचा सार्वजनिक बांधकाम खात्याने गंभीररपणे विचार केला पाहिजे. ज्या ठिकाणी वसाहत बांधली जाते ती जागा स्वच्छ आहे की नाही, इतर नागरी सुविधा चांगल्या प्रकारे आहेत की नाहीत, प्रदुषण आहे की नाही या सर्व गोष्टी विचारात घेऊन बांधकाम केले पाहिजे. नवी मुंबईमध्ये पोलीस कर्मचा-यांसाठी जी वसाहत बांधली ती बांधताना या गोष्टींचा यत्किंचितही विचार केला गेला नाही. आज त्या वसाहतीमध्ये एकही पोलीस कर्मचारी राहात नाही. तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाने या गोष्टीची गांभीर्याने दखल घ्यावी.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पृ.क्र. 77 वरील बाब क्रमांक 73कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आपण नवीन ग्राम धान्य कोषाची स्थापना करीत आहात. आजच वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आलेली आहे की, आपल्या गोडाऊनमध्ये तांदूळ नाही. तसेच रेशनवर लोकांना धान्य मिळत नाही. अहमदनगर जिल्ह्यातील एक भ्रष्टाचाराचे प्रकरण मी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांच्याकडे त्यांना स्वत: भेटून दिले होते. त्या प्रकरणाची त्यांनी तातडीने दखल घेतली. परंतु दुर्दैवाने हे सांगावेसे वाटते की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत ....

आजही रेशनिंगवरील धान्याचा भ्रष्टाचार चालू आहे. लोकांना धान्य मिळत नाही. तेव्हा याबाबतीत त्वरित योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृ.क्र.93 वरील बाब क्रमांक 87कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधित आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी देखील या गोष्टीचा उल्लेख केला. वाडिया हॉस्पिटलसाठी 4 कोटी रु. आपण देत आहात. मी तर म्हणेन 4 कोटी ऐवजी 5 कोटी रु. द्या. हे वाडिया हॉस्पिटल खरंच विकले जात असेल तर त्याची गांभीर्याने दखल घ्यावी. या निमित्ताने मी अशी मागणी करतो की, आमच्या परळ विभागामध्ये राज्य कामगार विमा योजनेचे महात्मा गांधी हॉस्पिटल आहे. मुंबईतील गिरण्या बंद पडल्यामुळे हे हॉस्पिटल देखील बंद पडत चालले आहे. 700 ते 750 खाटांचे हे हॉस्पिटल आहे. याच हॉस्पिटलच्या शेजारी के.ई.एम. हॉस्पिटल आहे. त्या ठिकाणी रुग्णांची प्रचंड गर्दी असते. प्रत्येक वॉर्डातून दोन-दोन खाटांच्यामध्ये रुग्ण ठेवलेले असतात. तेव्हा हे महात्मा गांधी हॉस्पिटल शासनाने स्वत: चालवावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. हे रुग्णालय चांगल्या स्थितीत आहे. हे चांगले रेडिमेड हॉस्पिटल आपल्या ताब्यात घेण्यासाठी शासनाने लवकरात लवकरत कारवाई करावी.

पृ.क्र. 94 वरील बाब क्रमांक 90कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक आरोग्य केन्द्राची अवस्था अतिशय वाईट आहे. मी अमरावती जिल्हयातील दर्यापूर तालुक्यातील एका प्राथमिक आरोग्य केन्द्राला भेट दिली होती. ते प्राथमिक आरोग्य केन्द्र पाहिल्यानंतर असे वाटले की, जर त्या ठिकाणी उपचार घेण्यासाठी रुग्ण गेला तर तो बरा होण्याऐवजी जास्तच आजारी पडेल. प्रसुती कक्ष तर इतका घाणेरणा होता की काही सांगण्याची सोय नाही. म्हणून राज्यातील प्राथमिक आरोग्य केन्द्रांच्या इमारती पहिल्यांदा स्वच्छ करण्याचे काम करावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

पृ.क्र. 95 वरील बाब क्रमांक 91 मध्ये केवळ " मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान" एवढाच उल्लेख करण्यात आलेला आहे. हा अधिक खर्च मुख्यत्वेकरुन वेतन व महागाई भत्त्याच्या दरात वाढ झाल्यामुळे झालेला आहे. महागाई भत्ता हा दिलाच पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

18-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-1

ABG/ SBT/ KTG/ KGS/ प्रथम श्री. शिगम 11:00

श्री. अरविंद सावंत....

सभापती महोदय, आज पर्यावरणाच्या संदर्भात मोठी चिंता व्यक्त करण्यात येत आहे. संपूर्ण जग पर्यावरणाच्या बाबतीत चिंता करावयास लागले आहे. परवा एका वृत्तपत्रात वृत्त आले आहे की, समुद्रात दिवसेंदिवस पाणी वाढत आहे. समुद्रातील पाणी असेच वाढत राहिले तर मंत्रालयातील सगळे मजले पाण्याखाली बुडतील. म्हणून पर्यावरणाच्या महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि सर्वसामान्य जनतेमध्ये पर्यावरणाच्या बाबतीत जागृती निर्माण करण्यासाठी शासनाने मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारची मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

-------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बजोरिया ( अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 37- मार्ग व पुलाच्या परिक्षण व दुरुस्तीसाठी अतिरिक्त अनुदाने यासंबंधीची आहे. मार्ग व पुलाच्यापरिक्षण व दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पीयय अंदाजात करण्यात आलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून आल्याने अर्थसंकल्पात 25 कोटी रुपयांची अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

सभापती महोदय, या पूरक मागणीच्या अनुषंगाने एक बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अकोला जिल्हयामध्ये चांदूर गाव आहे़ चांदूर गाव ते कोलखेड असा एक जुना मार्ग आहे. या मार्गाच्या मध्ये एक 100 वर्षापूर्वीचा पूल आहे. सदरहू पूल अतिशय जीर्ण झालेला आहे. आजही तो तुटलेल्या अवस्थेत आहे. या पुलाच्या दुरुस्तीचे काम शासनाने तात्काळ हाती घ्यावे म्हणून गेल्या तीन वर्षापासून मागणी करीत आहे. हा पूल नादुरस्त झाल्यामुळे जनतेची फार मोठया प्रमाणात गैरसोय होते आहे. पावसाळयात या पुलाच्या खाली पाणी मोठया प्रमाणात असते. पावसाळयात एखाद्या व्यक्तींचा मृत्यू झाल्यास त्या प्रेताला त्या पुलावरुन स्मशानभूमीत नेणे शक्य नसते. त्या नाल्यातील पाणी कमी होण्याची वाट बघावी लागते. सदर प्रेत चार, चार तास पुलाच्या शेजारी ठेवावे लागते, कधी कधी तर पूर परिस्थितीमुळे संपूर्ण दिवस प्रेत त्या ठिकाणी ठेवावे लागते. तेथील ग्रामस्थांची एवढी प्रचंड गैरसोय या नादुरुस्त पुलामुळे होते आहे. म्हणून या पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी शासन काही नियोजन करणार आहे काय याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, चांदूर रेल्वे ते वाशिम असा मार्ग व्हावा यासाठी देखील गेल्या तीन वर्षापासून मी या सभागृहात मागणी करीत आहे. सदर मार्गाचे काम व्हावे म्हणून अनेक वेळा माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे लेखी पत्रे दिलेली आहेत. परंतु माननीय मंत्री महोदयांकडून या मार्गाचे काम होण्याच्या संदर्भात काहीही उत्तर दिलेले नाही. चांदूर रेल्वे ते वाशिम असा मार्गाचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे व त्या कामासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारची माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 83- मंजूर विनियोजनापेक्षा अपेक्षित अधिकखर्च भागविण्यासाठी अतिरिक्त विनियोजन यासंबंधीची आहे. ही मागणी म्हाडाच्या संदर्भातील

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बजोरिया.....

आहे. गृहनिर्माणाच्या योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून खूप निधी येतो. केंद्र शासनाकडून जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन आणि एकात्मिक गृहनिर्माण योजनेसाठी आणि इतर योजनेसाठी प्रावधान केलेले आहे. एकात्मिक गृहनिर्माण योजनेसाठी केंद्र सरकारने 80 कोटी रुपयांची एक योजना राबविली आहे. या योजनेमध्ये 80 टक्के अनुदान केंद्र सरकारचे आहे. 10 टक्के अनुदान राज्य सरकारचे आहे आणि 10 टक्के हिस्सा लाभार्थ्यांचा आहे. या योजनेसाठी वाढीव निधीचे प्रावधान राज्य सरकारने काहीही केलेले दिसत नाही. मागे वाम्बी आणि इंदिरा आवास घरकुलाची योजना अस्तित्वात होती.त्यात 40 हजार रुपयांमध्ये घरकूल बांधावयाचे होते. अकोला जिल्हयात आणि वाशिम जिल्हयात 40 हजार कोटीची वाम्बेची योजनेचा लाभ दिला गेला आहे. अकोला येथे वाम्बे योजने अंतर्गत जे घरकूल बांधले त्यातील एका घरकुलाचे दोन स्लॅब पडले आणि त्यात तीन मुलांचा मृत्यू झाला. ही घटना मागच्या महिन्यात झाली आहे. अशा प्रकारच्या योजना महागाई जास्त झाल्याने त्या यशस्वी होऊ शकत नाहीत. या योजनेतून घरकूल बांधण्यासाठी 80 हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे, परंतु त्यात घरकुलाचे काम पूर्ण होऊ शकत नाही. त्याचे कारण असे आहे की, आज लोखंडांचा भाव प्रति टन 50 हजार रुपये एवढा झ ाालेला आहे. केंद्राकडून वाम्बे योजनेसाठी आलेली तरतूद 50 टक्के देखील खर्च केलेली नाही. माझ ी अशी मागणी आहे की, 80 हजार रुपयांमध्ये घरकूल पूर्णपणे बांधणे शक्य होत नाही. म्हणून प्रती लाभार्थी 25 ते 30 हजार रुपयांचे वाढीव अनुदान शासनाने उपलब्ध करुन द्यावे अशी माझी विनंती आहे. वाम्बे आणि इंदिरा आवास घरकूल योंजना ज्या प्रमाणे फोल ठरली आहे, त्याप्रमाणे केंद्र शासनाच्या गृहनिर्माण योजना फोल ठरु नये. या योजनेसाठी राज्य सरकारने मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे अशा प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, आरोग्य विभागाची बाब क्रमांक 88, पृष्ठ क्रमांक 94- अकोला येथील समान्य रुग्णालयामध्ये कोणकोणत्या अडचणी आहेत, त्या अडचणी माननीय वित्तमंत्र्यांच्या अकोला भेटीत निदर्शनास आणून दिल्या आहेत. त्या ठिकाणी एक्सप्रेस फिडरची अत्यंत आवश्यकता आहे. त्या रुग्णालयात साधे जनरेटर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात तर मोबाईलच्या प्रकाशात डॉक्टरांनी महिलांच्या प्रसुती केल्या आहेत. यासंबंधीचे वृत्त वृत्तपत्रात छापून आलेले आहे. डॉक्टरांचे फोटो वृत्तपत्रात छापून आलेले आहेत. ते

4...



ABG/ SBT/ KTG/ KGS/ प्रथम श्री. शिगम 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बजोरिया....

फोटो मी सोबत आणलेले असून ते मी आपणास सादर करतो. इतकी वाईट अवस्था विजेच्या संदर्भातील आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, सामान्य रुग्णालये येथे विजेच्या प्रकाशासाठी जनरेटची व्यवस्था करण्यात आली पाहिजे. त्याच प्रमाणे त्या ठिकाणी एक्सप्रेस फीडर आणि जलनिस्सारणाची व्यवस्था झाली पाहिजे. सामान्य रुग्णालयात एखाद्या पेशंटची भेट घेण्यासाठी गेलो तर तेथे अतिशय दुर्गंधी असते. माझी या बाबीच्या निमित्ताने विनंती आहे की, ग्रामीण भागातील सामान्य रुग्णालये, ग्रामीण रुग्णालयेृ प्राथमिक आरोग्य केंद्रे, या ठिकाणी इर्मजन्सी लाईटची व्यवस्था शासनाने केली पाहिजे अशा प्रकारची मागणी करतो आणि माझ ो भाषण संपवितो.

-----------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 11:05

श्री. रमेश शेडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 27, पृष्ठक्रमांक 26 यामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत केंद्र शासनाने 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. केंद्र शासनाने एवढया मोठया प्रमाणात या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे सर्वप्रथम मी केंद्र शासनाचे त्याचप्रमाणे केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार साहेबांचे आभार मानतो. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, केंद्र शासनाने एवढया मोठया प्रमाणावर निधीची तरतूद केली असल्यामुळे राज्य शासनाने सुध्दा तेवढयाच रकमेची या योजनेसाठी तरतूद करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 24 मध्ये सूक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत 80:20 टक्के असे निधीचे प्रमाण आहे. अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी 50 टक्के अनुदान देतो.या 50 टक्के अनुदानाऐवजी 75 टक्के अनुदान शासनाने द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 26 अंतर्गत पशुसंवर्धन खात्यामध्ये काही अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना वाढीव पगारापोटी पुरवणी मागणीअंतर्गत निधी मागितला आहे. पशुसंवर्धन खात्याच्या अंतर्गत महाराष्ट्रामध्ये फक्त अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली म्हणून निधी वाढवून मागितला आहे. या खात्याअंतर्गत राज्यातील ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना पूरक उद्योग पुरविण्यासिाठी अनेक योजना राबविल्या जातात. फक्त अधिकाऱ्यांच्या पगारासाठी निधी वाढवून न मागता पशुसंवर्धन खात्याच्या अंतर्गत ते शेळी-मेंढी विकास महामंडळ आहे त्यांच्याकडे शेकडो एकर जमीन पडून आहे. परंतु निधी नाही म्हणून महामंडळाअंतर्गत असलेल्या योजनांमधून विकास होत नाही. महाराष्ट्रातील मेंढपाळ आणि धनगर समाज आहे त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी-सवलती मिळत नाहीत. पशुसंवर्धन खात्याअंतर्गत निधी नाही म्हणून महामंडळाला निधी मिळत नाही त्यामुळे महामंडळ विकासाच्या योजना राबवू शकत नाही. त्यासाठी या महामंडळाचा निधी वाढवून देण्याबाबत शासनाने विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 26 यामध्ये राष्ट्रीय कृषी योजनेअंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये जलसंधारणाच्या कामामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. कृषी विभागाचे अधिकारी स्वत:च कामे करतात. सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये 2 लाख 62 हजार इतक्या रकमेची बोगस कामे झालेली आहेत. बोगस आणि निकृष्ट दर्जाची कामे केलेली आहेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 27, पृष्ठ क्रमांक 26 यामध्ये कुंभवडे गावामध्ये नालाबंडींगसाठी जी जागा निवडण्यात आली ती तांत्रिकदृष्टया योग्य नसल्यामुळे एक वर्षात नाला वाहून गेला. याबाबतीत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करुन चौकशी करावी व संबंधितांवर कारवाई करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 44, बाब क्रमांक 37 याअंतर्गत पूल आणि रस्ते यांच्या परिरक्षणासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील कणकवली तालुक्यामध्ये शिवडा गावात मोठया प्रमाणात क्रशर आणि खडीचा धंदा सुरु आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.........

त्याठिकाणी 10 ते 15 टन वाहतूक करण्यासाठीचा शिवडाव-कनेडी मार्गावरील पूल हा व्हीडीआर उपलब्ध असताना या मार्गावर 40 टन खडी वाहतूक होत असल्यामुळे हा रस्ता नादुरुस्त झाला आहे, रस्त्यावर खड्डे पडले आहेत, हा रस्ता वाहतूकीस अयोग्य झाला असल्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाची राजधानी ओरोस येथे रेस्टहाऊस बांधण्यात आले आहे. परंतु निधी अभावी रंगरंगोटी व फर्निचरची व्यवस्था नसल्यामुळे हे रेस्ट हाऊस वापरात येऊ शकत नाही. त्यासाठी त्वरित निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत राज्य ग्राहक संरक्षण मंच निर्माण करण्यात आला आहे. परंतु या मंचासाठी न्यायाधीशाची नेमणूक न केल्यामुळे 1998 सालापूर्वीचे निवाडे, अपिलातील निवाडे अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे शासनाने या मंचासाठी त्वरित न्यायाधीशाची नियुक्ती करावी व फर्निचरसाठी आर्थिक तरतूद करावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मी प्रामुख्याने तीन महत्वाच्या बाबींवर माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-5, पृष्ठ क्र.7 वर कार्यालयीन खर्चासाठी माहिती व जनसंपर्क विभागाची मागणी सादर केलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे मराठी राज्य असून मराठी भाषा ही या राज्याची राजभाषा आहे. इतर कोणीही शासनाकडे मागणी केलेली नाही. मग दाढ्या कुरवाळण्याचा प्रयत्न का होत आहे? हा अत्यंत महत्वाचा प्रश्न येथे निर्माण होतो. लोकराज्य या मराठी भाषेतील अंकाचा खप 4 लाखापर्यंत पोहोचल्यानंतर उर्दू, गुजराथी, इंग्रजी भाषेत तो प्रसिध्द करण्यासाठी खर्च वाढविण्याचा प्रयत्न का होत आहे? अशा प्रकारे इतर भाषांमधून अंक प्रसिध्द करणार असाल तर इतर राज्यांमध्ये अशी पध्दत आहे का हेही सांगावे. कारण नसताना दाढ्या कुरवाळण्याचे प्रकार थांबविण्यात यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाबाबत बोलत असताना न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर केला जाईल म्हणून राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाने घोषणा केली. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या संदर्भात उत्तर दिले नाही. न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर होण्यासाठी तयार करण्यात आलेले 25 लाख रुपयांचे सॉफ्टवेअर पडून आहे. न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा यासाठी वकिलांनी देखील एक दिवसाचे बैठे आंदोलन केले होते. "25 लाख रुपयांचे सॉफ्टवेअर पडून" अशी बातमी चार दिवसांपूर्वीच वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. माननीय राज्यपाल सत्य बोलतात की शासन असत्य बोलते हे सभागृहाला कळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कृषि विभाग, बाब क्र.25, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी वसंतदादा सहकारी संस्था, मांजरी, जि.पुणे या संस्थेला 52 लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. कोणत्या प्रकारचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन दिले जाणार आहे? बियाणे वितरणाची व्यवस्था कशी केली आहे? गुणवत्तेतून शेतकऱ्यांचा कोणता फायदा झाला हे सभागृहाला कळणे आवश्यक आहे. कृषि विद्यापीठांच्या माध्यमातून अनुदान दिले गेले तर चांगल्या प्रकारचे संशोधन करण्याची व्यवस्था तेथे असल्यामुळे उत्तम काम होऊ शकते. या संदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सभापती महोदय, शेतकऱ्यांना सुवर्ण पदके देण्याऐवजी कथिलाची पदके देऊन त्यांची फसवणूक करण्यात आली. काल सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी भाषणात सांगितले की, युती सरकारच्या काळामध्ये तिजोरीमध्ये खणखणाट होता, लोकशाही आघाडी सरकारच्या काळात खळखळाट आहे. वास्तविक 'खळखळाट' हा पुरस्कार हास्यसम्राट कार्यक्रमामध्ये विनोदी माणसाला दिला जातो. मराठी भाषेचे अनुकरण आणि शेतकऱ्यांच्या सुवर्ण पदकाच्या संदर्भात शासन काय पावले उचलणार आहे हे सभागृहाला स्पष्ट केले पाहिजे. आघाडी सरकारने विक्रम मोडला आहे. माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही विक्रमवीर आहोत. युती सरकारच्या काळात 56 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या असे ते म्हणाले. परंतु आघाडी सरकारच्या काळात 4500 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. हा देखील लोकशाही आघाडीच्या शासनाने विक्रम केल्या त्याबद्दल कौतुक करतो.

सभापती महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून येणारा निधी ठराविक जिल्हयांमध्ये वितरित केला जातो. पुणे जिल्हयात सर्वात जास्त निधी दिला गेला आहे. या संदर्भात वृत्तपत्रात देखील बातमी आलेली आहे. केंद्र सरकारकडून 650 कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला असून पुणे, वर्धा, सोलापूर, लातूर असे जे मंत्रीमहोदयांचे जिल्हे आहेत त्या जिल्हयांना वितरित केलेला दिसून येतो. महाराष्ट्राचे हित साधावे असा विषय असताना आपल्याच थाळीमध्ये ओढून घेतल्यामुळे सत्ताधारी पक्षातील अनेक सदस्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात नक्की उत्तर कोण देणार आहे? शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कोणता दिलासा मिळणार आहे हे कळले तर बरे होईल. आत्महत्या थांबणे महत्वाचे आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

(नंतर श्री.खर्चे....

PFK/ KGS/ MMP/ 11:15

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक- 1 ते 5 या मागण्या आहेत. त्यापैकी बाब क्रमांक-4 संबंधी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व इतर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. मंत्रालयामध्ये सातवा मजला कशासाठी बांधण्यात येत आहे? माननीय मुख्यमंत्र्यांचे दालन सहाव्या मजल्यावर असल्यामुळे सातवा मजला बांधल्यानंतर त्यांचे महत्व कमी होणार का? अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. सातव्या मजल्यावर माहिती व तंत्रज्ञान विभागाचे कार्यालय उभारण्यात येत आहे. शेवटी महत्व खुर्चीला असते. माननीय मुख्यमंत्री ज्या खुर्चीवर बसतात त्या खुर्चीला महत्व असणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी तळमजल्यावर बसण्याचे ठरविले तर तळमजल्याचे महत्व वाढेल. मला जेवढे सामान्य ज्ञान आहे त्याप्रमाणे मातोश्री बंगल्यामध्ये माननीय शिवसेनाप्रमुख दुसऱ्या मजल्यावर राहतात, श्री.उध्दवजी ठाकरे तिसऱ्या मजल्यावर राहतात. याचा अर्थ शिवसेना प्रमुखांचे महत्व कमी होत नाही. ते ज्या मजल्यावर राहतात त्या मजल्याला महत्व आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी म्हटले की, त्यांच्याजवळील माहिती त्या पटलावर ठेवतील. मी विनयाने सांगू इच्छितो की, माहिती पटलावर ठेवण्याचा अधिकार हा मंत्रीमहोदयांचा असतो, माननीय सदस्यांचा नाही. माननीय सदस्य त्यांच्याजवळील माहिती माननीय सभापतींकडे सादर करु शकतात.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आमदार निधीबाबतचा विषय मांडला आहे. अमरावती जिल्हयातील विधानसभा सदस्य श्री.बच्चू कडू यांना त्यांच्या स्थानिक विकास निधीतील 18 लाखाचा निधी पुढील आर्थिक वर्षात वापरण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्या जिल्हयात सातत्याने निवडणुका लागल्या होत्या. नगरपालिकांच्या निवडणुका संपल्यानंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या. त्यानंतर दर्यापूर विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक घेण्यात आली. त्यानंतर रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी संपूर्ण जिल्हयात आचारसंहिता लागू होती. त्यामुळे सातत्याने सहा महिने आचारसंहिता असल्यामुळे पुढील आर्थिक वर्षात निधी वापरण्यासाठी परवानगी देण्यात आली.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मी एक लाख रुपयांचा निधी दर्यापूर येथील एका चौकासाठी वितरित केला होता. पहिल्या वर्षी तो लॅप्स झाल्यामुळे पुन्हा पुढील वर्षी निधी दिला होता. रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची आचारसंहिता संपूर्ण अमरावती जिल्हयात लागू केल्यामुळे तो निधी वापरात आला नाही. तो एक लाख रुपयांचा निधी वापरण्यासाठी मुदत वाढवून दिली जाईल का? मला संबंधितांकडून निधी मिळावा म्हणून वारंवार पत्रे पाठविण्यात येत आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माझ्या बाबतीत सांगावयाचे झाले तर मी माझ्या आमदार फंडातून पुण्याच्या ससून हॉस्पिटलला ॲम्ब्यूलन्स घेण्यासाठी 8 लक्ष रुपये दिले होते. या गोष्टीला आता दीड वर्ष होऊन गेलेले आहेत. परंतु रेट कॉन्ट्रॅक्ट व शासनाच्या यंत्रणेमुळे माझे 8 लक्ष रुपये लॅप्स झालेले आहेत. माझे 8 लक्ष रुपये परत मिळावे यासाठी मी सन्माननीय अर्थमंत्र्यांना पुन्हा विनंती केलेली आहे. आमदार फंडाचा विनियोग करतांना जी दिरंगाई होते किंवा गलथानपणा होतो याची दखल घेण्याची आवश्यकता आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आमदार निधीचा विनियोग होतांना जी दिरगांई होते त्यासंदर्भात संबंधित खात्यांना आणि संबंधित अधिका-यांना यासंदर्भात निदेश देण्यात येतील. परंतु आपण जेव्हा आमदार निधीची कामे सांगतो तेव्हा आपल्याला दीड पट कामे सांगण्याची मुभा असते. आर्थिक वर्ष आपण 31 मार्च पासून पकडत असतो. तिजोरीतून निघालेला निधी 31 मार्च पर्यंत खर्च झाला नाही तर तो निधी पुढील वर्षी खर्च करण्याची मुभा देत असतो. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी अमरावतीच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत त्यासंदर्भात देखील निश्चितपणे विचार करण्यात येईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सेल्सटॅक्स विभागाच्या स्टाफिंग पॅटर्न बद्दल विचार मांडलेले आहेत. यासंदर्भात नुकतेच रिस्ट्रक्चरींग करण्यात आलेले आहे. माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी योग्य विचार मांडलेले आहेत. माहितीच्या अधिकारामध्ये ज्या प्रकारची माहिती मागविली जाते त्यातील बरीच माहिती विषयाला धरुन नसते. मधील काळात तर आम्हाला सुध्दा माहितीच्या अधिकाराखाली एक लेटर आले होते व त्यामध्ये म्हटले होते की, महाराष्ट्रातील सर्व मंत्री कोण-कोणत्या तारखेला दौ-यावर होते? दौ-यावर असतांना त्यांनी रात्रीचा मुक्काम कोठे केला ? त्यातील किती दिवस बी ॲड सी च्या रेस्ट हाऊसवर मंत्र्यांनी मुक्काम केला होता ? किती दिवस हॉटेलमध्ये मुक्काम केला होता ? त्या हॉटेलचे नाव काय होते ? अशा प्रकारची सर्व माहिती मागवली होती व ही सर्व माहिती आम्ही उपलब्ध करुन दिलेली आहे. सर्व मंत्री पारदर्शक असल्यामुळे काहीही अडचण आली नाही. झेरॉक्ससाठी बराच खर्च येत असतो. जेव्हा माहितीचा अधिकाराचा कायदा पास झाला होता तेव्हा झेरॉक्सचा खर्च संबंधित माणसाने करावयाचा होता. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले

.... Q 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ........

आहे की, ब-याच मोठया प्रमाणात झेरॉक्सचे पैसे मागितलेले आहेत परंतु बहुदा हे पैसे झ ेरॉक्सच्या खर्चासाठी मागितलेले असावेत. आता झेरॉक्सचे पैसे वाचविण्यासाठी बीपीएल धारकांच्या नावाने अर्ज केला जातो. माहितीच्या अधिकाराचा काही ठिकाणी दुरुपयोग सुध्दा होत आहे याबाबती सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. परंतु माहितीच्या अधिकाराचा फायदा सुध्दा अनेक ठिकाणी झाल्याचे आपल्याला दिसून आलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराच्या अमेंडमेंडसाठी सभागृहात चर्चा घडवून आणली तर त्यावर सन्माननीय सदस्य विचार मांडतील व यावरील सजेशन्स केंद्राला पाठविल्या तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, त्यामुळे अर्थ व नियोजन विभाग, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, हमारे वित्त मंत्री महोदय ने बताया कि विशेष परिस्थिति में उन्होंने मराठवाडा के एक आमदार का "आमदार फंड" रि-वेलिडेट किया है. मैं अगस्त 2006 में सदस्य हुआ और मई 2007 तक लगातार इलेक्शन हुए और इसमें रामटेक का लोकसभा चुनाव भी शामिल है तो इस दरमियान मेरा पूरा आमदार फंड लॅप्स हो गया है, ऐसा जबाब मुझे जुलाई 2007 में नागपुर के कलक्टर ने दिया है. इसलिए मेरा अनुरोध है कि अगस्त 2006 से मई 2007 तक की अवधि के दौरान मेरा जो आमदार फंड लॅप्स हुआ है, उसे रि-वेलिडेट किया जाए.

(उत्तर देण्यात आले नाही)

---------

.........यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम(भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याणराज्यमंत्री) :सभापती महोदय, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण या विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी कोणतीही चर्चा करण्यात आलेली नाही त्यामुळे त्याचे उत्तर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्यासबंधीच्या चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, श्री.संजय केळकर यांनी भाग घेतला असून आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की देवदासींच्या निर्वाह भत्यात 300 रुपयावरुन 500 रुपयापर्यत जी वाढ करण्यात आलेली आहे ती अत्यंत कमी असल्यामुळे ही वाढ एक हजार रुपये करण्यात यावी. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, हा निर्वाह भत्ता एक हजार रुपयापर्यंत वाढविण्यासबंधी राज्य सरकार जरुर विचार करणार आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अशी सूचना केली की राज्यामध्ये महिला कोष तयार करण्यात आला पाहिजे आणि आपण बचत गटांना 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. हा मुद्दा ग्राम विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे ग्राम विकास विभागाला त्या बाबतीत सांगण्यात येईल. त्याचबरोबर कुपोषणाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्यात यावी अशा प्रकारची एक मागणी या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी केली आहे त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, कुपोषणाच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढू असे आम्ही मागे सांगितले होते तेव्हा लवकरात लवकर श्वेतपत्रिका प्रसिध्द करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितले की, महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने महानगरपालिका आणि नगरपालिकांना अनुदान लवकर दिले पाहिजे मी त्या बाबतीत त्यांना सांगू इच्छितो की, महानगरपालिका आणि नगरपालिका यांना महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने अनुदान दिले जात नाही त्यामुळे त्यांना अनुदान देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या विभागाच्या ज्या पूरक मागण्या सभगृहासमोर मांडण्यात आलेल्या आहेत त्या मंजूर कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्रमांक 37 ते 41 अशा सात पुरवणी मागण्या असून एकूण 4 कोटी 83 लाख रुपये इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या आहेत. त्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, राज्यांतर्गत रस्ते आणि पुलाकरिता 1478 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्या निधीत वाढ करण्यात आली पाहिजे.त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, वित्त विभागाने 25 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला असून सर्व जिल्हयांना तो निधी समान वाटून दिला जाईल. तसेच तळोजा कारागृहाच्या सोयी सुविधा बाबत त्यांनी मुद्दा मांडला आहे तेव्हा या संदर्भात गृह विभागाकडून माहिती घेऊन त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल. सान्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सागितले की , 2005-2006 आणि 2007 या वर्षात अतिवृष्टीमुळे जवळजवळ 2705 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे आणि पूरहानीसाठी आतापर्यंत या विभागाला 734 कोटी रुपयांचा निधी मिळाला असून 1981 कोटी रुपयांची तूट आहे तेव्हा आगामी अर्थसंकल्पात प्लॅन आणि नॉन प्लॅनमधून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. या ठिकाणी साकव बांधण्याच्या योजनेचा उल्लेख त्यांनी केला होता. त्या बाबतीत मी खुलासा करु इच्छितो की, साकव बांधण्याची योजना जिल्हा स्तरीय योजना असून नवीन पध्दतीनुसार 2008 सालापासून नियोजन विभागाकडून आणि जिल्हाधिकाऱ्याकडून ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यानंतर एका गोष्टीचा मला खुलासा करावयाचा आहे की, रायगड जिल्हयात 2007-2008 साली पुरहानी दुरुस्तीसाठी 11 कोटी 31 लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे, राज्य क्षेत्रासाठी 7 कोटी 69 लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे आणि स्थानिक क्षेत्रासाठी 3 कोटी 72 लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी तळोजा येथील कारागृहाच्या धर्तीवर अन्य कारागृहाचे बांधकाम करावे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. ही बाब गृह विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागाकडून माहिती घेऊन त्या संबंधीचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी वसुंद्री पुलाचे काम पूर्ण करण्यासंबंधीचा मुद्दा मांडलेला आहे तेव्हा वासुंद्री पुलाच्या कामाच्या पूर्णत्वाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या जातील.त्याचबरोबर बौध्दवाडी -कोचरेवाडी - ब्राम्हणवाडी हा रस्ता नॉन प्लॅनमधील आहे. जिल्हा नियोजन समितीने



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे

श्री.रविशेठ पाटील ...

याबाबतचा निर्णय घेतला पाहिजे. 2008-2009 सालापासून जिल्हाधिकारी ही योजना राबविणार आहेत.सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी नवीन मुंबईतील पोलीस वसाहतीच्या संदर्भातील एक मुद्दा उपस्थित केला आहे. पोलीस वसाहतीचे बांधकाम कोठे करावयाचे कसे करावयाचे याचा निर्णय गृह विभागाने घ्यावयाचा असतो आणि तो निर्णय आम्हाला कळविल्यानंतर आमच्या विभागामार्फत बांधकाम केले जाते. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री गोपीकिसन.बाजोरिया यांनी चांदूर रेल्वे - कौलखेड रस्त्यावरील जुन्या पुलाच्या पुर्नबांधणीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे.....

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, चांदूररेल्वे हा वेगळा तालुका आहे. मी चांदूर गावाचा उल्लेख केला होता . तेव्हा चुकीचे रेकॉर्डवर राहू नये यासाठी योग्य ती दुरुस्ती करण्यात आली पाहिजे.

श्री.रविशेठ पाटील : ठीक आहे त्याप्रमाणे दुरुस्त करण्यात येईल आणि चांदूरगाव येथील जुन्या पुलाच्या बाबतीत जी काही सुधारणा करावयाची असेल त्यानुसार सुघारणा करु आणि त्यासंबंधीचा योग्य तो निर्णय सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील ....

चांदूर गावाचा जो जुना पूल आहे त्याबाबत सुधारणा करावयाची आहे, तो पूल दुरूस्त करून त्याची माहिती आपल्याला कळविण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने आपल्याला सांगतो. तसेच पुढे जाऊन मी आपल्याला हेही सांगू इच्छितो की, असे जे जुने पूल आहेत त्यांची दुरूस्तीदेखील डीपीडीसी कडून मान्यता घेऊन करण्याचा आपला प्रयत्न राहील. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी या जुन्या पुलांवरून जास्त क्षमतेची माहिती जातात त्यामुळे पूल नादुरूस्त होतात हे लक्षात घेऊन त्याबाबत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. त्यावर जड वाहनांना बंदी करावी किंवा कसे याबद्दल निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर त्यांनी ओरोस येथील रेस्ट हाऊसच्या देखभाल दुरूस्तीचाही मुद्दा येथे उपस्थित केला आहे. त्याबाबत मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, सदर विश्रामगृहाची रंगरंगोटीचे काम आपण आताच पूर्ण केलेले आहे. तेव्हा सभापती महोदय, माझ्या विभागाच्या सर्व मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात एवढीच विनंती मी आपल्याला करतो.

***

..... एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MMP/ श्री. गायकवाड नंतर --- 11:30

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम विभाग- सार्वजनिक उपक्रम) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यात बाब क्रमांक 37 ते 43 बाबत आमच्या सहकारी राज्यमत्र्यांनी येथे खुलासा केलेला आहे. परंतु या विभागाच्या पुरवण मागण्यांवर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी पेडर रोडवरील उड्डाण पूलासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, पेडर रोड वरील उड्डाणपूल बांधण्यासाठी जेवढ्या काही एनओसीज आपल्याला पाहिजे होत्या त्या सर्व विभागांकडून एनओसीज मिळालेल्या आहेत, केवळ पर्यावरण विभागाची एनओसी मिळणे बाकी आहे. पर्यावरण विभागाने एनओसी देण्यापूर्वी अशी अट टाकली होती की, आमच्या विभागाने सदर पूल बांधण्यासंबंधात मुंबईतील रजनतेला जाहीर आवाहन करून त्यांच्याकडून हा पूल तेथे व्हावा की न व्हावा त्याबाबत सूचना व मते मागवून घ्यावीत. त्यादृष्टीने आम्ही 4-5 दिवसापूर्वीच जाहीर आवाहन केले होते आणि लोकप्रतिनिधींना देखील त्यादृष्टीने पत्र पाठवून त्यांचीही मते मागवून घेतली आहेत, लोकांनाही सांगितले आहे की, त्यांनी या संबंधातील त्यांच्या सूचना, मते द्यावीत. मला आपल्याला सांगण्यास आनंद होतो की, मोठ्या प्रमाणात जनतेने आमच्या आवाहनाला प्रतिसाद दिला असून अनेकांनी अतिशय चांगल्या सूचना दिलेल्या आहेत आणि त्या साऱ्या सूचनांचा, मतांचा अभ्यास करून त्यांचा समावेश म्हणा वा उपयोग आपल्याला कसा करता येईल याचाही आम्ही निश्चितपणे विचार करू. शेवटी पर्यावरण विभागाची या पुलासाठी एनओसी मिळाल्यानंतर, 4.35 कि.मी.लांबीचा हा पूल 4 पदरी होणार असून त्यासाठी अंदाजे 200 कोटी रूपये त्याची किंमत राहणार आहे, त्याचे कामाला सुरूवात आम्ही करणार आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मागील वेळेस देखील सांगितले होते की, सर्व विभागांच्या एनओसीज या पुलासंबंधात मिळाल्या आहेत केवळ चौपाटीजवळून जो या पुलाचा भाग जाणार आहे त्या संबंधात काही आक्षेप आहेत. खरे तर तेथील श्रीमंत लोकांनी स्वत:च्या जाहिरात कमाईसाठी जे सारे चालविले आहे. तेथील आपला वॉकवे आपण केला तेव्हा त्याला पर्यावरण विभाग कोठे आडवा आला नाही मात्र केवळ 2 कि.मी.लांबीचा हा पूल होणार आहे तर लगेच त्यात तेथील हे श्रीमंत लोक आणि आपला पर्यावरण विभाग आड येतो आहे. तेथील प्रत्येकाच्या खिडकीला एसी लावलेला आपण पाहतो आहोत. तेव्हा पर्यावरण विभागाच्या एनओसीचा मुद्दा आपण त्या संदर्भात कोठे लक्षात घेत नाही. ..

..... एस 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, पर्यावरण विभागाच्या क्लिअरन्ससाठी आम्ही अप्लाय केलेला आहे आणि त्यावेळीच त्यांनी या बाबत जनतेचा सल्ला, सूचना व मते घ्याव्यात अशी सूचना आम्हाला केली होती त्यादृष्टीने आम्ही मते-सूचना मागविल्या असून त्या आधारे आम्ही आमचेही मत त्यांच्याकडे दिले आहे. तेव्हा त्या विभागाकडूनही एनओसी मिळाल्यानंतर या चार पदरी पूलाच्या कामाला आपण सुरूवात करू.. केवळ पर्यावरण विभागाचीच एनओसी मिळणे यामध्ये बाकी आहे, अन्य सर्व विभागांच्या एनओसीज मिळालेल्या आहेत, एवढेच मला आपल्याला सांगावयाचे होते.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपला हेतू आणि भावना सर्वांनाच मान्य आहेत,ख परंतु त्याची व्यवहार्यता आणि संकेत तपासून पाहिले पाहिजेत अन्यथा शासनाला तेथे काहीच करता येणार नाही हेही आपण लक्षात घ्यावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण शंभर टक्के पेडर रोडवरील उड्डाण पूल करणार आहोत. मात्र तत्पूर्वी सर्व फॉर्मेलिटीज पूर्ण करण्याचा जो भाग आहे तो आपण पूर्ण करीत आहोत इतकेच. बाकी माझ्या सहकारी राज्यमंत्र्यांनी आपल्यापुढे स्पष्टीकरण दिलेलेच आहे. तरी आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो.

***

( यानंतर श्री.सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रिफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यामधील बाब क्रमांक 53 ते 60 सभागृहापुढे मंजूरीसाठी आहेत....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी विषय उपस्थित केला होता त्यावेळी आपण पीठासीन अधिकारी होता. त्यावेळी विधी व न्याय विभाग चर्चेच्या यादीमध्ये नसल्याचे सांगण्यात आले. तसेच, संबंधित मंत्री देखील सभागृहात उपस्थित नव्हते.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागामध्ये त्या विभागाचा समावेश आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांबाबत सर्व विभागांची नावे कार्यक्रम पत्रिकेमध्ये छापण्यात येतात. त्याबाबत एक सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. या कार्यक्रम पत्रिकेमध्ये संबंधित मंत्रिमहोदयांचे नाव आणि त्यांच्यापुढे त्यांच्या खात्याचे नाव छापले तर ते जास्त सोयीस्कर होईल. त्यामुळे कुणाचीही अडचण होणार नाही अशी माझी सूचना आहे.

श्री. हसन मुश्रिफ : सभापती महोदय, माझ्या विभागाच्या सर्व मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापति महोदय, अन्न व नागरी पुरवठा की मागणी के संबंध में माननीय सदस्य श्री. सरपोतदार, श्री. दीपक सावंत और श्रीमती नीलम गो-हे ने विलेज ग्रेन बँक स्कीम के बारे में मुद्दा उपस्थित किया. यह स्कीम पहाड़ी क्षेत्र, ट्राइबल क्षेत्र और दुष्कालग्रस्त क्षेत्र के लोगों के लिए है. लोगों को अनाज मिलने में दिक्कत होती है, इसलिए यह स्कीम बनाई गई है और 1377 लोगों ने इसमें भाग लिया है. इसका उद्देश्य यह है कि जब अनाज वक्त पर नहीं मिलता तो 30-40 लोग मिलकर एक ग्रुप बनाते हैं और उनको इस बँक से एक क्विंटल अनाज मिलता है. जब उनके पास अनाज आ जाता है तो वे बँक को अनाज वापस कर देते हैं. मैं सभागृह से विनंती करता हूँ कि अन्न व नागरी पुरवठा विभाग की मांगणी क्रमांक 73,74 और 76 को मान्यता प्रदान की जाए.

---------

......T3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या मागण्यांसंदर्भात माझा सकाळी गोंधळ झाला होता. याबाबत सचिवांना विचारले असता त्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागांमध्ये विधी व न्याय विभागाचा समावेश आहे. हे अनेक माननीय सदस्यांना माहीत नसल्यामुळे त्यांना या विभागावर आपले विचार मांडता आले नाही. तेव्हा दुपारच्या सत्रामध्ये विधी व न्याय विभागाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता माननीय सदस्यांना संधी मिळाली पाहिजे. नाही तर नकळत त्यांचे हक्क हिरावून घेतल्यासारखे होणार आहे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. हसन मुश्रिफ : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी परळी येथील न्यायालयासंबंधी आपले विचार मांडले आहेत. त्याचप्रमाणे आणखी दोन-तीन माननीय सदस्यांनी माझ्या विभागावर आपले विचार मांडले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, त्या माननीय सदस्यांना आपण पुन्हा बोलण्याची संधी द्यावी.

----

....T4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्राम विकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, अरविंद सावंत यांनी माझ्या विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सिटी स्कॅन मशिन केव्हा खरेदी केले? त्यांची खरेदीची ऑर्डर केव्हां दिली? याबाबत प्रश्न उपस्थित केले होते. सिटी स्कॅन मशिनची ऑर्डर दि.29.3.2007 रोजी दिली होती, सदर मशिन दि.27.7.2007 रोजी प्राप्त झाले आणि दि.17.3.2008 रोजी त्या मशिनचे इन्स्टॉलेशन आणि कमिशनिंगचे काम झाले आहे. सदरहू मशिनचे इन्स्टॉलेशन झाल्यामुळे गोंदिया जिल्हयातील लोकांना त्याचा लाभ मिळाला आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी दोन प्रश्न उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, बीड जिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत. बीड जिल्हयाच्या स्टाफींग पॅटर्नप्रमाणे फक्त एकच बाल रोग तज्ज्ञ डॉक्टरचे पद रिक्त आहे. त्या व्यतिरिक्त इतर सर्व डॉक्टर्सची पदे भरली आहे. त्याचप्रमाणे लॅप्रोस्कोपिक मशिन उपलब्ध नसल्यामुळे स्टरिलायझेशन होत नाही असेही त्यांनी विचारले आहे. त्यांना सांगू इच्छितो की, त्याठिकाणी तीन स्टरिलायझेशनची यंत्रणा उपलब्ध आहे. त्यामुळे बीड जिल्हयातील हॉस्पिटलमध्ये लॅप्रोस्कोपिक स्टरिलायझेशन होत आहे, अशाप्रकारे अनेक जिल्हा रुग्णांलयांमध्ये ही यंत्रणा सुरु आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:40

श्री.रणजित कांबळे . . . .

सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, लॅप्रोस्कोपिक सर्जरी होतात किंवा नाही ? याबाबतीत सांगावयाचे तर राज्यातील कोणत्याही हॉस्पिटलमध्ये लॅप्रोस्कोपिक वापरुन एक्सेप्शनलाईज करीत नाही.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मलेरिया आणि डेंगुच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे की, मुंबई शहरामध्ये फार मोठया प्रमाणावर . . . .

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मी बीड येथील उप केंद्राच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्याची माननीय मंत्री महोदय माहिती देणार आहेत काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय,मी ही माहिती उद्या देतो. सन्माननीय सदस्य मधुकर चव्हाणसाहेबांनी मुंबई शहरामध्ये मोठया प्रमाणावर डेंगु आणि मलेरियाची वाढ झाली असून मृत्यूची संख्या देखील वाढलेली आहे. हे खरे आहे की, 1961 मध्ये मुंबईमध्ये 374 कर्मचारी होते. ते आज देखील तिकडे आहेत. पण महत्वाचे म्हणजे मुंबईतील लोकांच्या आरोग्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेवर येते. ही गोष्ट खरी आहे की, लोकसंख्येची वाढ लक्षात घेता मुंबई महानगरपालिकेने ज्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांची भरती करावयास हवी होती, ती त्यांनी आतापर्यंत केलेली नाही. त्यामुळे आम्ही या चर्चेच्या अनुषंगाने पुन्हा एकदा स्मरणपत्रे देऊ.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांची चुकीची माहिती दिलेली आहे. सगळया महाराष्ट्रात फक्त . . . .

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी सध्या फक्त मुंबईबाबत बोलत आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत नंतर माहिती देतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी महाराष्ट्राच्या संबंधात 374 बाबत उल्लेख केला आहे. मुंबईच्या बाबतीत आकडेवारी दिलेली नाही. 1961 मलेरिया विभागामध्ये 374 कर्मचाऱ्यांची भरती झाली होती, तेवढेच कर्मचारी आज 2007 मध्ये देखील आहेत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मला असे वाटते की, सन्माननीय सदस्यांचा थोडा गैरसमज झालेला आहे असे वाटते. याचे कारण असे की, मलेरिया विभागाचे जे कर्मचारी आहेत ते आज सब सेंटर्स्‌मध्येच आहेत. आपण फवारणी कर्मचाऱ्यांबाबत सांगितले. आता त्यांचा तेथे मल्टीपरपज वर्कर्स् म्हणून समावेश झालेला आहे. ग्रामीण भागामध्ये, राज्यातील इतर भागांमध्ये ते

. . . .यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

मल्टीपरपज वर्कर्स् म्हणून काम करतात. त्या व्यतिरिक्त आमच्याकडे फवारणी कर्मचारी देखील उपलब्ध आहेतच. आम्हाला जेव्हा-जेव्हा गरज भासते, तेव्हा-तेव्हा त्यांना कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर घेतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी तीन-चार प्रश्न उपस्थित केले. एक मुद्दा असा आहे की, कराड हॉस्पिटलमध्ये आय.सी.यु.बंद होते. त्याठिकाणी फिजीशिअनचे पद रिक्त असल्याने काही काळ तेथील आय.सी.यु.बंद होते. पण आता ते पद भरलेले असून सध्याच्या स्थितीत कराड ग्रामीण रुग्णालयामध्ये आय.सी.यु.सुरु आहे याची मी खात्री देऊ इच्छितो. त्या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांनी "नेकनोर" महिला हॉस्पिलटलच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता की, सध्या हे हॉस्पिटल बंद असून, त्याठिकाणी डिलीव्हरी होत नाहीत. मी सन्माननीय सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की, या हॉस्पिटलमध्ये मागच्या वर्षी 146 आणि सध्या एप्रिल 2007 ते फेब्रुवारी 2008 पर्यंत 240 डिलीव्हरीज् झालेल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे की, . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : यामध्ये मुले किती ? मुली किती आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, यासंबंधातील सविस्तर माहिती माझ्याकडे नाही. पण सन्माननीय सदस्यांना हवी असेल तर ती माहिती घेऊन सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, बीड जिल्हयामध्ये किती सब सेंटर्स् आहेत ? त्यातील किती बंद अवस्थेमध्ये आहेत ? बीड जिल्हयामध्ये एकंदर 280 सब सेंटर्स् आहेत आणि ती सर्व चालू स्थितीत आहे. कदाचित सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांची स्पेसिफीक तक्रार असेल तर मला किंवा माननीय मंत्री महोदयांना सांगितली तर ती बाब पुन्हा एकदा तपासून घेऊ. तसेच माननीय आरोग्य मंत्री या स्वत: त्या जिल्हयातील आहेत. त्यामुळे मला खात्री आहे की, त्या स्वत: यामध्ये लक्ष घालणारच आहेत आणि त्यांचे तसे पूर्ण लक्ष देखील आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हॉस्पिटलच्या खाजगीकरणा-बाबत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ संपत आलेली आहे. परंतु दहा मिनिटे सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

. . . .यु-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी यासंबंधात सभागृहाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, याबाबत माननीय मंत्री महोदयांच्या चेंबरमध्ये बैठक घेऊ. सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या दृष्टीने येथील हॉस्पिटलच्या खाजगीकरणाच्या संबंधात उपस्थित केलेला मुद्दा फारच महत्वाचा आहे. यासाठी माननीय मंत्री महोदयांच्या चेंबरमध्ये चॅरिटी कमिशनर यांना बोलावून याची चर्चा करण्यासाठी एक बैठक घेऊ. परंतु आमच्याकडे अशी काही माहिती नाही. पण सन्माननीय सदस्यांकडे माहिती आहे. त्यामुळे याबाबतीत एकत्र बैठक घेऊन, यासंबंधात शासनाला जी काही पावले उचलावी लागतील, ती आम्ही स्वाभाविकपणे उचलणारच आहोत. तसेच सन्माननीय सदस्यांनी एम.जी.पी.हॉस्पिटलबाबत सुध्दा प्रश्न उपस्थित केला.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ......

मी सांगितले की, हे मिल वर्कर्स असोसिएशन आणि गारमेंट असा ट्रायपार्टी ट्रस्ट आहे. आपल्या युनियनतर्फे किंवा एम.जी.पी. ट्रस्ट यांनी ठराव केला. केंद्र शासनाचे जे धोरण आहे त्याप्रमाणे इतर लोकांसाठी ते हॉस्पिटल खुले करण्यासाठी ॲक्टमध्ये बदल करण्याची गरज आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेब वारंवार पाठपुरावा करीत आहेत. मी माननीय केंद्रीय मंत्रिमहोदयांशी स्वतः चर्चा केली. त्यांनी सांगितले की, आपण नियोजन करावे. त्यामध्ये तीन मजले शासकीयसाठी आणि 3 मजले इएसआयएससाठी असे प्रपोजल तयार केले आहे. परंतु प्रत्यक्षात कायद्यामध्ये बदल करावयास पाहिजे. जोपर्यंत कायद्यामध्ये केंद्र शासन बदल करणार नाही तोपर्यंत त्याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे ते लवकरात लवकर करणार आहेत. आमचा त्यांच्यासोबत पाठपुरावा चालू आहे. आमची अशी इच्छा आहे की, ते एम.जी.पी. हॉस्पिटल लोकांसाठी खुले झाले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत शासन लक्ष घालील. मी सदनाला विनंती करतो की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : अकोला येथील एक्स्प्रेस फिडरचा मुद्दा उपस्थित केला होता.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सगळ्या ग्रामीण रुग्णालयांमध्ये जनरेटर आहेत. 390 प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इन्व्हर्टर आहेत. शेवटी बारा बारा तास लोडशेडिंग होते त्यामुळे ग्रामीण रुग्णालयांमध्ये अडचण निर्माण होणार. दररोज बारा बारा तास लोडशेडींग झाल्यानंतर पी.एल.फंडातून किती खर्च करावाचा याबाबतीत मर्यादा आहेत. असे घडले असेल तर शासन याबाबतीत लक्ष घालील.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काही मुद्दे उपस्थित केले. त्यामध्ये महिला लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यामध्ये 1 प्रशिक्षण केंद्र होणे आवश्यक आहे. याबाबतीत शासन लक्ष घालील. ज्या महिला सदस्या आहेत त्यांच्या प्रशिक्षणाबाबत आम्ही लक्ष घालू. मी आपल्या वतीने सभागृहाला विनंती करतो की, ग्रामविकास विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

-----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

ॲड. प्रितमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी प्रतिक्षानगर येथे कोड क्रमांक 191 मधील सदनिका वितरणाबाबत श्रीमती सुषमा संजय गुप्ता यांना म्हाडाकडून कर्जासाठी एन.ओ.सी. दिली नाही याबाबतीत मुद्दा उपस्थित केला. मी याबाबत स्पष्ट करु इच्छितो की, सदर सदनिका मुळात श्री. नवीनभाई चावडा यांना वितरित करण्यात आली होती. त्यांनी 2 लाख 22 हजार 250 रुपये इतकी रक्कम भरली होती.

श्री. मधुकर चव्हाण : अधिकारी आपल्याला चुकीची माहिती देत आहेत.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : माझ्याकडे माहिती आहे. मी सांगितले की, त्यांना सदनिका वितरित करण्यात आली होती. त्यांनी 8 लाख 45 हजार 250 रुपये भरावयाचे होते. त्यापैकी त्यांनी 25 टक्के म्हणजे 2 लाख 22 हजार 250 रुपये भरले होते. ही मूळ वितरित करण्यात आलेली सदनिका त्यांची होती. श्रीमती सुषमा गुप्ता या वेटिंग लिस्टवर होत्या. त्यांनी मुदतीमध्ये पैसे न भरल्यामुळे त्यांची वितरणपत्रिका रद्द करण्यात आली होती. परंतु त्याच्या विरुध्द त्यांनी मला मुदतवाढ द्यावी असा अर्ज म्हाडामध्ये केला होता. त्याला म्हाडाने मुदतवाढ दिली नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर.....

एप्रिल महिन्यामध्ये त्यांनी माझ्याकडे येऊन अर्ज केला. त्यामुळे मी म्हाडाच्या अधिका-यांना आणि त्यांनाही बोलवून एक बैठक घेतली होती. त्यांना मुदतवाढ का दिली नाही अशी विचारणा मी म्हाडाच्या अधिका-यांकडे केली होती. ते मूळ वितरक होते म्हणून त्यांना संधी दिली पाहिजे असे मी अधिका-यांना सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी पूर्ण पैसे भरले आहेत....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : माननीय मंत्रिमहोदय हे घटनाक्रम सांगत आहेत.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : श्रीमती सुषमा गुप्ता यांना म्हाडाच्या अधिका-यांनी पैसे भरण्यास सांगितले होते. त्या दोन महिन्याच्या काळामध्ये श्रीमती गुप्ता यांनी सुध्दा पैसे भरले आहेत. परंतु मूळ सदनिकेचे त्यांना वितरण केले असल्यामुळे...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी मंत्रिमहोदयांचा पूर्ण आदर राखून सांगतो की, आपण जी माहिती देत आहात ती आपली चूक नाही, कारण ती माहिती अधिका-यांनी दिलेली आहे. सभापती महोदय, संपूर्ण सभागृहाची दिशाभूल होत आहे. श्रीमती गुप्ता या महिलेला शासनाने उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये ही सदनिका श्री.चावला यांना दिली होती असे कोठेही लिहिलेले नाही. पहिल्यांदा श्री.चावला यांनी नियोजित वेळेमध्ये ही सदनिका घेतली नाही, ही जी माहिती देत आहेत ती सगळी श्रीमती गुप्ता यांना का दिली नाही ? श्रीमती गुप्ता यांनी 2 लाख 1 हजार 134 रुपये भरले आहेत. तसेच त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना 17 पत्रे लिहिली आहेत. ही पत्रे मी माननीय मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी आणली आहेत, त्यावर मुख्यमंत्री कार्यालयाचे स्टॅम्प आहेत. त्यांनी त्यात असे म्हटले आहे की, आपण मला का एनओसी देत नाही ? माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे निवेदन दिले आहे ते श्रीमती गुप्ता यांना द्यावयास पाहिजे होते. पणन संचालक यांचे दिनांक 25.10.2007 चे माझ्याकडे पत्र आहे. त्यात असे म्हटले आहे की,'अर्जदार श्रीमती सुषमा संजय गुप्ता यांना मंजूर करण्यात आलेल्या कर्जाबाबत. उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती सुषमा संजय गुप्ता, संकेत क्र.191, प्रतिक्षा नगर, सायन हया योजनेतील त्या यशस्वी अर्जदार आहेत. त्यांनी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



18-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W-2

श्री.मधुकर चव्हाण.....

कार्यालयाच्या देकार पत्रास अनुसरुन सदनिकेच्या विक्री किंमतीपोटी 25 टक्के रकमेचा भरणा केलेला आहे. अर्जदार श्रीमती सुषमा गुप्ता यांच्या सदनिका वितरणाच्या प्रक्रियेत प्रशासकीय अडचण निर्माण झाली असल्याने हे कार्यालय सद्य:स्थितीत त्यांना...' ही माहिती त्यांना सांगितली नाही. जर श्री.चावला यांचा क्लेम होता तर श्रीमती गुप्ता यांच्याकडून 2 लाख रुपये का घेतले ? तसेच श्री.चावला यांचा अधिकार आहे असे कोठेही लिहिलेले नाही. जर विवक्षित कालमर्यादेच्या आत पैसे भरले नाही तर.....

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ संपत आली आहे. माननीय सदस्य हे अन्य मार्गाने हा प्रश्न उपस्थित करु शकतात, हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री.मधुकर चव्हाण : सभागृहाच्या पटलावर चुकीची माहिती येऊ नये एवढी माझी इच्छा आहे.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, दोघांनीही पैसे भरलेले आहेत. ही बाब कायदेशीर सल्लागार यांच्याकडे पाठविलेली आहे, त्यावर निर्णय होईल. परंतु दोघांनाही सदनिकेचे वितरण केलेले नाही. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.बजोरिया यांनी वांबी घर योजनेबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ही योजना बंद झालेली आहे. हे आपल्याला माहिती आहे. पण या योजनेतील घरे अपूर्ण राहिलेली आहेत. त्या घरांसाठी अतिरिक्त 10 हजार रुपयांचा निधी ठेवलेला आहे. त्यातून अपूर्ण घरे पूर्ण करण्यात येतील. सभागृहाला विनंती करतो की, गृहनिर्माण विभागाच्या मागण्यां मान्य करण्यात याव्यात.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नगरपालिकांमध्ये ज्या वस्त्या आहेत त्यांच्या सुधारणांचे काम शासनाने सुरु केलेले आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, सस्पेंशन मेडिसिन आणि सायरप शासन घेत आहे. तसेच वसतिगृहाचा निर्वाहभत्ता देण्याचे राहिले असेल तर तो दिला जाईल. सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक 96 ते 105 वर आपले विचार मांडले आहेत, या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या तसेच जलसंधारण विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपलेली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

(11.55 ते 12.00 सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

-----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ प्रथम श्री. शिगम 12:00

<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**खेड (ग्रामीण) (जि.रत्नागिरी) येथील लोटे परिसरातील औद्योगिक कारखान्यांनी रसायनमिश्रित पाणी लोटे परिसरात सोडण्याबाबत**

**(1) * 37418 श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , डॉ. वसंत पवार** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खेड (ग्रामीण) (जि.रत्नागिरी) येथील लोटे परिसरातील औद्योगिक कारखान्यांनी रसायनमिश्रित पाणी लोटे परिसरात सोडल्यामुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असले व त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होत असल्याचे, जानेवारी, 2008 च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, तसेच पोलीस ठाण्यात तक्रार केली असल्याचेही उघडकीस आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री. गणेश नाईक यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) व (4) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. माहे डिसेंबर, 2007 मध्ये स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पहाणीमध्ये दोषी आढळून आलेल्या उद्योगांपैकी 2 उद्योगांना दि. 22/12/2007 रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच इतर 8 उद्योगांना उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर यापैकी 7 उद्योगांच्या सुनावणीमध्ये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37418....

प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुधारण्याबाबत आढावा घेवून व बँक हमी घेवून उत्पादन पुन्हा सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उर्वरित एका उद्योगाकडून कोणताही ठोस प्रस्ताव प्राप्त न झाल्याने बंदचे आदेश कायम आहेत.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न मी गेल्या चार अधिवेशनापासून सभागृहात मांडतो आहे. गेल्या दोन अधिवेशनापूर्वी सभागृहात असे ठरले होते की, लोटे परिसरातील औद्योगिक कारखान्यांकडून त्या परिसरात रसायनमिश्रीत पाणी सोडले जाते,त्यामुळे तेथे मोठया प्रमाणात प्रदूषण निर्माण होते आहे याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी सभागृहातील सदस्यांची समिती गठीत करण्यात येऊन ती समिती त्या ठिकाणी भेट देईल. परंतु आजपर्यंत समितीने त्या परिसरास भेट दिलेली नाही. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी माननीय मंत्री महोदयांकडून या विषयाच्या बाबतीत बैठक आयोजित केली जाते. ती बैठक ऐनवेळी रद्द सुध्दा केली जाते....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 12:05

ता.प्र.क्र. 37418 पुढे सुरु.....

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, आम्ही आमचे सगळे दौरे ॲडजेस्ट केले तरी या समितीचा दौरा फायनल होत नाही. या परिसराची पाहणी करण्यासाठी जी आमदारांची समिती नेमली होती ती माननीय सभापतींच्या निदेशानुसार नेमली होती. माझा प्रश्न असा आहे की, या समितीचा दौरा नेमका कधी आयोजित केला जाणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला ती वस्तुस्थिती आहे. कोकणातील आमदारांसमवेत लोटे-परशुराम येथे एक बैठक झाली होती. लोटे-परशुराम येथे बैठक घेण्याची मागणी केली होती त्यावेळी मंत्रीमहोदयांनी त्याला होकार दिला होता. बैठक झाली होती.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव म्हणतात ते खरे आहे. बैठक झाली परंतु समितीने प्रत्यक्षात भेट देणे महत्वाचे आहे. मुंबईत बैठक घेणे वेगळे आणि प्रत्यक्ष पाहणी करणे वेगळे आहे. समितीने या भागाला प्रत्यक्ष भेट देणे आवश्यक आहे सभापती महोदय, मुळात प्रश्न विचारण्यात आला आहे की. एमआयडीसी लोटे-परशुराम या भागात सीईटी प्लॅन्ट बसविण्यात येणार आहे काय ? हा प्लॅन्ट 2004 साली बसविण्यात आला होता परंतु तो बंद पडला. त्याचा काहीच उपयोग झाला नाही. आता अद्ययावत प्लॅन्ट बसविणार आहोत असे शासनाकडून सांगितले जाते. प्रत्यक्षात हा प्लॅन्ट कधी बसविण्यात येणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील :सभापती महोदय, सीईटी प्लॅन्ट एमआयडीसीमध्ये बसविण्याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. लवकरच हा प्लॅन्ट बसवावा असे आम्ही त्यांना ठामपणाने सांगितले आहे.

**सभापती** : कोकण विभागातील अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. सन्माननीय लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ या भागाला कधी भेट देणार आहे ते माननीय मंत्रीमहोदयांनी सांगावे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला अचूक उत्तर कसे येईल आणि त्यांची अपेक्षा कशी पूर्ण होईल हे मंत्रिमहोदयांनी पहावे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब आमदारांसमवेत बैठक घेतली जाईल आणि याबाबतीत योग्य तो निर्णय ताबडतोब घेतला जाईल.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37418 पुढे सुरु...

श्री. भास्कर जाधव :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विचारल्याप्रमाणे आमदारांसमवेत या भागाचा दौरा आयोजित करण्याबाबत शासनाने नोंद घ्यावी.सीईटी प्लॅन्ट बसविला जाणार आहे असे सांगण्यात आले. एक-दीड महिन्यापूर्वी या ठिकाणी सगळे अधिकारी गोळा झाले होते. त्यांनी सांगितले की हे पाणी व्यवस्थितपणे आणि चांगल्या प्रकारची ट्रीटमेंट करुन वापरीत आहोत. नागरिकांनी आग्रह धरला की पाणी पिऊन दाखवा. कोणीही पाणी पीत नव्हते. स्थानिक सरपंचांनी हे पाणी प्यायल्यानंतर तेथल्या तेथे ते बेशुध्द झाले आणि त्यांना रुग्णालयात हलवावे लागले एवढा वाईट परिणाम या पाण्यामुळे होत आहे. पाणी अतिशय भयानक आहे. मासे मरत आहेत. शासन याची दखल घेणार आहे किंवा नाही ?

श्री. रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सांगितलेली परिस्थिती बरोबर आहे. पाणी अशुध्द आढळून आल्यावर शासनाने संबंधितांवर ताबडतोब ॲक्शन घेतली आहे. या कारखान्याला नोटीस दिलेली आहे. या भागातील जवळजवळ 8 कारखाने बंद केल्यानंतर सुनावणी घेतली. या भागातील पाणी अशुध्द आहे हे मला मान्य आहे. म्हणूनच आम्ही संबंधित कारखान्यांवर ॲक्शन घेतली आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37418.........

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, एखाद्या कारखान्याला शासन परवानगी देते, त्यावेळी त्या भागातील पाणी अशुध्द होऊ नये याची दक्षता घेण्याची जशी आपली जबाबदारी आहे त्याप्रमाणे पाणी अशुध्द होत असेल तर ते शुध्द केले पाहिजे, या संदर्भात जे दखल घेणार नाहीत त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करणे हा उपाय आहे यादृष्टीने शासनाने काय केले असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.रविशेठ पाटील : शासनाने एमआयडीसीकडे प्रस्ताव दिला असून सी.ई.टी.प्लॅट बरोबर नाही. तो सी.ई.टी.प्लॅट चालल्याशिवाय सदर कारखाने चालू करु नका अशी सक्त ताकीद दिली आहे.

**सभापती** : मी हा प्रश्न राखून ठेवीत आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील मुरबाड शहर व तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीकडे पिण्याचे पाणी शुध्द करण्याची यंत्रणा नसल्याबाबत**

**(२) * ४०९३२ श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड शहर व तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीकडे पिण्याचे पाणी शुध्द करण्याची यंत्रणा नसल्याने जनतेस अशुध्द पाणी प्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील पिण्याचे पाणी शुध्द करण्याची यंत्रणा राबविणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप सदर तालुक्यातील शुध्द पाणी करण्याची यंत्रणा राबविण्यासाठी कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मुरबाड या शहरामध्ये अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. आज अनेक ग्रामपंचायतींकडे टीसीएल पावडर उपलब्ध नाही. पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा कोणकोणत्या ग्रामपंचायतीमध्ये आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, टीसीएल पावडर किंवा शुध्द पाणी पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. जिल्हा परिषद टीसीएल पावडर खरेदी करुन प्रत्येक ग्रामपंचायतीला पुरवित असते. त्यामुळे ग्रामपंचायतीकडे टीसीएल पावडर उपलब्ध नाही असे म्हणणे योग्य नाही. तेथे टीसीएल पावडर उपलब्ध आहे.

श्री.मंदा म्हात्रे : सभापती महोदय, खालच्या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.गोटीराम पवार यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. बऱ्याच ग्रामपंचायतींकडे टीसीएल पावडर उपलब्ध नाही. असली तरी उन्हाळ्यामुळे पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. बऱ्याच ग्रामपंचायतींकडे पाणी शुध्दीकरण यंत्रणा नाही.

श्री.रणजित कांबळे : मुरबाड तालुक्यातील फक्त एका ग्रामपंचायतीकडे फिल्टरेशन प्लॅंट असून तो प्रायोगिक तत्वावर बांधण्यात आला आहे व सध्या त्या ग्रामपंचायतीकडून या प्लॅंटचा वापर होत नाही. मुरबाड तालुक्यात 79 पाणीपुरवठा योजना असून त्यापैकी 37 योजनांचा सरफेस

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्त्रोत आहे. जेव्हा अशा योजना उभारल्या जातात त्यावेळी फिल्टरेशन प्लँट बसविणे, त्यासाठी येणारा खर्च, टेक्नीकल स्टाफ लक्षात घेऊन फ्रेंच गॅलरीच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो व टीसीएल पावडरचा पुरवठा केला जातो. मुरबाड तालुक्यात 37 पैकी 36 योजनांमध्ये फ्रेंच गॅलरी आणि टीसीएल पावडरच्या माध्यमातून पाणी शुध्दीकरण केले जाते.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांचा हा प्रश्न आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, बहुतेक ठिकाणी पाण्याची व्यवस्था आहे. त्या भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात खूप तक्रारी आहेत. मी मंत्रीमहोदयांना विनंती करु इच्छितो की, ग्रामीण भागातील शुध्द पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात जी काही व्यवस्था आहे त्या व्यवस्थेचा आढावा घेऊन पुढील अधिवेशनापर्यंत तो अहवाल सभागृहाला सादर करणार का?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मुरबाडचे सन्माननीय आमदार श्री.गोटीराम पवार यांनी गेल्याच महिन्यात मुरबाड ग्रामपंचायतीची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने तेथे सुधारित नळपाणी पुरवठा योजना करावी अशी मागणी केली होती. सदर योजना देखील म.जि.प्रा.मार्फत करावयाची म्हणून मुरबाड शहरात जल शुध्दीकरण केंद्र प्रस्तावित केले आहे. इतर बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. मागच्या वेळी खालच्या सभागृहात हाच प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.गोटीराम पवार यांनी उपस्थित केला होता.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40932....... श्री. अजित पवार.....

परंतु त्याच्या नंतर तेथे असणाऱ्या एकूण तालुक्यांमध्ये 79 योजना आहेत, त्यामध्ये भू-पृष्ठावरील 37 आणि भू-पृष्ठाखालील 42 योजना आहेत. या सर्व योजनांबद्दल साठवण, जागा, विहिरी, ब्लिचींग पावडर व निर्जंतुकीकरण करणे हे काम वेळोवेळी करण्यात येते व आरोग्य खात्यामार्फत पाण्याची तपासणी देखील करण्यात येते. आता यापैकी तेथे कुठलीही अडचण दिसत नाही. मुरबाड तालुक्यामध्ये साथीजन्य रोगाची लागण झाल्याचे कानावर आले नाही. म्हणजे लागण झाल्यानंतरच लक्ष द्यावयाचे असेही नाही पण स्वच्छ पाणी देण्याच्या दृष्टीने टी.सी.एल. पावडर टाकून पाणी स्वच्छ करुन देणे अशी खबरदारी हा विभाग नेहमीच घेतो. त्यासाठी वेगळी बैठक घेण्याची गरज नाही, असे मला वाटते.

श्री. केशवराव मानकर : महोदय, पिण्याच्या पाण्यासारखा महत्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला आहे. मी गेल्या चार अधिवेशनात किमान तीन वेळा मानिवली या एकाच ग्रामपंचायतीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित केला होता. या ग्रामपंचायतीमध्ये नळ योजना असताना सुध्दा तेथे पिण्याचे पाणी मिळत नाही. स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविण्याची जबाबदारी शासनाची असेल तर ज्या ग्रामपंचायतींना अशुध्द पाणीपुरवठा होतो आणि त्यांचे प्रश्न येथे उपस्थित झालेले आहेत त्या त्या ग्रामपंचायतींना कधीपर्यंत शासन शुध्द पाण्याचा पुरवठा करणार आहे ?

श्री. अजित पवार : महोदय, मानिवली ग्रामपंचायतीकडे जल शुध्दीकरण केंद्र आहे पण तेथील ग्रामपंचायत त्याचा वापर करीत नाही. कारण त्यांच्याकडे दैनंदिन देखभाल करणारी यंत्रणा नाही तसेच त्याचा खर्च त्यांना परवडत नाही. शेवटी ग्रामपंचायतीचे उत्पन्न किती यावर त्या त्याचा खर्च बेअर करु शकतात, अशी परिस्थिती आहे. म्हणून त्या ग्रामपंचायतींची आर्थिक कुवत पाहूनच जल शुध्दीकरण केंद्र शासन देत असते. परंतु अशी एखाद्या ग्रामपंचायतीने स्वत:हून मागणी केली की, या योजनेच्या मेंटेनन्सचा खर्च करण्याची आमची तयारी आहे आणि त्यांनी मागणी केली तर असे केंद्र शासनामार्फत देण्यात येईल.

--------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**काळुंद्रे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ओ.एन.जी.सी. कंपनीमध्ये**
**नोकर भरती करताना प्रकल्पग्रस्तांना डावलल्याबाबत**

**(3) * 37576 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **रोजगार व स्वयंरोजगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) काळुंद्रे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ओ.एन.जी.सी. कंपनीमध्ये विविध पदांसाठी करण्यात येणाऱ्या भरतीमध्ये पनवेल येथील सेवायोजना कार्यालयाने प्रकल्पग्रस्तांना डावलण्यात आले हे खरे आहे काय,

(2) दिनांक 31 मे, 2007 रोजी यासंबंधी पनवेलचे लोकप्रतिनिधी यांनी सेवायोजन कार्यालयात जावून संबंधित अधिकारी एस.जी.पवार यांना जाब विचारला असता पवार यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल माफी मागितली हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने या अधिकाऱ्याबद्दल कोणती कारवाई केली आहे तसेच होणाऱ्या भरती प्रक्रियांसंबंधीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.सतीश चतुर्वेदी** : (1) हे खरे नाही. तेल व नैसर्गिक वायु महामंडळाने केलेली मागणी ही प्रकल्पग्रस्तांच्या राखीव जागांसाठी नव्हती असे मागणीपत्रावरुन दिसून येते. सदर जागा या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व सर्वसाधारण प्रवर्गाच्या असल्यामुळे मागणीपत्रकानुसार, तसेच नोंदणीपटावर नोंद झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, शारिरीक योग्यतेप्रमाणे उमेदवारांची पाठवणी नियमानुसार केलेली होती.

(2) मा.विधानसभा सदस्य श्री.विवेक पाटील सुमारे 80 ते 100 कार्यकर्त्यांना घेऊन पनवेल सेवायोजन कार्यालयात गेले होते. जमावाच्या आक्रमक पवित्र्यामुळे, श्री.पवार यांनी घाबरुन, कार्यालयात काही अनुचित प्रकार घडू नये व निर्माण झालेला तणाव कमी करण्याकरीता माफी मागितली आहे.

(3) नियमानुसार पाठविलेल्या याद्या रद्द करण्याची चुकीची कार्यवाही केल्याने, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

नियोक्त्याकडून पुन्हा दिनांक 26.10.2007 च्या पत्रान्वये सदर रिक्त पदे भरण्याकरीता, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पनवेल या कार्यालयाकडे मागणीपत्र प्राप्त झाले आहे. त्यास अनुसरुन सदर कार्यालयाने, दिनांक 16.11.2007 च्या पत्रानुसार एकूण 978 पात्र उमेदवारांची यादी नियोक्त्याकडे पाठविली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात जे प्रकल्प आले आहेत, त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिले पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे. असे असताना ओएनजीसी कंपनीने रिक्त जागा भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागविली. परंतु त्या यादीमध्ये प्रकल्पग्रस्त एकही नव्हता. ही यादी बनविताना शासनाने ठरविल्यानुसार प्रकल्पग्रस्तांची मुले, पदवीधर आणि इंजिनिअर्स झालेले आहेत त्यांचा समावेश करुन फेर यादी बनविण्यासंबंधीचे धोरण शासन घेणार काय ?

....3



PFK/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. भोगले 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37586....

श्री. सतीश चतुर्वेदी : महोदय, ओएनजीसीने ज्या पध्दतीने रिझर्वेशनप्रमाणे यादी मागविली त्याप्रमाणे सेवायोजन कार्यालयाने ती पाठविली. त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या रिझर्वेशनचा समावेश नव्हता. प्रकल्पग्रस्तांची यादी जिल्हाधिकाऱ्यांकडून पाठविण्यात येते. सेवायोजन कार्यालयामार्फत रिझर्वेशनप्रमाणे यादी पाठविण्यात येते. आता पुन्हा जी यादी केली आहे त्यात 22 प्रकल्पग्रस्तांची नावे आहेत आणि प्रकल्पग्रस्तांसंबंधीचे शासनाचे जे धोरण आहे म्हणजे रिझर्वेशन नुसार आवश्यकतेप्रमाणे जिल्हाधिकारी आणि सेवायोजन कार्यालयाकडून यादी पाठवावी व तशी ती पाठविली जाते. येथे आमदार विवेक पाटील 100 लोक घेऊन गेले होते व त्यांच्याकडे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी माफी मागितली व अगोदरची यादी रद्द केली. ती यादी वेबसाईटवर पाठविली जाते. पुन्हा ओएनजीसीने मागितली आणि आता सिलेक्शन प्रक्रिया सुध्दा झालेली आहे व त्यात प्रकल्पग्रस्तांची नावे आहेत, ही प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37576 .........**

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, खास करुन वर्गश्रेणी 3 आणि वर्ग 4 मधील नोकर भरतीच्या वेळी साठी सेवायोजन कार्यालयाकडून नोकरभरती केली जावी, असा कायदा आहे.. त्यामुळे मला या निमित्ताने विचारावयाचे आहे की, या ठिकाणच्या एकूण प्रकल्पग्रस्तांची संख्या किती आहे, जे उमेदवार या ठिकाणच्या पदांसाठी लायक होते अशा लायक उमेदवारांचा डाटा तयार करण्यात आला होता का, ज्या पदासाठी नोकर भरती करावयाची होती त्या पदासाठी प्रकल्पग्रस्त पात्र होते का, असल्यास त्यांची नावे पाठविण्यात आली होती का, नावे पाठविण्यात आली नसमील तर का पाठविण्यात आला नाहीत ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या पदांसाठी जे उमेदवार पात्र होते अशा पात्र उमेदवारांचा डाटा पाठविण्यात आला होता. यामध्ये कोणत्याही पात्र उमेदवांराना डावलण्यात आलेले नाही. सुरुवातील 22 उमेदवारांची नावे पाठविण्यात आली होती.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी प्रकल्प ग्रस्तांची एकूण संख्या किती होती ? एकूण किती प्रकल्प ग्रस्तांना नोकरी देण्यात आली ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यापक प्रश्न विचारलेला आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगानेच मी प्रश्न उपस्थित केलेला आहे. या ठिकाणच्या एकूण प्रकल्पग्रस्तांची संख्या किती आहे? ओ.एन.जी.सी. मध्ये ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्यांना या कंपनीमध्ये प्राधान्याने नोकरी मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या ठिकाणी एकूण प्रकल्पग्रस्तांची संख्या किती व त्यातील किती प्रकल्प ग्रस्तांना या कंपनीमध्ये रोजगार मिळालेला आहे. जे या पदासांठी लायक होते, अशा किती उमेदवारांना डावलण्यात आलेले आहे?

श्री. सतीश चतर्वेदी : सभापती महोदय, जे पात्र उमेदवार होते अशा 22 उमेदवांराची नावे पाठविण्यात आली होती. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगतो की, तेल व नैसर्गिक वायु महामंडळाने केलेली मागणी ही प्रकल्पग्रस्तांच्या राखीव जागांसाठी नव्हती.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तसाच प्रश्न माझा सुध्दा आहे. या कंपनीमध्ये 978 पदे भरण्यात आलेली आहेत. या ठिकाणच्या पात्र प्रकल्पग्रस्तांना जाणीवपूर्वक डावलण्यात आले आहे काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37576** .........

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या ठिकाणी 978 पदांची भरती नसून या ठिकाणी 128 पदांची भरती होती. यासंदर्भात एकूण 978 उमेदवारांची नावे पाठविली होती. या पदांसाठी जे पात्र उमेदवार होते त्यांची नावे पाठविण्यात आलेली असून यामध्ये कोणत्याही पात्र उमेदवारांना डावलण्यात आलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, माननीय विधानसभा सदस्य श्री. विवेक पाटील सुमारे 80 ते 100 कार्यकर्त्यांना घेऊन पनवेल सेवायोजन कार्यालयात गेले होते. जमावाच्या आक्रमक पावित्र्यामुळे श्री. पवार यांनी घाबरुन माफी मागितलेली आहे. तसेच पुढे असेही म्हटले आहे की, नियमानुसार पाठविलेल्या याद्या रद्द करण्याची चुकीची कार्यवाही केल्याने संबंधित अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या ठिकाणच्या याद्या रद्द करण्याचे कारण काय तसेच या याद्या कोणी रद्द केल्या, पुन्हा तुम्ही या याद्या का मागवल्या ? या प्रकरणामध्ये श्री. पवार यांची चुक नसेल तर संबंधित अधिका-यांची चौकशी मागे घेतली जाईल काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात याद्या का रद्द करण्यात आलेल्या आहेत यांसदर्भात संबंधितांच्या विभागीय चौकशी सुरु आहे. विभागीय चौकशीची माहिती प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37576..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की," तेल व नैसर्गिक वायू महामंडळाने केलेली मागणी ही प्रकल्पग्रस्तांच्या राखीव जागासाठी नव्हती असे मागणीपत्रावरुन दिसून येते. " तेल व नैसर्गिक वायू महामंडळामध्ये काही पदे भरावयाची होती. या प्रकल्पासाठी तेथील लोकांनी जमिनी दिल्या होत्या. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना या महामंडळामध्ये प्राधान्याने नोकऱ्या दिल्या पाहिजेत. तेव्हा प्रकल्पग्रस्तांची यादी पाठवू नये असे तेल व नैसर्गिक वायू महामंडळाने असे सांगितले होते काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्ताना पाठविण्यात येऊ नये असे महामंडळाने कळविले असल्याचे उत्तरात म्हटलेले नाही. पनवेल येथील कार्यालयामध्ये नोंदविलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या 7 हजार 731 एवढी आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, प्रकल्पग्रस्तांना नोकरीत प्राधान्य देण्याच्या बाबतीत शासनाच्या स्टॅन्डीग ऑर्डर्स आहेत. पनवेल तालुक्यात ओ.एन.जी.सी.चा एक प्रकल्प आहे व त्या प्रकल्पासाठी तेथील काही लोकांच्या जमिनी गेल्या आहेत. त्यामुळे ते लोक प्रकल्पग्रस्त झाले आहेत. या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरी देण्याच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी मघाशी उत्तर दिल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांची यादी असते .त्याप्रमाणे ओ.एन.जी.सी.च्या प्रकल्पामुळे किंवा अन्य प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या लोकांची यादी जिल्हाधिका-यांकडे असते. ज्यावेळी एखाद्या कार्यालयात पदे भरत असतांना नावे मागविली जातात त्यावेळी सेवा योजन कार्यालयाकडून नावे मागतो किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील पुनर्वसन शाखेकडून सुध्दा नावे मागवत असतो. तेव्हा अशा प्रकारे त्यांच्याकडून काही नावे आली आहेत काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रकल्पग्रस्तांची यादी पाठवली जाते. सेवायोजन कार्यालयामध्ये ज्या पात्र उमेदवारांची नोंदणी केलेली आहे त्यामध्ये काही प्रकल्पग्रस्त असलेले सुध्दा उमेदवार आहेत.....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय,....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37576..

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्याला एक प्रश्न विचारण्याची संधी शेवटी देणार आहे. प्रकल्पग्रस्ताच्या प्रश्नांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याच भावना माझ्या आहेत. मी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न वेगवेगळया माध्यमातून अनेक वर्षे हाताळलेले आहेत. पुनर्वसन विभागाचा मंत्री म्हणून मी हे प्रश्न हाताळलेले आहेत तसेच एका मोठया प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्ता म्हणून सुध्दा मी हे प्रश्न हाताळलेले आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे त्या भावनेशी मी सहमत आहे. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, "ओ.एन.जी.सी.ने जी यादी मागितली होती त्यापैकी एक भाग सेवा योजन कार्यालयाकडून आलेला होता. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे असे म्हणणे आहे की, सेवा योजन कार्यालयामध्ये सुध्दा काही प्रकल्पग्रस्तांची नोंद असते. प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांकडे प्रकल्पग्रस्तांची यादी असणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे राज्य शासनाच्या स्टॅन्डी्ग ऑर्डर्स आहेत. सेवा योजन कार्यालयाकडून आलेल्या यादीपैकी काही जणांची नोंद प्रकल्पग्रस्त म्हणून आली तर ती इंटरटेन केली पाहिजे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली यादी सुध्दा इंटरटेन केली पाहिजे. अशा प्रकारचा हा इश्यू असल्यामुळे हा प्रश्न राखून न ठेवता याबद्दल मी माझ्या दालनात पाच सहा दिवसात बैठक बोलावतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये अनेक प्रकल्प घेण्यात आलेले आहेत.माननीय मंत्री महोदय या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत ती रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगत आहे की, ज्या प्रमाणे एखाद्या कार्यालयात पदे भरत असतांना सेवा योजन कार्यालयाकडून यादी मागितली जाते त्याच प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रकल्प बाधित व्यक्तीची जी यादी असते ती यादीसुध्दा स्वतंत्रपणे मागितली जाते. ओ.एन.जी.सी. जाणुनबुजून प्रकल्पबाधितांना बोलवत नाही. या प्रश्नाच्या बाबतीत आपण आपल्या दालनात बैठक बोलवत आहात व हा प्रश्न सोडविण्याचा निर्णय घेतला आहे याबद्दल मी आपला आभारी आहे. प्रकल्पग्रस्ताची यादी मागविण्याची गरज नाही आणि प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात येणार नाही असे रेकॉर्डवर आलेले आहे. ते काढून टाकण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

3..



VTG/ KTG/ SBT/ 12:25

ता.प्र.क्र.37576..

श्री.सतीश चतुर्वेदी :सभापती महोदय, ओ.एन.जी.सी. ने जे रिझर्व्हेशन ठरविले आहे त्या रिझर्व्हेशनप्रमाणे त्यांना उमेदवार हवे असून त्या नुसार त्यांनी वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती .इंडियन एक्सप्रेस आणि त्या सारख्या मोठ मोठया वर्तमानपत्रात त्यांनी जाहिरात दिली होती त्यानुसार काही लोकांनी अर्ज केले होते .......

नंतर श्री.सुंबरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37576 ....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या या उत्तरावरच माझा हरकतीचा मुद्दा आहे.... आपण मला बोलण्याची संधी द्यावी. ...

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांनी जी यादी पाठवावयाची होती ती यांनी एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कडून मागितली आणि त्यानंतर आमच्या खात्यावर प्रेशर टाकून त्यांनी यादी पाठवा म्हणून सांगितले. तसेच तेथील अधिकाऱ्यावर दबाव टाकला की ही यादी रद्द करा. हे देखील चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत माझ्या दालनामध्ये जेव्हा बैठक होईल त्यावेळेस आपण या बाबत सविस्तर खुलासा करून घेऊ शकता. ..

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण आपल्या दालनामध्ये जी बैठक बोलवाल त्यामध्ये संबंधित जिल्हाधिकारी आणि सर्व महसूल अधिकाऱ्यांनाही बोलवावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे जे उत्तर रेकॉर्डवर जात आहे ते शासनाच्या प्रचलित धोरणाच्या विरूद्ध आहे. कारण प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत कलेक्टर कार्यालयात जी यादी असते ती त्यांनी मागवावयाची असते. प्रकल्पग्रस्तांसाठी जाहिरात दिली वगैरे म्हणणे योग्य नाही. सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांची यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे असते आणि ती त्यांनी मागविली पाहिजे होती. पण आता मंत्री महोदय म्हणतात की, त्याची गरजच नाही., तर ते बरोबर नाही. तेव्हा असे सुधारित उत्तर रेकॉर्डवर आले पाहिजे असे मला वाटते.

**सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रकल्पग्रस्तांच्या अनुषंगाने जेव्हा जेव्हा त्या विशिष्ट प्रकल्पाच्या बाबतीत भरती राहते त्या त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेली प्रकल्पग्रस्तांची यादीच प्राधान्याने मागितली पाहिजे असे माझे यावर रूलिंग आहे.

***

..... इइ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथील नरखेड व काटोल तालुक्यात होत असलेले निकृष्ट बांधकाम**

**(4) * 37682 श्री.सय्यद जामा, श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. सुरेशदादा देशमुख** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथील नरखेड आणि काटोल तालुक्यात म्हाडाच्या जिल्हा परिषदेमार्फत बांधण्यात आलेल्या 30 बंधाऱ्यांच्या बांधकामाचे कंत्राट जि.प च्या लघु सिंचन विभागाने निकाजू कन्स्ट्रक्शन ला दिले होते त्यांनी निकृष्ट बांधकाम करून पैसे उचलले होते हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर कंपनीवर संबंधित विभागाने काही कारवाई केली असल्यास त्याचा तपशिल काय आहे,
(3) सदर प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) होय. तथापि सदर कंपनीला 14 कामांचे कंत्राट दिलेले आहे.
(2) पंचायत समिती नरखेड येथील खंडविकास अधिकारी यांनी दिनांक 29.12.2007 ला पोलीस स्टेशन नरखेड येथे प्रथम सूचना रिपोर्ट (FIR) दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, यह मामला बहुत गंभीर है. नागपुर स्थित नरखेड तथा काटोल तालुके में जिला परिषद के माध्यम से निर्माण किए गए 30 बंधारों के निर्माण का ठेका जिला परिषद के लघु सिंचाई विभाग ने निकाजू कंसट्रक्शन को दिया था. इस कंपनी ने खराब काम करके पैसा लिया है. इस संबंध में पंचायत समिति, नरखेड के खंड विकास अधिकारी ने दिनांक 19.12. 2007 को पुलिस स्टेशन, नरखेड में एफआयआर दाखिल की है लेकिन अभी तक कोई कार्रवाई नहीं की गई है. यह खुला भ्रष्टाचार है. मैं जानना चाहता हूं कि अब तक इस कंपनी पर कार्रवाई क्यों नही की गई है ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 29.12.2007 ला ही तक्रार नोंदविल्यानंतर काटोल येथील शाखा अभियंता श्री.सातपळे यांना अटक झाली होती आणि ते 7.1.2008 ते 14.2.2008 पर्यंत तुरूंगामध्ये होते. त्याचबरोबर नरखेडचे शाखा अभियंता श्री.पुरोहित हेही 11.1.2008 ते 7.2.2008 पर्यंत तुरूंगात होते आणि त्याशिवाय कार्यकारी अभियंता श्री.वेंकटराव हेही या प्रकरणात 3.1.2008 ते 7.1.2008 पर्यंत तुरूंगात होते. सभापती महोदय, यातील शाखा अभियंत्यांचे निलंबन ऑक्टोबरमध्येच झाले होते परंतु कार्यकारी अभियंता यांचे निलंबन मात्र फेब्रुवारी मध्ये झालेले आहे आणि सदरहू कंत्राटदार श्री.निकाजू हे अद्याप फरार आहेत.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37682 .........

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणात या कंत्राटदाराना पद्धतशीरपणे राजकीय दबावापोटी सहाय्य केले जात आहे. पहिली गोष्ट ही की, यांनी अफरातफर केलेली आहे आणि म्हणून आपण त्यांना ब्लॅक लिस्ट केले आहे काय ? तसेच या कंत्राटदाराची मोठी प्रॉपर्टी आहे हे सगळे आपल्याला माहिती आहे. असे असताना त्याच्या प्रॉपर्टीवर आपण टाच आणली असती तर तो लगेच सापडला असता. तो काही लहान माणूस नाही. तर मग आपले अधिकारी, पोलीस अधिकारी त्याचे समर्थन का करीत आहेत ? ज्याने 14 कामांमध्ये भ्रष्टाचार केलेला आहे त्याला संरक्षण का आपण देता ?

यानंतर श्री सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37682...

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, या ठेकेदाराला आपण काळया यादीमध्ये टाकले आहे काय? आणि तो जर सापडत नसेल तर त्याच्या मालमत्तेवर टाच आणण्याची कारवाई करणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संबंधित ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकण्याची कारवाई केली जाईल. त्याचबरोबर त्याला त्वरीत पकडण्यात यावे यासंबंधी पोलिसांना सूचना देण्यात येतील. जर तो पोलिसांना सापडला नाही तर त्याच्या मालमत्तेवर टाच लावण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, किती रकमेचा भ्रष्टाचार झाला आहे आणि तो केव्हा उघडकीस आला आहे?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आदिवासी उप योजनेमधील एकूण 30 बंधाऱ्यांच्या कामांकरिता रुपये 2 कोटी 58 लाख इतका निधी आला होता. यासंबंधी जुलै महिन्यामध्ये वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती. ऑक्टोबर महिन्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याबाबत तपासणी करुन शाखा अभियंता यांना निलंबित केले.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 29.12.2007 ला पोलीस स्टेशन नरखेड याच्याकडे प्रथम सूचना अहवाल सादर करण्यात आला. सदरहू आरोपी मार्च महिन्यात फरारी झाल्याचे सांगण्यात आले. या आरोपीला पकडण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आले?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शाखा अभियंता व संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणामध्ये 29 दिवसांपेक्षा जास्त दिवस तुरुंगामध्ये रहावे लागले. कार्यकारी अभियंता यांना तुरुंगात रहावे लागले. हा ठेकेदार फरारी असून त्याचा शोध सुरु आहे. तो जर सापडला नाहीतर पुढील कारवाई केली जाईल याचे उत्तर अगोदर दिले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## शेळी-मेंढी व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्याबाबत

**(५) * ३७९३० श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेळी-मेंढी व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्याच्या मागणीचा पाठपुरावा कृषी विभागाकडे करण्यात येईल असे आश्वासन दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी सभागृहात लक्षवेधीच्या चर्चेत देऊनही अद्याप त्यावर निर्णय झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेळी-मेंढी पालनास अद्याप कृषी उद्योगाचा दर्जा देण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. हसन मुश्रिफ, श्री.अनिस अहमद यांच्याकरिता : (१) होय.

(२) कृषि विभागाने कृषि प्रक्रिया उद्योगांना कृषि उद्योगाचा दर्जा देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. त्यामध्ये पशुसंवर्धनाशी निगडीत उद्योगचा समावेश होता. तथापि सदर निर्णय दिनांक १८.१.२००६ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला.

शेळ्या - मेंढ्या पालनास कृषि उद्योगाचा दर्जा दिल्यास उद्योजकास कोणकोणत्या सवलती द्याव्या लागणार व त्यापासून उद्योजकास कोणते फायदे व तोटे होणार आहेत याबाबतची शक्यता आजमावून पाहण्यात येत असून आवश्यकता वाटल्यास त्यानंतरच निर्णय घेण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दऱ्या खोऱ्यामध्ये रहाणाऱ्या मेंढपाळ करणाऱ्या समाजाकडून गेल्या २५ वर्षापासून सातत्याने मागणी केली जात आहे की, त्यांच्या उद्योगाला कृषी उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. माजी मंत्री श्री. शिवाजीराव शेंडगे उर्फ बापू हे आज हयात नाहीत. ते याविषयी मागणी करीत निघून गेले. आज त्यांची दुसरी पिढी पुन्हा तीच मागणी करीत आहे. याकरिता ज्यावेळी आम्ही मोर्चे, मेळावे आयोजित करतो त्यावेळी मंत्री त्याठिकाणी उपस्थित राहून केवळ घोषणा करतात आणि निघून जातात. चेंबूर येथे आयोजित केलेल्या मेळाव्याला तत्कालीन उद्योग मंत्री माननीय डॉ. पतंगराव कदम हे उपस्थित होते.एक वर्षाच्या आत शेळी-मेंढी व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्यात येईल. त्यावेळी आम्ही टाळया पिटल्या, ढोल वाजवून त्यांचा सत्कार केला. त्यानंतर सन २००५ मध्ये याबाबत लक्षवेधी सूचना सभागृहात मांडण्यात आली.त्यावेळी सांगण्यात आले की, याबाबत कृषी विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र. ३७९३०...

श्री. प्रकाश शेंडगे....

प्रश्न असा आहे की, गेल्या २५ वर्षापासून ज्या मागणीसाठी आम्ही सतत पाठपुरावा करीत आहोत ती मागणी सोडविण्यामध्ये शासनाला कोणती अडचण येत आहे. आपण कुक्कुट पालन व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा दिला, मत्स्य व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा दिला. असे असतांना या व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्यामध्ये कोणती अडचण येत आहे? उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, या व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा दिल्यास शासनाला कोणत्या सवलती द्याव्या लागतील याची शासनाला कल्पना नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. तेव्हा या व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा दिल्यास इतर उद्योगांना ज्या सवलती दिल्या आहेत त्या सवलती याही उद्योगाला देण्यात येतील काय?

श्री. हसन मुश्रिफ : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये धनगर समाजाची ३८ लाख कुटुबे या व्यवसायावर अवलंबून आहेत. इतक्या मोठया प्रमाणावर त्यांची संख्या असून बकऱ्या, शेळयांच्या मांसापासून व लोकरीपासून राज्याला फार मोठे उत्पन्न मिळत आहे. या व्यवसायाला कृषी विभागाने कृषी उद्योगाचा दर्जा द्यावा अशी मागणी असून त्याबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे लक्षवेधी सूचनेच्या वेळी उत्तर देतांना शासनाने सांगितले आहे. आज कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय या दोन्ही उद्योगांना कृषी उद्योगाचा दर्जा दिलेला आहे. त्याप्रमाणे याही उद्योगाला लवकरात लवकर म्हणजे सहा महिन्याच्या आत कृषी उद्योगाचा दर्जा मिळेल यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37930 . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी दुसऱ्या उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, "कृषी विभागाने कृषि प्रक्रिया उद्योगांना कृषि उद्योगाचा दर्जा देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. त्यामध्ये पशुसंवर्धनाशी निगडीत उद्योगाचा समावेश होता. तथापि सदर निर्णय दिनांक 18-1-2006 च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला." हा निर्णय पशुसंवर्धनाशी संबंधित जे कृषी उद्योग होते, त्याबाबतचा निर्णय रद्द करण्यात आला असे येथे म्हटलेले आहे आणि आता माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, आम्ही लवकरात लवकर उद्योगाचा दर्जा देण्याचा प्रयत्न करु." म्हणजे यातील खरे काय आहे ? जे उद्योग आहेत, त्यांना आपण वेगवेगळे पॅकेज देतो. पशुसंवर्धनाच्या संबंधातील जे उद्योग असतील मग तो दुधाचा धंदा असेल किंवा शेळी-मेंढीचा असेल किंवा गाईचा, म्हशीचा धंदा असेल, त्यांना उद्योगाचा दर्जा देत असताना आपण जो निर्णय घेतला तो रद्द करण्यात आला आहे. याची कारणे काय आहेत ? शेळी-मेंढी प्रकल्पाला उद्योगाचा दर्जा कमीतकमी किती दिवसामध्ये देणार आहात ? "लवकरात लवकर" हे शासनाचे नेहमीचे उत्तर आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, यासंबंधात 25 वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. ती मागणी पूर्ण होत नसेल तर या राज्यातील धनगर समाजावर हा अन्याय होत आहे. म्हणून आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून स्पेसिफीक उत्तर पाहिजे की, याबाबतीत आम्ही सहा महिन्याच्या आत निर्णय घेऊ. पशुसंवर्धनाशी संबंधित जे उद्योग असतील, त्यांना कृषी उद्योगाचा दर्जा देण्याचा जो निर्णय घेतला होता, तो रद्द करण्याची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय कृषी मंत्री देखील उपस्थित आहेत. म्हणून सहा महिन्याच्या आत माननीय कृषी मंत्र्यांबरोबर एकत्र बसून . . . .

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : एवढे महिने कशासाठी लागणार आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही या व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्याबाबत सहा महिन्याच्या आत निश्चितपणे निर्णय घेऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदत बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, जो निर्णय घेतला होता, तो रद्द करण्याची कारणे काय आहेत ?

. . . .2 जी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37930 . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कृषी विभागाने हा निर्णय 2006 मध्ये रद्द केलेला आहे हे खरे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा निर्णय रद्द का केला ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जादा सवलती द्याव्यात यासाठी रद्द केलेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, माननीय कृषी मंत्र्यांच्या बरोबर बैठक घेऊन सहा महिन्याच्या आत या व्यवसायाला उद्योगाचा दर्जा निश्चितपणे देऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

**सभापती** : मी सन्माननीय कृषी मंत्र्यांना विचारु इच्छितो की, यापूर्वी याबाबतचा निर्णय झाला होता. दरम्यानच्या काळामध्ये काही कारणास्तव हा निर्णय रद्द करण्यात आला. परंतु पूर्वी घेतलेला निर्णय पुन्हा विचारात घेण्याच्या दृष्टीने जो सहा महिन्याचा कालावधी सांगण्यात आला आहे, तो कमी करणे शक्य आहे काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा मूळ प्रश्न असा आहे की, . . . .

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना बोलण्यासाठी परवानगी देणार आहे. यापूर्वी माननीय कृषी मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आम्ही याबाबतीत तीन महिन्यामध्ये निर्णय घेऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मूळ प्रश्न असा विचारला होता की, कृषी विभागाने कृषी प्रक्रिया उद्योगांना कृषी उद्योगाचा दर्जा देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. पशुसंवर्धनाशी निगडीत उद्योगांचा त्यात समावेश होता. तथापि सदर निर्णय दिनांक 18-1-2006 या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला. तर सदरहू निर्णय रद्द करण्याची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मत्स्य उद्योगाचा आणि कुक्कुट पालनाच्या संबंधातील दोन्ही निर्णय तसेच आहेत.फक्त या उद्योगाच्या बाबतीतील निर्णय रद्द झाला, त्याची कारणे स्पष्ट

. . . .2 जी-3



APR/ KGS/ MMP/ 13:40

ता.प्र.क्र.38930 . . . .

श्री.हसन मुश्रीफ . . . .

होती की, निधीची तरतूद करणे, जादा काही फायदे देता येतात का ? हे पाहणे वगैरे. मघाशी माननीय कृषी मंत्री महोदयांनी तीन महिन्याच्या आत निर्णय घेऊ असे उत्तर दिलेले आहे आणि आम्ही तीन महिन्याच्या आत निर्णय घेऊ .

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37930 ......

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सहा महिन्यांच्या आत निर्णय घेऊ असे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले तसेच तीन महिन्यांमध्ये निर्णय घेऊ असे माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले. माझा छोटासा प्रश्न असा आहे की, तोपर्यंत हा जो शासन निर्णय आहे तो रद्द करण्यात आलेला आहे असे आजच्या आज सभागृहामध्ये जाहीर करण्यामध्ये काय अडचण आहे ? ज्या जास्त सवलती द्यावयाच्या त्या द्याव्यात परंतु त्यासाठी असलेल्या सवलती काढून घेणारा जो शासन निर्णय काढलेला आहे तो आजच्या आज रद्द करण्यामध्ये काय अडचण आहे ? अडचण नसेल तर शासन तो निर्णय रद्द करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : तो निर्णय का रद्द झाला हे मी सांगतो. राज्यात कृषी औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने नोव्हेंबर, 1998 मध्ये ॲग्रो ॲडव्हाँटेज परिषद आयोजित केली होती. त्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित धोरणामध्ये बदल करण्याचे तसेच काही सवलती देण्याच्या संदर्भात शासन निर्णयान्वये सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली. तथापी योजना तयार करताना आणि राबविताना शासन स्तरावर आणि क्षेत्रीय स्तरावर कोणत्याही स्वरुपाची सुस्पष्टता नसल्याने आणि या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही वित्तीय तरतूद करण्यात न आल्यामुळे ही योजना रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती आणि त्याप्रमाणे शासनाने निर्णय घेतला. जास्त सवलती देण्याच्या बाबतीत तीन महिन्यांच्या आत माननीय कृषी मंत्र्यांबरोबर बसून निश्चितपणे याला उद्योगाचा दर्जा देऊ.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, हा शेळी-मेंढी उद्योग आहे. आपण कोंबड्यांसाठी सवलती देतो. या महाराष्ट्रामध्ये आपण शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मोठ्या प्रमाणात सवलत देत आहोत. फक्त धनगरच समाजच नव्हे तर शेतकरी सुध्दा या व्यवसायावर अवलंबून आहेत. शेळी मेंढी व्यवसायाला उद्योगाचा दर्जा दिला तर वेगवेगळ्या प्रकारच्या सोयीसवलती मिळतील. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पुढील काही वर्षामध्ये मांसाची उपलब्धता कमी होणार आहे. खाण्यासाठी मांस इम्पोर्ट करावे लागेल. या व्यवसायाला उद्योगाचा दर्जा दिला तर सवलती मिळतील आणि शेळी पालन व्यवसाय वाढेल. शासन ते लवकरात लवकर करणार काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37930 ......

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे तसेच शेंडगे कुटुंबियांची सातत्याने ही मागणी होती. आपण दरवर्षी 77,487 मे.टन मांस उत्पादित करतो तसेच 1620 मे. टन लोकर उत्पादित करतो. हे खरे आहे की, मांसाची वाढती मागणी लक्षात घेता त्याचे शॉर्टेज येईल की काय अशी भीती आहे. याला उद्योगाचा दर्जा मिळाल्यानंतर काही सवलती मिळतील. मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, तीन महिन्यांमध्ये याचे चांगले पॅकेज, धनगर समाजाला सुध्दा......

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांना कर्जमाफी देत आहोत. मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना सुध्दा देत आहोत. धनगर समाजाला सुध्दा जास्तीत जास्त लाभ मिळाला पाहिजे यादृष्टीने शासन प्रयत्न करील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, दिनांक 31 मार्च, 2005 रोजी या विषयावर चर्चा होत असताना महाराष्ट्राचे उदयोन्मुख नेते आणि भविष्यातील मुख्यमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे यांना सभागृहात सांगितले होते की, आपल्याला उद्योगाचा दर्जा दिला जाईल. त्यांनी घोषणा केली. त्यानंतर धनगर समाजाने त्यांना घोंगडे पांघरले आणि त्यांनी ते स्वीकारले. हा सत्कार स्वीकारल्यानंतर आधी जे सवलती देण्याचे धोरण होते ते रद्द करुन टाकले. डॉ. पतंगराव कदम यांच्याबद्दलची नाराजी म्हणून ते रद्द केले का ? सभापती महोदय, आपण तारखा बघाव्यात. 31 मार्चला माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात सांगितले आणि 18.1.2006 ला निर्णय रद्द केला. 31 मार्चला सभागृहात चर्चा सुरु होती तेव्हा 18.1.2006 ला निर्णय रद्द झाला हे माननीय मंत्रिमहोदयांना माहीत नव्हते काय ? जर त्यांना माहीत असेल तर त्यांनी सभगृहाची दिशाभूल का केली ? आपण तारखा बघाव्यात. सभापती महोदय, हे काय चालू आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37930.... श्री.नितीन गडकरी....

कृषी विभागाचा संबंधित निर्णय रद्द करावयाचा आणि नंतर पॅकेज द्यावयाचे असे सरकारचे धोरण आहे. विदर्भासाठी दिलेल्या पॅकेजचे काय झाले ते सगळयांना माहीत आहे. त्याचा साधा लिफाफा सुध्दा मिळत नाही. माननीय श्री.अनिस अहमद हे पशुसंवर्धन मंत्री आहेत. त्यांच्या खात्याने शिफारस केलेली आहे, तरी सुध्दा त्याची अंमलबजावणी होत नाही. हे अधिवेशन संपण्याच्या आत शेळी-मेंढी व्यवसायाला कृषी उद्योगाचा दर्जा देण्यात येईल असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्यासाठी थोडासा वेळ लागेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, वेळ कशासाठी पाहिजे ?

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागा सोडून घोषणा देत असतात. )

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, सम्माननीय सदस्यों ने धनगर समाज को न्याय देने की बात कही है. मैं यह बताना चाहता हूं कि सरकार ने हमेशा धनगर समाज को मदद करने की बात कही है. इसलिए आज ही कृषि मंत्री के साथ बैठक लेकर और उस बैठक में जितने सम्माननीय सदस्य आना चाहते हैं वे आ सकते हैं, उनके साथ बैठक लेकर अधिवेशन समाप्त होने के पहले निर्णय लेंगे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाच्या धोरणाबाबत आम्ही निषेध व्यक्त करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात. )

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**जालना जिल्हा परिषद अंतर्गत लघुसिंचन उपअभियंता श्री.सानप यांनी बदनापूर व जालना तालुक्यातील कोल्हापूर पद्धती बंधारे दुरुस्ती कामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(६) * ३७७६५ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त, श्री. धनाजी साठे , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७१० ला दिनांक १९ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा परिषद अंतर्गत लघुसिंचन उपअभियंता श्री.सानप यांनी बदनापूर व जालना तालुक्यातील कोल्हापूर पद्धती बंधारे दुरुस्ती कामात झालेल्या भ्रष्टाचारा संदर्भात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात येत आलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त झालेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार यातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) होय.

(२) व (३) याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत ७ कामापैकी ५ कामामध्ये प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामांपेक्षा जास्त मोजमापे नोंदवहीत नोंदविले असल्याचे आढळून आले आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, याप्रकरणी एकूण किती रकमेचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाला आहे ? याप्रकरणी जबाबदारी निश्चित करुन किती अधिका-यांविरुध्द कारवाई सुरु करण्यात आली आहे आणि ती किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एकूण 7 कामे होती. ही कामे 1992 ते 2007 सालापर्यंत निरनिराळया कालावधीत पूर्ण झाली आहेत. 2007 च्या पावसाळयामध्ये बांधाचा भाग वाहून गेला होता त्याच्या दुरुस्तीचे काम घेण्यात आले होते. हे काम 18 लाख 32 हजार रुपयांचे होते. परंतु या कामाचे मोजमाप करण्यात आले त्यावेळी त्यात 20,538 रुपयांची तफावत आढळली. त्यामुळे कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि दोन शाखा अभियंता यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याकरिता दोषारोप पत्रे मागविली आहेत.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, याप्रकरणी संबंधितांना निलंबित का करण्यात आले नाही ?

श्री.बाळासाहेब थोरात : ही 7 कामे झालेली आहेत. परंतु त्या कामांची तपासणी 15 महिन्यानंतर झालेली आहे. या 7 कामांमध्ये 20 हजार 500 रुपयांची तफावत आढळली आहे. निलंबनाची कारवाई करण्यासारखी ही बाब नाही.

------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**पुणे महानगरपालिकेच्या एअर क्वॉलिटी मॅनेजेंट सेलच्या वतीने मांजरी, हडपसर, सोमवार, पेठ येथे केलेल्या सर्व्हेक्षणात घरात एलपीजी गॅस व्यतिरिक्त इतर इंधनाचा वापर करणाऱ्यांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याबाबत**

**(७) * ३७६४३ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. धनाजी साठे , श्री.राजन तेली :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या एअर क्वॉलिटी मॅनेजेंट सेलच्या वतीने मांजरी, हडपसर, सोमवार, पेठ येथे ऑगस्ट, २००७ रोजी केलेल्या सर्व्हेक्षणात घरात एलपीजी गॅस व्यतिरिक्त इतर इंधनाचा वापर करणाऱ्यांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा पध्दतीने घरातील प्रदुषण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी राज्यशासन जनजागृती मोहिम राबविणार आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतचा थोडक्यात तपशील काय आहे,
(४) अशा पध्दतीची मोहीम राज्यशासन राबविणार नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.गणेश नाईक यांच्याकरिता** : (१) प्राथमिक पाहणीनुसार हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर सर्व्हेक्षण जनजागृतीचा भाग म्हणूनच प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, एअर क्वॉलिटी मॅनेजमेंट सेलच्या वतीने प्रदूषणाच्या संदर्भात सर्वेक्षण करण्यात आले आहे त्यामध्ये काय आढळून आले ? शासन जनजागृतीची मोहिम राबविणार आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सर्वेक्षणामध्ये केरोसिन, एलपीजी, गॅस, लाकूड याद्वारे होणारे प्रदूषणाचे प्रमाण अनुक्रमे १९ टक्के, ४० टक्के, ३१ टक्के आढळले आहे.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सर्वेक्षणाच्या अहवालाचे स्वरुप काय आहे आणि जनजागृती मोहिम राबविली जाणार आहे काय आणि त्याचे स्वरुप काय आहे ?

श्री.रविशेठ पाटील : याबाबतीत तातडीने जनजागृती मोहिम राबविण्यात आली आहे. इंधनामुळे आरोग्यावर होणारे परिणाम विचारात घेता यासंबंधी योग्य ते उपाय योजण्यात आले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 37643...

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : मी अहवालाचे स्वरुप काय, असा प्रश्न विचारला होता. माझ्या माहिती प्रमाणे या प्रदुषणामुळे सकाळी उठल्यानंतर श्वास घेण्यास त्रास होणा-या लोकांचे प्रमाण 54 टक्के आहे. सतत कफ होणा-यांचे प्रमाणे 87 टक्के आहे. सतत छातीत दुखणा-यांचे प्रमाण 69 टक्के आहे, घसा दुखणा-या महिलांचे प्रमाण 77 टक्के आहे, सर्दी खोकला होणा-यांचे प्रमाण 75 टक्के आहे. हे प्रमाण गंभीर आहे यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रदुषणामुळे गरिबांच्या आरोग्याचे किती नुकसान होते याची आकडेवारी सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. याठिकाणी रॉकेल आणि लाकडाचा उल्लेख करण्यात आला. विदर्भामध्ये दगडी कोळसा वापरला जातो. त्यामुळे कार्बन पोल्यूशन जास्त प्रमाणावर होते. आदिवासी विभागामार्फत आदिवासींना एलपीजी गॅस शेगड्या आणि सिलेंडर्स मोफत उपलब्ध करुन दिले जातात. तेव्हा गरीब लोकांच्या आरोग्याची बाब लक्षात घेता सर्वसामान्य गरीब लोकांना एलपीजी गॅस कनेक्शन आणि सिलेंडर्स मोफत देण्याबाबत सरकार एखादी योजना हाती घेणार आहे काय ?

श्री. रविशेठ पाटील : याबाबतीत सरकार योग्य ते धोरण आखील.

**सभापती** : आर्थिकदृष्टया दुर्बल लोकांना मोफत गॅस कनेक्शन देण्यात येईल काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. तेव्हा त्यानुषंगाने उत्तर द्यावे.

श्री. रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल.

डॉ. दीपक सावंत : पर्यावरणाच्यादृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. प्रदुषणामुळे आरोग्यावर होणा-या घातक परिणामाबाबतची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री. रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी दिलेली माहिती बरोबर आहे.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उल्हासनगर, जि.ठाणे येथील उल्हास नदीच्या खोऱ्यातील**
**९० टक्के पाणी फुकट जात असल्याबाबत**

**(८) * ३८१८८ श्री. संजय दत्त , श्री. शरद रणपिसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, जि.ठाणे येथील उल्हास नदीच्या खोऱ्यातील ९० टक्के पाणी फुकट जात असतानाही हे पाणी वाचविण्यासाठी कोणती कार्यवाही होत नसताना अशातच कृष्णा पाणी वाटप तंटा लवादाने २० टक्के पाणी कपातीची सूचना दिल्याने तेथील शेती उत्पादनाबरोबरच ठाणे आणि रामगड मधील नागरिकांना पाण्याची तीव्र टंचाई भासणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय वा त्यात त्यांना काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) दिनांक १ जानेवारी, २००८ पासून उल्हास नदीतून पाणी वापरणाऱ्या शहरी भागास १४ टक्के कपात लागू करण्यात आली आहे इतर भागांत नाही.

(२) व (३) ठाणे, जिल्ह्यातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, नवी मुंबई या महानगरपालिकांना व अंबरनाथ, बदलापूर या नगरपालिकांना उल्हासनदी उद्‌भव घेवून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केल्या आहेत. उल्हास नदीमध्ये टाटा कंपनीच्या आंध्र धरणातून व बारवी धरणातून पाणी सोडण्यात येते. तथापि, दिनांक १५ ऑक्टोबर, २००७ ते १५ जुलै, २००८ या कालावधीत कृष्णा तंटा लवादानुसार टाटा कंपनीच्या आंध्र धरणामधील भिवपूरी विद्युत केंद्रातून उल्हासनदीमध्ये कमी पाणी उपलब्ध होणार आहे. सदर तुट भरुन काढण्याकरीता खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. टाटा कंपनी भिवपूरी विद्युत निर्मिती केंद्रात २x१२ मे.वॅट स्थापित क्षमतेचे स्टॅन्डबाय विद्युत संच सुरु ठेवण्यास जलसंपदा विभागाने मान्यता देवून स्थापित क्षमता ७२ मे. वॅट वरुन ९६ मे. वॅट पर्यंत झाली, त्यामुळे उल्हासनदीच्या पात्रात अतिरिक्त ३०द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध करण्यात आले आहे.

२. मोरबे धरणातील फिल्टर प्लॅन्टचे काम पूर्ण झालेनंतर सुमारे ७० द.ल.लि./प्र.दि. नवी मुंबईस पाणी पुरवठा होणार असल्याने परिणामी उल्हासनदी पात्रातील पाण्याची बचत होवून पाण्याची तूट कमी होण्यास मदत होणार आहे.

ठाणे महानगरपालिकेस भातसा धरणातून दिनांक १ मे, २००८ पासून ४० द.ल.लि./प्र.दि. पाणी पुरवठा होणार असल्याने पाण्याची तूट कमी होण्यास मदत होईल.

वरीलप्रमाणे उपाययोजून प्रथम जी २० टक्के पाणी कपात करण्यात येत होती. ती आता १४ टक्के इतकी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38188....)

श्री. संजय दत्त : या प्रश्नाशी संबंधित असलेल्या प्रश्नावर मागील आठवड्यामध्ये चर्चा झाली होती आणि सन्माननीय मंत्री महोदय श्री. अजित पवार यांनी त्या चर्चेला समर्पक उत्तर दिले होते. जिल्हयात पाणी टंचाई निर्माण झाल्याची दखल घेऊन त्यांनी बैठक देखील बोलावलेली होती. निश्चितच ठाणे जिल्हयातील लोकांच्या त्यांच्याकडून वेगळया अपेक्षा आहेत. ठाणे जिल्ह्यातील एकूण पाणी टंचाईची परिस्थिती पाहता ही पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना करण्याचे निश्चित केले आहे ? तसेच शॉर्टटर्म आणि लाँग टर्म मेझर्सबाबत मंत्री महोदय माहिती देतील काय ?

श्री. रणजित कांबळे : मागील आठवड्यामध्ये सन्माननीय मंत्री महोदयांनी या विषयावर सविस्तर उत्तर दिले होते. शॉर्टटर्म आणि लाँगटर्म उपाययोजना शासनाने केलेली आहे. 38 एमएमक्यू इतका शॉर्टेज निर्माण झालेला आहे. तो दूर करण्यासाठी टाटा हायड्रो इलेक्ट्रिक प्रोजेक्टचे स्टॅण्डबाय युनिट दुप्पट करुन 24 मेगावॅट वाढवून देण्यात आलेले आहेत. त्यामुळे 30 एमएमक्यू जास्त पाणी मिळणार आहे. या व्यतिरिक्त मोरबे धरणावर फिल्ट्रेशन प्लॅण्ट आहे. त्या माध्यमातून नवीन मुंबईला पाणी जाते. तो प्लॅण्ट तातडतोब चालू करण्याचा प्रस्ताव होता.

....नंतर श्री गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ SBT/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13:00

ता.प्र.क्र.38188... श्री.रणजित कांबळे...

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सदरहू प्लॅण्टच्या माध्यमातून आजपासून पाणी पुरवठा सुरु झ ाालेला आहे. या प्लॅण्टच्या माध्यमातून 7 एम.एम.क्यू.अतिरिक्त पाणी मिळणार आहे. यामुळे ठाणे महानगरपालिकेस थोडे जास्त पाणी मिळणार आहे.तरी देखील 34 एम.एम.क्यू.इतकी पाणी टंचाई राहणार आहे. त्यानंतर आमच्या असे निदर्शनास आले की, या पाणी वितरणाच्या पाईप लाईन्समध्ये अंतर्गत गळती मोठया प्रमाणात आहे. जवळपास 25 ते 30 टक्के पाण्याची गळती या पाईप लाईन्समधून होत आहे. यासंदर्भात सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांना त्यांच्या पाणी वितरणाच्या पाईप लाईन्समध्ये पाण्याची गळती सुरु आहे. ती गळतीची कामे ताबडतोबीने दुरुस्त करावीत अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपल्याकडे 14 टक्के शॉर्टेज राहणार आहे. त्यामुळे प्रत्येक महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्या क्षेत्रात एक दिवस पाणी वितरणाचे काम बंद ठेवण्यात आले आहे. लॉंग टर्म म्हणून मेजर घेतलेले आहे. त्यासंदर्भात बारवी धरणाची उंची दुप्पट करावयाची होती. त्या धरणाची उंची वाढविल्यानंतर 700 एम.एल.डी. पाणी पुढील दोन वर्षात उपलब्ध होणार आहे. त्या व्यतिरिक्त शाही आणि पोशीर धरण उल्हास नदीवर बांधण्यात येणार आहे. सदर धरणांची कामे झाल्यानंतर भविष्यात पाणी टंचाई निर्माण होणार नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मागच्या वेळेला या प्रश्नासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते आणि त्यासंबंधी ताबडतोबीने बैठक घेतली होती. त्यात पाणी कपात कमी कमी करण्याचे जाहीर केले होते. त्या बैठकीस ठाणे जिल्हयातील आमदारांना बोलाविण्यात आले होते. त्यांची बैठकीची सूचना माझ्यापर्यंत आली नव्हती. परंतु त्यांनी बैठकीत जाहीर केल्याप्रमाणे पाणी कपात त्यांनी कमी केली आहे. परंतु त्या ठिकाणी नागरीकरण प्रचंड प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे पोशीर धरणाचे काम व्हावे यासाठी शासन 1991 पासून प्रयत्नशील आहे. पोशीर धरणाच्या कामासाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या प्रशासकीय मान्यता मिळालेल्या आहेत अशी माझी माहिती आहे. पोशीर धरणाची मूळ किंमत 850 कोटी रुपये होते. आता त्या धरणाची किंमत निश्चितपणे वाढली असेल. या ठिकाणी शाही धरण आणि पोशीर धरण यांची कामे होतील असे शासनाकडून सांगण्यात येते. पोशीर धरणाच्या कामासाठी शासन किती निधी उपलब्ध करुन देणार आहे ? पोशीर धरणाच्या कामासाठी वेगवेगळया महानगरपालिकांना निधी द्यावा लागणार आहे. पोशीर धरणाच्या उभारणीच्या कामास शासन गती देणार आहे काय ? पोशीर धरणाच्या कामासाठी किती निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला जाणार आहे ? 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38188...

श्री. अजित पवार : सभापती महोदय, शाही आणि पोशीर धरणासंबंधीचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. पोशीर धरण हे रायगड जिल्हयात येत असले तरी त्या धरणातील पाण्याचा लाभ ठाणे जिल्हयाला मिळतो आहे. मी गेल्या आठवडयात माननीय मुख्यमंत्र्याबरोबर चर्चा केली त्यावेळेस मी त्यांना अशी विनंती केली की, एम.एम.आर.डी.ए. हे मुंबई आणि ठाणे या दोन्ही ठिकाणी येते तसेच रायगड देखील त्यात येते. जवाहरलाल नेहरु नॅशनल नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन मधून शाई धरणाच्या कामाकरिता काही पैसे मिळतात. पैसे कमी पडले तर त्या धरणाच्या कामासाठी एम.एम.आर.डी.ए.कडून पैसे उपलब्ध करुन देण्यात येतील अशी मागणी माननीय मुख्यमंत्र्यांनी तत्वत: मान्य केलेली आहे. पाच, सहा महानगरपालिकांचा प्रश्न या धरणांच्या कामामुळे सुटणार आहे. मोरवे धरणाच्या पाण्यामुळे नवी मुंबईतील प्रश्न सुटला आहे. मोरवे धरणातून नवी मुंबईसाठी पाणी उपलब्ध व्हावयास लागले आहेत. आजच त्या प्रकल्पाचे उद्‌घाटन होत आहे. 70 दशलक्ष लिटर प्रती दिन पाण्याची बचत होणार आहे. तेवढया पाण्याची गरज कमी होणार आहे. सदरहू पाणी इतर ठिकाणी वापरावयास मिळणार आहे. पाण्याची कमतरता कमी व्हावी म्हणून 15 जुलै पर्यंत आपण पाण्याचे आरक्षण करतो. परंतु यावेळी आम्ही थोडासा धोका पत्करतो आहोत की, 30 जून पर्यंतच पाण्याचे आरक्षण करण्याचे ठरविले आहे. आपल्याकडे साधारणत: 7 जून पासून पाऊस पडण्यास सुरुवात होते. पिण्याच्या पाण्याची कमतरता कमी करण्याच्या संदर्भात ही रिस्क आपण घेऊ पाहतो आहोत. गारगे आणि काळू धरणे मुंबई महानगरपालिका बांधणार आहे. शाई आणि पोशीर धरण हे जलसंपदा विभागाच्या माध्यमातून बांधावयाचे की दुस-या योजनेतून बांधावयाचे याबाबतीत महानगरपालिकांना विश्वासात घेऊन सदर धरणांची कामे केली जातील. परंतु या धरणांसाठी कमी पडणारा निधी एम.एम.आर.डी.ए.कडून दिला जाईल आणि त्या गोष्टीस माननीय मुख्यमंत्र्यांनी तत्वत: मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 13:05

ता.प्र.क्र. 38188 पुढे सुरु...

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, पोशीर धरणाच्या बाबतीत प्रशासकीय मंजुऱ्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे या धरणाच्या कामाला गती येण्याची आवश्यकता आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, धरणाचे काम पूर्ण होण्यासाठी वन खात्याचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच स्थानिक लोकांचा देखील विरोध आहे. स्थानिक लोकांचे म्हणणे असे आहे की, आमचे पाणी ज्या शहरांना जात आहे त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकी एकाला म्हणजे प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एकाला नोकरी दिली पाहिजे. रायगड जिल्हयामध्ये हा प्रकल्प असल्यामुळे स्थानिक लोकांचे म्हणणे असे आहे की, ठाणे जिल्हयाला पाणी घेऊन जाणार असल्यामुळे आमच्या प्रकल्पग्रस्त भागातील लोकांच्या पुनर्वसनाचे काय ? असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु चर्चेच्या माध्यमातून शासन हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख (वित्तराज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2007-2008 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आर्थिक पाहणी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

--

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन(सुधारणा) नियम,2008 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बाविआ.1007/प्र.क्र.12/2007 वित्त आयोग कक्ष, दिनांकित 29 फेब्रुवारी 2008 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाचा सन 2003-04 व 2004-05 चा अनुक्रमे चौतिसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने किराणा बाजार व दुकाने मंडळाचा सन 2003-2004, 2004-2005, व 2005-2006 चा अनुक्रमे चौतिसावा,पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धातू(लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ, मुंबईचा सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002,2002-2003, व 2003-2004 चा अनुक्रमे सत्ताविसावा, अठ्ठाविसावा, एकोणतिसावा, तिसावा व एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

. .....3

अप्रसिद्धीसाठी / प्रसिद्धीसाठी नाही





**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात मी हा प्रश्न उपस्थित करतो की, माथाडी मंडळ आणि कामगार मंडळाचे मागील 10/10 वर्षाचे वार्षिक अहवाल सदनाला सादर केले जात नाहीत याचा सरकार खुलासा का करीत नाही ? ज्या अधिकाऱ्यांनी हे अहवाल उशिरा सादर केले त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. अहवाल वेळेवर सादर न होण्याची कारणे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, शासनाने स्ट्रीम लाईन करण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. बहुतेक ठिकाणी स्ट्रीम लाईन झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय, गेले चार दिवस मराठीतून उत्तरे देत आहेत याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

**सभापती** : प्रयत्नांना यश आलेले आहे.

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत यांनी " दिनांक 17 मार्च, 2008 रोजी भायखळा येथील रेतीवाला इंडस्ट्रीयल इस्टेटच्या तिसऱ्या मजल्यावर आग लागून 10 जणांचा झालेला मृत्यू, तसेच 50 कामगार गंभीर जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, गुरुमुख जागवाणी यांनी "कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करणे तसेच ठाणे व रायगड जिल्हयासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय स्थापन करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...........

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी "कांदिवली (प.) येथील गोराई रोड परिसरातील न्यू एमआयजी वसाहतीचा पुनर्विकास करताना विकासकांवर टीट-बीट भूखंड आणि अतिरिक्त एफएसआयची खैरात करणाऱ्या म्हाडास दक्षता विभागाने थकबाकीची कोट्यावधी रुपयांच्या रक्कमेची वसुली का केली नाही, या नोटीशीस म्हाडाने उत्तर देण्यास टाळाटाळ करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण यांनी "सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर दिलेली परवानगी शासनाने रद्द करणे, अशा शाळेतील विद्यार्थ्यांना खाजगी विद्यार्थी समजून 17 नंबरचा फॉर्म भरण्यास सांगणे, फक्त एक-दोन शाळांनाच परवानगी देणे, विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचा दाखला देण्यास प्रश्नचिन्ह निर्माण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याच विषयासंबंधी श्री.जी.एल.ऐनापुरे यांनी देखील अनुक्रमांक-9 वर नमूद केल्याप्रमाणे नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या दोन्ही सूचनांबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "इमारतींचा विकास करताना तेथील जुन्या रहिवाशांना तात्पुरता निवारा म्हणून संक्रमण शिबीर बांधण्यासाठी 1997 ते 2000 च्या काळात मुंबई मंडळाने काही नामवंत बिल्डरांना 18 महिन्यांच्या करारावर विविध 7 ठिकाणी जमिनी उपलब्ध करुन दिलेल्या असणे, या बिल्डरनी सदरहू कालावधी संपल्यानंतरही भाड्याने घेतलेल्या जमिनींचा वापर सुरु ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "भारताचे वाईन कॅपिटल म्हणून उदयास येत असलेल्या नाशिकमधील एका वाईन यार्डमधील वाईन बारमध्ये दिनांक 15 मार्च, 2008 रोजी मध्यरात्रीपर्यंत फिल्मीस्टाईल पार्टीचे आयोजन करण्यात येणे, या पार्टीमध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...........

बारबालांच्या नाचगाण्यांची दृश्ये खाजगी दूरचित्रवाहिनीवरुन प्रसारित करण्यात येणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईतील तेली गल्लीतील शिवशक्ती अ,ब व क या इमारती तीस वर्षापूर्वी बी.जी.शिर्के या कंपनीने बांधलेल्या असणे, सदर इमारतींचे लिकेज होत असल्याने स्लॅब कोसळण्याचे प्रकार वारंवार घडत असणे, या इमारतींची अत्यंत बिकट अवस्था असल्याने मोठी प्राणहानी होण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "दिनांक 9 मार्च, 2008 रोजी सिंधुनगर प्राधिकरण, पिंपरी, पुणे येथे कु.कुंतल राजेश पांढरे या 9 वर्षीय वयाच्या मुलीने गृहपाठ न केल्याने तिच्या खाजगी शिक्षिका सोनाली घाडगे हिने आगीचे चटके दिल्याने सदर मुलगी गंभीर जखमी होणे, पोलिसांनी गुन्हेगारास ताब्यात घेऊन अटक न करता दुसऱ्या दिवशी सकाळी अटक दाखवून कोर्टात जामीन मिळविण्यासाठी केलेली मदत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेगाव जाणोरी या रस्त्याचे दिनांक 21 डिसेंबर, 2006 रोजी भूमिपूजन होऊन रस्त्याचे काम संथगतीने सुरु असून अद्याप काम अपूर्ण असणे, झालेल्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून त्यात अनेक त्रुटी असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी यांनी "करमाळा, जि.सोलापूर येथील अर्बन बँकेत ठेवलेल्या अवैध ठेवी, बँकेच्या बुडित ठेवी, अवैध मुद्रांक खरेदी आदी प्रकरणाबाबत जिल्हा उपनिबंधक, सोलापूर यांनी सहाय्यक निबंधकांना जुलै, 2006 पासून



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...........

लेखी पत्र देऊनही सदर बँकेच्या संचालकांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होणे, नगर दिवाणी न्यायालयात प्रकरण प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत जपण्याचे धोरण शासन अवलंबित असताना मालाड, मुंबई येथील मालवणी परिसरातील अलि तलावात अनधिकृतरित्या भरणी करुन त्यावर टॉवर उभारले जात असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, याकडे शासकीय यंत्रणेचे पूर्णपणे दुर्लक्ष होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती......**

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "वडाळा येथील संभवनाथ जैन मंदिरातील देवाच्या मुर्तीचे 4 सोन्याचे डोळे दिनांक 17 मार्च, 2008 रोजी वा त्या सुमारात चोरीस जाणे, याप्रकरणी आरएके मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवूनही अद्याप चोरटयांचा शोध न लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी "विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाचा तिसया सूचीमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे दिनांक 23 नोव्हेंबर, 2005 रोजी पाठविण्यात आला आहे अशी माहिती शासनाने सभागृहात देणे, केंद्रशासनाने तिसरी अनुसूची अस्तित्वात नसल्याचे उत्तर दिल्याने सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याबाबत जनतेत निर्माण झालेला संभ्रम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "राज्यशासनाच्या कर्मचारी संघटनेने माननीय मुख्यमंत्र्यांच्या दिनांक 14 व 25 जुलै तसेच 28 ते 30 ऑगस्ट या दिवशी राज्यशासनाचे कर्मचारी लाक्षणिक संप करणार असल्याचे नोटीशीद्वारे कळविणे, केंद्रशासनाने दिनांक 1 जानेवारी, 2008 पासून केंद्रशासनाच्या कर्मचाऱ्यांना 6 टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचे मान्य करणे, केंद्रशासनाप्रमाणे राज्यशासनाच्या कर्मचाऱ्यांना देखील उक्त महागाई भत्ता देण्याची कर्मचाऱ्यांकडून होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबई शेजारील ठाणे व रायगड जिल्ह्यातील पायाभूत सुविधा व विकासाचे काम मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडे सोपविण्यात येणे, या प्राधिकरणाने

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.........

आवश्यक तो निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर इतर ज्या सूचना आलेल्या होत्या, त्यांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

-------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज मंजूर करताना बेरोजगारांकडून कोरे धनादेश घेणे

**मु.शी.**: मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज मंजूर करताना बेरोजगारांकडून कोरे धनादेश घेणे याबाबत प्रा. शरद पाटील श्री. जयंत पाटील वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील यांनी "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज मंजूर करताना बेरोजगारांकडून कोरे धनादेश घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : महोदय, महाराष्ट्र शासनाने समाजातील विविध घटकांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी बेरोजगारांना अर्थसहाय्य मिळावे यासाठी वेगवेगळी महामंडळे स्थापन केलेली आहेत. त्यात मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ हे एक आहे. वास्तविक पाहता महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहे पाटील आर्थिक विकास महामंडळ या महामंडळांकडून बेरोजगार तरुणांना व्यवसायासाठी कर्जपुरवठा करीत असताना त्या लाभार्थ्यांकडून कागदपत्रांची पुर्तता करुन घेतली जाते. असे करीत असताना त्यांच्याकडून कोरे चेक घेतले जात नाहीत. परंतु मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून मात्र बेरोजगार तरुणांना कर्ज मंजूर करीत असताना कोरे चेक घेण्याची पध्दत सुरु केली आहे. 25 हजारापासून 2 लाखापर्यंतचे कर्ज मंजूर करण्यात येते व त्यासाठी जामीनदार घेण्यात येतात, मालमत्ता असल्यास त्यावर बोजा टाकण्यात येतो परंतु त्याबरोबर कोरे चेक सुध्दा घेण्यात येतात. त्याचे कारण कर्जदाराचा हप्ता चुकला तर हे चेक बँकेकडे पाठवून ते परत आले तर कर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल करता येतो. अशा प्रकारे सांगली जिल्ह्यातील जवळपास 119 लाभार्थ्यांवर अशा प्रकारे फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत, वॉरंट निघालेले आहेत व आता त्यांना अटक होण्याची देखील शक्यता आहे. माझी मागणी आहे की, महामंडळाने जे कोरे चेक घेतलेले आहेत, जे दावे दाखल केलेले आहेत ते ते परत घेऊन कर्जदाराकडून सामोपचाराने हप्ते भरण्याची व्यवस्था शासन करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला 52 टक्के रिकव्हरी करावयाची आहे. आपण अनुदान म्हणून नव्हे तर कर्ज म्हणून पैसे देत असतो. हा सर्क्युलेटरी फंड आहे. अगोदरच्या लाभार्थ्यांकडून पैसे आले नाही तर पुढील लाभार्थ्यांना पैसे उपलब्ध करुन देणे कठीण होईल. त्यामुळे महामंडळाने वनटाईम सेटलमेंट करण्याचा निर्णय घेतला असून जो दंडनीय व्याज माफ करुन मुळ कर्ज आणि त्यावरील व्याज सर्व लोक भरण्यास तयार असतील तर सर्व केसेस मागे घेण्याचे धोरण स्वीकारले जाईल. पुढील काळात केस करण्याच्या आधी प्रत्येक केसची माहिती बोर्डासमोर नेऊन वैयक्तिक केस समजून फौजदारी गुन्हा किंवा इतर काही कारवाई करावयाची की., नाही याबाबतीत पाऊले उचलण्यात येतील.

----------------------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाविद्यालयातील इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांच्या अर्जाना मंजूरी घ्यावी लागणे.

**मु. शी.** : महाविद्यालयातील इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांच्या अर्जाना मंजूरी घ्यावी लागणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी महाविद्यालयातील इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांच्या अर्जाना मंजूरी घ्यावी लागणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जे आर्थिक विकास मागासवर्गीय विद्यार्थी आहेत त्यांना पूर्वीच्या काळी जिल्हाधिका-यामार्फत इबीसी विद्यार्थ्यांची चौकशी करुन पैसे दिले जात होते. परंतु नंतर यासंदर्भातील काम उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे देण्यात आले. रत्नागिरी जिल्हयातील शाळांनी इबीसीच्या यासंदर्भातील अर्ज सहसंचालकांकडे पाठविल्यानंतर त्यांनी सांगितले की, तुम्ही पुण्याच्या अधिका-यांकडे जा. परंतु पुण्याच्या अधिका-यांनी सांगितले की, आम्ही हे अर्ज तपासणार नाही. परंतु आपण असे लिहिले आहे की, 31.3.2008 पर्यंत इबीसीच्या रक्कमा देण्यात येतील. आपण ही बाब मान्य केल्यामुळे मी अधिक प्रश्न विचारीत नाही. 31.3.2008 पर्यंत सर्व शाळांना इबीसीच्या रक्कमा देण्यात येतील यासंदर्भात आदेश देणार का ? यासंदर्भातील अंमलबजावणी झाली नाही तर त्यासंदर्भात कारवाई करणार का?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जे सांगितले ते खरे आहे. सन 2004-2005 पर्यंत हे काम जिल्हापरिषदेकडे होते. परंतु 2007 मध्ये यासंदर्भात नवीन जी.आर.काढून ईबीसी आणि स्कॉलरशिपचे काम उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे दिलेले होते. आता आपण 31 मार्च, 2008 पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना पैसे देणार आहोत. यापुढे जाऊन मी सांगू इच्छितो की, पुढील वर्षापासून जेव्हा विद्यार्थी बारावीसाठी कॉलेजमध्ये दाखला घेतो त्याच वेळी इन्कम सर्टीफिकेट आणि ईबीसीचा ॲप्लीकेशन फॉर्म जमा करणार व जून-जुलै मध्ये जेव्हा ॲडमिशन होईल त्याचवेळी ही प्रोसेस पूर्ण करुन लवकरात लवकर पैसे देण्याचा प्रयत्न केला जाईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चेंबूर येथील सावित्रीबाई विद्यानिकेतन हायस्कूल या शाळेच्या व्यवस्थापनाबद्दल गंभीर स्वरुपांच्या तक्रारींची चौकशी करणे

**मु. शी.** : चेंबूर येथील सावित्रीबाई विद्यानिकेतन हायस्कूल या शाळेच्या व्यवस्थापनाबद्दल गंभीर स्वरुपांच्या तक्रारींची चौकशी करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे यांनी "चेंबूर येथील सावित्रीबाई विद्यानिकेतन हायस्कूल या शाळेच्या व्यवस्थापनाबद्दल गंभीर स्वरुपांच्या तक्रारींची चौकशी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सावित्रीबाई फुले विद्यानिकेतन हायस्कूल, चेंबूर या ठिकाणचा संबंधित प्रश्न आहे. चार वेळा हा प्रश्न या सभागृहात आलेला असून यानंतर हा प्रश्न पुन्हा या सभागृहात उपस्थित करण्याची आमची हिंमत होणार नाही. या ठिकाणी चर्चा होते, आम्हाला शासनाकडून आश्वासन मिळते परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही होत नाही. कार्यवाही न झाल्यामुळे शिक्षकांचा हप्ता वाढतो. आता 3 ते 5 हजार रुपये हप्ता आहे. आता जर काही कार्यवाही झाली नाही तर 5000 च्या पुढे दरमहा हप्ता जाण्याची शक्यता आहे. मुख्याध्यापक काम न करता पगार घेतो हे शासनाने मान्य केलेले आहे. माझ्याकडे पिल्ले कॉलेजचे पत्र आहे त्यामध्ये 11 ते 5 अशी कॉलेजची वेळ आहे, हे दोघेही पगार घेत असून दुस-या बाजूला बी.एड. पूर्ण करीत आहेत. संस्थाचालकांविरुध्द 11.2.2008 रोजी 406,520,504 खाली एफआयआर दाखल झालेला आहे. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी सुध्दा केली जात नाही. डिपार्टमेंटला सहकार्य करीत नाही यासंदर्भात निरीक्षकांचे पत्र सुध्दा आहे. एकंदरीत हा सर्व विचार करता या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणार का? सदर शाळेवर प्रशासक नेमण्याची किंवा मान्यता काढून घेण्याची कारवाई केली जाणार आहे काय? परत हा विषय या सभागृहात येणार नाही यासंदर्भात कार्यवाही केली जाणार आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.25 प्रा.वसत

पुरके : सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आलेल्या बाबी निश्चितच गंभीर स्वरुपाच्या आहेत. 2004सालापासून या सर्व बाबी शासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत. दिनांक 30.12.2004 रोजी समेट घडविल्यामुळे काही शिक्षकांनी तक्रारी देणे बंद केले होते परंतु या ठिकाणी ज्या तक्रारी सांगण्यात आलेल्या आहेत त्या वस्तुस्थितीला धरुन आहेत. काही तांत्रिक अडचणीमुळे या शाळेवर प्रशासक नेमता येत नाही परंतु या शाळेची मान्यता काढण्याची प्रक्रिया निश्चितच सुरु करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : धर्मदाय रुग्णालयाकडून रुग्णांना सवलतीच्या दरामध्ये औषधोपचार न मिळणे

मु.शी : धर्मदाय रुग्णालयाकडून रुग्णांना सवलतीच्या दरामध्ये ओषधोपचार न मिळण्याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी,.पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी " धर्मदाय रुग्णालयाकडून रुग्णांना सवलतीच्या दरामध्ये ओषधोपचार न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस :कृपया सोबत जोडेलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई आणि पुणे येथे धर्मदाय संस्थेच्या मार्फत मोठ मोठी हॉस्पिटल्स चालविली जातात. त्यांनी महाराष्ट्र शासनाकडून कोटयावधी रुपयांचे अनुदान घेतलेले आहे.जी गरीब व्यक्ती आहे आणि ज्या कुटुंबाचे उत्पन्ने 25 हजार रुपयापेक्षा कमी आहे अशा व्यक्तिंना मोफत किंवा ज्यांचे उत्पन्न 50 हजार रुपये आहे अशा व्यक्तिंच्या बाबतीत बिलाच्या 50 टक्के सवलत देऊन त्यांच्यावर औषधोपचार करावा अशी अट या हॉस्पिटलवर टाकण्यात आलेली आहे.तरीसुध्दा सर्व हॉस्पिटल्सकडून ही अट पायदळी तुडविण्यात येते.या संदर्भात धर्मदाय आयुक्तांकडून सर्व्हे केला जात नाही. मागच्या वेळी देखील लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती परंतु त्या समितीचा अहवाल आला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही.या हॉस्पिटल्सवर नियंत्रण ठेवण्यासाठी सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर या हॉस्पिटल्सकडून किती गरीब कुटुंबावर सवलतीच्या दराने उपचार करण्यात आले होते याची माहिती ऑन लाईन देण्याबाबत त्यांच्यावर सक्ती करण्यात येईल. असे मागे जाहीर करण्यात आले होते तेव्हा ही माहिती ऑन लाईन देण्याच्या दृष्टीने हॉस्पिटल्सवर पुन्हा सक्ती करण्यात येणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे :सभापती महोदय, ज्या हॉस्पिटल्सने शासनाकडून अनुदान किंवा मदत घेतली आहे त्यांनी गरीब रुग्णांसाठी 10 टक्के बेडस राखीव ठेवावेत असे त्यांच्यावर बंधन घालण्यात आलेले आहे. त्याबाबतीत काही हॉस्पिटल्सच्या संदर्भात तक्रारसुध्दा करण्यात आली म्हणून जनहित याचिकासुध्दा दाखल करण्यात आली होती. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या हॉस्पिटलच्या संदर्भात मागच्या एका प्रकरणात हायकोर्टाने असा निर्णय दिला होता की, प्रत्येक हॉस्पिटलने "इंडिजंट पेशंट फंड" नावाचे एक अकाऊन्ट उघडणे आवश्यक आहे आणि त्या हॉस्पिटलचे जे ग्रॉस बिलींग असेल त्याच्या दोन टक्के रक्कम अशा प्रकारच्या वेगळया खात्यामध्ये जमा केली पाहिजे.त्याचप्रमाणे 25 हजार रुपये ज्यांचे उत्पन्न आहे अशा रुग्णांना 100 टक्के मोफत औषधोपचार दिला पाहिजे आणि ज्या विकर सेक्शनमधील व्यक्ती आहे, ज्यांचे वार्षिक उत्पन्न 25 हजार ते 50 हजार रुपयांच्या दरम्यान आहे अशा व्यक्तींना 50 टक्के सवलतीच्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दरात औषधोपचार दिला पाहिजे अशा प्रकारे कोर्टाने निर्णय दिला होता. मागच्या अधिवेशनात या विषयावर एक लक्षवेधी सूचना सुध्दा उपस्थित करण्यात आली होती. त्यावर उत्तर देत असतांना सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी असे सांगितले होते की, "हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे तेव्हा या प्रकरणी जेव्हा कोर्ट निर्णय देईल त्या नंतर लोकप्रतिनिधीची समिती गठीत करण्यात येईल. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, या संदर्भात समिती गठीत झालेली आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हे आपल्याला सांगत आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय मी चुकीचे काहीही सांगत नाही.सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर प्रश्न पुन्हा विचारावा. या प्रकरणात कोर्टाने निर्णय दिल्यानंतर जिल्हा स्तरावर आणि विभागीय स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय पातळीवर एकूण सात समित्या गठीत करण्यात आल्या होत्या आणि प्रत्येक जिल्हयाकरता एक समिती गठीत केलेली आहे. मी मुंबईच्या बाबतीत सांगू इच्छितो की मुंबईकरिता जी समिती गठीत करण्यात आली होती. मी मुंबईचे एक उदाहरण देतो की, मुंबईच्या समितीमध्ये जॉईन्ट चॅरिटी कमिशनर हे अध्यक्ष राहणार आहेत, त्याचबरोबर जाईन्ट डायरेक्टर, हेल्थ सर्व्हिसेस , असोसिएशन ऑफ हॉस्पिटल्स मुंबई आणि मुंबई महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी हे सदस्य राहणार आहेत अशा प्रकारे कोर्टाच्या निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अशी सूचना केली आहे की, या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असला पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

मागील वेळेस सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनीदेखील याबाबत उल्लेख केला होता की, शेवटी लोकप्रतिनिधींकडे लोक तक्रार घेऊन येत असल्याने त्यांना देखील या समितीमध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु आजच्या घडीला ही बाब सबज्युडिस असल्याने लोकप्रतिनिधींची नावे त्यात आपण घेतलेली नाही. तेव्हा कोर्टाचा निकाल आल्यानंतर त्या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश आपल्याला करता येईल आणि कोर्टाचा देखील मग त्याबाबत जो काही आदेश असेल त्यावर ते त्यावेळी अवलंबून राहील.

***

..... क्यूक्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गडचिरोली जिल्ह्यात मध्यान्ह भोजन योजनेची निधी अभावी अमलबजावणी न होणे.

**मु. शी.** : गडचिरोली जिल्ह्यात मध्यान्ह भोजन योजनेची निधी अभावी अमलबजावणी न होणे याबाबत सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा.बी.टी.देशमुख यांनी "गडचिरोली जिल्ह्यात मध्यान्ह भोजन योजनेची निधी अभावी अमलबजावणी न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... क्यूक्यू 3 ... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सुचनेवरील (क्र.5) मा.शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील 1ली ते 5 वी पर्यंतच्या सर्व अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून ही 'मध्यान्ह भोजन' योजना राबविण्यात येत आहे आणि त्यासाठी केंद्राकडून 75 टक्के आणि राज्य सरकारकडून 25 टक्के निधी दिला जातो. या योजनेमध्ये 3.9.3007 च्या शासन निर्णयान्वये 157.5885 कोटी आणि 16.1.2008 च्या शासन निर्णयान्वये 181221 कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला असल्याचे या निवेदनातून सांगण्यात आले आहे. हा निधी वितरित केला असला तरी प्रत्यक्षात शाळांना हा निधी पोहोचण्यात फार विलंब लागतो. ऑक्टोबर पासून अन्न शिजवून देण्यासाठी म्हणून जो निधी या शाळांना दिला पाहिजे होता तो दिलेला नाही. तो निधी तरी आपण आता 31 मार्च अखेरपर्यंत देणार आहात का ? आपण आजही याबाबत सर्वेक्षण केले तर आपल्याला दिसून येईल की, 50 टक्के शाळांमध्ये आज खिचडी शिजतच नाही म्हणून 31 मार्च पर्यंत हा निधी देण्याची कार्यवाही आपण करणार काय आणि या पुढील सत्रापासून यासाठी ॲडव्हान्स निधी आपण देणार का ? खरे तर यासाठी ॲडव्हान्स निधी द्यायचा आहे, त्याप्रमाणे तो देणार का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा प्रश्न निधीचा आहे. तो मार्च पर्यंत निश्चितपणे वितरित केला जाईल. आणि जानेवारीच्या सुरूवातीस, तिमाही सुरू होतानाच तो पैसा मिळाला पाहिजे म्हणून, शेवटी केंद्र सरकारकडून येणारा पैसा हा केव्हा ना केव्हा येतच असतो. आणि या मुलांच्या दैनंदिन जीवनाशी हा प्रश्न निगडित असल्याने यासाठी ॲडव्हान्स निधी शाळांना देण्याच्या दृष्टीने आपण निश्चितपणे तरतूद करू, त्यादृष्टीने दखल घेऊ. सभापती महोदय, यामध्ये केवळ प्रश्न हा निधीचा नाही. धान्य वेळेवर न मिळाल्यामुळे देखील कित्येकदा यामध्ये विलंब होत असतोअसे मी नियम 93 च्या आधारेच काल उत्तर दिलेले आहे. यामध्ये अनियमितता झालेली आहे आणि त्यामुळे 2-2, 3-3 महिने गडचिरोलीमध्ये या शाळांतील मुलांना खायला मिळाले नाही. म्हणून एक समिती गठित करून हे अधिवेशन संपण्यापूर्वी मी निश्चितपणे याबाबतचा अहवाल घेऊन सभागृहाला सादर करीन.

***

..... क्यूक्यू 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवंडी महापालिका शिक्षण मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये 100 शिक्षकांची पदे 2 वर्षांपासून रिक्त असणे.

**मु. शी.** : भिवंडी महापालिका शिक्षण मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये 100 शिक्षकांची पदे 2 वर्षांपासून रिक्त असणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "भिवंडी महापालिका शिक्षण मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये 100 शिक्षकांची पदे 2 वर्षांपासून रिक्त असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...क्यूक्यू 5 ...

( नियम 93 च्या सुचनेवरील (क्र.6) माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, भिवंडी महानगरपालिकेतील प्राथमिक शाळांतील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. मागील वेळेस देखील मी हा प्रश्न येथे उपस्थित केलेला होता. आजही तेथे 96 शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यासाठी जाहिरात दिल्याप्रमाणे निवड यादी तयार आहे. त्यानुसार त्यांनी त्यांची प्रतिक्षा यादी देखील तयार केलेली आहे आणि शासनाचा जी.आर.च आहे की, निवड यादी संपल्यानंतरही पदे उपलब्ध असतील तर ती पदे गुणवत्ता यादीतून भरावीत. पण अद्यापही ही पदे भरलेली नाहीत. आता परीक्षा सुरू आहेत तेव्हा तातडीने निवड समितीला आदेश देऊन, कारण या जागा भरण्यासंबंधात तेथे शिक्षकांनी उपोषण सुरू केलेले आहे, आठ दिवसात या जागा भरल्या जातील काय ? हा माझा एक प्रश्न आहे, त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तेथील शिक्षकांना 2-2, 3-3 महिने वेतन मिळालेले नाही. तेव्हा अशी जी प्रकरणे आहेत ती 31 मार्च पूर्वी आपण निकाली काढणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, भिवंडी महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाची जवळ जवळ 100 पदे रिक्त आहेत. त्यासाठीची निवड प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांची प्रतिक्षायादी देखील तयार आहे आणि त्याबाबत ताबडतोबीने आदेश दिले असून त्यातूनही जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबतही बाकी भरतीची प्रक्रिया पूर्ण करून त्या जागाही भरण्यात याव्यात असे सांगितले आहे. त्या दृष्टीने तेथे प्रक्रिया सुरू झालेली आहे. सभापती महोदय, तेथील शिक्षकांना वेळेवर वेतन मिळत नाही असा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. त्याबाबत महापालिकेचे म्हणणे असे होते की, शासनाने आमचे 11 कोटी रूपये कापून घेतल्यामुळे आम्हाला हे वेतन देता आले नाही. .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ...

श्री. हसन मुश्रिफ ....

वेतनाची येणे रक्कम 1 कोटी 68 लाख आहे. त्यापैकी 1 कोटी दिले गेले आहेत आणि 68 लाख 31 मार्चपूर्वी दिले जाणार आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांची वरिष्ठ व निवडश्रेणीच्या प्रकरणांचा निपटारा आठ दिवसाच्या आत करण्याबाबत उप संचालकांना सूचना दिल्या आहेत. भविष्य निर्वाह निधीच्या आलेल्या अर्जांबाबत सत्यता पडताळून ते अर्ज मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, 126 कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियमातील कलमांप्रमाणे कायम करण्यात येईल. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेतील शिक्षकांसंबंधी उपस्थित केलेले प्रश्न या महिन्याअखेर पूर्णपणे मिटविण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

पृ.शी. : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुपरस्पेशालिटी डॉक्टरांचा असलेला तुटवडा

.

मु.शी. : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुपरस्पेशालिटी डॉक्टरांचा असलेला तुटवडा याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुपरस्पेशालिटी डॉक्टरांचा असलेला तुटवडा " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, विदर्भामध्ये सर्व स्तरावर मोठया प्रमाणात अनुशेष शिल्लक असून तो शासनाकडून पूर्ण करण्यात येत नाही. विदर्भातील गंभीर आजाराच्या रुग्णांना न्याय दिला पाहिजे ही भूमिका शासनाने मान्य केली आहे. नागपूर येथील रुग्णालयामध्ये रुग्णांची प्रतिक्षा यादी मोठी असून संपूर्ण विदर्भातील रुग्णांचा भार नागपूर शहरावर पडत आहे. यामध्ये हृदरोगी असलेल्या रुग्णांची बायपास सर्जरी करणे, कॅन्सरच्या रुग्णांवर उपचार करणे याचा संपूर्ण भार नागपूरच्या रुग्णालयावर पडतो. हा भार कमी करण्यासाठी अमरावती विभागामध्ये आपण वैद्यकीय सुविधा निर्माण करणार आहात काय? शासनाने उत्तर देतांना म्हटले आहे की, 30 खाटा मंजूर करण्यात आल्या आहेत, त्याऐवजी त्या 45 करण्याचा प्रस्ताव आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण 15 खाटांची वाढ केल्यामुळे हा प्रश्न सुटणार नाही. याठिकाणी 100 ते 200 रुग्णांची प्रतिक्षा यादी असल्यामुळे हा भार कमी करण्यासाठी आपण अमरावती जिल्हयामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणार काय? असल्यास, किती दिवसात देणार आहात? तिसरा प्रश्न असा की, प्रतिक्षा यादीवरील रुग्णांना उपचार न मिळाल्यामुळे किती रुग्ण मृत्यू पावले?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. नागपूर जिल्हयामध्ये रुग्णांची फार मोठी प्रतिक्षा यादी आहे. आतापर्यंत जवळपास 579 केसेस आल्या आहेत. त्यापैकी 543 केसेसना मान्यता दिली आहे, आणि 252 रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. अजून 289 रुग्ण प्रतिक्षा यादीवर आहेत. त्यामध्ये 50 टक्के हृदरोगाचे रुग्ण प्रतिक्षा यादीवर आहेत. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये 30 बेड असून त्याठिकाणी रोज 20 केसेस होऊ शकतात. आणखी 15 ते 20 खाटा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून प्राधान्याने या खाटा वाढविण्यात येणार आहेत. माननीय सदस्यांनी नागपूरच्या रुग्णालयांवर अधिक भार पडत असल्याचे सांगितले आहे हे खरे आहे. त्याकरिता अमरावती येथे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला मान्यता दिली असून त्याच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरु झाले आहे. ते पूर्ण होण्यामध्ये काही वेळ जाणार आहे. त्या हॉस्पिटलच्या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे, स्टाफींग रिक्रुटमेंट प्रोसेसमध्ये आहे. त्याचप्रमाणे फेज 2 चे काम चालू करण्याची गरज आहे, त्या कामाला सुध्दा आम्ही प्राधान्य देणार आहोत. त्यामुळे टप्पा 2 चे काम आम्ही प्राधान्याने सुरु करु.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विदर्भामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची फॅसिलिटी आहे आणि त्याविषयी येथे प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, सर्व लोड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर याठिकाणी येत आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले ते खरे आहे की, अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे सहा अति विशेष उपचाराच्या सुविधांच्या बाबतीत काम सुरु झालेले आहे. यासंबंधात तीन इमारतींचे काम झालेले आहे आणि बाकीच्या ठिकाणी फॅसिलिटी इन्स्टॉल केल्या जात आहेत. परंतु टप्पा-2 मधील इमारतींच्या कामांना अजून सुरुवात झालेली नाही. दोन वर्षापूर्वी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, दोन महिन्यामध्ये या कामांना प्रशासकीय मान्य देऊ. परंतु त्यानंतर हा प्रश्न सभागृहासमोर चर्चेसाठी आला नाही हे माझे अपयश आहे. याबाबतीत माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा की, या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, जर प्रशासकीय मान्यता दिली नसेल तर ती केव्हा दिली जाणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला मान्यता दिल्यानंतर तेथे कोणकोणत्या डिव्हीजन ॲड करावयाच्या, फॅसिलिटी ॲड करावयाच्या असा प्रश्न आहे. तेथे 6 फॅसिलिटी ॲड करावयाच्या आहेत. त्याप्रमाणे तीन ॲड केल्या आहेत आणि तीन करावयाच्या आहेत आणि त्यासाठी वेगळा आदेश काढण्याची गरज नाही. तेथील इमारतींचे स्ट्रक्चर झाल्यानंतर एक विभाग सुरु करता येईल. तो सुरु झाल्यानंतर दुसरा सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारले आहे की, बाकीचे काम कधी सुरु करणार आहात ? याबाबतीत सांगावयाचे तर सुरुवातीला 3 फॅसिलीटी सुरु होऊ द्या. त्यानंतर बाकीच्या 3 सुरु करता येतील. जर सर्वच एकदम सुरु करावयाचे म्हटले तर तेथे पुरेसा स्टाफ नाही वगैरे. ही बाब बरोबर होणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय . . . .

**सभापती** : सदनासमोर नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनांबाबत जी निवेदने येतात, त्यावर एक प्रश्न विचारण्यासाठी परवानगी दिली जाते. परंतु मी अपवाद म्हणून सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना एक प्रश्न विचारण्यासाठी परवानगी दिली. याठिकाणी माननीय आरोग्यमंत्री डॉ.विमल मुंदडा उपस्थित आहेत. मला असे वाटते की, त्यांनी सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, प्रा.बी.टी.देशमुख यांना सर्वांना आपल्या दालनामध्ये बोलवावे आणि पुढील कार्यवाही होईल यादृष्टीने या विषयाच्या संबंधात चर्चा करावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आपण याठिकाणी जे निदेश दिले, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. पण याठिकाणी नियम 93 अन्वये जी सूचना दिली आहे, त्याबाबत चर्चा झ ाली. त्यामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचेही नाव आहे. त्यामुळे माननीय आरोग्य मंत्र्यांच्या दालनामध्ये जी बैठक होईल, त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांना देखील बोलविण्यात यावे.

**सभापती** : नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे असतील मग त्यामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर किंवा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचेही नाव असेल, त्या सर्वांना बोलविण्यात यावे.

---

. . . .2 एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ KGS/ MMP/ 13:40

**पृ. शी.** : कळवा खाडीच्या किनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या बेकायदेशीर झोपडया.

**मु. शी.** : कळवा खाडीच्या किनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या बेकायदेशीर झोपडया याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोते व संजय केळकर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (नरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोत व संजय केळकर यांनी "कळवा खाडीच्या किनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या बेकायदेशीर झोपडया " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एस-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, संबंधित अधिकारी आपल्याला या विषयाच्या बाबतीत दिशाभूल करीत आहेत. "लोकसत्ता" या दैनिकामध्ये ही बातमी आलेली आहे. तेथील नगरसेवक, दादा इ.लोकांनी येथील भाग वाटून घेतलेला आहे आणि तेथील खारफूटी तोडून झोपडपट्टी बांधण्यात येत आहे. या झोपडयांनी एम.आय.डी.सी.च्या पाईप लाईनला देखील विळखा घातलेला आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन सुध्दा केवळ त्याठिकाणी संबंधितांना नोटीस देण्याचे नाटक करण्यात आले आहे, यापलिकडे काहीही कारवाई झालेली नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे तेथील बेकायदेशीर झोपडपट्टीमध्ये पाणी पुरवठा करण्यात आला आहे, विजेचे कनेक्शन देण्यात आलेले आहे, शौचालये बांधण्यात आली आहेत. तसेच तेथे एस.टी.चे वर्कशॉप असून त्याच्या पाठिमागे एक महिला सर्रास 30 ते 50 हजार रुपयांना झोपडया विकण्याचा उद्योग करते. यासंबंधात माझा प्रश्न असा आहे की, तेथील महानगरपालिका, पोलीस आणि कलेक्टर यांनी संयुक्त मोहीम आखून तेथील बेकायदेशीर झोपडपट्टी तोडणार आहे काय ? याठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे, ते अतिशय हास्यापद आहे. त्यावरुन संबंधित अधिकारी कशा प्रकारे दिशाभूल करीत आहेत हे दिसून येईल. याठिकाणी निवेदनामध्ये म्हटलेले आहे की,"कळवा खाडीलगत जागेवर मातीचा भराव टाकणाऱ्यांवर एम.आर.टी.पी.अंतर्गत गुन्हे दाखल करणे." परंतु संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे असे म्हटलेले नाही. पुढे असे म्हटलेले आहे की, "तसेच खाडी परिसरातील मॅग्रोव्ह क्षेत्र मुक्त करणाच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही ठाणे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे." म्हणजे याबाबतीत कार्यवाही केली आहे असे म्हटलेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, येथील झोपडपट्टी दादांच्या संबंधात, लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात त्वरित फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करणार आहात काय ? तसेच महानगरपालिका, पोलीस, कलेक्टर यांची संयुक्त मोहीम आखून कळवा खाडीच्या लगत उभी राहिलेली झोपडपट्टी त्वरित तोडणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अतिशय महत्वाच्या सार्वजनिक विषयावर नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे की, हा सी.आर.झेड. चा भाग आहे. उल्हास नदी त्याचबरोबर ठाणे क्रीक या दोन्हीच्या ठिकाणी सी.आर.झेड-1 मधील भाग असताना त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत झोपडपट्टया झालेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये साधारणपणे साहेबानगर, जानकीनगर, महात्मा फुले नगर, जयभीमनगर या ठिकाणी 3887 झोपड्या सर्वेक्षणात लक्षात आलेल्या आहेत. निवेदनात सांगितल्याप्रमाणे महापालिकेच्या वतीने निश्चितप्रकारे कारवाई करण्यात येत आहे. साधारणतपणे 20 फेब्रुवारी, 2008 ला 123 झोपड्यां काढून टाकल्या. परंतु तीन ते साडेतीन हजार झोपड्यांच्या तुलनेत 123 ही संख्या थोडी आहे. त्यामुळे त्या ठिकाणी ज्या अनधिकृत झ ोपडपट्टया झालेल्या आहेत त्या निष्कासित करणे आवश्यक आहे. ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि त्याचबरोबर पोलीस कमिशनर यांना शासनाच्या वतीने सूचना देण्यात येतील आणि या तिघांच्या संयुक्त विद्यमाने या झोपडपट्टया काढण्याच्या दृष्टीकोनातून तातडीने कार्यवाही करण्यात येईल. त्याचबरोबर जे लोक या गोष्टीला प्रवृत्त करीत असतील त्या सगळ्यांवर सुध्दा महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्टच्या माध्यमातून गुन्हे दाखल करण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा ताबडतोबीने सूचना देण्यात येतील. तिसरी महत्वाची बाब अशी आहे की, या जमिनी शासकीय आहेत आणि त्यामुळे त्या सुरक्षित ठेवणे ही आवश्यक बाब आहे. त्या ठिकाणी केवळ निष्कासित करुन चालणार नाही तर ती जमीन सुरक्षित ठेवण्यपच्या दृष्टीने काही नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी मी सांगितल्याप्रमाणे निष्कासन करण्याची कारवाई, पोलिसामध्ये गुन्हे दाखल करण्याची कारवाई, जमीन सुरक्षित ठेवण्याची कारवाई आणि ज्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केला असेल त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करणे या सर्व गोष्टी करण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी चांगले उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. परंतु केवळ शाब्दिक बोल नकोत. कृती कशी होणार आहे यावर सर्व अवलंबून आहे. शासनाची उक्ती आणि कृती यामध्ये खूप फरक असतो. आपण जे सगळे

...2...

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर सरपोतदार .....

रेकॉर्डवर आणले आहे त्याची अंमलबजावणी करुन हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्याचा अहवाल या सदनामध्ये सादर करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हे अधिवेशन साधारणत: आणखी महिनाभर चालेल असे वाटते. महिनाभराच्या आत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे शासनाच्यावतीने कारवाई केली जाईल आणि सभागृहात अहवाल सादर केला जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्या सूचनेला दाद देऊन माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्याचे निश्चितपणे स्वागत करतो. परंतु आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय असे म्हणतो त्याप्रमाणे विधानसभा सभागृहामध्ये...

**सभापती** : विधानसभा सभागृहाचा रेफरंस या ठिकाणी द्यावयाचा नाही.

श्री. संजय केळकर : ठीक आहे. सभापती महोदय, जवळजवळ 4 हजाराच्या वर त्या ठिकाणी बांधकामे झालेली आहेत आणि आजपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्यावर त्याबाबतीत कारवाई करण्यात आलेली नाही. कोणावरही एमआरटीपी ॲक्ट लावलेला नाही. आपण अहवाल सादर करण्याचे मान्य केले आहे. कळवा खाडीच्या भागामध्ये ठाणे-भिवंडी बायपास रोडला मोठया प्रमाणवर गोडावून आणि झोपडपट्टयांची बांधकामे चालू आहेत. त्यासंदर्भात देखील अहवाल सादर करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचा मान राखून याबाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल.

-----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : राज्याच्या सागरी किनारपट्टीवर परप्रांतीय बोटींनी केलेली घुसखोरी

**मु. शी**. : राज्याच्या सागरी किनारपट्टीवर परप्रांतीय बोटींनी केलेली घुसखोरी याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अनिस अहमद ( मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील आणि शरद पाटील यांनी ' राज्याच्या सागरी किनारपट्टीवर परप्रांतीय बोटींनी केलेली घुसखोरी ' या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये शासनाने कबूल केले आहे की, 5700 बेकायदेशीर नौका आहेत. या बेकायदेशीर नौकांची संख्या जास्त आहे. या बोटींमध्ये 288 परप्रांतीय आहेत. परप्रांतीय नौकांवर बंदी घालण्यासाठी शासन कठोर उपाययोजना आखणार आहे काय ? गस्ती घालणा-या नौकांचा स्पीड 4-5 नॉटिकल मैल आहे. गस्तीसाठी आधुनिक नौका दिल्या तर गस्तीचे काम चांगल्या प्रकारे होऊ शकेल. यासाठी शासन ठोस तरतूद करील काय ? ज्या 5667 बोटी आहेत त्यांचे सर्वेक्षण झालेले नसताना त्या सुरु आहेत. यामध्ये अधिका-यांमार्फत मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे तो थांबविण्यासाठी शासन प्रचलित कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करील काय ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, 1981 के फिशिंग एक्ट में अमेंडमेंट करने का काम कॅबिनेट के अन्दर अभी किया गया है. इल्लीगल फिशिंग को रोकने के लिए एपलीकेशन देने के 45 दिन के अन्दर रजिस्ट्रेशन का काम किया जाएगा. अभी तक जो 500 या 1000 रुपए फाइन देना पड़ता था, उसको 5 गुना बढ़ाने का काम किया है और इल्लीगल फिशिंग करते हुए तीसरी बार पकड़े जाने पर 1 साल जेल भेजने का निर्णय किया है. पेट्रोलिंग करने के लिए अभी तक 1 करोड़ रुपए का मेन्टेनेन्स का खर्च हो रहा है. हम माननीय सदस्य श्री. जयंत पाटील को साथ में लेकर उनके सुझावों को अमेंडमेंट के अन्दर शामिल करेंगे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

**पृ. शी.** : सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कंत्राटी कामगारांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे लाभ मिळत नसल्याने त्यांची नोकरी संपुष्टात येण्याची निर्माण झालेली भीती

**मु. शी.** : सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कंत्राटी कामगारांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे लाभ मिळत नसल्याने त्यांची नोकरी संपुष्टात येण्याची निर्माण झालेली भीती यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यामध्ये १२५० कर्मचारी आरोग्य विभागातंर्गत सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात गेल्या ८ ते १२ वर्षापासून कार्यरत असणे, सदर कर्मचाऱ्यांना कंत्राटी कामगार म्हणून नाममात्र मानधनाच्या स्वरुपात वेतन दिले जात असणे, राज्य शासनाच्या धोरणानुसार २४० दिवस काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरी दिली जात असणे, परंतु सदर कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणताही लाभ मिळत नसणे, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही तात्पुरती स्वरुपात असल्याने त्यांची नोकरी केव्हाही संपुष्टात येण्याची निर्माण झालेली भीती, राज्यातील ग्राम सेवक व शिक्षण सेवक यांच्याप्रमाणे कंत्राटी सेवा संपल्यानंतर ज्याप्रमाणे त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येते त्याचप्रमाणे सदर कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची केलेली मागणी, याबाबत कर्मचाऱ्यांच्या संघटनेने संबंधित विभागाकडे केलेली मागणी, परिणामी महाराष्ट्र राज्य सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कर्मचारी संघटना, बीड या संघटनेने काढलेला मोर्चा, याबाबत शासनाने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याकरीता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5.....

NTK/ KGS/ MMP/

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या कर्मचा-यांनी दिलेल्या सेवा लक्षात घेता त्यांना कायम स्वरुपी रोजगार देण्याची मागणी केलेली आहे. याबाबतीतील शासनाच्या निर्णयानुसार त्यांना इतर शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सेवेत सामावून घेण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे कंत्राटी पध्दतीचे कर्मचारी आहेत. क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी त्यांची नियुक्ती झाली होती. सभापती महोदय, श्रीमती उमादेवी विरुध्द कर्नाटक सरकार या प्रकरणासंबंधी नुकताच सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, 'कोणताही कर्मचारी असो मग तो डेलि व्हेजिसचा असो, ॲडहॉक पध्दतीचा असो, कंत्राटी पध्दतीचा असो, या कर्मचा-यांना कायम करु शकत नाही.' सभापती महोदय, कोणत्याही पदावरील कर्मचा-यांना नियमित करावयाचे असेल तर त्यासाठी एक प्रक्रिया असते. त्या प्रक्रियेच्या माध्यमातून निवड झाली असेल तर नियमित करावे लागते. परंतु या कर्मचा-यांना तात्पुरत्या पदांवर घेण्यात आले होते. कंत्राटी पध्दतीने त्यांची नियुक्ती झाली होती. त्यांना स्पेसिफिक प्रोजेक्टसाठी घेतले होते. या प्रोजेक्टचे काम संपल्यामुळे त्यांना कायम करणे शक्य होणार नाही.

श्री.नितीन गडकरी : ग्रामसेवक, शिक्षण सेवक ही पदेही कंत्राटी पध्दतीचे असताना त्यांच्याबाबत सरकारने सहानुभूतीचे धोरण स्वीकारले आहे. त्याप्रमाणे या कर्मचा-यांसाठी सुध्दा सहानुभूतीचे धोरण स्वीकारले जाईल काय ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

श्री. रणजित कांबळे : शिक्षण सेवक किंवा ग्राम सेवकांची पदे ही मंजूर पदे आहेत. या पदांवर सुरुवातीची तीन वर्षे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर काम केल्यानंतर त्यांना कायम स्वरुपी सेवेमध्ये घेण्यात येईल असे सुरुवातीलाच नियुक्ती करताना सांगितले जाते. क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमामध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांची पदे मंजूर नाहीत. त्यामुळे त्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : केन्द्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या विविध योजना आहेत. या लोकांनी काम केल्यानंतर आता ते एजबार झालेले आहेत. त्यामुळे त्यांना अन्य ठिकाणी नोकरीची संधी नाही. त्यांचे संसार उघड्यावर पडण्याची वेळ आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये अशा लोकांना सेवेमध्ये घेऊ नका असे म्हटलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक प्रकणामध्येय निर्णय दिलेला आहे. आता हा क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम संपुष्टात आला असेल तर दुस-या योजनेमध्ये त्यांना काम द्यावे. आज या लोकांचे जीवन उद्ध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे. तेव्हा या लोकांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मकदृष्ट्या प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक प्रकरणामध्ये निर्णय दिलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक आहे हे सन्माननीय सदस्यांना देखील माहीत आहे. सन्माननीय सदस्यांनी अशाच प्रकारच्या दुस-या योजनेमध्ये या लोकांना सामावून घ्यावे असे सांगितले. त्या पध्दतीने विचार करता येऊ शकेल. परंतु या लोकांना कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर नेमले होते. जी पदे कॉन्ट्रॅक्च्युअल होती ती कायम करता येणार नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नियुक्तीचे प्रोसिजर पूर्ण करुन या लोकांना सेवेमध्ये घेण्यात अडचणी आहेत. परंतु केन्द्र सरकारच्या आरोग्य विभागाच्या, समाजकल्याण विभाच्या अनेक योजना आहेत आणि त्या योजनांमध्ये कंत्राटीपध्दतीवर नेमणुका करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम संपला असेल तर आमच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

विदर्भामध्ये सिकलसेल निर्माण झालेला आहे. सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमास केन्द्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमामध्ये काम नसेल तर सिकलसेलमध्ये या लोकांना काम द्यावे.

श्री. रणजित कांबळे : जेव्हा ते निकषामध्ये बसतील त्यावेळीच त्यांना घेता येईल. या लोकांची 1 वर्षासाठी कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर नियुक्ती झाली होती. These appointments are exclusively temporary. They are only for a period of one year. असे त्या पदांच्या बाबतीत म्हटलेले आहे. या लोकांची नियुक्ती करताना ही पदे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आहेत हे त्यांना माहीत होते. तसेच 20 रु.च्या स्टॅम्पपेपरवर त्या लोकांच्या सह्या घेतलेल्या आहेत. ही केन्द्र शासनाची योजना होती आणि त्यासाठी केन्द्र सरकारकडून निधी प्राप्त होत होता. या कार्यक्रमाला केन्द्र सरकारने जसजशी मुदतवाढ दिली त्याप्रमाणे हे लोक कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर काम करीत होते. स्पेसिफिक टाईम बाऊण्ड प्रोग्रॅमसाठी या लोकांची नियुक्ती करण्यात आली होती. बेरोजगार होणा-या या लोकांना नोकरी मिळाली पाहिजे अशी सनमाननीय सदस्यांची इच्छा आहे. हे लोक मेरिटमध्ये बसत असतील तर त्यांना घेता येईल अन्यथा त्यांना घेता येणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सदर कामगार 12 वर्षापासून काम करीत आहेत. दुस-या प्रकारचे कॉन्ट्रक्ट आले तर त्या ठिकाणी या कर्मचाऱ्यांना वर्ग करुन घेण्यात यावे अशा प्रकारची सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विनंती केली आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, ते कर्मचारी जर मेरीटमध्ये बसले तर आम्ही त्यांचा विचार करु. कंत्राटी कामगार मेरीटमध्ये बसतात म्हणून त्यांना आपण प्रथम काम दिले. 12 वर्षानंतर कंत्राटी कामगार मेरीटच्या बाहेर जातात असा माननीय मंत्री महोदयांचा अनुभव आहे काय ? मेरीटची अट घालणे ही गोष्ट बरोबर आहे काय ? या कंत्राटी कामगारांच्या बाबतीत विचार करण्यात येईल अशी माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली असती तर आम्ही समाधानी झालो असतो. परंतु सन्माननीय मंत्री महोदय, मेरीटचा विषय काढीत आहात तो बरोबर आहे काय ?

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे ) : माननीय मंत्री महोदयांनी सर्व सदस्यांचे प्रश्न ऐकून घ्यावीत त्यानंतर त्यांनी एकत्रितपणे उत्तर द्यावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम हा केंद्र शासनाचा आहे असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे. फायलेरिया हा कार्यक्रम केंद्र शासनाचा आहे. मलेरिया हा कार्यक्रम केंद्र सरकारचा आहे. मलेरियाच्या रुग्णांचे रक्ताचे नमुने घेण्यासाठी मलेरिया वर्कर्‌ची जास्त प्रमाणात गरज पडते. या कर्मचा-यांना मलेरिया संदर्भातील थोडेसे प्रशिक्षण दिले तर ते मलेरिया वर्करची कामे करु शकतात. तर या कर्मचा-यांचा मलेरिया वर्कर म्हणून समावेश करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, क्षयरोग नियंत्रणातील कंत्राटी कामगारांना दुसरीकडे वर्ग करण्यात येणार नाही. अशा कर्मचा-यांना दुसरीकडे वर्ग करावयाचे असल्यास त्या पदांसाठी ज्या काही रिक्वॉयरमेंट आहेत. त्या रिक्वॉयरमेंटमध्ये सदरहू क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कर्मचारी बसत असले तर त्यांना घेऊ शकतो. रिक्वायरमेंटमध्ये बसले नाही तर त्या कंत्राटी कर्मचा-यांना आम्ही दुसरीकडे सामावून घेऊ शकत नाही. कोर्टाने आदेश दिले असल्यामुळे त्यांचे आदेश आम्हाला बंधनकारक आहेत. We are bound by this. या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला की, या कंत्राटी कर्मचा-यांना मलेरिया किंवा फायलेरिया वर्कर म्हणून घेण्यात यावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : या कर्मचा-यांना दुसरीकडे वर्ग करुन घेऊ नये असे कोर्टाने निर्णय दिला आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : तसे कोर्टाचे आदेश नाहीत. सन्माननीय सदस्य माझी दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मला वाटते. Any Act, Order passed by the Supreme Court applies throughout the Country.

Shri Nitin Gadkari : It is an Order passed by the Court in individual case. तुम्ही वकील आहात. एका व्यक्तिगत प्रकरणाच्या बाबतीत कोर्टाने दिलेला निर्णय सगळयांना लागू करता येतो काय ? एका व्यक्तिगत प्रकरणाच्या बाबतीत कोर्टाने निर्णय दिलेला आहे. तो निर्णय सगळयांना लागू होतो काय? यासंबंधीचा सभापती महोदया आपणच आम्हाला माहिती द्यावी. मंत्री महोदय, याबाबतचा निकाल एकदा लागू द्यावा. एक व्यक्ती व्यक्तीगतरित्या कोर्टात गेली होती..

**तालिका सभापती** : आपला मुद्दा मला समजलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : माझे पूर्ण म्हणणे कृपया ऐकून घ्यावे. एखादी व्यक्ती व्यक्तिगतरित्या सुप्रीम कोर्टात नोकरीत कायम करण्यासंबंधी गेली. त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला की, कंत्राटवर असलेल्या कर्मचा-यांना सेवेत कायम करता येत नाही. नियुक्तीचे जे प्रोसीजर असते ते पूर्ण केल्यानंतरच त्यास कायम सेवेत घेता येईल. कायम नियुक्तीकरिता प्रोसीजर पूर्ण करुन घेता येईल असा एका व्यक्तिगत केसमध्ये कोर्टाने निर्णय दिला. पहिला मुद्दा असा की, एका व्यक्तिगत केसमध्ये झालेला निर्णय हा सगळयांना लागू आहे काय ? Whether this decision is applicable to an individual or whether it is applicable to all? If it is mentioned in the judgement of the Supreme Court that this decision, this guideline is applicable for all, then it is different thing. The decision taken by the Supreme Court is related with the individual problem of the Applicant, which was submitted before the Court by that Applicant. The decision of the Supreme Court was mandatory in case of that individual Applicant and it cannot be mandatory for all cases. This is my legal point.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, केंद्राची मलेरिया, फायलेरिया या रोगांवर नियंत्रण करण्यासंबंधीची स्कीम आली. आणि त्या स्कीमची अंमलबजावणी करण्यासाठी कंत्राट बेसीसवर कर्मचा-यांची आवश्यकता भासली तर या 12 वर्ष क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात काम करणा-या कर्मचा-यांना कंत्राटी बेसीसवर नियुक्त्या देता येतील काय ?

यानंतर श्री. कानडे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे सुरु...

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदया, परमनंट करण्यासाठी प्रोसिजर आहे. 12 वर्षे कर्मचाऱ्यांनी सेवा केलेली आहे आणि ते योग्य ठरत असतील तर त्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी शासनाने प्राधान्य दिले पाहिजे. निकषामध्ये हे कर्मचारी बसत असतील तर त्यांना प्राधान्य देऊ असे शासनाने सांगावे. सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा आधार घेऊन गरीब लोकांवर अन्याय का करीत आहात ? याबाबत सभापती महोदया आपण मला उत्तर द्यावे.

**तालिका सभापती** : (श्रीमती उषा दराडे ) : माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, मघाशी आपण असे म्हणाला की, सर्व सन्माननीय सदस्यांनी एकदम प्रश्न विचारावेत म्हणजे मंत्रीमहोदय सगळया प्रश्नांना एकाच वेळी उत्तर देतील. परंतु मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, सभागृहामध्ये अशी पध्दत नाही. एका वेळी एका माननीय सदस्याने प्रश्न विचारावयाचा आणि मंत्रीमहोदयांनी त्याला उत्तर द्यावयाचे अशी पध्दत आणि प्रथा आहे. आपण सांगितलेली सभागृहाची प्रथा नाही. म्हणून ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे. रेकॉर्डवर असे वक्तव्य ठेवणे बरोबर होणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, आरोग्य खात्यात 8/10 वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. चर्चेत सहभागी होताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय 2006 मध्ये लागलेलाआहे. मुख्य न्यायमूर्ती एस.के.सबरवाल यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, हंगामी कर्मचाऱ्यांविषयी त्यांच्या सेवा बेकायदेशीर नसल्या पण अनियमित असल्या तरी 10 वर्षापेक्षा अधिक सेवा झालेला कर्मचारी असेल तर तो सरकारी सेवेमध्ये कायम सामावून घेण्याची मुभा शासनाला राहील. जर कर्मचाऱ्यांनी 8/10 वर्षे काम केले आहे आणि जरी त्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्या तरी पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सेवेत कायम केले जाईल काय ?

श्री. रणजित कांबळे : ' नाही '.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचे कंत्राट संपल्यानंतर त्याचा हक्कही जातो. कंत्राटी पध्दतीमध्ये कोणतेही काम सातत्याने करावे लागत असेल आणि असे काम करताना 240 दिवस सलग भरले असतील तर त्याला रेग्युलर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

करावे लागते. कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत 12 वर्षे सातत्याने ते काम करीत आहेत तेव्हा दरवर्षी त्यांच्या कराराचे रिनीवल केले होते काय ? कंत्राट संपले तरी 1 वर्षे सातत्याने काम करीत होते काय ? कराराचे रिनिवल केले असेल आणि 12 वर्षे सातत्याने कर्मचारी काम करीत असेल तर त्याची सेवा कंटीन्यू समजली जाते. मेरीटचा प्रश्न निर्माण होतो. कोर्टामध्ये मेरीटवर रेग्युलर रिक्रुटमेंट बेसीसवर क्वॉलिफिकेशनचा अंतर्भाव केलेला आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.......... लक्षवेधी सूचना क्र.1....

कदाचित कॉन्ट्रॅक्टवर त्या कर्मचाऱ्याकडे पात्रता नसेल, त्याला पात्र होण्यासाठी बाहेरुन क्वालिफाय व्हावे लागेल. मग मेरिटचा विषय तेथे लागू होतो. याठिकाणी तो लागू होत नाही. 12 वर्षे त्याने अखंड सेवा केली आहे. शासनाने कॉन्ट्रॅक्ट एक्स्पायर न करता कंटिन्यू केल्यामुळे त्याला आता सेवेत घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे उदारमतवादी धोरण स्वीकारुन या कर्मचाऱ्यांना इतरत्र शासन सेवेत सामावून घेतले जाईल काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदया, उमादेवी विरुध्द स्टेट ऑफ कर्नाटक या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने जे जज्जमेंट दिले, which are applicable to the States...

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : सुप्रीम कोर्टामध्ये जे प्रकरण होते त्या प्रकरणामध्ये इंडिव्हीज्युअल पार्टी होती. सुप्रीम कोर्टामध्ये कोणते इश्यू डिस्कस झाले, कोणते जज्जमेंट दिले, त्या जज्जमेंटमध्ये अशा कामगारांना प्रोसीजर पूर्ण करुन पुन्हा घेऊ शकता असे म्हटले आहे का?..

श्री.रणजित कांबळे : ज्या केसचा उल्लेख करण्यात आला ती बाब विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायासाठी सादर केली होती. त्या विभागाने ही बाब तपासून अभिप्राय दिले आहेत. सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकारी या नात्याने आपले ओपिनियन विचारु इच्छितात.

**तालिका सभापती** : आपण माझे ओपिनियन पूर्ण होऊ देत नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी प्रत्येक प्रश्न शोधून काढला आहे. सुप्रीम कोर्टामध्ये झालेल्या प्रकरणी जज्जमेंट देत असताना प्रोसीजर पूर्ण करुन घ्यावयाचे असेल तर घ्यावे किंवा घेऊ नये. याचा अर्थ प्रोसीजर पूर्ण करणे किंवा न करणे ही शासनाची इच्छा आहे. ही इच्छा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. शासनाला या कामगारांना सेवेत घ्यायचे असेल तर घेता येईल. सेवेत घ्यायचे नसेल तर शासनावर बंधन नाही असा त्याचा अर्थ निघतो. या प्रकरणाचे जे फॅक्ट्स आहेत, जे इश्यू आहेत ते काय आहेत हे सभागृहासमोर स्पष्टपणे आले पाहिजेत. ते आणि हे प्रकरण, दोन्ही सिमीलर आहेत का हे तपासून घेतले पाहिजे. सुप्रीम कोर्टाचे एखादे रुलिंग ओव्हररुल करताना फॅक्ट असेल तर ओव्हररुल करता येते अशी परिस्थिती आहे का याचा विचार करावा लागेल. यात महत्वाचा प्रश्न असा आहे, प्रशासनाने निर्णय घेत असताना इतर कोणत्या योजनेमध्ये सामावून घेण्याची सहानुभूती दाखविण्याकरिता इतर योजनेमध्ये कुठे जागा उपलब्ध आहेत का? या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**..........

कामगारांना घेण्याची गरज आहे का? असल्यास यांना सेवेत घेत असताना यांचे मेरिट आहे का हे देखील तपासावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो म्हणजे, या कामगारांना शासनाने सलग कामावर ठेवले का? शासनाने दरवर्षी त्यांचे वेगळे कॉन्ट्रॅक्ट केले होते का? त्या कॉन्ट्रॅक्टच्या अटी या कामगारांना मान्य आहेत का? त्यामध्ये ब्रेक किती होता या सर्व बाबी तपासून निर्णय घ्यावा लागेल.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदया, आपण जे निदेश दिले ते विधी व न्याय विभागाकडून तपासून घेतले जातील आणि त्यानंतर जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो शासन घेईल.

----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर येथे औषध नमुने चाचणी प्रयोगशाळा निर्माण करणे

**मु.शी.**: नागपूर येथे औषध नमुने चाचणी प्रयोगशाळा निर्माण करणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संपूर्ण राज्यात अन्न व औषध प्रशासनाकडून औषधे आणि सौंदर्य प्रसाधने अधिनियम व त्याखालील नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसणे, त्यासाठी सन १९६८ नंतर बांद्रा (मुंबई) येथे एक औषध नियंत्रण प्रयोगशाळा कार्यान्वित असणे, परंतू अलीकडे औषध निर्माण संस्था राज्याच्या इतरही जिल्ह्यात सुरु झाल्याने मुंबई येथील प्रयोगशाळेवर कामाचा अतिरिक्त भार पडणे, या सर्व बाबींचा विचार करुन राज्यात नागपूर आणि औरंगाबाद येथे प्रत्येकी एक प्रयोगशाळा सुरु करण्याचा प्रस्ताव दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजी शासनाकडे सादर करणे, त्या अनुषंगाने अन्न व औषधी प्रशासनाच्या योजनांसाठी आठव्या पंचवार्षिक योजनेत सन १९९२-९७ च्या नियतव्यय वार्षिक योजनेत नागपूर येथे प्रयोगशाळा उभारणीसाठी शंभर लक्ष (एक कोटी) रुपयांच्या निधीची केलेली तरतूद, परंतु औरंगाबाद येथे सन २००१ मध्ये औषध नियंत्रण प्रयोगशाळा अस्तित्वात येऊनही नागपूर येथे औषध नियंत्रण प्रयोगशाळा उभारणीची अद्यापही कार्यवाही न होणे, खाद्य पदार्थामधील भेसळ शोधून काढण्यासाठी आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्या कंपन्यांना आळा घालण्याच्या उद्देशाने नागपूर येथे प्रयोगशाळेची आवश्यकता असणे, अन्न नियंत्रण, प्रयोगशाळेच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव विचाराधीन असणे, परंतू अन्ननियंत्रण प्रयोगशाळेबरोबर औषधनियंत्रण प्रयोगशाळा नागपूर येथे सुरु करण्यासंबंधी शासनाकडे वारंवार केलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व औषधिद्रव्ये प्रशासन राज्य मंत्री ): सभापति महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**( श्रीमती उषाताई दराडे) :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, अन्न व औषध प्रशासनाच्या संदर्भातील ही लक्षवेधी असून नागपूरयेथे औषध नियंत्रण प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी ही लक्षवेधी आलेली आहे. सन 1992 ते 1997 या आठव्या पंचवार्षिक योजनेतील ही योजना असून शासनाने त्यासाठी 1 कोटीचा नियतव्यय देखील मंजूर केला होता. त्यानुसार सन 1996-97 मध्ये 20 लाख रुपये एवढा निधी दिला आहे. तसेच निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, भविष्यात अन्न व औषध नमुने चाचणीच्या कामाची निकड विचारात घेऊन तसेच जागा व निधीची उपलब्धता विचारात घेऊन नागपूर येथे औषधे व अन्न नमुने चाचणीसाठी प्रयोगशाळा स्थापन करण्याची बाब विचारात घेण्यात येईल. माझा या निमित्ताने असा प्रश्न आहे की, या कामासाठी शासन प्रशासकीय मान्यता केव्हा देणार ? तसेच ज्यावेळेस ही लक्षवेधी सूचना सभागृहासमोर आली त्यावेळेस कमिशनर एफ.डी.ए. यांनी नागपूर विभागीय आयुक्तांना 70 हजार चौ.फूट जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केली आहे. हा भूखंड किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येईल ?

श्री. बाबा सिध्दीकी : महोदय, या प्रयोगशाळेसाठी जमीन अद्याप प्राप्त झालेली नाही परंतु आयुक्तांना जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत. तसेच शासकीय जमीन प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही त्वरित करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, हे प्रकरण 22 वर्षांपासून तसेच पडून आहे. या 22 वर्षात जमीन मिळाली नाही ती आता नागपूर शहरात मिळणे दुरापास्तच आहे. म्हणून जागा मिळत नाही तोपर्यंत भाडयाने जागा घेऊन तेथे ही प्रयोगशाळा सुरु करण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. बाबा सिध्दीकी : सभापति महोदय, पूरे देश में 40 हजार ड्रग्स की टेस्टिंग होती है. इनमें से 8 हजार ड्रग्स की टेस्टिंग महाराष्ट्र राज्य में होती है. मुंबई में प्रयोगशाला है. उसके बाद आधाडी सरकार ने औरंगाबाद में प्रयोगशाला शुरु की है. नागपुर में प्रयोगशाला की आवश्यकता नहीं है लेकिन शासन के पास प्रस्ताव आया है इसलिए प्रयोगशाला के लिए नागपुर में जमीन प्राप्त करने की कोशिश कर रहे हैं. अगर जमीन प्राप्त नहीं होगी तो केबिनेट मंत्री के साथ बैठक आयोजित करके चर्चा करेंगे.

श्री. नितीन गडकरी :नागपुर में प्रयोगशाला की आवश्यकता नहीं है, यह आप किस आधार पर कह रहे हैं, आप यहां पर गलत जानकारी क्यों दे रहे हैं ? नागपुर में प्रयोगशाला की आवश्यकता है. इस संबंध में नागपुर के आयुक्त का पत्र मेरे पास है. इस पत्र में यह कहा गया है

...4



श्री. नितीन गडकरी......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कि, 11 व्या पंचवार्षिक योजनेत अन्न व औषध नियंत्रण प्रयोगशाळा नागपूर येथे सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. याचाच अर्थ असा आहे की नागपुर येथे प्रयोगशाळेची गरज आहे. ऐसी स्थिति में आप नागपुर में प्रयोगशाला क्यों शुरु नहीं कर रहे हो ?

**तालिका सभापती (श्रीमती उषातई दराडे)** : या प्रयोगशाळेसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासंबंधी शासन काय प्रयत्न करणार आहे, एवढयापुरतेच उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. बाबा सिध्दीकी : जिल्हाधिकारी, एनआयटी व आयुक्तांना या प्रयोगशाळेसाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. केशवराव मानकर : सन 1985 पासून हा प्रस्ताव शासनाकडे आहे. त्यावेळेस जागा देण्याचे मान्य केले होते परंतु आतापर्यंत त्यासाठी जागा उपलब्ध करण्यात आली नाही. ज्या ठिकाणी फूडची लॅब चालू आहे तेथे ड्रग्जची लॅब का चालू शकत नाही ?

श्री. नितीन गडकरी : महोदय, नागपूरला माता कचेरी म्हणून एक मोठा परिसर आहे. पूर्वी संचालकांचे कार्यालय होते ती जागा फार मोठी आहे. ही इमारत खूप मोठी आहे व ही जागा आरोग्य विभागाच्या अंतर्गत आहे. आयुक्तांनाही या प्रयोगशाळेसाठी जागा मागण्याची गरज नाही. यासाठी केवळ आपल्या विषयाचे कॅबिनेट मंत्री आणि आपण एक बैठक ताबडतोबीने बोलावून ही आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेली जागा या प्रयोगशाळेसाठी घेण्यात यावी. केवळ स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत प्रयत्न सुरु आहे अशा प्रकारची उत्तरे देऊन ह्या प्रश्नाचे उत्तर टाळण्याचा प्रयत्न करु नये. असे शासन करणार आय ?

श्री. बाबा सिध्दीकी : महोदय, बैठक बोलावून निर्णय घेण्यात येईल तसेच सदर बैठकीसाठी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनाही बोलाविण्यात येईल.

............

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील राजपुरी प्रवाशी जेट्टीचे काम ठेकेदाराने बंद ठेवल्यामुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय

**मु. शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील राजपुरी प्रवाशी जेट्टीचे काम ठेकेदाराने बंद ठेवल्यामुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय यासंबंधी सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुरुड (जिल्हा रायगड) तालुक्यातील राजपूरी प्रवाशी जेट्टी जूनी झाल्याने मोडकळीस येणे, या जेट्टीच्या दुरुस्तीसाठी, रस्त्यासाठी व वाहनतळ यासाठी ग्रामस्थांच्या आग्रहास्तव सुमारे पावणेदोन कोटी रुपयांची तरतूद मेरीटाईम बोर्डाकडून मंजूर होणे, संबंधीत ठेकेदाराने काम सुरु केले मात्र काही प्रमाणात काम केल्यानंतर मे २००७ पासून काम बंद ठेवणे, नवीन काम करण्यासाठी पूर्वीच्या जेट्टी व त्या ठिकाणच्या इमारती जमीनदोस्त झाल्याने सध्या या मार्गावर प्रवास करणे अतिशय धोकादायक झाले असणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना."

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर ( बंदरे राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्रीमती उषाताई दराडे ): निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

...2

18-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3A-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी जेट्टी बांधण्याचे काम ज्या कंपनीला देण्यात आलेले आहे ती कंपनी सदर काम करण्यास लायक नाही. मेरीटाईम बोर्डाने ठेकेदाराची क्षमता, त्याचा मागील अनुभव न बघता मुरुड तालुक्यातील राजपुरी जेट्टीचे कामे ठेकेदाराला दिलेले आहे. या ठेकेदाराला मेरीटाईम बोर्डाने जी कामे दिलेली आहेत ती सर्व कामे या ठेकेदाराने अर्धवट ठेवलेली आहेत. राजापूरी जेट्टीजवळ महिलांसाठी टॉयलेट होते परंतु हे टॉयलेट तोडल्यामुळे महिलांची फार गैरसोय झालेली आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराकडून दंड वसूल करुन सदर ठेकेदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकून राजपुरी प्रवाशी जेट्टीच्या कामाला सुरुवात केली जाईल काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ज्या ठेकेदाराकडून लोएस्टचे टेंडर येते त्याच ठेकेदाराला कामाचा ठेका दिला जात असतो. सदर ठेकेदाराने गेल्या दोन वर्षात राजपुरी जेट्टीचे फारसे काम पूर्ण केलेले नाही त्यामुळे सदर कॉन्ट्रक्ट रद्द करण्याची प्रोसेस सुरु असून सदर काम दुस-या ठेकेदाराला देण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, या ठेकेदाराची कोकणातील बरीच कामे अर्धवट अवस्थेत पडलेली आहेत. लोएस्ट टेंडर जरी आले तरी सुध्दा त्या ठेकेदाराने अगोदर केलेली कामे, त्या कामाचा दर्जा तपासूनच कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिले जात असते. केवळ ऑडीटर चूक काढेल म्हणून ज्याला अनुभव नाही, ज्याचा मागील कामाचा दर्जा चांगला नाही असे असतांनाही ज्याचे लोएस्ट टेंडर येईल त्याला कामाचा ठेका दिला जाईल, असा नियम नाही. आम्हाला शासनाचा नियमाची माहिती. आम्ही कायदे मंडळाचे सदस्य आहोत. आम्हीच कायदे केले आहेत. त्यामुळे आम्हाला सुध्दा नियमाची माहिती आहे. त्यामुळे आपण रेकॉर्डवर चुकीची माहिती देत आहात. राजपुरी प्रवाशी जेट्टीवर रोज लाखो प्रवासी ये-जा करीत असता, मी सुध्दा रोज याच जेट्टीवरुन ये-जा करीत असतो. आज या जेट्टीवर चालण्यासाठी सुध्दा जागा नाही अशी परिस्थिती आहे.मेरीटाईम बोर्डाने ज्या ज्या ठिकाणी कामाचा ठेका दिलेला आहे ती सर्व कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे ज्या अधिका-यांनी सदर कॉन्ट्रॅक्ट दिले त्या अधिका-यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सर्व सूचना तपासून घेतल्या जातील. तसेच या ठिकाणी काम करण्यासाठी दुस-या कॉन्ट्रक्टरची आवश्यकता आहे का ही बाब सुध्दा तपासून घेतली जाईल तसेच या विषयाच्या संदर्भात संबंधित अधिकारी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, ज्या ठेकेदाराला सदर जेट्टीचे काम दिले होते त्या ठेकेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे त्या कामावरील खर्च आता वाढला आहे त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे सदर नुकसानभरपाई सदर ठेकेदाराकडून वसूल केली जाईल काय?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत सर्व माहिती तपासून निर्णय घेतला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदया, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ठेकेदारांना परस्पर कामे देण्यात आलेली आहेत. याबाबतीत सभागृहात निवेदन सुध्दा करण्यात आलेले आहे. देवगड येथील आनंदवाडी प्रकल्पासाठी जे सिंगल टेंडर वर काम देण्यात आलेले आहे, त्या बाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो तपासून त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे ) : लोएस्ट टेंडर आले म्हणून ठेकेदाराला काम न देता त्याने पूर्वी केलेली कामे, त्यांचा दर्जा ही बाब बघून ठेकेदाराला काम दिले पाहिजे. दोन दोन वर्षे काम अपूर्ण राहत असेल तर ही बाब योग्य नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, अपूर्ण कामांची तपासणी आपण किती दिवसात पूर्ण करणार आहात?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सदर कामाची तपासणी करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागेल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : ही बाब तपासून पाहण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ?

. **तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भातील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : होय

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : मुंबईमध्ये वृध्दांच्या झालेल्या हत्या

**मु. शी**. : मुंबईमध्ये वृध्दांच्या झालेल्या हत्यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, गोविंदराव आदिक, जैनुद्दीन जव्हेरी,राजन तेली,विनोद तावडे,संजय केळकर, मधुकर चव्हाण,रामनाथ मोते,गुरुमुख जगवानी,अरुण गुजराथी,वि.प.. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रतापसिंह मोहिते- पाटील (विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय .उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील वरळी येथील सेन्सॉर बोर्डच्या सदस्या किरण खन्ना, सांताक्रुझ येथील वृध्द जोडपे आणि वार्डन रोड येथील लाजवंती धुमाणी या ज्येष्ठ नागरिकांच्या फेब्रुवारी, 2008 च्या पहिल्या आठवडयात झा लेले हत्याकांड आणि या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर शहरातील एकाकी राहणा-या वृध्दांमध्ये पसारलेली घबराहट आणि चिंतेचे वातावरण तसेच याबाबत कोणत्याही सुरक्षिततेची हमी नसल्याने पोलीस यंत्रणेवरील जनतेचा उडालेला विश्वास, याबाबत वृध्दांच्या संरक्षणासाठी शासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजना आणि त्यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही "

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नतर -

श्री.प्रतापसिंह मोहिते - पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ नागारिकांकडे आणि वृध्द नागरिकांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा आदराचा आणि सन्मानाचा आहृे परंतु फेब्रुवारी 2008 मध्ये वृध्द माणसाच्या झालेल्या हत्या पाहता आणि एकाकी झालेल्या माणसांच्या झालेल्या हत्या पाहता या व्यक्तींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था शासनाकडे नाही असे चित्र दिसून येत आहे त्यामुळे या वृध्द माणसांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. अशा प्रकारे एकाकी आणि वृध्द माणसांना संरक्षण देण्यासाठी शासन कोणती योजना आखणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,समाजामध्ये अनेक वृध्द व्यक्ती एकाकी राहतात. त्यांना मुले असूनसुध्दा मुले वेगळे राहतात आणि त्यांचे वृध्द आई वडील वेगळे राहतात अशा व्यक्तींना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने विविध उपाय योजले आहेतृ त्यांच्यासाठी 100, 109 आणि 103 या नंबरची हेल्प लाईन सुरु करण्यात आलेली आहे.या फोन नंबरवरुन या वृध्द व्यक्तींनी काही सूचना केली असेल तर त्यांच्या घरी जाऊन पोलिसांनी जाऊन चौकशी करावी आणि त्यांच्या आरोग्या विषयी काम असो वा अन्य कोणतेही काम त्यांनी सांगितले असेल तर ते करण्यासाठी पोलीस स्टेशनला सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे पोलीस त्या वृध्द माणसांच्या घरी जातात आणि त्यांना योग्य ती मदत करीत असतात अशा प्रकारे एकूण 46 हजार कॉल्स त्यांनी अटेन्ड केलेले आहेत.अशा प्रकारे ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी पोलीस जाऊन या वृध्द व्यक्तींना मदत करीत असतात अशा प्रकारे शासनाने त्यांना मदत करण्याची व्यवस्थां केलेली आहृे

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, वृध्द माणसाकडे सहानुभूतीने पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन असला पाहिजे. त्यांच्याकडे हयुमन अप्रोचने पाहिले गेले पाहिजे. या ठिकाणी केवळ ब्युरॉक्रॅटीक उत्तर देऊन चालणार नाही. आज दिवसेंदिवस वृध्द माणसांच्या मोठया प्रमाणावर हत्या केल्या जात आहेत. कोणत्याही दिवसाचे वर्तमानपत्रा उघडले तर त्या वर्तमानपत्रामध्ये वृध्द व्यक्तीची हत्या केल्याची बातमी प्रसिध्द झालेली असते. अशा प्रकारे वृध्द माणसांची हत्या करण्याचा क्राईम रेट वाढत चालला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, " ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातात तसेच ज्येष्ठ नागरिकांकडे काम करणा-या कामगाराची नोंदणी व अभिलेख ठेवण्यात येतात तसेच वृध्द महिलांचे राहते ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये म्हणून कटाक्षाने प्रयत्न केले जातात." तेव्हा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त.....

अशा प्रकारची दक्षता घेण्यात आल्यानंतर या गुन्हयामध्ये घट का होत नाही ? अशा प्रकारचे किती गुन्हे गेल्या वर्षी नोंदविण्यात आले होते त्यात किती जणांना अटक करण्यात आली होती आणि या गुन्हेगारांची पार्श्वभूमी काय होती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वृध्द व्यक्तीची हत्या करण्याच्या गुन्हयात वाढ होत आहे असे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी सांगितलेले आहे परंतु त्यांनी सांगितलेली माहिती बरोबर नाही. या गुन्हयासंबंधीची संपूर्ण आकडेवारी माझ्याकडे असून ती मी आपल्याला देऊ इच्छितोृ

श्री.संजय दत्त : सभापती महोदय. दिवसेंदिवस वृध्द व्यक्तींची हत्या करण्याचे प्रमाण वाढत चालले असल्यामुळे समाजामध्ये वेगळया प्रकारचा मेसेज जात आहेृ

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 2002 मध्ये अशा 21 घटना घडल्या आणि 22 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या होत्या, सन 2003 मध्ये 12 घटना घडल्या आणि 12 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या होत्या, 2004 मध्ये 10 घटना घडल्या होत्या आणि 11 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या होत्या, 2005 मध्ये 14 घटना घडल्या होत्या आणि 13 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या, 2006 मध्ये 9 घटना घडल्या होत्या आणि 10 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या होत्या, 2007 मध्ये 8 घटना घडल्या आणि 8 यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या, 2008 मध्ये 4 घटना घडल्या होत्या आणि 5 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेतृ

डॉ.दीपक सावंत : 2008 साल आता सुरु झालेले आहे

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : 2002 सालापासूनची आकडेवारी मी आपल्याला दिली आहे.दिवसेंदिवस या गुन्हयाच्या संख्येत घट झालेली आहे या घटनेकडे ब्युरोक्रॅटीक नजरेने न पाहता सहानुभूतीने पहावे याबददल कोणाचेही दुमत नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे,

नंतर श्री.सुंबरे

नंतर श्री. सुंबरे

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. म्हेत्रे ....

शेवटी या ज्या घटना घडलेल्या आहेत त्या बहुतेक घटनांमध्ये असे दिसून आलेले आहे की, त्यांच्या घरामध्ये घरकाम करण्यासाठी ठेवलेल्या नोकरानेच हे काम केलेले आहे. एका घटनेमध्ये तर 13 वर्षे काम करीत असलेल्या नोकराने हे काम केले आहे. म्हणजे इतक्या विश्वासाने इतकी वर्षे काम करीत असलेल्यांनीच आपल्या वृद्ध मालकांना मारलेले आहे, असे असेल तर विश्वास तरी कोणावर ठेवायचा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच हेल्प लाईन द्वारा, जीएएसची यंत्रणा बसविण्याचेही काम आपण करीत आहोत जेणे करून अशा घटना घडल्यास ताबडतोब आपले पोलीस तेथे मदतीसाठी जाऊन पोहोचू शकतील. तेव्हा अशी यंत्रणा बसविण्याचे काम चालू आहे.

( **सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. उल्हास पवार** )

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणचा पोलीस खात्याचा दृष्टीकोन देखील आपण पाहिला पाहिजे. या निवेदनामधील शेवटच्या परिच्छेदात आपण म्हटलेले आहे की, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. तसेच ज्येष्ठ नागरिकां कडे काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी व अभिलेख ठेवण्यात येतात. तर या संदर्भात मी आपल्याला विचारू इच्छितो की, सांताक्रूज येथे जी घटना घडली त्या यघरातील नोकरांचा अभिलेख तेथील पोलीस ठाण्यामध्ये होता काय ? तसेच वृद्ध महिलांच्या राहत्या ठिकाणी अनुचित प्रकार घडू नयेत म्हणून कटाक्षाने प्रयत्न केले जातात असे जे आपण या निवेदनात शेवटी म्हटलेले आहे तर असे कोणते प्रयत्न आपल्याकडून केले जातात याची माहिती आपण देऊ शकाल का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सगळ्याच पोलीस ठाण्यांमधून वेळोवेळी त्या त्या भागातील जनतेला आवाहन करण्यात येते की, जी वृद्ध मंडळी आपापल्या घरामध्ये मुला-बाळांपासून एकटी रहात असतील त्यांनी त्यांच्याकडे काम करणाऱ्या नोकरांची माहिती व फोटो पोलीस ठाण्यामध्ये द्यावेत जेणे करून त्या माणसाची अधिक माहिती घेऊन त्याचा पूर्वेतिहास पोलीस जाणून घेऊ शकतील आणि संबंधित ज्येष्ठ नागरिकांनाही त्याबाबत माहिती करून देता येऊ शकेल. परंतु पोलिसांच्या आवाहनानुसार सगळेच काही अशी माहिती पोलीस ठाण्यांमध्ये देत नाहीत. जे देतात त्यांचा रेकॉर्ड ठेवण्यात येतो. आता सांताक्रूजच्या घटनेच्या संबंधात जे विचारले आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्याची माहिती आता माझ्याकडे नाही.

...... 3सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना आलेली आहे आणि त्यावर आपण निवेदन दिले आहे त्या निवेदनाच्या आधारेच आम्ही उपप्रश्न विचारीत असतो. तेव्हा आपण दिलेल्या निवेदनावरून अपेक्षित उपप्रश्न लक्षात घेऊन मंत्री महोदयांकडे माहिती असणे आवश्यक आहे. ...

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती सांताक्रूज पोलीस ठाण्यामध्ये नाही. कारण संबंधितांनी तशी कोणतीही नोंद पोलीस ठाण्यात केलेली नाही. पोलिसांकडून वेळोवेळी आवाहन करण्यात येते त्यानुसार लोकांनी त्यांच्याकडीन नोकरांची माहिती पोलीस ठाण्यात दिली पाहिजे, फोटो दिले पाहिजे. जेणे करून त्यावरून त्याचा मागील रेकॉर्ड तपासून घेता येऊ शकेल. पोलिसांच्या आवाहनाला लोक योग्य तो प्रतिसाद देत नाही .

डॉ. दीपक सावंत : मग प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये ही माहिती जमा करणे बंधनकारक आपण करणार का ?

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात हे आणून देऊ इच्छितो की, पोलिसांनी अशा प्रकारे एकदा आवाहन केल्यानंतर नागरिकांनी देखील त्याला प्रतिसाद दिला पाहिजे, त्यानुसार वागले पाहिजे. मात्र त्यांच्यावर असे करणे बंधनकारक करता येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रत्येक पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई घरोघरी पाठवून अशी माहिती आपल्याला घेता येऊ शकत नाही का ? किमान अशी माहिती आपण पोलीस ठाण्यात द्यावी म्हणून तरी आपण प्रत्येक मोहल्ल्यात जाऊन सांगितले पाहिजे. शेवटी आपण या निवेदनात जे म्हटले आहे त्या अनुषंगानेच मी हे विचारीत आहे. ..

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मीही त्याच अनुषंगाने उत्तर देत आहे. पोलिसांकडून सर्वसाधारणपणे आवाहन करण्यात येते त्यानुसार जे कोणी त्यांच्याकडील नोकरांची माहिती पोलिसांकडे आणून देतात त्यांचे रेकॉर्ड पोलीस ठाण्यावर ठेवले जाते. सांताक्रूजच्या घटनेतील संबंधितांनी अशी कोणतीही माहिती तेथील पोलीस ठाण्यात दिलेली नसल्याने पोलिसांच्या रेकॉर्डला ती माहिती नाही.

...... 3सी 3 ...



श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी आणि आपणही सांगितले की, अशी माहिती देण्याचे बंधन आपण नागरिकांवर घालू शकत नाही. पण येथे निवेदनातून आपण जे

सांगितले आहे त्या आधारेच आम्ही प्रश्न विचारीत असतो. आता यात आपणच म्हटले आहे की, ज्येष्ठ नागरिकांकडे काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी व अभिलेख ठेवण्यात येतात. म्हणून हा प्रश्न येथे विचारण्यात आला. राज्यमंत्र्यांकडे माहिती नसेल तर त्यांना सहकार्य करण्यास ज्येष्ठ मंत्री येथे उपस्थित आहेतच.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ज्यांनी ज्यांनी पोलिसांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन त्यांच्याकडील कामगारांची माहिती दिली आहे त्यांचे रेकॉर्ड आपण ठेवले आहे. ज्यांनी दिले नाही त्यांच्याबाबत आपण काही करू शकत नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, पोलिसांकडून अशा प्रकारचे आवाहन केले गेले होते हे बरोबर आहे. परंतु मध्यंतरी पोलिस ठाण्यांच्या माध्यमातून त्या त्या मोहल्ल्यामध्ये अशा प्रकारी किती ज्येष्ठ नागरिक एकाकी राहतात, तसेच त्यांच्याकडे बाहेरून आलेले कोण लोक काम करीत आहेत याची माहिती घेण्याच्या दृष्टीने मोहीम सुरू केली होती ती आता बंद केलेली आहे असे दिसते. तर अशी मोहीम पोलिसांकडून पुन्हा सुरू आपण करणार काय ?

( यानंतर श्री. सरफरे.... 3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

अशाप्रकारच्या घटनेमध्ये पोलीस स्टेशनला आपण सूचना दिल्या आहेत काय? अशा प्रकारच्या घटनेमध्ये किती लोक बाहेरुन आले आहेत. पोलिसांनी जी मोहिम बंद केली आहे ती पुन्हा चालू करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांनी मोहिम बंद केलेली नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी आपणास माहिती देण्यास तयार आहे. पोलिसांकडून गेल्या अनेक दिवसापासून अशाप्रकारची मोहिम हाती घेण्यात आलेली नाही...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांनी मोहिम बंद केलेली नाही. आपणास असे वाटत आहे की, पोलिसांनी त्या मोहिमेला अधिक गती दिलेली नाही. तेव्हा ती मोहिम अधिक तीव्र करण्यात येईल. जेणेकरुन त्यामधून आपल्याला चांगला रिझल्ट मिळाला पाहिजे अशाप्रकारच्या कडक सूचना देण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासनाने गृह खरेदीवर भरावयाच्या मुद्रांक शुल्कात केलेली वाढ

मु.शी. : शासनाने गृह खरेदीवर भरावयाच्या मुद्रांक शुल्कात केलेली वाढ यासंबंधी सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, अनिल परब, डॉ. दीपक सावंत, अरविंद सावंत, सुरेश जेथलिया, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, किसनचंद तनवाणी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"राज्यातील पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद व विशेषत: मुंबईमध्ये बिल्डर्सनी सदनिकांचे वाढविलेले असमर्थनीय भाव, सध्या रियल इस्टेट उद्योग अत्यंत तेजीत असल्याने त्याचा फायदा घेण्यासाठी शासनाने गृह खरेदीवर भरावयाच्या मुद्रांक शुल्कात सुमारे ४० ते १०० टक्के केलेली वाढ, सदर मुद्रांक शुल्क वाढीमुळे आधीच प्रचंड किंमत असलेल्या सदनिका आता मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर जाणे, शासनाने जाहिर केलेले गृहनिर्माण धोरण हे पूर्णत: बिल्डर्सधार्जिणे असणे, मुंबई सारख्या महानगरात सध्या घरांची आवश्यकता किती आहे व त्यांची पूर्तता कशी करावी याबाबत शासनाचे नियोजन नसणे, प्रतिवर्षी १ जानेवारी रोजी शासन जागांच्या किंमतीनुसार मुद्रांक शुल्कांचे रेडीरेकनर जाहिर करीत असणे, परंतु यावर्षी रेडीरेकनर नुसार ४० ते १०० टक्के वाढ जाहिर करुन शासनाने बिल्डर्सबरोबर संगनमत करुन फ्लॅटच्या मुद्रांक शुल्कात १०० टक्के वाढ केल्याने जागेचे भाव आकाशाला भिडणे, परिणामी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर या शहरामधील व महाराष्ट्रातील जमिनीच्या किंमती आकाशाला भिडत चालल्या आहेत त्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना विचारली आहे. प्रतिवर्षी प्रत्येक विभागातील जमिनीच्या किंमती किती असाव्यात यासंबंधी रेडी रेकनर तयार केले जाते. हे रेडी रेकनर तयार करीत असतांना त्या विभागातील परिस्थितीबरोबर इतर अनेक गोष्टी विचारात घेतल्या जातात. या निवेदनामध्ये म्हटले आहे की, सन 2008 साठी बाजारमूल्यदर तक्त्याचे प्रस्ताव तयार करतांना प्रत्येक मूल्य विभागातील सन 2007 मध्ये झालेल्या खरेदी विक्री व्यवहारांचा तपशील संकलित करुन त्या त्या मूल्य विभागातील खरेदी-विक्री व्यवहारांचा सरासरी दर आणि स्थानिक चौकशी वास्तूप्रदर्शने व सहजिल्हा निबंधक यांचेकडून प्राप्त दर वाढीचा प्रस्ताव इत्यादीचा साकल्याने विचार करुन त्या त्या मूल्य विभागामध्ये दर वाढ केलेली आहे". सभापती महोदय, ही दरवाढ करीत असतांना त्या विभागाचे असलेले महत्व उदा. बांद्रा (पूर्व) येथे बांद्रा-कुरला कॉम्प्लेक्स आहे. त्या विभागामध्ये आज 1 स्क्वेअर फूटाची किंमत 3 लाख रुपयापर्यंत आहे. अशाप्रकारे जमिनीचे दर वाढत चालले आहेत. हे खरेदी-विक्रीचे दर विचारात घेऊन त्यावर अधिमूल्य ठरविले जाते की, स्थानिक परिस्थिती, स्थानिक जनतेचा विचार घेऊन, स्थानिक उद्योगधंदे विचारात घेऊन, स्थानिक इन्फ्रास्ट्रक्चर विचारात घेऊन त्या जमिनीचे मूल्य ठरविले जाते. वाहनांचे ट्रान्सपोर्टेशन, इतर अन्य सोयी-सवलतींचा विचार करुन हे रेडी रेकनर तयार केले जाते. याबाबत हे शासन माहिती देईल काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार साहेबांनी रेडी रेकनर तयार करतांना कोणती पध्दत अवलंबिली जाते किंवा तो कशाप्रकारे तयार केला जातो याची माहिती उपलब्ध करावी अशाप्रकारचा प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, शासन दरवर्षी 1 जानेवारी रोजी रेडी रेकनर जाहीर करते. त्यापूर्वी मागील काही वर्षामध्ये त्या जमिनीची ज्या दराने झालेली विक्री आणि त्या दराची सरासरी बघितली जाते. अनेक निकषांपैकी हे एक निकष आहेत. त्याचप्रमाणे ज्या वास्तूची स्टॅंप डयुटी भरावयाची आहे त्या वास्तूच्या किवा जमिनीच्या बाजूला असलेले इन्फ्रास्ट्रक्चर विचारात घेतले जाते. त्यामध्ये रेल्वे स्टेशन, बस स्टॉप, शाळा-कॉलेज, आरोग्याची व्यवस्था जवळ आहे काय? या इन्फ्रास्ट्रक्चरच्या

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. नारायण राणे....

बाबी विचारात घेऊन त्याप्रमाणे रेडी रेकनर तयार केले जाते. फक्त मागील वर्षी झालेल्या जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार विचारात घेऊन हे तयार केले जात नाही. अनेक ठिकाणी आज 2 हजार रुपयांचा भाव असलातरी त्या ठिकाणी 3 हजाराच्या भावाने सुध्दा व्यवहार होतो व डॉक्युमेंटचे रजिस्ट्रेशन होते. काही ठिकाणी 3500 च्या भावाने रजिस्ट्रेशन होते. हे अधिकचे दर त्या त्याठिकाणी वेगवेगळे असतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

म्हणून दिवसेंदिवस रेडी रेकनरचे दर वाढत आहेत आणि याला रजिस्टर होणारी डॉक्युमेंटस् कारणीभूत आहेत. नागरीक स्वत:हून ज्या किंमती दाखवितात, ती अधिकची दाखवितात. त्यामुळे हे दर वाढलेले दिसत आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी परिच्छेद क्र.3 वाचून दाखविले. त्यामध्ये जो आधार दिलेला आहे, तोच आधार मी प्रश्न विचारताना दिलेला आहे. पण माननीय मंत्री महोदयांनी अधिक माहिती दिलेली आहे. ही माहिती जर या निवेदनामध्येच आली असती तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता. याबाबतीत माझा आणखी एक असा प्रश्न आहे की, मुंबई शहरामध्ये जागांचे दर आकाशाला भिडलेले आहेत. हे प्रकार असेच वाढत राहिले तर मुंबई शहरातील जो स्थानिक भूमीपुत्र आहे, संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून या ना त्या कारणासाठी येथे येणारा जो कामगार, रहिवाशी, झोपडपट्टीतील लोक आहेत आणि मी हे भूमीपुत्राबद्दल बोलत आहे, बाहेरुन आलेल्या लोकांबद्दल बोलत नाही. पण येथील वाढलेले दर पाहता भूमीपुत्रांना तडीपार होण्याचा प्रसंग निर्माण होणार आहे आणि मुंबई शहरामध्ये फक्त लक्ष्मीपुत्रांचे वास्तव्य दिसणार आहे. त्या मुळे याबाबतीत शासन जागरुक राहून काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी चिंता व्यक्त केली आहे, ती रास्त आहे. आज मध्य मुंबईत किंवा मुंबईच्या काही ठराविक भागामध्ये मध्यमवर्गीय लोक घर घेऊ शकतील अशी परिस्थिती नाही, ही वस्तुस्थिती आहे.

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : उपनगरामध्ये सुध्दा घरे घेऊ शकत नाहीत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे की, मुंबईमधील काही भाग असे आहेत. रेडीरेकनरमुळे भाव वाढत आहेत या म्हणण्यामध्ये काही तथ्य नाही. आपण आज सकाळी एखाद्या इमारतीमध्ये चौकशी करण्यासाठी गेलो तर 5000 रुपये भाव सांगितला जाईल, परंतु जर संध्याकाळी चौकशी करण्यासाठी गेलो तर तो भाव 6000 रुपये सुध्दा असू शकेल.अशा प्रकारे भाव वाढत असले तरी सुध्दा घरांची खरेदी होत आहे. ती थांबलेली नाही. घरांचे भाव वाढत आहेत आणि खरेदी-विक्रीवर आज तरी काही नियंत्रण नाही. पण ग्रामीण भागामध्ये हे भाव 10 ते 20 टक्के, नगरपालिका क्षेत्रामध्ये 15 ते 20 आणि शहरी भागामध्ये 20 ते 40 टक्क्यापर्यंत वाढलेले आहेत. तसेच मुंबई शहरामध्ये हे भाव अधिक वाढलेले आहेत. जेथे भाव वाढलेले आहेत, तेथे

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

खरेदीचे प्रमाण कमी आहे.जेथे भाव कमी आहेत,तेथे खरेदीचे प्रमाण जास्त आहे.असे असले तरी 20टक्के ,25 टक्के, 40 टक्के एवढी स्टॅम्प डयुटी लागते आणि शेवटी तो भार जागा घेणाऱ्यांवर पडतो. त्यामुळे शासन याबाबत नक्कीच विचार करील एवढेच मी सांगू इच्छितो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, रेडीरेकनरमुळे भाव वाढत नाहीत. माझे म्हणणे असे आहे की, जागांचे आणि सदनिकांचे भाव रेडी रेकनरमुळे वाढतात आणि त्यामुळे शासनाला कमी महसूल मिळतो. मी याचे उदाहरण देतो. राज्य शासनाच्या नवीन रेडी रेकनरमुळे काय झाले आहे, तर एखादे जिल्हयाचे ठिकाणी असेल, महानगरपालिका असेल मग ती कोल्हापूर, अकोला किंवा मुंबई असेल, तेथे समजा 'अ ' व्यक्तीने आपली प्रॉपर्टी ' ब ' व्यक्तीला विकली व त्यावर साडेसहा लाख मुद्रांक शुल्क भरावे लागले तर त्या प्रापर्टीची किंमत एक कोटी साडेसहा लाख रुपये झाली. जर तीच प्रापर्टी 'ब' व्यक्तीने 'क ' व्यक्तीला विकली तर त्याला सुध्दा साडेसहा लाख रुपये भरावे लागतात. अशाप्रकारे साडेसहा लाख अधिक साडेसहा लाख असे एकूण 13 लाख रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागते त्यामुळे त्या प्रापर्टीची किंमत वाढते. वॅट या कर पध्दतीप्रमाणे प्रापर्टीची किंमत वाढते. अशा वेळी 'अ' व्यक्ती काय करते ते मी सांगू इच्छितो. 'अ' आपली प्रापर्टी 'ब' ला विकताना त्याला सांगतो की साडेसहा लाख रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागेल. समजा ' ब ' ला ती प्रापर्टी 'क ' ला विकावयाची असेल तेव्हा 'अ' व 'ब' असे ठरवितात की 13 लाख मुद्रांक शुल्क भरण्याऐवजी आपण 100 रुपयांचा बॉण्डवर हा व्यवहार दाखवू. त्यामुळे मुद्रांक शुल्क भरावे लागणार नाही व त्यामुळे आपले पैसे वाचतील. तर अशा प्रकारचा व्यवहार केल्यामुळे शासनाला कमी महसूल मिळतो.

श्री.नारायण राणे (खाली बसून) : याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. या विषयावर चर्चा कशासाठी करावयाची ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . . .

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सरसकट दिलेले आहे. कोणत्याही जिल्ह्यामध्ये मूल्य निर्धारणाची एक पध्दत आहे असे असे म्हणणे बरोबर नाही. 20 टक्के, 15 टक्के, 10 टक्के अशी पध्दत आपल्याला करता येत नाही. प्रॉपर्टीचे आजूबाजूचे खरेदी व्यवहार लक्षात घेतल्यानंतरच रेडी रेकनर तयार करण्यात येतो. उच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत. मी सभागृहामध्ये न्यायालयाचा निर्णय वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की,

> "..the Registering Authority are directed to act in accordance with the Rule (4)(6) of the Bombay Stamp Rules, 1995. They will not refuse to entertain the document for registration on the ground that the full stamp duty has not been paid in accordance with the Ready Reckoner. This will however not prevent them from taking any further action in accordance with the said rules."

सभापती महोदय, आता नियमामध्ये काय दिलेले आहे ते सांगतो.

**तालिका सभापती ( श्री. उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. रेडीरेकनर आपण अंमलात आणण्याच्या पंधरा दिवस पूर्वी सर्व जनसामान्यांना आवाहन करणार काय की, आपल्या प्रॉपर्टीबद्दल आपले ऑब्जेक्शन, सजेशन आहे काय ? आपण त्यांची नाहरकत घेणार काय ? या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, मूल्यांकन बरोबर नसल्यास सेक्शन 31 प्रमाणे कारवाई करु शकतो. माझ्या माहितीप्रमाणे सेक्शन 31 प्रमाणे नव्हे तर सेक्शन 32 (अे) प्रमाणे मूल्य कमीजास्त असेल तर निवेदन करता येते. सेक्शन 32 (अे) प्रमाणे पंधरा दिवसाच्या आत त्या प्रॉपर्टीचे भाव कमीजास्त असले तर त्यांना न्याय देणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी किती प्रश्न विचारले हे मी मोजले नाहीत. त्यापैकी मला जे प्रश्न समजले त्याबाबत उत्तर देतो. सन्माननीय सदस्यांनी शेवटचा प्रश्न सेक्शनबाबत विचारला. सेक्शन 31 नसून 32(अे) असल्याचे सांगितले. एखाद्याला जर 50 हजार रुपये स्टॅम्प ड्युटी लावली असेल आणि ती त्याला मान्य नसेल तर स्टॅम्प ॲक्टच्या सेक्शन 31 प्रमाणे अपिलाची तरतूद आहे आणि तो अपिलात जाऊ शकतो आणि लावलेली स्टॅम्प ड्युटी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ......

योग्य आहे की अयोग्य आहे याबाबतीत न्याय मिळवू शकतो. त्याबाबत स्टॅम्प ॲक्टचा सेक्शन 31 आहे. सन्माननीय सदस्यांची कोर्टाचा निर्णय वाचून दाखवला. सुप्रीम कोर्टाने आपला रेडी रेकनर मान्य केलेला आहे. ज्या प्रमाणे आपण रेडी रेकनर तयार करतो ती पध्दत योग्य आहे आणि त्याला कोर्टाने मान्यता दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एखाद्या इमारतीची किंमत 1 कोटी रुपये असेल आणि ती इमारत विकली तर साडेसहा लाख रुपये द्यावे लागतात. ती इमारत दुसऱ्यांदा विकली की परत साडेसहा लाख रुपये द्यावे लागतात म्हणजे एकूण 13 लाख रुपये द्यावे लागतात. म्हणून काही लोक 100 रुपयाच्या स्टॅम्पवर लिहून घेतात. पण ते कायदेशीर नाही. जर आपले डॉक्युमेंट रजिस्टर करावयाचे असेल, कायदेशीर करावयाचे असेल तर आपल्या मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते रजिस्ट्रेशन करावयास पाहिजे. 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेणे वगैरे पळवाट आहे. ते कायदेशीर नाही. स्टॅम्प ड्युटीच्या नियमानुसार जी स्टॅम्पड्युटी लावतो त्यामुळे जमिनीचे दर वाढतात हे म्हणणे योग्य नाही असे मी सुरुवातीला सांगितले आहे. अनेक लोक आपली जमीन विकताना डॉक्युमेंट रजिस्टर करतात. काही लोक कर्ज घेतात. उदाहरण म्हणून सांगतो. प्रत्यक्षात दीड लाख रुपयांचे पेमेंट करावयाचे असेल पण दोन लाख रुपये कर्ज मागावयाचे असेल तर रजिस्ट्रेशन दोन लाख रुपयांचे व्हावयास पाहिजे. दीड लाखाची मालमत्ता असते परंतु वरचे 50 हजार रुपये अन्य ठिकाणी वळविता येईल यासाठी अधिकची रक्कम नोंदविली जाते. त्याच्या सरासरीच्या माध्यमातून दर ठरविणे हा रेडीरेकनरचे जे निकष ठरविले आहेत त्यातील एक निकष आहे. मी इन्फ्रास्ट्रक्चरबद्दल सांगितले. तेथील इन्फ्रास्ट्रक्चरचा विचार केला जातो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

मी असे म्हणालो आहे की, काही भागामध्ये स्टॅम्प डयूटीचे जास्त प्रमाणात वाढले आहे हे सरकारच्या लक्षात आल्यामुळे सरकार याबाबत निश्चित विचार करील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे या शहरांमध्ये मध्यमवर्गीयांना घर घेणे दुरापास्त झालेले आहे. ठाण्यामध्ये रहावयास गेलो त्यावेळी जुन्या चाळीतील घर विकले, त्यातून जो पैसा आला त्यातून ठाण्यात नवीन घर घेतले होते. बहुतांश मुंबईकरांची हीच परिस्थती आहे. पूर्वी वनरुम किचनची घरे मिळत होती. परंतु आता कोणत्याही बिल्डरची जाहिरात पहावी. साधारणपणे 2बीएचके, 2.5बीएचके, 3 बीएचके, 3.5बीएचके पेक्षा की एरियाची घरे विकत नाहीत. आता वन रुमची संकल्पना मोडीत निघाली आहे. 1बीएचके सुध्दा नाहीसे झाले आहेत. यापूर्वी एखाद्या बिल्डरने अमूक एरियाची एक इमारत बांधली तर त्याला आयकरामध्ये सूट मिळत होती. त्यातून बिल्डरचा आणि घर घेणा-याचाही फायदा होत होता. महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून अशी तरतूद केली जाईल काय ? आता कोणताही बिल्डर वन रुम बांधत नाही. सरकारने रेडिरेक्नरच्या माध्यमातून बिल्डर्सना फायदा दिला किंवा त्या माध्यमातून काही तरतूद केली पाहिजे. वन रुम किचनची घरे बांधली तर तुम्हाला रेडिरेक्नरचा फायदा देऊ. असे केले तरच मध्यमवर्गीय लोक ठाणे किंवा मुंबई परिसरात घरे घेऊ शकतील. त्यामुळे ती बांधली जातील, अन्यथा कोणीही 1बीएचकेची घरे मुंबईत बांधणार नाहीत, अशी परिस्थिती होईल. याबाबत शासन गंभीरपणे विचार करील काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मुंबईत 400 ते 600 चौ.फू.ची वनरुम किचनची घरे तयार करण्यासाठी सरकार कायदा करील काय असा प्रश्न विचारला आहे. मागील वेळी ज्यांना 5 लाखापर्यंत घर घ्यावयाचे असेल तर त्यासाठी स्टॅम्प डयूटी लावलेली नव्हती. या मर्यादेसंबंधीची माहिती उद्या माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्प जाहीर करतील. अर्थसंकल्पापूर्वी मी अगोदर माहिती देऊ इच्छित नाही. त्यासंदर्भात दिलासा दिला जाईल. तसेच राज्याच्या येणा-या गृहनिर्माण धोरणासंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मी सूचना केलेली आहे की, मुंबईमध्ये ज्या जुन्या चाळी होत्या त्या जाऊन आता मोठमोठया इमारती

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.नारायण राणे....

होत आहेत. कोणताही फ्लॅट 1 कोटीच्या, 2 कोटीच्या खाली नाही. मध्यमवर्गीय घेऊ शकत नाही. या जागांवर ज्या इमारती उभ्या राहतील त्यापैकी 30 टक्के तरी 400 ते 600 चौ.फूटांचे फ्लॅट त्या बिडरने बांधावेत अशा अटीचा समावेश येणा-या गृहनिर्माण धोरणात समाविष्ट करीत आहोत आणि तसे बंधन बिल्डर्सवर राहणार आहे. अशाप्रकारच्या उपाययोजना सरकार करीत आहे.

श्री.अरविंद सावंत : घरांचे दर सुध्दा कमी झाले पाहिजेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : मुंबई प्रमाणेच ठाणे जिल्हयासाठी सुध्दा धोरण लागू करावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जसा स्टॅम्प डयूटीचा प्रश्न आहे तसा नागपूर शहरामध्ये एकाच वेळी 2-2, 3-3 कर घेण्याचा प्रश्न आहे. एकाच प्लॉटवर जिल्हाधिका-यांकडून एनआयटीचा रेडी रेक्नरचा कर तर भरतोच शिवाय 2-2 कर द्यावे लागतात. हा विषय मंत्रिमहोदयांना माहीत आहे, त्याबात माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. अद्याप मंत्रिमहोदयांना त्या बैठकीसाठी मुहूर्त सापडलेला नाही. मी त्याबाबत आपल्याला, आपल्या सेक्रेटरींना पत्र दिले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, नागपूर शहराला केवळ विशेष प्रोव्हिजन ठेवून डबल कर लावलेले आहेत. आमचा विकास तर करीत नाही, वरुन हे डबल कर लावले आहेत. निदान या डबल करातून आम्हाला मुक्त तरी केले जाईल काय ?

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. मागील अधिवेशनामध्ये नागपूर शहराच्या करासंबंधी मी बैठक बोलवितो असे सांगितले होते, त्यानुसार मी बैठक निश्चित केली होती, परंतु सन्माननीय सदस्य त्या बैठकीला पोहोचू नव्हते म्हणून मी ती बैठक पुढे ढकली होती. त्यांनी वस्तुस्थितीवर आधारित हा विषय मांडला आहे. तेथे दोन कर आहेत. नागपूरमध्ये महसूल खात्याचा आणि एनआयटीचा असे दोन वेगवेगळे कर आहेत. या दोन करांऐवजी एक कर असावा या मताचा मी स्वत: आहे. त्यादृष्टीने कार्यवाही करीन, याबाबत लवकरच बैठक बोलवून हा विषय संपविण्यात येईल.

------

यानंतर श्री.शिगम.....

अस्धारितप्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र.211 वर अपघाती मृत्यूचे वाढलेले प्रमाण

**मु. शी.** : बीड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र.211 वर अपघाती मृत्यूचे वाढलेले प्रमाण यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" बीड शहरामधून राष्ट्रीय महामार्ग क्र. 211 जात असून बीड शहराला बायपास नसल्यामुळे शहरात अपघाती मृत्यूचे वाढलेले प्रमाण, या रस्त्याला कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात ही तीन राज्ये महामार्गाने जोडली असून या महामार्गवर कंटेनर, कार्गो तसेच जडमालाची वाहतूक करणा-या ट्रकची ये-जा गेल्या काही वर्षात दहापटीने वाढणे, चौसाळा, बीड, शहागड रस्त्यावर वारंवार अपघाती मृत्यू होत असणे, बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असून या महामार्गावर मध्यवर्ती बसस्थानक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सिव्हिल हॉस्पिटल, दूध डेअरी, डीडीआर ऑफिस, शिवाजी चौक, साठे चौक, अनेक दवाखाने, व्यापारी दुकाने, गॅरेजेस, शोरुम, हॉटेल्स, मंगल कार्यालये, शाळा असणे, या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन अपघात होत असणे, यामुळे तेथील नागरिकांत पसरलेले भीतीचे वातवावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची तातडीची उपाययोजना "

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : बीड जिल्हयाच्या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग क्र. 211 हा बीड शहरातून जातो आणि शेजारच्या किमान सहा राज्यांना जोडणारा हा रस्ता आहे. हा रस्ता बीड शहरातून जात असताना शाळा, कॉलेजेस, छत्रपती शिवरायांचा पुतळा, दूध डेअरी, मंगल कार्यालय, बस डेपो, मुख्य बाजारपेठ या ठिकाणांहून हा रस्ता जातो. मोठे ट्रॉलर्स, कंटेनर्स, टँकर्स, एस.टी. इत्यादी प्रकारची वाहतूक या शहरातून सतत चालू असते. या रस्त्यावर मोजता येणार नाहीत इतके अपघात झालेले आहेत. या बायपास रस्त्यासाठी मी वारंवार मागणी करीत आहे. मागील हिवाळी अधिवेशनामध्ये देखील मी तारांकित प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला "शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सल्लागार निश्चित करण्यात येईल" असे उत्तर दिले होते. तेच वाक्य आज या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये देखील दिलेले आहे. या रस्त्याच्या सर्वेक्षणाची मान्यता केन्द्राकडून मिळण्यासाठी इतका विलंब होणार असेल तर बीड शहरातील हा बायपास रस्ता मार्गी लागण्यासाठी किती कालावधी लागेल ? तेव्हा हा बायपास रस्ता लवकरात लवकर होण्यासाठी राज्य शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? बीड शहरातील या रस्त्यावर अपघाती मृत्यू होऊ नयेत म्हणून हा बीड शहराचा बायपास रस्ता निश्चित किती कालावधीत पूर्ण होईल ?

श्री. रविशेठ पाटील : राष्ट्रीय महामार्ग क्र.211 कि.मी. 158/00 ते 292/500 मांजरसुंबा-बीड-झाल्टाफाटा हा एकूण 134.00 कि.मी. लांबीचा रस्ता आहे. केन्द्र शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर एक वर्षाच्या आत सर्वेक्षण पूर्ण होईल. बी.ओ.टी. तत्वावरील प्रस्तावास केन्द्र शासनाची परवानगी मिळाल्यानंतर या रस्त्याचे काम चालू करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : बीड जिल्ह्यातील हा महत्वाचा प्रश्न आहे. बीड जिल्ह्याचा अनुशेष शिल्लक आहे. हा रस्ता बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून जातो. या रस्त्यावर वारंवार होणा-या अपघातांमध्ये अनेक जण प्राणास मुकले आहेत. तेव्हा राज्य सरकार केन्द्र सरकारकडे विशेष प्रयत्न करुन हा रस्ता मंजूर करुन घेणार आहे काय ?

श्री. रविशेठ पाटील : हा केन्द्र सरकारच्या अखत्यारितील रस्ता आहे. हा बायपास रस्ता लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी राज्य शासन केन्द्र सरकारकडे निश्चितच पाठपुरावा करील.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : उच्च न्यायालयामध्ये, सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरणे असल्यामुळे कामे प्रलंबित ठेवणे योग्य नाही. तेव्हा या बायपास रस्त्याच्या बाबतीत अशा प्रकारचा कोणताही विलंब केला जाणार नाही आणि एका वर्षाच्या आत रस्ता पूर्ण केला जाईल अशा प्रकारचे ठोस आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री. रविशेठ पाटील : विलंब केला जाणार नाही. लवकरात लवकर हा रस्ता मार्गी लागेल.

----

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : खार(प.) ते नानावटी इस्पितळापर्यन्त असलेले एस.व्ही. रोडवरील अनधिकृत स्टॉल्स व धंदे हटविण्याबाबत

**मु. शी.** : खार(प.) ते नानावटी इस्पितळापर्यन्त असलेले एस.व्ही. रोडवरील अनधिकृत स्टॉल्स व धंदे हटविण्याबाबत

डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"खार (प.) सांताक्रुझ (प.) ते नानावटी इस्पितळ ह्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी असणे, एस.व्ही.रोड वर एमएमआरडीए आणि काही ठिकाणी मुंबई महानगरपालिका यांच्यातर्फे नाला रुंदीकरण करणे, ड्रेनेज सिस्टिम नव्याने टाकणे, रस्त्याचे सपाटीकरण करणे, पेपर्स ब्लॉक बसवणे, अशी कामे गेल्या वर्षभरापासून चालू आहेत, प्रत्येक वळणावर अनेक फेरीवाले विशेषत: चहा-पानाच्या टप-या, स्टॉल्स असून त्यांच्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने तशाच सुरु आहेत. निकृष्ट दर्जाचे पेवर्स ब्लॉक बसवल्याने इंटरलॉकिंग सिस्टिम निघून खड्डे पडले आहेत. रस्ता वरखाली झाला असल्याने अनेक ठिकाणी पाणी जमा होण्याची भीती आहे. या सर्वामुळे वाहने कूर्मगतीने चालतात आणि तासनतास ट्राफिक संध्याकाळी 4 वाजल्यानंतर रात्री 9 वाजेपर्यंत जॅम होते. येथे एकही वाहतूक अधिकारी ट्राफिक नियमित करण्यासाठी नसतो. त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाद्वारे मी मागणी करीत आहे की, ताबडतोब खार(प.) ते नानावटी इस्पितळापर्यन्त असलेले अनधिकृत स्टॉल्स, फूटपाथवरील धंदे हटवावेत. एम.एम.आर.डी.ए. व मुंबई महानगरपालिकेद्वारे झालेले अपूर्ण काम पूर्ण होऊन रस्त्यांच्या लेबल बाबतीतील त्रुटी व खड्डे त्वरित बुजबावेत. एस.व्ही.रोड, कॉर्नरवरील सर्व चहापानाच्या टप-या काढून टाकाव्यात जेणेकरुन वाहतुकीची कोंडी होणार नाही व वाहतूक पोलिसांची नेमणूक करावी, यावर शासनाने तात्काळ निवेदन करावे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, खार (प.), सांताक्रुझ (प.) ते नानावटी इस्पितळ या एस.व्ही. रोडचे दुरुस्तीचे काम एम.एम.आर.डी.अे. व मुंबई महानगरपालिका गेल्या 6 महिन्यापासून करीत आहे. खार स्टेशन ते सांताक्रुझ बस डेपो आणि नानावटी हॉस्पिटल येथपर्यन्तचा रस्ता अर्धवट स्थितीत बनविलेला आहे. या रस्त्याचे काम करणारा ठेकेदार पळून गेलेला आहे. पेव्हर ब्लॉक अनइव्हन रीतीने बसविलेले आहेत त्यामुळे येणा-या पावसाळयामध्ये पाणी साचून वाहतुकीची मोठी कोंडी होणार आहे. या रस्त्यावर अनधिकृत दुकाने, पानाच्या टप-या, स्टॉल्स आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे या रस्त्यावरील वाहतूक नियमित करण्यासाठी एकही वाहतूक पोलीस अधिकारी नसतो. वाहतूक अधिका-याची चौकी वांद्रे येथे असून मिलन सबवे आणि एस.व्ही.रोड याठिकाणी वाहतूकीची प्रचंड कोंडी होते. 5 मिनिटांच्या अंतरासाठी 40-50 मिनिटे लागतात.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो की, एम.एम.आर.डी.ए. व मुंबई महानगरपालिकेव्दारे झालेली अपूर्ण कामे एकमेकांच्या सहकार्याने पूर्ण करावीत. तसेच एस.व्ही. रोड, कॉर्नरवरील सर्व चहापानाच्या पट-या काढून टाकाव्यात व या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होणार नाही म्हणून वाहतूक पोलिसांच्या नेमणूका तात्काळ करण्यात याव्यात अशा प्रकारची विनंती करतो आणि विशेष उल्लेखावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

---------------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ 15:00

**पृ.शी.**: नागपूर येथील कार्गो हब या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अल्प दराने जाहीर केल्याने शेतक-यांनी सुरु केलेले आंदोलन

**मु.शी.**: नागपूर येथील कार्गो हब या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अल्प दराने जाहीर केल्याने शेतक-यांनी सुरु केलेले आंदोलन याबाबत श्री. सय्यद जामा, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** ( श्री. उल्लास पवार ) : माननीय सदस्य श्री. सय्यद जामा यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सय्यद जामा ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" नागपूर येथे कार्गो हब (मिहान) SEZ या व्यापारी प्रकल्पाकरिता शेतक-यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात येत आहे. शिवणगाव व आजुबाजुच्या परिसरातील गावातील प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतमजूर यांचे साखळी उपोषण व सामुहिक मुंडण इत्यादि मार्गाने आंदोलन केलेले आहे. पण सरकारने अत्यंत अल्प अवार्ड घोषित केल्याने निराश होऊन आंदोलन मागे घेण्यात आले आणि ही समस्या न्यायप्रविष्ट करण्याचा शेतकरी विचार करीत आहे.

हे सर्व शेतकरी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रोजी रोटीपासून वंचित झाल्यामुळे आर्थक तंगीत जीवन मरणाचा जणू लढा देत आहेत. पण माननीय मुख्यमंत्री यांनी मिहान SEZ प्रकल्पग्रस्त शेतक-यांना वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांचे उल्लंघन करण्यात येत आहे. तसेच माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंहजी यांनी प्रकल्पग्रस्तांना घोषित केलेल्या राष्ट्रीय पुनर्वास निती 2007 च्या निर्देशांचे सुध्दा सरळ उल्लंघन करुन जबरदस्तीने शेत जमिनींच्या भूसंपादन राज्य सरकार सन 1894 च्या ब्रिटीश कायद्यांतर्गत करीत आहे.

नागपूर शहराच्या आत असलेल्या शिवणगाव परिसरात कोटयावधी प्रति एकर बाजारमुल्य असताना राज्य सरकार शेतक-यांना अत्यंत अल्प ( नाम मात्र ) मोबदला प्रति एकर देऊन बेदखल करीत आहे. या ज्वलंत प्रश्नाकडे सन्माननीय सभागृहाचे लक्ष वेधण्याकरिता विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करण्याची अनुमती द्यावी अशी विनंती आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जामा.....

सभापति महोदय, मैं विशेष उल्लेख के माध्यम से बहुत ही गंभीर समस्या की ओर शासन का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ. नागपुर में कार्बो हब की एक बहुत बड़ी योजना चालू हो रही है और उसके लिए भूमि का अधिग्रहण किया जा रहा है. इस संबंध में पिछले साल माननीय मुख्य मंत्री ने मीटिंग ली थी और अभी पिछले कुछ दिउनों से शिवनगाँव के किसानों ने 10 महीने तक शान्तिपूर्वक आंदोलन किया. किसानों की जमीन के लिए मुआवजे की रकम केवल 3.50 लाख रुपए तय की है. इससे किसानों में बहुत असंतोष है और उन्होंने 10 महीने से चला आ रहा आंदोलन समाप्त करके कोर्ट में जाने का तय किया है. हमारी शंका है कि जमीन देने के बारे में अगर यह मामला कोर्ट में चला जाएगा तो यह प्रोजक्ट डिले होगा और उसकी कॉस्ट बहुत ज्यादा बढ़ जाएगी. मैं इस विशेष उल्लेख के माध्यम से शासन से अनुरोध करना चाहता हूँ कि वहां पर कलक्टर के द्वारा जबर्दस्ती जमीन लेने की प्रक्रिया की जा रही है, उस पर रोक लगाई जाए और किसानों के प्रतिनिधियों के साथ मुख्यमंत्री जी या संबंधित विभाग के लोग चर्चा करें.

--------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सार्वजनिक बांधकाम उप विभागातील हजेरीपत्रक बेवारस स्थितीत आढळून येणे

**मु.शी.**: सार्वजनिक बांधकाम उप विभागातील हजेरीपत्रक बेवारस स्थितीत आढळून येणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" बीड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम उप विभागातील हजेरी पत्रक क्रमांक 34958 हे हरविल्याची कार्यालयात नोंद असणे, सदर हजेरीपत्रक बेवारस स्थितीत सार्वजनिक ठिकाणी वार्ताहराला सापडणे, सापडलेल्या हजेरीपत्रकावर कोऱ्या रकान्यावर वरिष्ठ लेखा अधिकारी यांची सही शिक्का व त्याखाली उपविभागीय अधिका-यांची सही असणे, यावरुन शासन रोजगार हमी योजनेवर कोटयावधी रुपये खर्च करुनही योजनेत भ्रष्टाचार व गैरव्यवहार होत असल्याचा जनसामुदायात संशय उत्पन्न होत असणे, याबाबत या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्यावर तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, बीड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम उपविभागातील हजेरीपत्रक हरविल्याची कार्यालयात नोंद करण्यात आलेली आहे. परंतु सदर हजेरीपत्रक बेवारस स्थितीत सार्वजनिक ठिकाणी वार्ताहराला सापडझले, त्या हजेरीपत्रकावर को-या रकान्यावर वरिष्ठ लेखा अधिकारी यांची सही शिक्का व त्याखाली उपविभागीय अधिका-यांनी सही केलेली आहे. यावरुन शासन रोजगार हमी योजनेवर कोटयावधी रुपये खर्च करुनही योजनेत भ्रष्टाचार व गैरव्यवहार होत असलेला जनसामुदायात संशय उत्पन्न झालेला आहे. अशा प्रकारे हजेरीपत्रकावर सहया व शिक्का घेऊन संबंधित अधिकारी मोठया प्रमाणात गैरव्यवहार करीत आहेत लोकप्रतिनिधींना देखील संशय निर्माण झाला आहे. हे गंभीर प्रकरण असून या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणाबाबत शासन कोणाला जबाबदार धरणार आहे ?

5...



श्रीमती उषा दराडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणत्या अधिका-यांवर जबाबदारी फिक्स केली जाणार आहे ? भविष्यात असा प्रकार होऊ नये म्हणून शासन काय दक्षता घेणार आहे याबाबतची सभागृहाला माहिती व्हावी म्हणून मी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.

--------------

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: ऑटो रिक्षा चालकांना शासनाने नॅनो गाडी उपलब्ध करुन देणेबाबत

**मु.शी.**: ऑटो रिक्षा चालकांना शासनाने नॅनो गाडी उपलब्ध करुन देणेबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" टाटा कंपनीची नवीन चारचाकी गाडी नॅनो ही कमी किंमतीत उपलब्ध होणे, ऑटो रिक्षापेक्षा कमी किंमतीत नॅनोगाडी उपलब्ध होणे, गरीब नागरिकांना टॅक्सीसेवा परवडत नसल्यामुळे ते ऑटो रिक्षांनी प्रवास करीत असणे, उन्हाळयात व पावसाळयात ऑटो रिक्षात ऊन व पावसापासून प्रवाशांना संरक्षण न मिळणे, ऑटो रिक्षांचे मीटर चोरीला जात असणे, तसेच ऑटो रिक्षांच्या देखभालीचाखर्च सुध्दा जास्त असणे, ऑटो रिक्षा चालकांना शासनाने जर नवीन नॅनो गाडी उपलब्ध करुन दिली तर ऑटो रिक्षपा चालकांना तीन प्रवाशाऐवजी चार प्रवासी नॅनो गाडीत बसवून त्यांच्या उत्पन्नात भर पडेल, रत्यावर जे ट्रॉफिक होते त्याला आळा बसेल, त्यामुळे राज्यातील ऑटो रिक्षा चालकांना कमी किंमतीत मिळणारी नॅनो मोटार उपलब्ध करुन देऊन ऑटो रिक्षाने प्रवास करणा-या प्रवाशांना ऊन पावसापासून संरक्षण मिळवून देण्याबाबत तसेच रिक्षा चालकांच्या उत्पन्नात वाढ करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, टाटा कंपनीने गरीब व सर्वसामान्य लोकांसाठी नवीन चारचाकी नॅनो गाडी काढलेली आहे. कालच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सभागृहात सांगितले की, मुंबई शहरातील टॅक्सी, ऑटो रिक्षा अतिशय जुन्या झालेल्या आहेत. त्या वाहनांमध्ये सर्वसामान्य जनता बसू शकत नाही. म्हणून शासन नवीन टॅक्सी आणि ऑटो रिक्षांचे नियोजन करणार आहे काय ? परंतु त्याबाबतीत शासनाकडून समाधानकारक माहिती मिळाली नाही. माझी देखील विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहाला विनंती आहे की, आज मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या ठिकाणी मोठया प्रमाणात ऑटो रिक्षा चालविल्या जातात. मुंबईत जवळपास 1 लाख ऑटो रिक्षा कार्यरत आहेत.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 15:05

श्रीमती मंदा म्हात्रे.........

नवी मुंबई परिसरात जवळजवळ 8 ते 9 हजार ऑटोरिक्षा आहेत. आज त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. सर्वसामान्य नागरिकांना आज टॅक्सीमधून प्रवास करणे परवडत नाही. त्यामुळे नॅनो या वाहनाचा ऑटोरिक्षासाठी वापर झाला तर प्रवाशांना ऊन-पावसापासून संरक्षण मिळेल. आज ऑटोरिक्षाचे मीटर चोरीला जातात त्याला देखील आळा बसेल. त्याचप्रमाणे मोठया प्रमाणात शालेय विद्यार्थी ऑटोरिक्षामधून परीक्षेला जात असतात, त्यांना देखील दिलासा मिळू शकेल. वाहतूक कोंडीपासून काही प्रमाणात सुटका होईल आणि ऑटोरिक्षा चालकांच्या उत्पन्नात देखील वाढ होईल. म्हणून माझी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती आहे की, टाटा कंपनीकडे नॅनो वाहनाचा ऑटोरिक्षासाठी वापर करण्यास परवानगी देण्याबाबत शिफारस करण्यात यावी.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुक्यात सन 2004-05 मध्ये झालेला रॉकेल घोटाळा.

**मु. शी.** : गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुक्यात सन 2004-05 मध्ये झालेला रॉकेल घोटाळा" याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुक्यात सन 2004-05 मध्ये रॉकेल घोटाळयाची तक्रार होणे, तक्रारकर्त्यांनी पाठपुरावा केल्यामुळे शासन स्तरावरुन आयुक्त कार्यालयाला सदर प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात येणे, आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून चौकशी अहवालाची मागणी करणे, दरम्यान जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी 29 डिसेंबर, 2007 च्या पत्र क्र.कक्ष-1/अका/पुरवठा/कावि/157/07 अन्वये रॉकेल वितरणाच्या रेकॉर्डची मागणी करणे, त्यावर अका/अन्न/तह/कावि/318/2008 अन्वये सडक अर्जुनी तहसीलदारांनी रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे सांगणे, या संदर्भात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी तहसीलदारांना विचारणा केली असता तहसीलदारांनी 3 मार्च, 2008 च्या पत्रातून केरोसीनच्या नस्त्या तहसील कार्यालयात आढळून आले नसल्याचे सांगणे, या संदर्भात अव्वल कारकूर (अन्न) यांना तहसील कार्यालयातून 5 फेब्रुवारी, 2008 च्या पत्र क्र.अका/अन्न/तह/कावि/76/08 अन्वये कार्यालयात केरोसीनच्या नस्त्या आढळून आले नसल्यामुळे कारणे दाखवा नोटीस देण्यात येणे, परंतु अद्यापही त्या केरोसीनच्या नस्त्या उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत आणि त्यासंदर्भात साधा खुलासाही न करणे, त्याचप्रमाणे तालुक्यातील एका कंपनीचे वितरक आणि अर्धघाऊक परवानाधारकाने खोटा अहवाल बनवून शासनाच्या डोळयात धूळ फेकल्याचा अहवाल 25 सप्टेंबर, 2007 ला जिल्हा पोलीस अधीक्षकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे, अशा प्रकारे सन 2004-05 मध्ये केरोसीनचा मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, दरम्यान तहसील कार्यालयातून अचानक केरोसीनचा गहाळ झालेला रेकॉर्ड, त्या भ्रष्टाचारात तहसील कार्यालयापासून ते शासन

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...........

स्तरापर्यंत सहभागी अधिकारी व कर्मचारीवर्ग, त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करुन भ्रष्टाचारात गुंतलेल्या अधिकाऱ्यांवर करण्यात येणारी कार्यवाही आणि सदर प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांकडून पोलिसांकडे सुपूर्द करण्याची परिसरातील नागरिकांनी शासनाकडे वारंवार केलेली मागणी लक्षात घेता शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

-------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : जुलै, 2005 च्या अतिवृष्टीमध्ये नुकसानग्रस्त ठरलेल्या

**मु. शी.** : जुलै, 2005 च्या अतिवृष्टीमध्ये नुकसानग्रस्त ठरलेल्या शाळांना भरपाई मिळणे" याबाबत श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"दिनांक 25, 26 व 27 जुलै, 2005 मध्ये राज्यातील अनेक भागात पूरपरिस्थिती होती. नुकसानग्रस्त शेतकरी, व्यापारी यांना मदत मिळाली आहे. नुकसानग्रस्त शाळांना नुकसानभरपाई मिळाली नाही."

सभापती महोदय, तिसऱ्यांदा मी हा विषय या सभागृहात मांडीत आहे. दिनांक 25, 26 व 27 जुलै, 2005 रोजी या राज्यामध्ये प्रचंड अतिवृष्टी झाली. या प्रचंड अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली. या पूरपरिस्थितीमुळे अनेक व्यक्ती दगावल्या. अनेक लोकांचे आर्थिक नुकसान झाले. ज्या व्यक्तींचे नुकसान झाले त्या नुकसानग्रस्त व्यक्तिंना शासनाकडून मदत, नुकसानभरपाई मिळाली. सर्वसामान्य शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना, टपरीधारकांना सुध्दा शासनाकडून नुकसानभरपाई मिळाली.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

परंतु वारंवार विनंती करुनही ज्या ज्या शाळांना व शैक्षणिक संस्थांचे नुकसान झालेले आहे त्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यात प्रामुख्याने संगणक शाखा, लायब्ररी, फर्निचरचे नुकसान झालेले आहे, त्यांना मदत मिळाली नाही. मध्यंतरी ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी पुढाकार घेऊन पुनर्वसन विभागाची एक बैठक घेतली होती व तातडीने मदत देण्याबाबत उपाययोजना करावी, असे निदेश दिले होते. परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझी शासनाला अशी विनंती आहे की, दिनांक 25 ते 27 जुलै, 2005 याकाळात ज्या ज्या शाळांचे नुकसान झालेले आहेत त्या शाळांना तातडीने नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा.

--------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विकासकाकडून रस्त्याचा ताबा घेण्यापूर्वी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत.

**मु.शी.**: विकासकाकडून रस्त्याचा ताबा घेण्यापूर्वी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत याबाबत श्री. मधुकर चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मुंबई शहरात अनेक बिल्डर्स वसाहती विकसित करतात परंतु त्या ठिकाणी कार्पोरेशनने घातलेल्या अटींचे पालन करीत नाहीत. त्या भागात रस्ते तयार करणे, सांडपाण्याची तसेच पर्जन्यवाहिन्यांची व्यवस्था करणे यासंबंधी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

विकासकाकडून रस्त्याचा ताबा घेण्यापूर्वी रस्ता, सांडपाण्याची गटारे, विजेचे खांब यांचे काम विकासकाने पूर्ण केले नसल्यास या कामासाठी लागणारा पैसासदर विकासकाकडून महानगरपालिका घेते. नगर भूमापन क्र. 12 (पै.) व 23 (पै.) हाजी बापू मार्ग, मालाड (पूर्व) व नगर भूमापन क्र. 23 (पै.) हितेंद्र मार्ग, मालाड (पूर्व) या अनुक्रमे 550 मीटर व 200 मीटर लांब रस्त्याचा ताबा मुंबई महानगरपालिकेने विकासक हेमंत परसरामपुरीया यांच्याकडून सन 2002-03 साली नियमबाह्यरित्याघेतला. हे दोन्ही रस्ते पालिकेने ताब्यात घेताना रस्ता, वीज या सर्वांचा देखभालीचा खर्च विकासक हेमंत परसरामपुरीया यांच्याकडून महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी वसूल न करता या रस्त्यावर पर्जन्यवाहिन्या व सांडपाणी वाहून जाण्याकरिता गटारे उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांचे पावसाळयात अतोनात हाल होत असतात. या सर्व समस्यांची महानगरपालिकेकडे तक्रार केली असता महानगरपालिकेने कोणतीही कारवाई केलेली नाही, हा विषय सार्वजनिक हिताचा असून तो मी आता विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडू इच्छितो.

-------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: तोटयात असलेल्या महामंडळांपैकी किमान तीन महामंडळांना बजेटमध्ये भरीव तरतूद करणे

**मु.शी.**: तोटयात असलेल्या महामंडळांपैकी किमान तीन महामंडळांना बजेटमध्ये भरीव तरतूद करणे याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, राज्यशासनाच्या विविध विभागांतर्गत असलेल्या 51 महामंडळांपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे तब्बल 28 महामंडळे तोटयात गेल्याचे फेब्रुवारी, 2008 च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास येणे, सदर महामंडळाचा तोटा 5953.38 कोटी एवढा प्रचंड असणे, या महामंडळाच्या स्थापनेमागील उद्देश ज्या नावाने कार्यरत असणे हा त्या विभागाचा किंवा घटकाचा विकास करणे हा आहे यापैकी 5 पाच महामंडळेच सर्वाधिक तोटयात असणे, त्यात विद्युत, एस.टी., रस्ते विकास, वस्त्रोद्योग, वित्तीय यासारखी प्रमुख महामंडळे असणे या पाच महामंडळांव्यतिरिक्त अन्य महामंडळांचा तोटा केवळ 10 टक्के असणे, शासनाचे या 51 महामंडळांकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे. तसेच जी सामाजिक न्यायासाठी वेगवेगळया सामाजिक घटकांच्या विकासासाठी जी महामंडळे निर्माण केली आहेत त्यांच्या होणाऱ्या तोट्याचा विचार न करता उदा. वसंतराव नाईक महामंडळ, शेळी-मेंढी विकास महामंडळ, ओ.बी.सी. महामंडळ इ. महामंडळांना नुकत्याच सादर होणाऱ्या बजेटमध्ये भरीव तरतूद करुन सर्व समाजघटकांना समान न्याय द्यावा, अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी करीत आहे.

---------------

.......4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पाणी टंचाई असताना ठाणे जिल्ह्यातील पाणी कोको-कोला कंपनीला देण्याचा निर्णय घेणे

**मु.शी.**: पाणी टंचाई असताना ठाणे जिल्ह्यातील पाणी कोको-कोला कंपनीला देण्याचा निर्णय घेणे याबाबत श्री. संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, ठाणे जिल्ह्यात पाणी टंचाईने उग्र रुप धारण केले असून त्यामुळे ठाणे जिल्ह्यात हाहा:कार उडाला आहे, असे असताना ही वाडा तालुक्यातील डोंगस्ते लघु पाटबंधारे योजनेतून कोटयावधी लिटर पाणी कोको-कोला कंपनीला देण्याचा निर्णय लघु पाटबंधारे विभागाने माहे मार्च 2008 च्या सुमारास घेतल्याचे निदर्शनास येणे, खास शेती सिंचनासाठी बांधण्यात आलेल्या या योजनेतील पाणी आता शीतपेयासाठी दिले जाणार असल्याने नागरिकात तीव्र असंतोषनिर्माण झालेला आहे. याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन त्वरित कार्यवाही करण्याची गरज आहे. या सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्वाच्या प्रश्नाबाबत मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे विनंती करीत आहे की, ठाणे जिल्हयात पाण्याची तीव्र टंचाई असताना हा विषय गंभीर रुप धारण करीत आहे. सुदैवाने या चर्चेच्या वेळी या खात्याचे कार्यक्षम मंत्री डॉ. सुनील देशमुख सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांना अशी विनंती करीत आहे की, या प्रश्नाची दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी.

-------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी डोंगस्ते लघु पाटबंधा-यातून मिळणा-या शेतीच्या पाण्याच्या संदर्भात अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला असल्यामुळे व या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित असल्यामुळे त्यांनी यासंदर्भात खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन 2004 साली या डोंगस्ते प्रकल्पाच्या संदर्भात करार झाला होता आता 2008 साल सुरु आहे. या ठिकाणावरुन कोका कोला कंपनीने अद्यापपर्यंत पाणी उचलले नाही. या प्रकल्पाची सिंचन क्षमता 256 हेक्टरची असून या प्रकल्पाची सिंचनाची जेवढी क्षमता आहे तेवढया प्रमाणात या प्रकल्पातून पाणी सुध्दा उचलले गेले नाही. सन 2007 मध्ये या प्रकल्पातून केवळ 65 हेक्टर क्षेत्रासाठी पाण्याचा वापर झालेला आहे. सिंचनासाठी कपात करुन दुस-या कामासाठी या प्रकल्पातून पाणी दिले जात नाही. पिण्याच्या पाण्याला आपण प्रमुख प्राथमिकता दिलेली आहे. तसेच या प्रकल्पाच्या पाण्यावर जिल्हाधिका-यानी रिझर्वेशन सुध्दा ठेवलेले नाही. ज्यावेळेस पाण्याचे दुर्भिक्ष जाणवेल त्यावेळेस या ठिकाणी रिझर्व्हेशन ठेवले जाईल परंतु या ठिकाणी 2004 पासून कोणत्याही प्रकारचे दुर्भिक्ष जाणवलेले नाही.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : आता सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे व सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे परंतु ते सभागृहात उपस्थित नाहीत.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन: भरेल.

( 3.17 ते 3.45 मध्यांतर )

----------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- (मध्यंतरा नंतर )

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी . महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्न**

**मु.शी : महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्न या विषयावर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा**

**सभापती** : सीमा प्रश्न हा महाराष्ट्रातील तुमच्या आमच्या सर्वांच्या जिव्हाळयाचा आहे. सीमा भाषिकांची जी मागणी आहे त्या मागणीला आपण सातत्याने अनेक वर्षे दोन्ही सभागृहाच्या माध्यमातून एकमुखाने पाठिंबा दिलेला आहे. त्या बाबतीत या सदनाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याबरोबर तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बरोबर माझी चर्चा झालेली आहे. सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर. पाटील यांना मी विनंती करतो की, त्यांनी या सबंधीचा प्रस्ताव येथे मांडावा. सभागृहाच्या नेत्यांनी प्रस्ताव मांडल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर त्याला पाठिंबा देतील आणि त्यानंतर गट नेते त्याबाबतीत आपले विचार मांडतील.या प्रस्तावावर केवळ चर्चा होईल. त्यानंतर हा प्रस्ताव आपण संमत करु या.

श्री.आर.आर,.पाटील ( उपमुख्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो : -

"महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा वाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असूनही कर्नाटक सरकारच्या वतीने कर्नाटक सीमेवरील बेळगाव, निपाणी, अवराद, भालकी व इतर आसपासच्या गावातील नागरिकांवर करण्यात येत असलेला अन्याय व अत्याचार, कर्नाटक सरकारने मराठी भाषिक लोकांवर कानडी भाषेची सक्ती करुन त्यांच्या वाहनांची केलेली तोडफोड, या अन्याया विरुध्द व मराठी भाषिक लोकांचे प्रश्न सोडविण्याकरिता महाराष्ट्र एकीकरण समितीने आंदोलने करुन सुध्दा कर्नाटक शासनाकडून त्यांना न्याय न मिळणे, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न तातडीने सोडविण्याबाबतची निर्माण झालेली आवश्यकता "

सभापती महोदय , काल सीमा भागातील नेत्यांचे एक शिष्टमंडळ मला येऊन भेटले होते त्याचबरोबर माननीय अध्यक्षांना भेटले होते.त्याचप्रमाणे आपल्याला सुध्दा त्यांनी एक निवेदन दिले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते, सभापती महोदय, कालच्या भेटीमध्ये या शिष्टमंडळाने अत्यंत तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत.महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा वादाच्या संदर्भात लवकर निर्णय होत नाही. तसेच त्या भागाचे कानडीकरण करण्याचा झपाटा युध्दपातळीवर कर्नाटक शासनाने लावला आहे..एका बाजूने हे काम करीत असतांना जाणीवपूर्वक मराठी भाषिकांना नाऊमेद करण्यासाठी त्यांच्यावर वेगवेगळया पोलीस केसेस दाखल करणे, लाठीमार करण्याचा प्रसंग आला तर अमानुषपणे मराठी भाषिकांना बदडून काढणे, अमानुषपणे त्यांच्यावर गोळीबार करणे, लोकशाहीच्या माध्यमातून आम्हाला महाराष्ट्रात समाविष्ट करुन घ्यावे अशा प्रकारे जर कोणत्याही संस्थेने ठराव केला तर लोकशाहीचा गळा घोटत ती संस्था बरखास्त करणे असे प्रकार तेथे होत आहेत. त्या भागातील मराठी भाषिक बोर्ड काढून टाकणे या किरकोळ बाबी तेथे मानल्या जात आहेत. परंतु नको तितका छळवाद सीमा भागात कर्नाटक शासनाच्या मदतीने सुरु आहे. याबद्दल काल भेटायला आलेल्या शिष्ट मंडळाने त्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केलेली आहे.मी सदनाला विनंती करतो की त्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करुन केन्द्र सरकारने ताबडतोब यामध्ये हस्तक्षेप करावा आणि त्या परिसरात असलेल्या मराठी भाषिकांची गळचेपी कोणत्याही पध्दतीने केली जाऊ नये यासाठी केन्द्राला विंनती करणारा प्रस्ताव या सदनामार्फत केन्द्र सरकारकडे पाठवला जावा अशी या सदनाला विनंती करण्यासाठी मी येथे उभा आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचना करीत असताना देशातील सगळ्या भाषिकांना आपल्या भाषेप्रमाणे राज्य मिळाले. परंतु दुर्दैवाने द्विभाषिक राज्याचा प्रयोग महाराष्ट्राच्या माथी मारण्याचे काम त्या काळामध्ये केले गेले. मोठ्या संख्येने मराठी भाषिकांनी उठाव केला आणि 105 लोकांना हौतात्म्य पत्करावे लागले, राज्य सरकारने प्रयत्न केले आणि संयुक्त महाराष्ट्र आपल्या वाट्याला आला. बहुसंख्य मराठी भाषिकांना न्याय मिळाला, पण हा न्याय देत असताना बेळगाव परिसरातील 40 लाख मराठी भाषिकांना मात्र या देशातील सगळ्या भाषिकांना भौगोलिक सलगतेने न्याय मिळाला तो न्याय त्यांना डावलला गेला. यामध्ये केंद्र सरकारने उदासीनतेची भूमिका घेतली. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला आता सुप्रीम कोर्टात दावा दाखल करावा लागला आहे. आज सुप्रीम कोर्टामध्ये हा दावा प्रलंबित असताना, बेळगावमध्ये नवीन विधानसभा बांधण्याचा घाट, अनेक उद्योजक त्या परिसरामध्ये बोलावून, तेथे अनेक नवे कारखाने करून तेथे कन्नड भाषिकांची संख्या वाढविण्याचा केला गेलेला प्रयत्न, अनेक एसइझेड त्याच परिसरामध्ये आणून मराठी भाषिक मायनॉरिटीमध्ये जातील अशा पद्धतीच्या केल्या गेलेल्या उपाय योजना, कोणी आंदोलन केलेच तर 10-20 नेत्यांची नावे लिहून हजारो असा पुढे उल्लेख करून, मेरिटमध्ये पास होणारी मुले गुन्ह्यांमध्ये अडकवून त्यांचे भविष्यच उद्ध्वस्त करण्याचा सपाटा आज तेथील प्रशासनाने लावलेला आहे. खरे तर देशात कोठल्याही भाषिकांच्या वाट्याला न आलेली दु:खे आज तेथे असलेल्या मराठी भाषिकांच्या वाट्याला येत आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्रात मध्यंतरी 4-2 घटना घडल्या आणि महाराष्ट्रात परप्रांतीय लोकांवर केवळ अन्यायच होतो आहे असे पद्धतशीर वातावरण निर्माण केले गेले. केंद्र सरकारच्या अनेक आयोगाचे सदस्य महाराष्ट्रात येऊन दाखल झाले. मानवी हक्क आयोगापसून लँग्वेस्टिकस् कमिशन पर्यंत सगळ्या लोकांनी येथे येऊन त्या विषयी चिंता व्यक्त केल्या. लोकसभेमध्ये देखील तीन दिवस या विषयावर चर्चा झाली. सभापती महोदय, घटनेप्रमाणे सगळ्यांना सगळीकडे जाण्याचा, राहण्याचा निश्चितपणे अधिकार आहे. महाराष्ट्राने घटनेतील तरतुदींचा नेहमीच आदर केला आहे. महाराष्ट्र नेहमी राष्ट्रीय प्रवाहामध्ये राहतो आहे, सगळ्या भाषांचा मान-सन्मान ठेवतो, परंतु आज हीच गोष्ट महाराष्ट्राचा दुबळेपणा म्हणून गणली जात आहे. कोठे तरी त्या 40 लाख मराठी भाषिक बांधवांना एक विश्वास देण्याची आवश्यकता आहे, तुम्ही एकटे नाही, महाराष्ट्रातील 10 कोटी जनता ही पूर्ण

...... 3एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

शक्तीनिशी तुमच्या पाठीशी आहे. भौगोलिक सलगतेने त्यांना जो न्याय मिळाला पाहिजे, तो दिला गेला नाही. किमान हा न्याय मिळेपर्यंत, सुप्रीम कोर्टातील केस निकाली लागेपर्यंत त्यांच्यावर सक्तीने कानडी लादण्याचा प्रयत्न, त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न, त्यांना गुन्हेगार बनविण्याचा प्रयत्न, त्यांच्या संस्था बरखास्त करण्याचा प्रयत्न, हे सगळे प्रकार थांबविण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने यात हस्तक्षेप केला पाहिजे आणि तेथील मराठी भाषिक माणसाला आवश्यक ते संरक्षण दिले पाहिजे या सदनाच्या भावना आपल्या मार्फत केंद्र सरकारला कळविल्या जाव्यात हा विनंती करणारा प्रस्ताव मी सगळ्यांच्या संमतीने मांडतो. आपण सगळ्यांना याला अनुमती द्यावी आणि तातडीने हा प्रताव केंद्र सरकारच्या लक्षात आणून द्यावा अशी विनंती करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...... 3एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते नामदार श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधीचा जो प्रस्ताव येथे आणला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, सीमावादाचा प्रश्न हा अनेक वर्षे या महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या विधीमंडळातील या दोन्ही सभागृहांमध्ये वर्षानुवर्षे येतो आहे आणि त्यावर त्या त्यावेळी चर्चा देखील झालेली आहे व आजही ती चालू आहे. दरवर्षी अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये माननीय राज्यपालांच्या प्रत्येक अभिभाषणामध्ये या सीमावादाचा उल्लेख केला जातो. परंतु प्रश्न मात्र अजूनही सुटलेला नाही. आताची परिस्थिती तर अशी आहे की, त्या ठिकाणी मराठी भाषिकांवर कन्नड भाषिकांकडून एवढा अन्याय आणि अत्याचार चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मागील वर्षी आपल्या दालनामध्ये बैठक झाली होती. सीमा भागातील महापौरांवर निर्घृणपणे लाठीहल्ला करण्यात आला, त्यांच्या तोंडाला काळे फासून त्यांना अवमानित करण्यात आले. अशापध्दतीने मराठी माणसाचा छळ सुरु आहे. त्याचा आपण निषेध करुन हे सभागृह स्थगित केले होते. आणि आझाद मैदानावर सर्व पक्षीय नेते बेळगावच्या लोकांना भेटावयास गेले होते. भाषावार प्रांतरचनेला एकदा तत्वत: मान्यता मिळाल्यानंतर हा प्रश्न इतकी वर्षे लोंबकळत रहावा हे मराठी भाषिकांचे दुर्दैव आहे. आज हे प्रकरण न्यायालयामध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असून या प्रकरणाचा निकाल न्यायालयामध्ये लागत नाही. मात्र कन्नड भाषिकांच्या अन्याय व अत्याचाराची परिसीमा दिवसें दिवस वाढत चालली आहे. आता सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले की, त्या भागामध्ये आज लाठी हल्ला, गोळीबार करुन मराठी भाषिकांच्या संस्था बरखास्त करुन वेगवेगळया पध्दतीने त्यांच्यावर अन्याय, अत्याचार सुरु असून यामध्ये तेथील शासन सुध्दा सहभागी झाले आहे. या गोष्टींना कर्नाटक शासन प्रोत्साहन देत आहे. त्यांचा निषेध करावा तेवढा थोडा आहे. या महाराष्ट्रामध्ये अनेक प्रांतातील लोक येऊन राहतात, परंतु याठिकाणी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याविरुध्द कोणतीही गोष्ट महाराष्ट्रात घडत नाही. म्हणून या सभागृहाच्या माननीय नेत्यांनी केंद्र सरकारने यामध्ये त्वरीत हस्तक्षेप करण्यासंबधीचा ठराव मांडला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमेवर आज 40 लाख मराठी भाषिक लोक रहात आहेत त्या 40 लाख मराठी भाषिकांवर अन्याय, अत्याचार होणार नाही. त्यांच्या सुरक्षिततेची हमी केंद्र सरकारने घ्यावी अशाप्रकारची विनंती करणारा प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे त्याला अनुमोदन व पाठिंबा देऊन मी माझे वक्तव्य संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अतिशय ज्वलंत अशा प्रश्नावर या सभागृहाचे नेते सन्माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी त्यांच्या स्थानावरुन ज्या शब्दामध्ये हा प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे त्यांचे हे शब्द ऐकून मला खूप बरे वाटले. तुम्ही म्हणाल कां? आजच तुम्हाला कां बरे वाटले ? अशाप्रकारचा संभ्रम तुमच्या मनामध्ये निर्माण होईल. परंतु या लढयाशी मी आणि आमचा पक्ष प्रथमपासून निगडीत आहे. दिनांक 21 नोव्हेंबर 1955 ला हा लढा सुरु झाला. त्यावेळेपासून आजपर्यंत हा लढा अव्याहतपणे चालू आहे. माझ्याबरोबरचे माझ्या वर्गातील दोन विद्यार्थी या 105 हुतात्म्यांमध्ये आहेत. आमच्या शाळकरी जीवनामध्ये, मुंबई शहरामध्ये हा लढा सुरु झाला. त्या लढयामध्ये आम्ही सर्वांनी स्वत:ला झोकून दिले होते. मुंबईमधील गिरणी कामगार, पांढरपेशा वर्ग, मुंबईतील मध्यमवर्गीय मराठी जनतेने या पध्दतीने प्रचंड आंदोलन उभे केले होते. त्या 105 हुतात्म्यांपैकी पुष्कळशी नावे मला माहीत आहेत. हे हुतात्मे या मुंबई शहरामध्ये झाले आणि ते त्यावेळच्या महाराष्ट्र शासनामुळे झाले होते. हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. शूट ॲट साईटची पहिली ऑर्डर त्यावेळचे मुख्यमंत्री कै. मोरारजी देसाई यांच्याकडून दिली गेली. त्यातच पहिला बळी माझ्या वर्गातील मुलगा गेला, त्या ऑर्डरमुळे गेला. त्यावेळी बेळगावमध्ये घेण्यात आलेला सभेला माननीय शिवसेनाप्रमुख, कै. एस.एम.जोशी आणि मी गेलो होतो. आम्ही बेळगावातील सर्व जिल्हयात आणि तालुक्यामध्ये फिरलो. त्याठिकाणी लहान मुले सभेच्या पूर्वी आम्हाला विचारीत होती ते ऐकण्यासारखे होते. "साहेब, तुम्ही आमच्या उमेदवारांना मते देण्यास सांगायला येऊ नका,...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

आम्ही त्यांना निवडून आणणारच. प्रश्न फक्त एकच आहे की, तुम्ही आम्हाला महाराष्ट्रामध्ये कधी सामावून घेत आहात ? त्यावेळी त्या लोकांचे सर्व शब्दोच्चार हे काळीज भेदून टाकणारे होते. मी 1980,1881, 1982,1983 या वर्षातील गोष्ट सांगत आहे. आपल्याला माहिती आहे की, आपणही त्यावेळी आला होतात. पण त्यानंतर मी गेल्या वर्षी देखील 1 नोव्हेंबर रोजी गेलो होतो. 1 नोव्हेंबर हा दिवस बेळगावमध्ये "काळा दिवस" म्हणून पाळला जातो. गेल्यावर्षी आपणही होतात, मी देखील होतो. या वर्षी देखील गेलो होतो. मी प्रत्येक वर्षी तेथे जाण्याचा प्रयत्न करीत असतो कारण आमचे या सीमावासियांशी अगदी अतूट नाते जुळलेले आहे. मुंबई शहरामध्ये आमचे 69 हुतात्मे झाले आहेत. या लढयासाठी 105 हुतात्मे गेले. जेव्हा शिवसेनेने हा लढा उभा केला आणि जेव्हा माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, श्री.मनोहर जोशी, श्री.दत्ताजी साळवी या लोकांना अटक केली, त्यावेळी सर्व मुंबई शहरामध्ये आंदोलन पेटले आणि ही घटना 8 फेब्रुवारी 1969 मध्ये घडली. मला या सर्व तारखा तोंडपाठ आहेत. त्यानंतर मुंबई शहरामध्ये खूप मोठे आंदोलन झाले होते आणि 8 दिवस मुंबई धगधगत होती. हा इतिहास आहे. त्यावेळी माननीय कै.मोरारजी देसाई हे उप पंतप्रधान होते आणि त्यांच्या गाडीने माहीम येथे एका फोटोग्राफरला उडविले होते. तेव्हापासून सुरुवात झाली आहे. हा दिवस म्हणजे दि.8 फेब्रुवारी 1969 होता आणि अद्यापही आम्ही तो हुतात्मा दिन म्हणून साजरा करतो. या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्र शासनाने जी भूमिका घेतली आहे, ती ऐकून खूप बरे वाटले. जर ही भूमिका पूर्वी घेतली असती तर आपला हा प्रश्न कधीच मार्गी लागला असता. आम्ही या विषयाच्या संबंधात लोकसभेमध्ये एक दिवस कामकाज बंद पाडले होते. आम्हाला तेथे बेळगाव-कारवार मधील सर्व महापौर भेटावयास आले होते. त्यानिमित्ताने आम्ही लोकसभेमध्ये गदारोळ घातला होता. त्यावेळी माननीय श्री.देवेगौडा पंतप्रधान होते. त्यावेळी मी माननीय पंतप्रधान श्री.देवेगौडा यांना समक्ष जाऊन भेटलो होतो. त्यावेळी ते म्हणाले की, "Mr. Sarpotdar, for God's sake don't ask me this question. Regarding other things you can ask me what is to be done. But regarding this particular issue, please don't ask me anything." अशा प्रकारचे त्यावेळी माननीय श्री.देवेगौडा यांनी उत्तर दिले होते. म्हणून त्यावेळी आम्ही सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला आणि तेथे गोंधळ घातल्यानंतर प्रथम तहकूब झाले होते. माझे दु:ख एकच आहे की, हा लढा ......

. . . .3 पी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

पेटवून त्याला गती द्यावयाची असेल,त्यातून काही निष्पन्न करावयाचे असेल तर आता लोकसभेमध्ये महाराष्ट्रातील सर्व खासदारांनी एका सूरामध्ये ओरडले पाहिजे.एका सूरामध्ये मागणी केली पाहिजे, एका सूरामध्ये रडले देखील पाहिजे आणि एका सूरामध्ये आक्रमण देखील केले पाहिजे. हे सर्व जो पर्यंत घडत नाही, तोपर्यंत बेळगाव-कारवार हा भाग महाराष्ट्रामध्ये येईल यावर माझा खूप कमी विश्वास आहे. तोपर्यंत आम्ही असेच लटकत राहणार आहोत. दुसरी गोष्ट अशी की, जेव्हा आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये रिट पिटीशन फाईल केला, त्यावेळेस त्यामध्ये एक प्रेअर असण्याची आवश्यकता होती की, जोपर्यंत या प्रश्नाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत बेळगाव-कारवार मधील त्या सीमा भागातील जनतेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय कर्नाटक सरकार करणार नाही अशा प्रकारचे निदेश कोर्टाने त्यांना द्यावेत अशा प्रकारची त्यात प्रेअर हवी होती, पण ती पण नव्हती. त्याचा परिणाम असा झाला आहे की, आता कोर्टामध्ये केस पडून आहे. तसेच केंद्र शासनाने यासंबंधात जे प्रतिज्ञापत्र फाईल केले आहे, ते तर महाराष्ट्राच्या विरोधात आहे. त्यामुळे आपल्याला केवळ आपल्याच सामर्थ्यावर उभे रहावयाचे आहे. आपल्याला केंद्र शासनाचा पाठिंबा मिळेल की नाही असा प्रश्न आहे. केंद्र शासनामध्ये महाराष्ट्रातील बरेच खासदार मंत्री म्हणून काम करीत आहेत. एक दिवस जर सर्व मंत्र्यांनी उभे राहून सांगितले की, जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत आम्ही केंद्र शासनामध्ये काम करणार नाही. असे झाले तर हा प्रश्न ताबडतोब सुटेल असे मला वाटते. पण आम्ही तसे करण्याचे धाडस सुध्दा दाखवत नाही. या पार्श्वभूमीवर आपण महाराष्ट्रामध्ये कितीही लढलो, किती आंदोलने केली, येथील कितीही माणसे पोलिसांनी किंवा अन्य काही कारणामुळे मारली तरीसुध्दा हा प्रश्न सुटेल यावर माझा फार विश्वास कमी आहे. मी सुध्दा या एका प्रश्नासाठी पोलिसांचे फटके खाल्ले आहेत, तुरुंगामध्ये जाऊन आलो आहे, सगळे काही केले आहे. म्हणून या विषयाच्या बाबतीत आमचे जे दुःख आहे, ज्या वेदना आहेत, त्या बोलत आहेत. म्हणून माननीय गृहमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडला, त्यामुळे मला खूप आनंद झाला. सभापती महोदय, हा विषय अतिशय ज्वलंत आहे आणि त्याला जर जास्त मोठे स्वरुप द्यावयाचे असेल तर महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी एकमुखाने ही मागणी लावून धरली पाहिजे आणि तशी कृती केली पाहिजे. सर्वांची अशी कृती करण्याची तयारी आहे काय ? हा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .



RDB/ KTG/ SBT/ पूर्वी सौ. रणदिवे .... 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ती जर असेल तर प्रश्न सुटतो की नाही ते बघावे. तरच तो प्रश्न मार्गी लागेल. कर्नाटकचा विषय निघाला की, पक्ष कोणताही असला तरी लोकसभेमध्ये कर्नाटकचे सगळे खासदार एकत्र उभे राहतात. तामीळनाडूचा प्रश्न निघाला तर तेथील सगळे खासदार एकमेकांचे कितीही विरोधक असले तरी एकमुखाने बोलतात. पण महाराष्ट्राचे खासदार असे कधी एकत्र येत नाहीत. सगळ्या पक्षाचे खासदार एकत्र येऊन त्यांनी जर जोरात त्वेषाने प्रश्न मांडला तर आजही त्यातून मार्ग निघेल असे मला वाटते. त्यादृष्टीने माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी आपल्याला विनंती आहे. आपणही प्रयत्न करावा. माननीय मुख्यमंत्र्यांनीही प्रयत्न करावा आणि जसे या विधानसभेत वातावरण उभे राहात आहे तसे वातावरण संपूर्ण देशामध्ये आणि लोकसभेमध्ये उभे करण्याचा प्रयत्न केला तर त्याला चालना मिळेल आणि या 40 लाख सीमावासीय जनतेचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी प्रयत्न होईल अशी माझी अतिशय मनापासूनची भावना आहे. त्याला साथ देऊन जर आपण पुढे पावले टाकली तर हा प्रश्न सुटेल. आपण एकमेकांच्या हातात हात घालूनच पुढे जावयास पाहिजे. या ठिकाणी आपण एकमेकांना विरोध करु, एकमेकांवर टीका करु, एकमेकांबद्दल बोलू, सगळे काही करु परंतु सीमा प्रश्न ज्यावेळी उभा राहतो त्यावेळी आम्ही सगळे एक आहोत आणि दुसरे कोणी नाही असे दिसले पाहिजे. पाच पांडव आणि शंभर कौरव हे जरी चित्र असले तरी ज्यावेळी त्या दोघांवर संकट येईल त्यावेळी ते एकशेपाच आहेत ही भावना घेऊनच आपण समोर जाऊन सीमा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तरच तो प्रश्न सुटू शकेल. आता सुप्रीम कोर्टात सुध्दा काय होईल ते मी सांगू शकत नाही. कारण शेवटी राजकारणात आपण ज्या पध्दतीने पावले उचलतो, ज्या पध्दतीने वकिलांना आपण संपूर्ण मटेरियल पुरवतो, ज्या पध्दतीने बुध्दिवंत, नामवंत वकील त्या ठिकाणी युक्तिवाद करतात त्याच्यावरच त्याचा अंतिम निर्णय अवलंबून राहील. त्या ठिकाणी जर महाजन अहवालासारखा काही धोका झाला नाही तरच आम्ही जिंकू अन्यथा खूप कठीण आहे अशी माझी भावना आहे. पण आपण जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. या प्रस्तावाला आमच्या शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा तर आहेच पण या सदनामध्ये ज्या भावना व्यक्त झाल्या त्यात आम्ही सर्वजण सामील आहोत. हा प्रस्ताव मंजूर करावा अशी मी या सदनाला आणि आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

----

...2...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : माननीय सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी जो प्रस्ताव समोर ठेवला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. बेळगाव, कारवार, बिदर, भालकी या सीमा भागाच्या प्रश्नावर या सदनाचे कधीही दुमत झालेले नाही. सभागृहाच्या नेत्यांनी यथार्थ शब्दात वर्णन केले आहे की, 10 कोटीचा महाराष्ट्र सीमा भागाविषयी नेहमीच ठामपणे उभा राहिलेला आहे. परंतु यावेळचा जो प्रश्न आहे, प्रामुख्याने निपाणीच्या संदर्भात जो प्रश्न आहे, तेथील नगरपालिकेमध्ये मराठीच्या प्रश्नावर जे रणकंदन झाले आणि जो अत्याचार कर्नाटक सरकारने केला तो प्रश्न काही सीमा प्रश्न नाही. या देशाच्या संविधानाने या देशातील सर्व अल्पसंख्यांक समुदायांची भाषा, धर्म आणि त्यांची संस्कृती यांचे रक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने त्या त्या सरकारवर दिलेली आहे आणि या घटनादत्त जबाबदारीपासून कर्नाटक सरकार नुसतेच दूर पळाले असे नाही तर त्यांनी घटनेचा द्रोह केलेला आहे. कारण अल्पसंख्यांक समुदायाच्या भाषेबद्दल, त्यांच्या धर्माबद्दल किंवा त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करण्याची जबाबदारी असताना त्यांच्यावर अत्याचार करणे आणि त्यांच्यावर सक्ती करावयास लावणे यासारखा दुसरा घटनाद्रोह नाही. कर्नाटक सरकारचे हे कृत्य लोकशाहीविरोधी आहे, संविधान विरोधी आहे. आणि त्यांचा तीव्र शब्दात आपण धिक्कार केला पाहिजे. केवळ आपला पाठिंबा आहे आणि त्यांच्यामागे मराठी भाषिकांच्या पुरते समर्थन आहे एवढा मुद्दा नसून कर्नाटक सरकारने जी कृती केली त्याचा या सदनाने तीव्र शब्दात धिक्कार नोंदविला पाहिजे.

सभागृहाच्या नेत्यांनी जी मागणी केली त्याप्रमाणे मी दुसरी मागणी करणार आहे. केंद्र सरकारने यामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज आहे. कारण नुसता अल्पसंख्याक समुदायाचा मुद्दा नव्हता. हा सबंध परिसर वादग्रस्त आहे. सुप्रीम कोर्टामध्ये हा विषय आहे. जोपर्यंत त्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत त्यांना कोणतीही सक्ती करता येणार नाही आणि त्यामुळे केंद्र सरकारने याबाबतीत तातडीने हस्तक्षेप करुन तेथील सर्व मराठी भाषिकांच्या हक्कांचे रक्षण केले पाहिजे. आणि आदरणीय श्री. मधुकर सरपोतदार यांनी ज्या पध्दतीने सुचवले त्या पध्दतीने या सभागृहाच्या नेत्यांनी, राज्याच्या नेत्यांनी आणि सर्व पक्षाच्या नेत्यांना एकत्र घेऊन दिल्लीत जावे आणि तेथील सर्व मराठी भाषिकांच्या हक्कांच्या जपणुकीसाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप करावा अशी मागणी जर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. कपिल पाटील ......

आपण एकदिलाने करु शकलो तर एक वेगळा मेसेज सीमा भागामध्ये जाईल. केवळ सीमा भागातच मेसेज जाणार नाही तर महाराष्ट्र नेहमीच अल्पसंख्यांक समुदायाबद्दल ज्या पध्दतीने उदारतेची भूमिका घेतो आणि घटनेला अनुसरुन भूमिका घेतो, या राज्याच्या अल्पसंख्याक समुदायाबद्दल आपण जितके संवेदनशील आहोत त्याच पध्दतीने आम्ही अन्य राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाबद्दल आणि जे आमच्या भाषेशी निगडीत आहेत त्यांच्याबद्दल आम्ही तितकेच संवेदनशील आहोत हा मेसेज या निमित्ताने जाणे आवश्यक आहे. एवढे सांगून मी पुन्हा आपल्याला समर्थन व्यक्त करतो. धन्यवाद

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे आणि त्या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी पाठिंबा दिलेला आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनीही या प्रस्तावाचे समर्थन केलेले आहे.

सीमा भागामध्ये राहणारे जे मराठी भाषिक आहेत त्यांनी जवळजवळ 50 वर्षे या लढ्याच्या माध्यमातून असीम त्याग केलेला आहे. अनेक प्रकारचा अत्याचार सहनही केलेला आहे. गेली 50 वर्षे सातत्याने विधानपरिषद आणि विधानसभेच्या माध्यमातून सर्वजण एकमताने या मराठी भाषिकांच्या पाठीशी कणखरपणे उभे राहिले आहेत. मराठी भाषिकांचा हा लढा न्यायाचा आहे. तो कोणत्याही परिस्थितीत सुटला पाहिजे. याकरिता अनेक वेळा, अनेक पध्दतीने आपण चळवळीही उभ्या केल्या आहेत. मराठी भाषिकांना वेळोवेळी सक्रीय पाठिंबा दिलेला आहे. दुर्दैवाने कर्नाटक सरकार गेल्या अनेक वर्षापासून अनेक मार्गांनी मराठी भाषिकांवर अन्याय करीत आहे. कानडी भाषेची सक्ती करीत आहे, असे जे प्रकार तेथे सुरु आहेत ते केंद्र सरकारने कोणत्याही परिस्थितीत रोखावेत ही तुमची, आमची पहिल्यापासूनची मागणी आहे. ही मागणी आपण केंद्र सरकारकडे करतो त्याच पध्दतीने सर्वोच्च न्यायालयामध्ये आम्हाला न्याय मिळावा, मराठी भाषिकांना न्याय मिळावा असे आमचे जे धोरण आहे त्यासाठी राज्य सरकारने प्रयत्नांची पराकाष्टा करावी आणि तुमच्या आमच्या महाराष्ट्रातील जनतेचा जो अत्यंत महत्वाचा दुवा म्हणजे सीमावर्ती बांधव आहेत, त्यांचा हा प्रश्न सोडविण्यासाठी अंतिम स्वरुपाचा लढा यशस्वी करता यावा अशी माझी स्वत:ची या बाबतीतील धारणा आहे. म्हणून या सदनामध्ये सदनाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी मांडलेल्या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनीही पाठिंबा दिलेला आहे. कर्नाटकातील सीमा भागातील जनतेवर होणा-या अन्यायाबाबत या सभागृहाच्या नेत्यांनी हा प्रस्ताव मांडला आहे आणि त्याच पध्दतीने या प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांनी पाठिंबा दिलेला आहे. ' सीमा भागातील जनतेवर होणारा अन्याय आहे तो दूर होण्यासाठी, सीमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**सभापती**.......

भागातील जनतेला नाहक त्रास होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना केंद्र सरकारने तातडीने करावी असे आवाहन मी या सभागृहाच्या माध्यमातून करीत आहे. सीमावासीय जनतेला लवकर न्याय मिळेल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो ' या पध्दतीचा हा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव एकमताने मान्य व्हावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रस्ताव एकमताने संमत झाला.

-------

3.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**<u>औचित्याच्या मुद्यासंबंधी</u>**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनाच्या व्यवस्थेबाबत मला एक छोटासा औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री सुध्दा सभागृहात उपस्थित आहेत. लोकशाहीमध्ये लोकसभा अथवा विधिमंडळात सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष किंवा सभापती असतात आणि विरोधी पक्षाचे उपाध्यक्ष वा उपसभापती असतात. हा सर्वसाधारणपणे दंडक आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार....)

मध्यंतरी 8 वर्षापूर्वी असे घडले होते की, अशी व्यवस्था असताना आम्ही निवडणूक लढविली होती आणि त्या निवडणुकीमध्ये आमच्या उमेदवाराला अपयश आले होते. तेव्हापासून विधानसभा असो अथवा विधान परिषद असो तेथील उपाध्यक्ष अथवा उपसभापती पदी सत्ताधारी पक्षाचेच सन्माननीय सदस्य असतात. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य नसतात. तेव्हा ही जी व्यवस्था आहे तिला केव्हा तरी वळण दिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, मध्यंतरी दिनांक 13 मार्च 2008च्या एका वर्तमानपत्रातील बातमी माझ्या वाचनात आली. त्या बातमीमध्ये जो उल्लेख करण्यात आलेला आहे तो मी आपणास वाचून दाखवितो. "श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या नावाबाबत प्रथम एकमत नव्हते. मात्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून त्यांची निवड 6 वर्षासाठी असून उमेदवारी डावलल्यास पदासाठी पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल....

श्री. जितेंद्र आव्हाड : वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमी विषयी सभागृहामध्ये चर्चा होऊ शकत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : माझे म्हणणे काय आहे ते आपण ऐकून घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : वर्तमानपत्रामध्ये बातमी कशी यावी यावर कोणाचेही नियंत्रण असणार नाही आणि असू शकणार नाही. वर्तमानपत्रातील कोणत्याही बातमीसंदर्भात या ठिकाणी चर्चा होणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला जो एक मुद्दा मांडला त्याबाबत मी सांगेन की, तो मुद्दा माझ्या कक्षेत येत नाही. त्या मुद्याच्या बाबतीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने एकत्र बसून चर्चा करावी.

श्री. मधुकर सरपोतदार : माझा दुसरा मुद्दा असा आहे की, वर्तमानपत्रामध्ये अशा रीतीने बातमी छापून येणे हे लोकशाही संकेताच्या विरुध्द आहे.

प्रा. वसंत पुरके : मग अन्य सन्माननीय सदस्यांसंबंधी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली तर ती देखील वाचून दाखवायची काय ?

...2..

श्री. जितेंद्र आव्हाड : मी देखील एक बातमी वाचतो, " शिवसेनेने जे दोन उमेदवार जाहीर केले....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या हातामध्ये वृत्तपत्र किंवा वृत्तपत्राचे कात्रण नाही. कोणता तरी एक कागद हातामध्ये घेऊन ते वर्तमानपत्र असल्याच्या आविर्भाने ते वाचत आहेत. सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने बनवाबनवी करणे योग्य नाही.

**सभापती** : बनवाबनवी हा शब्द आक्षेपार्ह आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कोणता तरी कागद हातामध्ये धरुन ते वर्तमानपत्र म्हणून आपणास दाखवायचे ही बनवाबनवी नाही तर काय आहे ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना सांगू इच्छितो की, वृत्तपत्रातील माहिती आपण या ठिकाणी वाचून दाखवित आहात. वृत्तपत्रातील बातमी कशी असावी, बातमीत काय मजकूर असावा, याबाबतीत वृत्तपत्रांना तुम्हाला आणि मला मर्यादा घालता येणार नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : वृत्तपत्रात असत्य माहिती छापून आलेली आहे. ती असत्य माहिती काय आहे ते मी या ठिकाणी वाचून दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**सभापती** : सदरहू वृत्तपत्रातील कात्रण माझ्याकडे द्यावे, त्यातील वृत्त मी वाचून घेतो.

श्री. मधुकर सरपोतदार : ठीक आहे. सदर वृत्तपत्राचे कात्रण मी आपणाकडे सादर करतो.

**सभापती** : सदरहू वृत्तपत्राचे कात्रण माझ्याकडे पाठवून द्यावे. त्यात काय वृत्त आलेले आहे ते मी वाचून पाहीन. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात होईल.

---------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा व दुसरा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज, मंगळवार, दिनांक 18 मार्च, 2008 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रमपत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या.**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1) उप मुख्यमंत्री विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1, बी-4, बी-5

2) महसूल मंत्री विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1, सी-4

3) सहकार व पुनर्वसन व मदत कार्यमंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक सी-5,व्ही-5

4) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास आणि पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3, आय-4, आय-5

5) उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक के-7, के-10, झेड-डी-1

6) राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक के-4,यु-3

7) शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक ई-2, ई-3

8) ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक के-6, एस-1, डब्ल्यू-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4

9) पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय आणि औकाफ मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक डी-5

10) वने मंत्री यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक सी-7



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा ) : सभापती महोदय, काल मी पूरक मागण्यावरील चर्चेच्या सुरुवातीला एक मुद्दा उपस्थित केला होता. सभागृहात ज्या विभागाच्या पूरक मागण्या मंजुरीसाठी आलेल्या आहेत त्या विभागाच्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे अशी या सभागृहाची प्रथा आणि परंपरा आहे. आज देखील अनेक विभागांचे मंत्री सभागृहात उपस्थित दिसत नाहीत ही गोष्ट बरोबर नाही. सामुहिक जबाबदारी म्हणून एखादे मंत्री सभागृहात बसतात आणि ते सदस्यांच्या सूचनांची नोंद घेत असतात. ज्यावेळेला या चर्चेवरील उत्तराची वेळ येते त्यावेळी त्या त्या विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित होतात. मोजक्या शब्दात उत्तर देऊन ते आपल्या विभागाच्या मागण्या मंजूर करुन घेतात. अशा प्रकारची प्रथा बरोबर नाही असे पुन्हा मी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11,12 आणि 13 वरील गृह विभागाच्या बाब क्रमांक 7,8,11 आणि 12 यावर मी माझे विचार मांडणार आहे. बाब क्रमांक 7- तक्रारकर्त्यांना, पकडलेली रक्कम परत करण्यासाठी तरतूद करणे या विषयाची बाब आहे. शासनाच्या आदेशानुसार, विनिर्दिष्ट कालावधीत पकडलेली रक्कम तक्रारकर्त्यालापरत करणे आवश्यक असते, तथापि, अपु-या निधीच्या तरतुदीमुळे 15 कोटी 85 लाख 565 इतकी रक्कम परत करणे प्रलंबित आहे. म्हणून या प्रयोजनासाठी 2007-08 या वर्षी रुपये 15 कोटी रुपयांची तरतुदीची पूरक मागणी सभागृहाला सादर करण्यात आली आहे. तक्रारकर्त्यांना पकडलेली रक्कम परत करणे यासंबंधीची माहिती आम्हाला न समजणारी आहे. त्यामुळे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 8- भाडे पट्टी व कर याबाबतच्या थकित बिलांच्या प्रदानासाठी तरतूद करण्यासंबंधीचा विषय आहे. भाडेपट्टी व कर याबाबतच्या थकित बिलाच्या प्रदानासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकरिता रुपये 13 कोटी 6 लाख 41 हजार रुपयांची पूरक मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. भाडेपट्टी आणि कर याबाबतच्या रक्कमा तात्काळ अदा केल्या जात नाहीत काय? याबाबतीत देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. कानडे....



**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

श्री. मधुकर सरपोतदार ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 19 बाब क्रमांक 17 मध्ये मालेगांव,जि.नाशिक येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत बांधण्यात येत आहे. या कार्यालयाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. या बांधकामासाठी मूळ तरतूद किती आणि पुरवणी मागणी का सादर करावी लागली याचा खुलासा शासनाने करावा. 21 लाख 80 हजार रुपयांची मागणी सादर करण्यात आली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18 मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी एकूण 21 लाख 97 हजार रुपयांची मागणी का करण्यात आली याचा शासनाने खुलासा करावा. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 19 मध्ये सुध्दा मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. मूळ मंजूर अनुदान किती होते आणि पूर्ण खर्च होऊन पुरवणी मागणी मागण्याचा प्रश्न का निर्माण झाला याचा शासनाने खुलासा करावा. सभापती महोदय, बाब क्रमांक 20 मध्ये 3कोटी 60 लाखांची मागणी करण्यात आली आहे. आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी ही मागणी आहे. आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अनेक पध्दतीने त्रास दिला जातो. त्यांना शासनाकडून मिळणारी मदत वेळेवर मिळत नाही. ही मदत मिळविण्यासाठी आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अनेक खेटे मारावे लागतात. शासकीय यंत्रणा ज्या पध्दतीने तत्पर असावयास पाहिजे तशी ती दिसत नाही. एकतर आत्महत्या झाल्याचे दुःख त्या कुटुंबियांवर असतेच. शिवाय मदतनिधी जो जाहीर केला जातो तो मिळविण्यासाठी होणारे क्लेष आणि यातना या कमी कशा होतील आणि त्रास कमी कसा होईल याबाबात शासनाने काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, अचलपूर आणि कुर्ला येथील दंगलीमध्ये बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. अचलपूर येथील दंगलीची अतिशय थोडक्यात चर्चा झाली होती. दंगलखोरांना मदत करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. दंगलीत बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना ही मदत दिली जाते. दंगलीची कारणे शोधून काढली पाहिजेत. दंगलींना प्रोत्साहन देण्याचे काम होता कामा नये. याबाबत शासनाने नीट काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो. अशावेळी दंगलखोरांना प्रोत्साहन मिळणार नाही याची दक्षता शासन घेणार आहे किंवा नाही ?

.....2



श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 29 आणि 30 मध्ये उर्दू शिक्षकांना मानधन देण्यासाठी व उर्दू शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती करण्यासाठी पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. उर्दू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षकांना जरुर सवलती द्या. याबाबत मी आपल्याला रत्नागिरी जिल्हयातील एका शाळेचे उदाहरण देईन. या जिल्हयामध्ये एक उर्दू शाळा आहे.त्या शाळेत 8 विद्यार्थी आहेत. मुस्लिमांची अनेक घरे गावात आहेत. परंतु शाळेत मुले मात्र 8-10 आहेत. त्या गावामध्ये 7 वी पर्यंत मराठी शाळा आहे. ही मुले मराठी चौथीपर्यंत त्या शाळेज जातात आणि नंतर उर्दू शाळेत जातात. त्यामुळे मुलांना धड मराठी येत नाही आणि धड उर्दू येत नाही अशी परिस्थिती आहे. निराळया उर्दू शाळेत मुलांना न शिकविता पहिली पासून मराठी शाळेत पाठवावे आणि उर्दू विषय शिकविण्याकरिता एक स्वतंत्र शिक्षक नेमावा. 2 उर्दू शिक्षकांची मान्यता असलेल्या शाळेमध्ये एकच शिक्षक उर्दू शिकवितो. एक शिक्षक काम नसल्यामुळे शाळेत जात नाही. हा जो गोंधळ उडालेला आहे त्यामध्ये शासनाने लक्ष घालावे.

सभापती महोदय, उर्दू शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती करण्यासाठी अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात माझी एकच विनंती आहे की, उर्दू शिक्षकांची जरुर नियुक्ती करा परंतु त्यावरील खर्च आणि विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन त्यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी विनंती आहे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

ज्या गावात मराठी शाळा आहे त्या शाळेत 150 मुले शिकत असून तेथे दोन शिक्षक कार्यरत आहेत. परंतु ज्या उर्दू शाळेत फक्त 8 मुले शिकत आहेत तेथे दोन शिक्षक कार्यरत असूनही आणखी एका शिक्षकाची नियुक्ती केली जाणार असल्याची मला माहिती मिळाली आहे. मंत्रीमहोदयांनी या संदर्भात खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, जलसंधारण विभाग, पृष्ठ क्रमांक 52, बाब क्रमांक-44 व 45 संबंधी मी बोलणार आहे. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांच्या अधीन असलेल्या विभागांची नावे बदलणे यासाठी रु.1000 ची दत्तमत मागणी सादर केली आहे. नावे बदलणे हे कार्यालयीन खर्चात होऊ शकते. त्यासाठी पूरक मागणी सादर करण्याची पाळी का आली? केवळ नावाच्या पाट्या बदलण्यासाठी मागणी सादर केली आहे. जायकवाडी प्रकल्प जलनि:स्सारण बांधकाम विभाग क्रमांक-3, बीड हे नाव बदलून जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक-3, बीड असे करण्यात येत आहे. जायकवाडी प्रकल्प जलनि:स्सारण बांधकाम विभाग क्रमांक-2, लातूर याऐवजी लातूर पाटबंधारे विभाग, लातूर असे नाव बदलण्यात येत आहे. शेतचारी अस्तरण विभाग क्र.1, परळी वैजनाथ याऐवजी माजलगाव पाटबंधारे विभाग, परळी वैजनाथ असे नाव बदलण्यात येत आहे. यासाठी 1000 रुपयांची दत्तमत मागणी सादर केली आहे. अशा प्रकारच्या कार्यालयीन कामकाजासाठी अर्थसंकल्पीय अनुदानातून तरतूद करता आली नसती का? पूरक मागणी का सादर केली?

सभापती महोदया, बाब क्रमांक-45 मध्ये म्हटले आहे की, नावामध्ये बदल केल्याने कोणताही वित्तीय बोजा पडणार नाही, तर यामुळे केवळ प्रयोजनात बदल होणार आहे. मग ही पुरवणी मागणी का मांडण्यात आली आहे?

सभापती महोदया, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, पृष्ठ क्रमांक-68, बाब क्रमांक-62 अन्वये वर्धा आणि कोल्हापूर येथील औद्योगिक न्यायालय कार्यालयांच्या नूतनीकरणासाठी रु.9.19 लाखाची पूरक मागणी सादर केली आहे. शासनाने कोल्हापूर येथे औद्योगिक न्यायालयाची स्थापना केली आहे. त्या न्यायालयाच्या नूतनीकरणासाठी पूरक मागणी सादर केली आहे. रत्नागिरी आणि कोल्हापूर यामधील अंतर अंदाजे 120 कि.मी.इतके आहे. रत्नागिरीमधील कामगारांना त्यांच्या औद्योगिक कामगार न्यायालयीन कामकाजासाठी कोल्हापूरला जावे लागते. ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

व्यवस्था कोकणात का केली जात नाही? रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात कारखाने असल्यामुळे तेथे औद्योगिक व कामगार न्यायालय का स्थापन केले जात नाही? याबाबत मंत्रीमहोदय खुलासा करतील काय? किती वर्षे कामगारांना त्रास देणार आहात? रत्नागिरीमधील कामगारांना 120 कि.मी.अंतरावरील न्यायालयात जावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक-63 अन्वये वितरण कंपनीला अर्थसहाय्य देण्यासाठी तसेच परतफेड करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्याकरीता रु.1084.90 कोटीची पूरक मागणी सादर केली आहे. ऊर्जा विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. महाराष्ट्राला ऊर्जा कशी मिळणार आहे? आम्ही ऊर्जा विभागाच्या मागण्यांवर जे मुद्दे उपस्थित करीत आहोत त्याची नोंद कोणी घेत असताना दिसत नाही. त्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटासाठी तहकूब करावी अशी माझी विनंती आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : महोदय, माननीय उर्जा मंत्री खालच्यासभागृहात पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी उपस्थित राहण्यासाठी गेले आहेत. तेथील चर्चेला आणि या ठिकाणच्या चर्चेला सुध्दा तेच उत्तर देणार आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांची नोंद येथे घेतली जात आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरु ठेवावे.

श्री. विनोद तावडे : कालच्या सभागृहात पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरुच नाही. माननीय मंत्री महोदयांनी चुकीची माहिती दिली आहे. म्हणून उर्जा विभागाच्या मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याचा निरोप द्यावा व तोपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करावी.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे, माननीय मंत्री महोदयांना निरोप देण्याची व्यवस्था करण्यात येईल. ते सभागृहात लवकरच उपस्थित होतील.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय मंत्री महोदय येईपर्यंत किमान 10 मिनिटांसाठी तरी सभागृहाची बैठक स्थगित करावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील महत्वाचे मुद्दे उपस्थित मंत्री महोदयांपैकी कोणीतरी लिहून घेण्याची जबाबदारी घ्यावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, मी माननीय सभापतींकडे गेलो होतो म्हणून सभागृहात उपस्थित राहू शकलो नाही, आता मी सभागृहात उपस्थित झालो आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय मंत्री महोदय सभागृहात बैठक सुरु असताना माननीय सभापतींकडे गेले होते आणि त्याबाबत त्यांनी कळविले किवा नाही हे माहिती नाही. परंतु माझी एकच विनंती आहे की, मंत्रिमंडळाच्या सदस्यांनी अशा प्रकारे सभागृहाच्या कामकाजाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे योग्य नाही, म्हणून संबंधित मंत्र्यांना समज द्यावी.

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असताना माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे, याची दखल घ्यावी.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, वीज वितरण कं. मर्या. यांच्याकडून वसूली झालेल्या अधिक रकमेची परतफेड करण्यासाठी 827.37 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु ही तरतूद पुरवणी मागण्यांच्या माध्यमातूनच का करण्यात येत आहे यासंबंधीचा खुलासा उत्तराच्या भाषणातून मंत्री महोदयांनी करावा, अशी माझी मागणी आहे. कारण इतमक्या कोटयावधी रुपयांची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ........

मागणी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करण्यासाठी काय आधार आहे याचाही खुलासा करावा. तसेच पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून किती रकमेपर्यंतची तरतूद करता येते अथवा तसे संकेत आहेत यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

बाब क्र. 64-उर्जा विभागाच्या संदर्भात ही तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित. गतिशील विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणारा अतिरिक्त निधी या कारणामुळे झालेला हा खर्च 14 कोटीचा आहे. परंतु ज्यावेळी अर्थसंकल्प सादर झाला होता त्यावेळी अशा प्रकारची आकडेवारी मांडली जाते परंतु त्यावेळी शासनाचे व संबंधित विीागाचे गणित चुकते आणि पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अशी मागणी सभागृहासमोर आणली जाते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

त्यामुळे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी जागरुक राहून लक्ष देण्याची आवश्यकता आहे. वीज ग्राहकांना वीज बिले दिली जातात परंतु वीज काही मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

आता मी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 119 वर विचार मांडणार आहे. नागरी पाणी पुरवठा योजनेअंतर्गत भातसाई प्रकल्पाकरिता 9 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात अर्थसंकल्पात 3 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु पुरवणी मागण्यांमध्ये 9 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पापेक्षा पुरवणी मागणीत अधिकची मागणी का करण्यात आलेली आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी एवढे बोलून मी माझे विचार व्यक्त करतो.

---------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : माननीय सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवर बोलण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. मी आता बाब क्रमांक 8, भाडे पट्टी व कर याबाबतच्या थकित बिलांच्या प्रदानासाठी 13,06,41,000 रुपयांची तरतूद केलेली असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करते. नवीन मुंबई आयुक्तालयामध्ये 474 पोलिसांची भरती केलेली आहे. परंतु त्यांना घरभाडेभत्ता देण्यात येत नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी अशी विनंती आहे. त्याच प्रमाणे नवीन मुंबई मध्ये पोलीस वसाहतीला मागील आठवडयात अंदाज समितीने भेट दिली होती. या भेटीमध्ये समितीला पोलीस वसाहत दुरावस्थेत असल्याचे दिसून आलेले आहे. या पोलीस वसाहतीची दुरावस्था झालेली असल्यामुळे या वसाहतीमध्ये पोलीस राहत नाही. या ठिकाणची 76 निवासस्थाने पोलिसांना राहण्यासाठी सुरक्षित नसल्यामुळे , धोकादायक असल्यामुळे या वसाहतीमध्ये पोलीस राहत नाहीत. पोलिसांच्या वसाहतीसाठी जी.आर.मध्ये 2.5 एफ.एस.आय दिलेला आहे. नव्या मुंबईमध्ये सीडकोने जी घरे बांधलेली आहे त्या ठिकाणी जर 2.5 एफ.एस.आय. दिला तर चांगले होईल. यासंदर्भात सीडकोच्या एम.डी.यांनी सांगितले आहे की, आम्हाला या ठिकाणी जर 2.5 एफ.एस.आय. दिला तर या ठिकाणची जुनी घरे डिमॉलिश करुन नवीन घरे बांधून देऊ. त्यामुळे जर सिडकोला 2.5 एफ.एस.आय. दिला तर पोलिसांच्या घरांचा प्रश्न सुटू शकेल त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदया मी आता बाब क्रमांक 40 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. पुणे येथे तंत्रनिकेतनासाठी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे माझी विनंती आहे नव्या मुंबईमध्ये मोठया प्रमाणात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, या ठिकाणी अनेक शाळा आणि कॉलेजस मोठया प्रमाणात निर्माण झालेले आहेत. तरी नवी मुंबईमध्ये तंत्रनिकेतन संस्था निर्माण करावी ही विनंती. तसेच वन औषधीसाठी अनुदान देण्यात यावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदया, सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदया, गृह विभागाची बाब क्रमांक 6 पान नंबर 12 सबंधी मला बोलावयाचे आहे. गुप्त सेवा खर्चासाठी 77 लाख 32 हजार रुपयांची पूरक मागणी या ठिकाणी करण्यात आलेली आहे.देहू येथील संत तुकाराम महाराजांचा मुखवटा चोरीस गेला आहे. आता तो मुखवटा मिळाला आहे असे जाहीर करण्यात आलेले आहे. परंतु तो मुखवटा नवीन तयार करण्यात आला असून तो खोटा आहे असे देहूच्या परिसरात बोलले जात आहे. तेव्हा या संदर्भातील खरी बाब कोणती आहे याचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी दिले पाहिजे. शासनाची, महाराष्ट्र राज्याची आणि गृह विभागाची लाज राखण्यासाठी त्या ठिकाणी नवीन मुखवटा करण्यात आला होता. तेव्हा हा एक प्रकारचा कट होता की काय अशी शंका येते. इंद्रायणी नदीच्या बाजूला जेथे एक झाड होते त्या झाडाच्या फांदीला एक दोरी बांधण्यात आली होती. प्लॅस्टिकच्या पिशवीमध्ये हा मुखवटा ठेवून तो पाण्यात सोडण्यात आला होता. त्यानंतर कोणीतरी पोलिसांना फोन केला होता की, अमुक अमुक ठिकाणी मुखवटा ठेवण्यात आलेला आहे. त्यानंतर पोलीस त्या ठिकाणी गेले होते आणि पाच मिनिटात पोलिसांना मुखवटा सापडला होता. या ठिकाणी मी ही बाब अत्यंत स्पष्टपणे मांडू इच्छितो आणि माननीय गृहमंत्र्यांनी वा माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मला त्या संबंधीचे उत्तर द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. देहूच्या परिसरात या मुखवटया संबंधी बरेच बोलले जात आहे. संत तुकाराम महाराजांचा जो मूळ मुखवटा होता त्या मुखवटयासकट त्यांचे फोटो प्रसिध्द होत असतात. एखाद्या तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी देव देवतांचे किंवा संत, महंताचे फोटो भाविकांच्या विक्रीसाठी ठेवण्यात येतात. आता या मुखवटयाची त्या फोटोबरोबर लोक तुलना करु लागले आहेत. जो जुना मुखवटा होता त्या मुखवटयावर केलेले नक्षीकाम, त्यांच्या डोळयाचा आकार किंवा चेह-यावर ज्या काही सुरकुत्या असतात त्या कलाकाराने तासकाम करुन आणि एनग्रेव्हींगने त्या असतात. त्या जुन्या मुखवटयामध्ये आणि आताच्या मुखवटयामध्ये फरक आहे. जो मुखवटा चोरीस गेला होता तो आता सापडला आहे असे सांगून महाराष्ट्रातील जनतेची फसवणूक करण्यात आलेली आहे काय ? ज्याने हा मुखवटा चोरला आहे त्याला पोलीस पकडू शकत नाही आणि आता सपूर्ण महाराष्ट्रात भावनांचा उद्रेक होईल त्यामुळे असे करण्यात आलेले आहे काय ? सभापती महोदया, जेव्हा हा मुखवटा मिळाला होता तेव्हा या सभागृहाच्या आवारात सुध्दा अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

सन्माननीय सदस्य असे बोलत होते की, जो मुखवटा सापडलेला आहे तो नव्याने बनविण्यात आलेला आहे. अशा प्रकारे जर नव्याने मुखवटा बनविलेला असेल तर आपल्या गुप्तचर खात्याला काहीही माहिती मिळालेली नाही काय ? या शासनाचा कारभार कशा प्रकारे चालला आहे ? चोर मिळत नाही म्हणून नवीन मुखवटा आणून त्या मंदिरातील मूर्तीला लावला जाणे हा संपूर्ण प्रकारच हास्यास्पद आहे.पोलीस आता आपल्या मागावर येतील असे कोणाला तरी भीती पोटी वाटले असल्यामुळे तो झाडावर चढला असेल. इंद्रायणी नदीच्या काठावर असलेल्या झाडाची पुढे आलेली एक फांदी आहे, त्या फांदीच्या पलीकडे जाऊन त्याला दोर बांधून ती प्लॅस्टिकची पिशवी बांधून ठेवील व त्यामध्ये हा मुखवटा ठेवून पाण्यात टाकून देईल हे सगळे हास्यास्पद आहे. म्हणून मला असे सागावयाचे आहे की ,ही बाब जर सत्य असेल तर ती भयंकर गोष्ट आहे. भाविकांची आणि वारकरी पंथाच्या लोकांच्या भावनांशी हा खेळ खेळला गेला आहे. एखाद्या वस्तूची चोरी झाल्यानंतर चोरलेली वस्तू पकडण्या ऐवजी डुप्लीकेट वस्तू तयार करावयाची आणि ती सादर करावयाची ही गोष्ट बरोबर नाही. अशा प्रकारे जर पांयडे पडू लागले तर ती गंभीर बाब आहे असे मला सांगावयाचे आहे. देहूच्या परिसरात आज या बाबीसंबंधीची चर्चा होत आहे तेव्हा शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन सर्वजनतेच्या समोर सत्य परिस्थिती मांडणे आवश्यक आहे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, यानंतर मला शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 28 पान नंबर 29 सबंधी मला बोलावयाचे आहे. 43 शैक्षणिकदृष्टया मागास गटातील सहावी ते आठवीच्या इयत्तेच्या विद्यार्थ्याकरिता दुपारचे जेवण योजनेच्या विस्तारासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मागास गटातील विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे ही चांगली गोष्ट आहे. या शासनाने 2004, 2005, 2006, 2007 या काळात ग्रामीण भागात, डोंगरी आणि मागासलेल्या भागात तसेच आदिवासी भागात ज्या शिक्षण संस्था आहेत त्या शिक्षण संस्थांना वेतनेतर अनुदान दिलेले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील शाळांसंबंधी मी येथे बोलत नाही कारण त्या शिक्षण संस्थांशी मेडिकल कॉलेज, इंजिनिअरीग कॉलेज, डेंटल कॉलेज, बी.एड. आणि डी.एड. कॉलेज संलग्न आहेत. त्यामुळे देणग्यांच्या माध्यमातून या संस्था पैसे मिळवू शकतात आणि या पैशातून त्या शिक्षण संस्थेच्या संकुलातील इमारतीची देखभाल करु शकतात . अभ्यासा व्यतिरिक्त जो काही शैक्षणिक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

उपक्रम राबवावयाचा असतो तो राबविण्यासाठी पैसे लागतात परंतु शासनाने यासाठी एक पैसा सुध्दा दिलेला नाही. मी स्वत: एका शिक्षण संस्थेचा चेअरमन आहे. रत्नागिरी सारख्या जिल्हयामध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेज आणि सिनिअर कॉलेज चालविण्यात येते त्या पलीकडे त्या भागात संस्थेशी संलग्न असलेल्या इतर फॅकल्टीज नसल्यामुळे त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या संस्थेला देणग्याच्या माध्यमातून पैसे मिळत नाहीत. माननीय शिक्षण मंत्री मघाशी या ठिकाणी उपस्थित होते परंतु आता ते उपस्थित नाहीत. तेव्हा माझ्या भाषणातील मुद्दे कोण लिहून घेत आहे हे मला माहीत नाही. जर कोणी मंत्री महोदय माझे मुद्दे लिहून घेत असेल तर ठीक आहे. या शिक्षण संस्थाना हे पैसे का दिलेले नाहीत ? मी असे ऐकले आहे की अर्थ खात्याने त्यांना असे सागितले आहे की, हे पैसे पूर्वलक्षी प्रभावाने मागू नका तर पुढच्या वर्षासाठी पैसे मिळतील यासाठी तरतूद करा . मला अशीही माहिती मिळालेली आहे की,चार जणांची एक समिती नेमण्यात आलेली आहे . माननीय शिक्षण मंत्री, माननीय अर्थ मंत्री, माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम आणि अन्य एका मंत्र्याची एक समिती नेमण्यात आलेली आहे हा काय प्रकार सुरु आहे ? शासनाने जर निधी दिला नाही तर ग्रामीण भागातील शाळा कशा चालविता येतील ? या शाळेच्या इमारतीला रंगरंगोटी करण्यासाठी , साहित्य खरेदी करण्यासाठी, बेंचेस आणण्यासाठी पैसे कोठून आणावयाचे? सरकारकडून असे फतवे काढण्यात येतात की अभ्यासा व्यतिरिक्त मुलांच्या अंगातील अंगभूत गुणांना चालना देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, त्यांना केवळ परीक्षार्थी म्हणून शिक्षण न देता आजूबाजूला असलेल्या परिसरातील शिक्षण देण्यासाठी शिक्षण संस्थांनी ....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

उपक्रम राबविले पाहिजेत तर निदान जे काही 12 टक्के, 9टक्के, 10 टक्के वेतनेतर अनुदान आहे ते तरी त्यांना दिले पाहिजे. ते दिले नाही तर या शाळा जगणार कशा ? महाविद्यालयांना देखील हे वेतनेतर अनुदान दिले पाहिजे. हे वेतनेतर अनुदान या शाळा-कॉलेजांना दिले नाही तर या संस्था जगणार नाहीत. सभापती महोदय, काल तर या ठिकाणी शासनाकडून सांगितले गेले की, तुमच्या काळात शासनाच्या तिजोरीमध्ये खडखडाट होता आणि आमच्या काळात आता खणखणाट आहे, खुळखुळाट आहे. तर मग हे इतके दारिद्र्य कशासाठी दाखविता ? रिट्रॉस्पेक्टिव मागणी करू नका, प्रॉस्पेक्टिव मागणी करा, आम्ही तुम्हाला देऊ असे कशासाठी सांगता ? आपल्या गावात एखादा शिपाई निवृत्त झाला, एखादा शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त झाला तर त्याची जागा भरण्यासाठी तुमची परवानगी नाही. केवळ मागासवर्गीय पद असल तर ते भरण्यासाठी परवानगी आहे. म्हणून त्या ठिकाणी या गोष्टीचा म्हणजे वेतनेतर अनुदानाचा विचार करून हे अनुदान निश्चितपणे या शाळा-कॉलेजांना मिळालेच पाहिजे असे आपण करावे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 145, बाब क्रमांक 122 - पर्यटन व सांस्कृतिक विभागाची ही पूरक मागणी आहे. सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या ज्या भागात राहतात त्यांच्या जवळच बेलापूरचा किल्ला आहे. अतिशय सुंदर आणि चांगला असा तो किल्ला आहे. त्या काळामध्ये पोर्तृगीजांकडून चिमाजीआप्पांनी तो मिळविलेला आहे. तो किल्ला पाहण्यासाठी काही दिवसांपूर्वीच काही आमदार गेले होते. तेथे त्यांनी पुरातत्त्व खात्याच्या अधिकाऱ्यांना विचारले की, हा किल्ला आता कोणाच्या ताब्यात आहे ? त्यावर त्यांनी उत्तर दिले की, हा किल्ला कोणाच्या ताब्यात आहे याची आम्हाला माहिती नाही. त्यावर त्या आमदारांसोबत असलेले सिडकोचे श्री.गिल साहेब म्हणाले की, हा किल्ला सध्या आमच्या म्हणजे सिडकोच्या ताब्यात आहे. तेव्हा महसूल खात्याचे अधिकारी म्हणाले की, हा किल्ला सिडकोच्या ताब्यात कसा काय जाऊ शकतो ? ती सारी जमीन आमच्याच ताब्यात आहे. परंतु सिडकोचे श्री.गिल यांनी सांगितले की, ही जमीनही सध्या आमच्याच ताब्यात आहे आणि त्यामुळे किल्लाही आमच्या ताब्यात आहे. सभापती महोदया, आज नवी मुंबई हे संपूर्णपणे सिमेंटचे जंगल बनलेले आहे आणि अशा भागामध्ये हा अतिशय सुंदर पुरातन किल्ला आहे, जो आपला ऐतिहासिक वारसा आहे, तो जतन केला तर तेथे एक चांगले पर्यटन स्थळ होईल. त्या भागामध्ये जेथे सारे सिमेंटचे जंगल निर्माण

...... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

केले गेले आहे तेथे लहान मुलांना दाखविण्यासाठी तरी काही राहील. अतिशय जुना व सुंदर असा हा किल्ला आजही तेथे त्या मानाने चांगल्या अवस्थेत आहे. सभापती महोदया, पर्यटन मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी जरूर ह.भ.प. व्हावे, किर्तन करो, भक्तिभाव दाखवावा, पण महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेच्या सरकारातील एका खात्याचे आपण मंत्री आहात हेही आपण लक्षात घ्यावे. तेव्हा आपल्यावर घटनेने जी जबाबदारी सोपविलेली आहे ते पार पाडणे हेही आपले काम आहे, जशी आपण पंढरपूरची वारी करता त्याप्रमाणे आपण अशा पर्यटनस्थळांचीदेखील वारी केली पाहिजे. आपल्याकडील अशा दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. सुदैवाने आपल्याला निसर्गाने अशी अनेक सुंदर स्थळे उपलब्ध करून दिलेली आहे, कोकणामध्ये देखील अनेक अशी स्थळे आहेत त्यांना आपण आकार द्यावा...

श्री. दिलीप वळसे-पाटील (खाली बसूनच..) : आता येथे पर्यटन मंत्री उपस्थित नाहीत ... सन्माननीय श्री.पाचपुते साहेबांकडे पर्यटन खाते नाही ...

श्री. मधुकर चव्हाण : बरे झाले, सभागृहात पर्यटन मंत्री उपस्थित नाहीत हे आपणच लक्षात आणून दिले आहे. माझे असे म्हणणे आहे की, बेलापूरचा हा किल्ला पुरातत्त्व विभागाने आपल्याकडे वर्ग करून घेतला पाहिजे आणि त्याची देखभाल सिडकोने केली पाहिजे. म्हणजे तो किल्ला चांगल्या प्रकारे जतन केला जाईल आणि तेथे एक चांगले सुंदर असे पर्यटन स्थळ निर्माण होईल एवढे बोलून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

***

( यानंतर श्री. सरफरे .... 4ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, गृह विभागाची बाब क्रमांक 8 व 9 पैकी क्रमांक 8 मध्ये भाडेपट्टी व कर या संदर्भात थकित बिल प्रदान करण्यासंदर्भातील बाब आहे...

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ एक तासांनी वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, अशाप्रकारे भाडेपट्टीवर घेतलेल्या जागेच्या बाबतीत प्रत्येक पुरवणी मागण्यांमध्ये मागणी असते. परंतु भिवंडीमध्ये असलेल्या पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी अशाप्रकारे भाडेपट्टीच्या जागेमध्ये बसू नये म्हणून सरकारी जमिनीवर पोलीस चौकी बांधण्यासाठी घेतली. त्याकरिता माननीय उपसभापती व स्थानिक आमदार यांनी आपला स्थानिक विकास निधी उपलब्ध करुन दिला. पोलीस चौकीचे बांधकाम सुरु झाले. आदरणीय गृहमंत्री श्री. आबा पाटील यांनी स्वत: त्याठिकाणी जावून श्रीफळ वाढविले आणि त्यानंतर त्या बांधकामाला सुरुवात झाली. त्यानंतर दंगल उसळली. त्यामध्ये आपल्या खात्याच्या दोन पोलिसांना अत्यंत निर्घृणपणे, क्रूरतेने मारले गेले. या संदर्भात सदनामध्ये सखोल चर्चा झाली तिचे आपण साक्षीदार आहात. त्यावेळी सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी सदनाला शब्द दिला की, आठ दिवसाच्या आत या जमिनीचा निर्णय लागल्याबरोबर पोलीस चौकी बांधावयाला सुरुवात करु. सभापती महोदया, मी तांत्रिक अडचण समजू शकतो. परंतु आठ दिवस नाही तर किती दिवस झाले आपल्याला माहीत आहे. परंतु हा विषय कोर्टापर्यंत गेला, तो नेण्याची व्यवस्था करण्यात आली. राजकीय डावपेचातून यामध्ये कसा वेळ जाईल हे पहाण्यात आले. परंतु याबाबतीत सुप्रिम कोर्टाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला. आणि बांधकाम करावयास हरकत नाही असे सांगितले असतांनाही माननीय उपमुख्यमंत्री जे इतके बोलतात, आणि बोलावयास उभे राहिले की, त्यांना बसवायचे कसा हा सभागृहासमोर प्रश्न असतो. बाहेरच्या मंचावर असतात तेव्हा तो तिकडचा प्रश्न असतो. ते इतके बोलतात आणि काही झाले की, पटकन घोषणा करतात. या बाबतीत मात्र ते मूग गिळून बसले आहेत. त्यांच्यावर असे कोणते दडपण आहे हे मला कळत नाही? कोणत्या लाचारीतून हे काम पुढे रेटले जात नाही? हे मला कळत नाही. या सरकारने कोणत्या शक्तीपुढे गुडघे टेकले आहे? हे पोलीस स्टेशन बांधावयास घेतल्यानंतर आपले काय होईल, याची त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

भीती वाटत आहे काय? हे मला समजत नाही. या माध्यमातून मी माननीय सभापतींकडे या सदनामध्ये त्यांनी पोलीस स्टेशन बांधण्याचा जो शब्द दिला होता, तो त्यांनी पाळला नाही म्हणून हक्कभंगाचा प्रस्ताव दिला आहे. माननीय सभापतींनी तो प्रस्ताव स्वीकारावयाचा की नाही या संदर्भात ते मूग गिळून बसले आहे. त्या संदर्भात ते वक्तव्य करीत नाहीत. माझा हक्कभंगाचा प्रस्ताव मांडण्याची ते मला संधी देत नाहीत. आतापर्यंत तीन अधिवेशने झाली. तेव्हा या धर्मांध शक्तीचा पगडा घेऊन हे सभागृह चालणार असेल आणि या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पोलिसांचे नितीधैर्य खच्ची करण्याचे काम होणार असेल तर कशासाठी या सदनामध्ये यायचे आणि या कायदेमंडळामध्ये बोलत रहावयाचे? असाा प्रश्न निर्माण होतो. म्हणून असे गुडघे टेकणारे सरकार काल पटा पटा बोलत होते. मला काल बोलण्याची संधी मिळाली नाही. नाही तर आपण उपस्थित केलेल्या प्रत्येक गोष्टींचे मी उत्तर दिले असते. त्यांना वाटले की, मी काय भाषण केले? काय माझे सरकार आहे? आम्ही काय करीत आहोत? सांगा आम्हाला कां देत नाही? हे पोलीस स्टेशन कां होत नाही? याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. ते कधी बांधावयास सुरुवात करणार आहात ते समजले पाहिजे. आणखी किती दिवस भाडयाच्या घरामध्ये पोलिसांना आपला कारभार करावयास लावणार हे समजले पाहिजे. त्याचप्रमाणे माननीय सभापतींना या माध्यमातून विचारतो की, मी दिलेला हक्कभंगाचा प्रस्ताव आपण विचारात कां घेत नाही? हा प्रश्न उपस्थित करतो. पोलिसांच्या गोळीबारामध्ये शेतकरी मृत्यू पावले. आबा आपण शेतकऱ्यांची बाजू घेऊन काल किती कळवळयाने बोलत होता? काल मी काही कारणांमुळे उशिरा आलो. याठिकाणी जे वाचन करुन दाखविण्यात आले त्यावर मी हक्कभंगाची सूचना दाखल करणार आहे. शेतकऱ्यांची टिंगल कदापि आमच्याकडून केली जाणार नाही. आमच्या हातामध्ये जेवढी सत्ता होती तेवढे जमेल ते करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न केला, आपल्या अपेक्षेप्रमाणे ते झाले नसेल. परंतु कोणते तरी वर्तमानपत्र नाचवून न बोललेल्या गोष्टी या सदनामध्ये दाखवून आमच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत असलेल्या भावनांना बदनाम करण्याचा प्रयत्न होणार असेल तर आम्ही तो हक्कभंगाचा प्रस्ताव दाखलच करतो. हा एवढा गंमतीचा किंवा टिंगल टवाळी करुन बोलण्याचा भाग नाही. या मागणीच्या बाब क्रमांक 9 मध्ये हा विषय आलेला आहे. आबा या गोळया कुणी घातल्या ?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

पोलिसांच्या गोळीबारामध्ये मृत पावलेल्या व्यक्तिच्या वारसांना, जखमी झालेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई देणार आहेत. पण या व्यक्ती कोण आहेत ? मी भोगवती साखर कारखाना, ता.पारिते, जिल्हा कोल्हापूर बाबत बोलत आहे. माननीय गृहमंत्री महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना गोळया घालून कोणी मारले ? आम्ही तर मारले नाही ना. यासंदर्भात नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत येथे मागण्यांमध्ये विषय आलेला आहे. शेतकऱ्यांचे कैवारी, पण तुम्ही गोळया घालून शेतकऱ्यांना मारले आहे. त्यांना न्यायालयाने न्याय दिला. कोण शेतकऱ्यांचे कैवारी आहेत ? कोण शेतकऱ्यांचे वैरी आहेत ? माननीय गृहमंत्र्यांनी सांगावे की, कोल्हापूर मधील या शेतकऱ्यांना गोळया घालून कोणी मारले ? याठिकाणी कशासाठी मागणी करावी लागत आहे ? टिंगल-टवाळी असे म्हटले गेले. पण या शेतकऱ्यांना कोणी गोळया घातल्या आहेत ? हा गोळीबार कशासाठी करण्यात आला ? आम्हाला याचे उत्तर मिळाले पाहिजे. तर भोगवती सहकारी कारखान्याच्या जनरल बॉडीमध्ये केवळ त्या कारखान्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी काँग्रेसच्या दोन गटामध्ये झालेल्या झुंबडीमधून या शेतकऱ्यांना गोळया घातल्या गेल्या. शेतकऱ्यांनी त्यांच्या न्याय मागण्यांसाठी एखादे आंदोलन केले आहे, ऊसाला भाव मिळावा म्हणून आंदोलन केले असताना दंगल माजली आहे, जाळपोळ झाली आहे, कारखाना जाळून टाकला आहे आणि आता तेथील परिस्थिती आवाक्यात येत नाही म्हणून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गोळीबार करावा लागला तर मी समजू शकतो. पण त्याठिकाणी जनरल बॉडीची सभा होती आणि तेव्हा दोन काँग्रेसच्या गटातील झुंबडीमध्ये गोळीबार केला आणि त्यामध्ये त्या शेतकऱ्यांना मारले ? तुम्ही शेतकऱ्यांचे खुनी आहात. महाराष्ट्रभर कसले कौतुक करुन घेत आहात ? दुसऱ्याची टिंगल-टवाळी करीत असताना एक गोष्ट लक्षात ठेवा की, एक बोट दुसऱ्याकडे दाखवत असताना चार बोटे आपल्याकडे वळलेली असतात आणि आम्हाला याचे भान आहे. परंतु तुम्हाला याचे भान राहिलेले नाही. तुमचे आपसातच एकमेकांकडे बोट दाखवून चालले आहे की, हे मी केले का ? तू केले का? तसे आम्ही केले नाही. सभापती महोदया, मला याचे उत्तर हवेच आहे.

सभापती महोदया, यानंतर महसूल विभागाच्या बाब क्र.20 बाबत बोलावयाचे आहे. त्यामध्ये म्हटलेले आहे की,"आपाद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रक्कम प्रदान करण्यासाठी तरतूद." काल माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आणि ते त्यांनाही माहिती आहे की, पॅकेज अंतर्गत जी अवजारे

. . . .4 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

दिली आहेत, ती संपूर्ण खोटी निघाली. त्याबाबतीत चौकशी सुरु आहे. गेल्या अधिवेशनामध्ये याबाबतीत माननीय कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी मला उत्तर दिले होते की,"आम्ही चौकशी करीत आहोत." नंतर मी त्यांच्याशी संपर्क साधला, त्यांना भेटलो आणि विचारले की, तुम्ही या शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत काय करीत आहात ? ते सांगावे. हे तुमच्या राज्यात घडले आहे, आमच्या राज्यात नाही. तुमच्या राज्यामध्ये पॅकेज जाहीर करण्यात आले. आमचे सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे उपस्थित आहेत, पक्ष बाजूला ठेवून त्यांनी सांगावे की, अकोटमध्ये पॅकेजमध्ये किती भ्रष्टाचार झालेला आहे ? आम्ही अगदी व्यक्तीच्या नावानिशी, बंधाऱ्यानिशी, अवजारानिशी याची माहिती देऊ शकतो आणि ती माहिती मांडलेली आहे. अशा वेळी यातील किती अधिकारी निलंबित केले आहेत ? हा भ्रष्टाचार झाला म्हणून तुम्ही अधिकारी निलंबित केले आणि हे तुमच्या काळामध्ये झाले आहे की नाही ? आज विदर्भातील शेतकऱ्यांची माती करुन टाकली आहे. जी कर्जमाफी जाहीर झाली, त्यामध्येही त्याची माती झाली. पण जे पॅकेज देण्यात आले होते, त्यामध्येही त्याची माती झाली. मग येथे बाब क्र.20 मध्ये आपादग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रक्कम प्रदान करण्याकरता 3 कोटी 60 लाख रुपयांची मागणी करण्यात येत आहे. कशासाठी ? यामध्ये असे म्हटलेले आहे की, "आरोग्य व शिक्षण या प्रयोजनासाठी घोषित केलेल्या सहाय्यामध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी, विदर्भाच्या सहा जिल्हया तील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पहिल्यांदा पैसे दिले म्हणून तेवढया रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी मागणी येथे आणली आहे. परंतु आम्हाला याबाबतीत यादी द्यावी. तुम्ही 3 कोटी 60 लाख रुपयांमधून किती लोकांना आरोग्य दिले ? शिक्षण किती मुलांना दिले ? त्यांना काय मदत दिली ? जर माननीय मंत्री महोदयांना आज याबाबतीत यादी देण्यास जमत नसेल तर त्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी. परंतु ही यादी मिळणे आवश्यक आहे, ती आम्हाला हवी आहे. ही दत्तमत्त मागणी मान्य करीत असताना किती कुटुंबियांना कोणकोणती मदत केली ? याची माहिती पाहिजे.

सभापती महोदया, बाब क्र.22 बाबत सांगावयाचे तर 2007 मध्ये अचलपूर मध्ये दंगल आणि कुर्ला आग प्रकरण यांत बळी पडलेल्या व्यक्तींना सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्याकरता ही मागणी केली आहे. पण अचलपूर मध्ये दंगल का झाली ? या विषयाच्या संबंधातील लक्षवेधी सूचना

. . . .4 बी-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नागपूरच्या अधिवेशनामध्ये आली नाही. अचलपूर मध्ये असे झाले की, गणपतीच्या वेळी "मंदिर वहीं बनाऐंगे" ही कॅसेट वाजविण्यात आली. मग नवरात्राच्या उत्सवाच्या वेळी मिरवणुकीच्या वेळी अल्पसंख्यांकांनी दगडफेक करुन हल्ला केला, कारण मुसलमान म्हटले की काही लोकांना राग येतो. अशा प्रकारे हल्ला का करण्यात आला ? त्याचे त्यांनी स्टेटमेंट दिले की, गणपतीच्या वेळी "मंदिर वही बनाऐंगे" अशी कॅसेट वाजविण्यात आली म्हणून त्या रागापोटी आम्ही नवरात्रामध्ये मिरवणुकीवर हल्ला केला. त्यावेळी सगळी हिंदूची दुकाने जाळून भस्मसात केली, घरे जाळली. त्यावेळी मी काँग्रेसच्या एका नगरसेवकाच्या घरी गेलो होतो. तेव्हा त्याची 80 वर्षाची म्हातारी आई मला म्हणाली की, बाबारे, त्या लोकांनी आमच्या घरामध्ये घुसून माझ्या सुनेला सुध्दा छळण्याचे सोडले नाही. तो काँग्रेस पक्षाचा नगरसेवक आहे, मी त्याचे नाव घेत नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

एवढा अत्याचार झाल्यानंतर सुध्दा अटक कोणाला केली ? मी स्वत: त्या ठिकाणी गेलो होतो. त्या मंडळाच्या मुलांना अटक केली. मी विचारले त्यांना अटक का केली ? त्यांनी कॅसेट वाजवली होती म्हणून त्यांना अटक केली असे सांगण्यात आले. त्यांच्या भावना दुखावल्या होत्या. मी त्यांना प्रश्न विचारला की, "मंदिर वही बनायेंगे" ही कॅसेट आम्ही हिंदुस्थानात वाजवावयाची नाही तर पाकिस्तानात वाजवावयाची काय ? या देशामध्ये हा तुमचा कसला कपाळकरंटेपणा आहे ? "मंदिर वही बनायेंगे" या कॅसेटवर बंदी नाही. त्या कॅसेटवर शासनाने बंदी घातलेली नाही. बंदी नसलेली कॅसेट वाजवली म्हणून त्या मुलांना अटक केली. जाळपोळ झाली. आदल्या दिवशी मिटींग झाली. त्याची बातमी होती तरी काही केले नाही. खूप भीषण दंगल झाली. नुकसानीचा सरकारी आकडा 4 कोटी रुपयांचा आहे. 20 लाख रुपयांची मदत जाहीर केली. मी स्वत: मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो होतो. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. 20 लाख रुपयांची मदत जाहीर केली पण आतापर्यंत फक्त 16 लाख रुपये त्या ठिकाणी पोहोचलेले आहेत. या ठिकाणी 40 लाख रुपयांची मागणी आहे. मला कळत नाही. आता सकाळी चौकशी केली. त्या ठिकाणी 16 लाख रुपयांच्या वर अजून पैसे पोहोचलेले नाहीत. तेवढेच वाटप झालेले आहे. सर्व दुकाने भस्मसात झ ाली. त्यांना सांगितले की, तुमचा इंश्योरंस घ्या. 10 हजार रुपये तुम्हाला देतो. ज्यांची घरे जळाली त्यांना साडेसात हजार रुपये दिले. दारु पिऊन मेले तर 1 लाख रुपये देतात. खोपडी पिऊन मेले तर आणखी पैसे देतात. दारु पिऊन, खोपडी पिऊन मेले त्यांना आपण एक लाख रुपये दिलेले आहेत. पण दंगलीमध्ये ज्यांची दुकाने उध्वस्त झाली त्यांना फक्त 10 हजार रुपये दिले. कारण ती हिंदूंची दुकाने होती. लांगूलचालनाची विटंबना किती कराल ? आपण अचलपूरच्या दंगलीबाबतच्या मदतीच्या संदर्भात काय करणार आहात याबाबत मला उत्तर पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात महत्वाचा विषय आहे. आता माननीय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित नाही. उपस्थित माननीय मंत्रिमहोदयांनी मुद्दा लिहून घ्यावा. आम्हाला अत्यंत वेदना होतात. आमचे सन्माननीय सदस्य श्री. हिराणी साहेबांनाही वेदना होतील. कारण मी त्यांना जास्त ओळखतो त्यामुळे सांगतो. बाब क्रमांक 29 मध्ये मदरशांचे आधुनिकीकरण करणे हा विषय

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

श्री. दिवाकर रावते ......

यामध्ये आहे. श्री. अर्जूनसिंग हे सन्माननीय केंद्रीय मंत्री आहेत. त्यांच्याकडे मनुष्यबळ विकास खाते आहे. आपण हिंदुस्थानामध्ये राहात आहोत की पाकिस्तानात किंवा अरब देशामध्ये राहात आहोत ? या देशाच्या सर्वोच्च ठिकाणी दिल्लीत बसलेल्या मंत्र्याला सुध्दा काही वाटत नाही. 15 ऑगस्टच्या दिवशी मदरशावर तिरंगा फडकवा, तुम्हाला अनुदान देऊ असे त्यांनी सांगितले. माझ्या तिरंग्याचा तुम्ही लिलाव करता का ? तुम्ही झेंडा फडकवा. ते झेंडा फडकवत नाहीत. या हिंदुस्थानात या मदरशांना एवढी मस्ती आहे काय ? आमचे केंद्र सरकार जाहीर करते की, मदरशावर झेंडा फडकवला तर आम्ही अनुदान देऊ. आपल्याला काही वाटत नाही का ? आपला पक्ष कोणता, आपण कोण हे सोडून द्या, पण हिंदुस्थानी म्हणून आपल्या अंगात रक्त आहे की नाही ? आपल्याला काहीच वाटत नाही काय ? कोणीही निषेध केला नाही. मी एकदा बोललो आज परत बोलत आहे. मदरशांची ही काय मस्ती आहे ? या ठिकाणी मदरशांमध्ये उर्दू शिक्षक नियुक्त करण्याबाबत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्यांना शिक्षण देणे हे मान्य आहे. ते मूळ प्रवाहामध्ये आले पाहिजेत. परंतु त्या ठिकाणी काय शिकवतात ? आपण महाराष्ट्रभर उर्दू शाळा मान्य केलेल्या आहेत. पाहिजे तर आणखी 100 शाळा काढा, 1 हजार शाळा काढा, 5 हजार शाळा काढा. मुसलमानाच्या प्रत्येक घरातील मुलगा शिकला पाहिजे. त्याला जर त्याच्या उर्दू मातृभाषेत शिकावयाचे असेल तर त्याला तो अधिकार आहे. मराठी अनिवार्य विषय घेऊन बाकी त्यांनी उर्दूमध्ये शिकावे. अगदी डिग्री पण घ्यावी. पुढे अलीगढ युनिव्हर्सिटीमध्ये पाठवून त्याला सर्वोच्च डॉक्टरेट मिळविण्यासाठी स्कॉलरशीप द्या. पण त्या मदरशामध्ये हे सर्व करीत असताना मला शिक्षण मंत्र्यांना प्रश्न विचारावयाचा आहे. आपल्याकडे एक नियम केलेला आहे. सर्व शाळांमध्ये आपण एक प्रतिज्ञा म्हणतो. भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत अशी प्रतिज्ञा सकाळी मुलांकडून बोलून घेतली जाते. आठवड्यातून एक दिवस ती इंग्रजीतून बोलून घेतली जाते. आठवड्यातून एक दिवस ती हिंदीतून बोलून घेतली जाते. मदरशामध्ये ही प्रतिज्ञा बोलून घेतली जात नाही. मग आपण अनुदान का देता ? या देशाशी इमान न राखता केवळ मतांच्या लाचारीने आम्हाला किती मतांघ केले आहे ? हा देश आपण गहाण टाकणार आहात काय ? हा देश बुडविणार आहात काय ? तुमच्या आमच्या अंगामध्ये हिंदुस्थानचे रक्त आहे ना ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

एवढेही तुम्हाला समजत नाही ? कशासाठी एवढेच चोचले पुरविता ? यासाठी नियम करावा, त्यांच्या शिक्षणाला आमचा विरोध नाही, किंबहूना, आमच्यापेक्षा त्यांच्या शिक्षणावर सरकारने जास्त खर्च करावा. त्या लोकांना मूळ प्रवाहामध्ये आणावे. जोपर्यंत शिकत नाही तोपर्यंत समाज उभा रहात नाही. हे आम्हाला मान्य आहे. पण ऊर्दू माध्यम नसलेल्या शाळांमध्ये ऊर्दू भाषा शिकविण्यासाठी शिक्षक नेमणे ही काय भानगड आहे ? सरकारला ऊर्दूचा प्रचार करावयाचा आहे. हा विषय मी सकाळी झालेल्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्यावेळी उपस्थित केला होता. लोकराज्य ऊर्दू भाषेमध्ये काढण्यासाठी सरकारने पुरवणी मागणी सभागृहाला सादर केलेली नाही. तरी सुध्दा सरकारने त्यासाठी जाहिराती दिल्या आहेत. त्या जाहिराती मी आणलेल्या नाहीत. यासाठी मराठीचे ज्ञान आवश्यक नाही. श्रीमती मनिषा म्हैसकर यांच्या सहीने ती जाहिरात आलेली आहे. श्रीमती म्हैसकर हया माहिती व जनसंपर्क विभागाच्या महासंचालक आहेत. महाराष्ट्रातील संचालक पदासाठी मराठीचे ज्ञान आवश्यक नाही असे त्या जाहिरातीत दिलेले आहे. म्हणजे सरकारसमोर आम्ही किती डोकेफोड करावयाची ? महापालिकेच्या शिक्षणाधिका-यांसमोर मी हा विषय मांडला होता, त्यांनी मला दोन दिवसांची मुदत दिलेली आहे, हा विषय नंतर येईल. विधी व न्याय विभागाची चर्चा सकाळी होती की संध्याकाळी आहे, त्याबाबत आपण सर्वजण संभ्रमामध्ये होतो. काल विचारले होते तेव्हा माहीत नाही असे सांगण्यात आले. नंतर सांगितले की, आज या विभागाची चर्चा नाही. त्या निमित्ताने मंत्रिमहोदयांना विनंती केली होती की, आपण पुन्हा चर्चा करु. आपण आमचे म्हणणे नंतर आम्हाला उत्तर द्यावे. परंतु येणार नाही असे ते म्हणाले आहेत, आता ते कसे येत नाहीत ते पाहू.

सभापती महोदय, बॉम्बेचे मुंबई असे नामकरण झालेले आहे. पण बॉम्बे हायकोर्टाचे मुंबई हायकोर्ट असा बदल करण्यासाठी मी गेली 5 वर्षे सतत परिश्रम करीत आहे. त्यासाठी विधी विभागाला पत्रे लिहिली आहेत. त्यांनी असे सांगितले की, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला पत्र दिलेले आहे. बॉम्बे हायकोर्ट, दिल्ली हायकोर्ट, कलकत्ता हायकोर्ट, मद्रास हायकोर्ट या सगळया हायकोर्टांची नावे दिल्लीतून बदलणे आवश्यक आहे असे सांगितले जाते. एवढी वर्षे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

झाल्यानंतर दिल्लीचा काय अडेलतट्टूपणा आहे ? बॉम्बेचे मुंबई नाव झाले आहे, हे नाव संपूर्ण जगामध्ये गेले. परंतु बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई हायकोर्ट असे केले जात नाही. यासाठी वारंवार पत्र व्यवहार करुनही हा बदल केला जात नाही. यापुढे काय करावे म्हणजे हा बदल होईल ? मुख्यमंत्र्यांच्या दरवाजावर जाऊन काय करावे का ? माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या कॅबिनवरील नावाची पाटी बदलण्याचा प्रयत्न केला तर माझ्यावर खटला भरला आहे, हरकत नाही. परंतु श्री.शंकरन यांनी माझ्या नावाची पाटी मी बदलणार नाही अशी भूमिका घेतली. त्यांनी त्यांच्या पाटीवर डी.के.असेच लिहिले होते. आई-वडिलांनी इतके सुंदर नाव नाव ठेवलेले असताना डी.के.असेच ठेवले. मुंबई हायकोर्ट असा बदल करण्यासाठी मी केलेला पत्रव्यवहार येथे आणलेला नाही.

सभापती महोदय, दुसरा एक विषय मी केंद्र सरकारकडे मांडला पाहिजे. मी मुंबईचा महापौर होतो तेव्हापासून एल्फिन्स्टन रोड या नावाऐवजी प्रभादेवी असे नामकरण करण्याचा पाठपुरावा करीत आहे. आज त्याला 12 वर्षे झाली आहेत. गेल्या दोन महिन्यापूर्वी केंद्र सरकारला पत्र लिहिले आहे, खासदारांना पत्रे पाठविली आहेत. या रेल्वे स्टेशनच्या बाजूला प्रभादेवीचे मंदिर आहे. त्यामुळे प्रभादेवी असे नाव द्यावे असे मी पत्रात लिहिलेले आहे. ही साधी गोष्ट सुध्दा केंद्र सरकार मान्य करीत नाही. बिहारींची मुंबईमध्ये भरती करण्यासाठी लालूप्रसाद यादव यांना जेवढी उत्सुकता आहे तेवढीच उत्सुकता आमची अस्मिता राखण्यासाठी नाही ही आमची व्यथा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एल्फिन्स्टन रोड स्टेशनचे नामकरण होणे हा विषय माननीय सदस्य श्री.रावते यांनी मांडलेला आहे. या विषयाचा संबंध एका महत्वाच्या घटनेशी आहे. 1857 च्या उठावाला या वर्षी 150 वर्षे पूर्ण होत आहेत. आझाद मैदानावर पहिले जे 2 हुतात्मे झ ाले त्यांना मारण्याचा आदेश एल्फिन्स्टन नावाच्या गर्व्हनर यांनी दिला होता. किमान सरकारने यावर्षी तरी एल्फिन्स्टन स्टेशनचे नाव बदलावे. कारण त्या स्वातंत्र्य संग्रामाला 150 वर्षे झाली आहेत. त्यावेळी मुंबईचे पहिले दोन हुतात्मे झाले होते. एल्फिन्स्टन नावाच्या गव्हर्नरने फायरिंगचे आदेश दिल्यामुळे ते हुतात्मे झाले होते. त्यामुळे एल्फिन्स्टन रोडचे नाव प्रभादेवी नाव करावे ही मागणी अत्यंत सुसंगत वाटते.

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी अतिशय सुंदर संदर्भ दिला आहे. या मागणीबद्दल राष्ट्रीय भावना त्यांनी उभी केली त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या राष्ट्रीय अस्मिता कोणत्याही पक्षाच्या नाहीत, हा बदल करावा अशी यानिमित्ताने मी विनंती करतो. सरकारने हा ठराव आहे असे समजावे. बॉम्बे हायकोर्टाच्या नावात बदल करुन मुंबई हायकोर्ट करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केले आहेत, परंतु अधिकारी प्रयत्न करताना दिसत नाहीत.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागावर बोलणार आहे. माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे काल सभागृहात उपस्थित नव्हते. राज्यपालांच्या चर्चेला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक प्रश्न विचारला होता. त्यावेळी श्री.आर.आर.पाटील हे म्हणाले होते की, उद्योगामध्ये सर्वात जास्त उद्योग महाराष्ट्रात आले आहेत. त्यांनी तेव्हा बरीच माहिती दिली होती, त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे विचारले की, राज्यात वीज नसताना राज्यात उद्योग कसे काय आले ? या प्रश्नाला माननीय ऊर्जामंत्री हे सुध्दा उत्तर देऊ शकणार नाहीत, इतका वेळ म्हणजे 15 मिनिटांपर्यंत ते जहालपणे उत्तर देत होते. राज्यात अशा मार्गाने वीज निर्माण होईल, तशा मार्गाने वीज निर्माण होईल.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु....)

एन्रॉन बुडविण्याचा उल्लेख करण्यात आला. तो एन्रॉन तुकारामाच्या गाथेप्रमाणे आम्ही वर आणला असे येथे हात वर करुन सांगितले नाही हे नशीब. कदाचित हात वर करण्याचे राहून गेले असेल. सध्या त्यांनी आपल्या नेत्याला शेतक-यांच्या कर्जमाफीमधे बुडविलेले आहे. एन्रॉनपासून ते सारे काही सांगत होते. परंतु घुग्गुस पासूनची कोळश्याची आवक मात्र त्यांनी सांगितली नाही. विजेचा प्रश्न निर्माण झाल्यावर सांगितले जाते की वीज येणार आहे. पण ही वीज केव्हा येणार आहे ? तर ही वीज 2009 किंवा 2010मध्ये येईल असे सांगण्यात आले. आनंद आहे. त्यांनी दोन गोष्टी सांगितल्या त्या खटखल्या. त्या गोष्टींचा मी येथे उल्लेख केला तर आपणही त्यास दुजोरा द्याल. माजी ऊर्जामंत्री श्री. सुरेश प्रभू यांचे नाव घेऊन, ते कार्यक्षम ऊर्जामंत्री होते परंतु त्यांना दूरदृष्टी नव्हती, असे त्यांनी सांगितले. श्री. सुरेश प्रभु हे केन्द्रामध्ये वीज मंत्री असताना त्यांनी वर्कशॉप घेऊन नियोजन करुन असे सांगितले होते की, 2013 पर्यन्त या देखातील सर्व ग्रामीण भागातील लोकांना वीज मिळेल. असे सांगणे हा दूरदृष्टीचा अभाव असेल तर ते मला माहीत नाही. त्यानंतर श्री. अनंत गीते हे ऊर्जामंत्री झाले. त्यांनी एक मेगावॅट वीज दिली नाही असे यांनी सांगितले. माननीय वीज मंत्री माझ्या बरोबर एका कार्यक्रमामध्ये असताना हा उल्लेख झालेला आहे. 220 मेगावॅट वीज मंत्र्यांनी देऊ केली होती. परंतु त्यावेळी असे सांगण्यात आले की, आमच्या महाराष्ट्रामध्ये मुबलक वीज आहे त्यामुळे वीज नको असे एका अधिका-याने स्टेटमेंट केले होते. श्री. गोडबोले नावाचे महान अधिकारी होऊन गेले. त्यांना लिखाणाची आवड होती. त्यांनी महाराष्ट्रामध्ये मुबलक प्रमाणात वीज आहे अशी वातावरण निर्मिती केली आणि वीज नको म्हणून सांगितले. त्यामुळे आज महाराष्ट्राला विजेचा त्रास भोगावा लागत आहे. खरे म्हणजे आज विजेअभावी महाराष्ट्रातील जनतेला जो त्रास भोगावा लागत आहे त्याबाबतीत आणि राज्य आणि केन्द्र सरकारची दिशाभूल केली म्हणून गोडबोले नावाच्या अधिका-यावर खटला भरला पाहिजे. ग्रामीण भागातील लोकांना 16-16 तास वीज मिळत नाही. लोक हैराण झालेले आहेत. वीज कोठून आणि कशी देणार हा प्रश्न आहे. या सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय जेव्हा सरकारचे गोडवे गात होते त्यावेळी विधानसभेमध्ये माननीय अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर हे सांगत होते की, हे शासन इतके खराब आहे की आंधळ दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय अशी राज्याची परिस्थिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

आहे. सभापती महोदय, त्यावेळी श्री. अनंत गीते साहेबांनी वीज देऊ केली होती. परंतु त्यांना, आमच्याकडे पुरेशी वीज आहे, असे कळविण्यात आले. त्यानंतर 100 मेगावॉट वीज दुस-या राज्यातून आणली. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या संदर्भातील उल्लेख या ठिकाणी केला म्हणून मलाही तसा उल्लेख करावा लागला.

सभापती महोदय, यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भातील एक बाब मी येथे सांगतो. माझ्याकडे एक अपंग मुलगा आला आणि मला परदेशात जायचे आहे असे सांगून माझ्याकडे पैसे मागू लागला. मी विचारले, परदेशात कशाला जातोस ? त्याने सांगितले की, परदेशात शैक्षणिक दौरा आयोजित केलेला आहे. तो शिवसनेच्या अपंग सहाय्य सेनेच्यावतीने माझ्याकडे आला. मी परदेश दौ-याचा कार्यक्रम पाहिला. त्यामध्ये सकाळी उठून कुठे जायचे आणि कधी परतायचे एवढाच कार्यक्रम सांगितलेला आहे. शैक्षणिक कार्यक्रम कुठेच दाखविलेला नाही. अपंगांना परदेशामध्ये घेऊन चालले आहेत ही आनंदाची बाब आहे. सभापती महोदय, अपंगांचा अनुशेष भरण्याच्या बाबतीत उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अपंगांचा अनुशेष भरुन काढण्यात यावा म्हणून शासनास स्पष्टपणे सूचना दिल्या आहेत. या अपंगांकडे दोन पैसे नाहीत. त्या अपंगांना लाखो रुपये खर्चाच्या युरोप टुरचे अमिष दाखवित आहेत. त्यांची कोणी तरी निवड करीत आहेत. श्री. सुभाष काळे, महाव्यवस्थापक तथा माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त महामंडळ, हे युरोप दौ-यासंदर्भात अपंगांना अमिष दाखवित आहेत. अपंगांकडून लाखो रुपये जमा करावयाचे आणि त्यांना युरोपला घेऊन जावयाचे त्यात आपल्या विभागाचे चार अधिकारी फुकट घेऊन जावयाचे असा प्रकार चालला आहे. अपंग व्यक्ती आपल्या जीवनाच्या संघर्षामध्ये आहेत. जगावयाचे कसे हा त्यांच्यासमोर यक्षप्रश्न आहे. कठीण परिस्थितीत रोजी रोटीचा व्यवसाय अपंग व्यक्ती करीत आहेत. माझ्या शरीर क्षमतेत जेवढी शक्ती आहे, तेवढयापूरती मला नोकरी द्या आणि मला जगू द्या अशी अपंगाची अपेक्षा आहे. अपंगाना परदेशात घेऊन जाऊन काही नवीन दाखवावयाचे असेल तर त्याचा मला आनंद आहे. शासनाला या निमित्ताने एवढीच विनंती करतो की, दर वर्षी 50-50 अपंग युरोपला पाठवा, अमेरिकेला पाठवा. परंतु त्यांना दारोदार पैसे मागण्यास पाठवू नका. श्री. सुहास काळे, महाव्यवस्थापक, माहिती अधिकारी यांची यासंबंधीची कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे सादर करतो. त्याबाबतीत माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी सखोल चौकशी करावी आणि त्या अधिका-यां विरुध्द तातडीने कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणाचा शेवट करताना सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब सभागृहात आले त्याचा मला खूप आनंद झाला. आज सकाळपासून ते सभागृहात नव्हते. सन्माननीय सदस्यांच्या आगमनामुळे इतका आनंद का झाला यासंबंधीची माहिती मी या ठिकाणी देणार आहे. काल माननीय उप मुख्यमंत्री बोलले. त्यावेळी मला सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांची आठवण झाली. विधानसभेतील अध्यक्षांनी विधानसभा सभागृहात सरकारचे धिंडवडे काढले. काल माननीय उप मुख्यमंत्री हे नकारात्मक विक्रम सभागृहात सांगत होते. त्यांनी काल असेही सांगितले की, विरोधी पक्षाने काय करावयाचे ? तुमचे आता काय होईल ? मी मागे वळून बघितले तर त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी सभागृहात उपस्थित नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आम्हाला एक नवीन ऊर्जा दिली आहे. आम्ही काल म्हणालो " देता का जाता ". त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेब म्हणाले आम्हाला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असे म्हणू नका. त्यांनी " जाता की पळता " अशा प्रकारचे आम्हाला घोषवाक्य दिले. आम्हाला आंदोलनाची एक दिशा दाखविली त्याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो. असे आंदोलन देणारे सदस्य सत्ताधारी पक्षात असतील तर आम्हाला खूपच आनंद होतो याचे एक उत्तम उदाहरण मी या ठिकाणी सांगितले आहे.

सभापती महोदय, मी शेवटी एक मुद्दा उपस्थित करुन माझे भाषण संपविणार आहे. राज्य सरकारमधील सर्व मंत्री ॲम्बॅसेडर कार मधून फिरताना दिसतात. एखाद्या मंत्र्यांची खाजगी एस्टीम असेल तर तो मंत्री त्यांच्या खाजगी वाहनावर लाल दिवा लावतो आणि ते वाहन वापरतो. परंतु काल मी लाल दिवा असलेली स्कोडा गाडी बघितली. महाराष्ट्र शासनाने स्कोडा गाडया स्पॉन्सर केल्या आहेत काय ? त्या स्कोडा गाडीवर " महाराष्ट्र शासन " असे लिहिले होते. मी विचारले की, ही गाडी कोणाची आहे ? त्या गाडीचा नंबर बघितला तर ती गाडी संभाजीनगर येथे रजिस्ट्रेशन झालेली दिसून आली. ती गाडी या ठिकाणी कशी आली असा प्रश्न माझ्या मनात उभा राहिला. मी सदरहू गाडीची माहिती घेतल्यानंतर असे कळले की, सदर गाडी ही सिकॉम लिमिटेडची होती. त्या गाडीत आय.ए.एस.अधिकारी श्री. सानेसाहेब बसलेले होते. प्रथम मला काही कळले नाही. महाराष्ट्र शासन किती गतीमान झाले आहे की, आमचे मंत्री ॲम्बॅसेडर मध्ये फिरतात आणि शासनातील आय.ए.एस.अधिकारी स्कोडा गाडयांमधून फिरता आहेत. ही वस्तुस्थिती शासनाने जाणून घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 17:25

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात दोन, तीन मुद्दे मांडून माझे मनोगत पूर्ण करणार आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 109, पृष्ठ क्रमांक 126- उच्च शिक्षण विभागामध्ये महाविद्यालयातील कर्मचा-यांसाठी भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज देण्याच्या संदर्भात 37 कोटी 39 लाख 10 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. मूळ मागणी 54 कोटी रुपयांची होती. यासंदर्भात 37 कोटी रुपयांचा खर्च जास्तीचा झाला आहे, म्हणून पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. मूळ मागणी 54 कोटी रुपयांची होती आणि तद्नंतर पुन्हा 37 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. भविष्यनिर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम देण्यासाठी ही तरतूद आहे. परंतु मूळ मागणी आणि पूरक मागणीच्या रक्कमेत एवढा मोठा फरक कशामुळे झाला यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

या मागणीच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, महाविद्यालयांच्या अनुदानाच्या संदर्भामध्ये राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. साधारणत: प्रत्येक तालुक्यामध्ये एक तरी महाविद्यालय अनुदान तत्वावर असले पाहिजे. परंतु आता परिस्थिती अशी आहे की, ज्या महाविद्यालयांना दिलेले आहे ती सगळी महाविद्यालये शहरी भागामध्ये आहे. आज ग्रामीण भागात जी महाविद्यालये सुरु झाली आहेत. ती महाविद्यालये विना अनुदान तत्वावर किंवा कायम विना अनुदान तत्वावरील आहेत. आम्ही वारंवार शासनाकडे मागणी करतो आहोत की, तालुक्यातील किमान एक तरी महाविद्यालयास शासनाच्या धोरणानुसार अनुदान देण्यात यावे. अनुदानित महाविद्यालये ही शहरी भागात आहेत. ख-या अर्थाने गोरगरीबांची मुले शिकतात. त्या महाविद्यालयांना अनुदान देण्यात यावे. ग्रामीण भागात नवीन महाविद्यालये निर्माण झालेली आहेत. त्या महाविद्यालयांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशा प्रकारची विनंती या मागणीच्या निमित्ताने शासनास करीत आहे....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 17:30

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदया, बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 20 या अंतर्गत पुनर्वसन कामासाठी निर्माण केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व वेतनेतर खर्चासाठी 5 कोटी 13 लाख आणि 50 हजार रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. हे सगळे कर्मचारी कोणत्याकामासाठी नेमले आहेत याचा खुलासा व्हावा. पुनर्वसन कामासाठी मूळ अंदाजपत्रकात किती तरतूद करण्यात आली आहे आणि किती कर्मचारीवर्ग नेमलेला आहे याची माहिती शासनाने द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 20 अंतर्गत बॉम्बस्फोटातील बाधित व्यक्तींना मदत करण्यासाठी 75 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बाधित व्यक्तींना मदत करताना खऱ्या अर्थाने जे आपद्ग्रस्त आहेत आणि दोष नसताना जे बाधित झालेले आहेत त्या व्यक्तिंनाच मदत करणे आवश्यक आहे. एक बाब मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 1992 साली भाऊबिजेच्या दिवशी कल्याण लोकलमध्ये बॉम्बस्फोट होऊन संदीप परशुराम कांबळे या उल्हासनगरमधील शिक्षकाला अपंगत्व आले. हा शिक्षक शाळेमध्ये काम करीत होता. त्यानंतर शाळा बंद पडली आणि त्याची नोकरीही गेली. सदरहू शिक्षकाने कोणत्याही प्रकारचा आधार नसल्याने अनेक वेळा रेल्वे मंत्रालय आणि राज्य शासन यांच्याकडे नोकरीसाठी विनंती केली. अपंगत्व आल्यामुळे बोलता येत नाही म्हणून बसून कुठेतरी लिपिकाची नोकरी मिळावी आणि चरितार्थ चालावा यासाठी त्याने रेल्वे प्रशासन आणि राज्य शासनाकडे वारंवार विनंती केली. परंतु त्याच्याकडे ना राज्य शासनाने ना रेल्वेप्रशासनाने लक्ष दिले. मला सांगण्यास अतिशय वाईट वाटते की, या शिक्षकाचे 25 दिवसापूर्वी दुःखद निधन झाले. या शिक्षकाला शेवटपर्यंत रेल्वे प्रशासनाकडून आणि राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळू शकली नाही हे मी सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद शिक्षक विभाग) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 94 मध्ये राज्यातील शासकीय महाविद्यालयामध्ये म्हणजे मिरज येथील महाविद्यालयामध्ये जवळपास 322 रिक्त पदे भरली आहेत त्यासाठी 3 कोटी 95 लाखाची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, मिरज येथील शासकीय महाविद्यालयाप्रमाणे राज्यातील इतर जी शासकीय महाविद्यालये आहेत त्याठिकाणी असलेली रिक्त पदे तातडीने भरली पाहिजेत अशी मी शासनाला विनंती करतो. त्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 28 मध्ये शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या इयत्ता 6 वी 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मध्यान्हभोजन योजना शासनाने यावर्षीपासून सुरु केली आहे. त्यासाठी जवळपास 748 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यानिमित्ताने मला एवढेच निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्यातील जेवढया शाळा आहेत त्यातील जवळपास 90 टक्के शाळा या ग्रामीण भागामध्ये आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...........

आज आपण पाहतो की, शासनाने 2004 पासून या सगळ्या शाळांचे वेतनेतर अनुदान बंद केले आहे. मध्यान्ह भोजन योजना सुरु केली. विद्यार्थ्यांना तांदूळ शिजवून खिचडी खाऊ घातली जाते. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे एक रुपया अनुदान दिले जाते. हे अनुदान सुध्दा वेळेवर दिले जात नाही. त्या शाळांना कोणतीही अनुदान उपलब्धी नसते. त्यामुळे शिक्षकाला कधीकधी स्वत:च्या वेतनातून खर्च करावा लागतो व तांदूळ शिजवून द्यावा लागतो. अनुदान येणार आहे म्हणून थांबता येत नाही. दररोज विद्यार्थ्यांना खिचडी करुन खाऊ घालावी लागते. म्हणून शासनाने हे अनुदान प्रत्येक महिन्याला नियमितपणे दिले पाहिजे. शासनाने 2004 पासून वेतनेतर अनुदान बंद केले आहे. राज्यातील जवळपास 90 टक्के शाळा ग्रामीण भागामध्ये आहेत. शहरामध्ये धोरण ठरविले जाते. धोरण ठरविताना मुंबई पुणे शहर डोळयासमोर ठेवले जाते. धोरण ठरविणारे अधिकारी किंवा सचिव मंडळी मुंबई आणि पुणे शहर डोळयासमोर ठेवून धोरण तयार करीत असतात. आज मुंबई पुणे यासारख्या शहरामध्ये पहिलीच्या विद्यार्थ्याची वार्षिक एक लाख रुपये फी भरणारे पालक आहेत. बिर्ला स्कूलमध्ये वार्षिक तीन लाख रुपये फी भरणारे पालक आहेत. ग्रामीण भागामध्ये उलट परिस्थिती आहे. विद्यार्थी फी देतच नाहीत. टयूशन फी पालकांना माहितीच नाही. परंतु आठवी किंवा नववीच्या विद्यार्थ्यांसाठी 30 रुपये परीक्षा फी असते ती फी सुध्दा विद्यार्थी देऊ शकत नाहीत. इतकेच नव्हे तर पालक सुध्दा फी भरु शकत नाहीत. म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने वेतनेतर अनुदान त्वरित दिले पाहिजे. वरिष्ठ महाविद्यालयांना सुध्दा वेतनेतर अनुदान दिले पाहिजे. शासनाने वरिष्ठ महाविद्यालयाबाबत चांगला निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो, मंत्रीमहोदयांचे देखील विशेष अभिनंदन करतो. अत्यंत चांगला निर्णय घेतला आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी नवीन शाखा काढली जाणार आहे. आर्टस् कॉलेज असले तरी नव्याने सायन्स व कॉमर्ससाठी 100 टक्के अनुदानावर परवानगी दिली जाणार आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. आज ग्रामीण भागामध्ये विद्यार्थी फी देऊ शकत नाहीत, परीक्षा फी देत नाहीत. परिणामत: शिक्षकाला वेळप्रसंगी स्वत:च्या पगारातून खर्च करावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शासनाने लवकरात लवकर वेतनेतर अनुदान द्यावे अशी विनंती करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...........

सभापती महोदया, बाब क्रमांक-29 अन्वये उर्दू शिक्षकांना दरमहा 500 रुपये मानधन देण्यासाठी तरतूद केली आहे. ही तरतूद फार अपुरी आहे. 500 रुपयांमध्ये काय होणार आहे? उर्दू शिक्षक किंवा इतर भाषा शिक्षकांच्या दृष्टीने ही रक्कम अपुरी असल्यामुळे ही तरतूद वाढविण्यात यावी. किमान 4000 रुपये दरमहा मानधन देण्यात यावे. तरच उर्दू शिक्षक किंवा अल्पसंख्याक शिक्षकांना न्याय दिल्यासारखे होईल. केंद्र सरकारची योजना असली तरी राज्य सरकारने त्यामध्ये वाटा उचलावा आणि आर्थिक तरतूद करावी.

सभापती महोदया, बाब क्रमांक-30 अन्वये अपंग बालकांसाठी एकात्मिक शिक्षण योजनेमधून अशासकीय संस्थांना अनुदान देण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. आज राज्यामध्ये अशा पध्दतीच्या अनेक अपंग शाळा चालतात. या अपंग शाळा विनाअनुदानित आहेत, त्यांना त्वरित अनुदान दिले पाहिजे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदया, बाब क्रमांक-109 ते 111 या तीनही बाबींमध्ये सर्वसाधारण शिक्षण महाविद्यालये, तंत्रज्ञान, कला महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधीवरील व्याज देण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. ही अभिनंदनीय बाब आहे. आज राज्यामध्ये तंत्रशिक्षणाला महत्व देत असताना नवनवीन तंत्रशिक्षण महाविद्यालये, आय.टी.आय. स्थापन केली जात आहेत. परंतु आज राज्यातील तंत्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये जवळपास हजारो प्राध्यापक कंत्राटी स्वरुपात काम करीत आहेत. त्यांना अत्यंत तुटपुंजे मानधन दिले जात आहे. अशा सर्व कंत्राटी प्राध्यापकांना शासनाने लवकरात लवकर सेवेत नियमित केले पाहिजे. कारण त्यांची शासनाला गरज आहे. म्हणून माझी विनंती आहे की, विद्यार्थ्यांचे शिक्षण चांगल्याप्रकारे होण्यासाठी या कंत्राटी प्राध्यापकांना त्वरित सेवेत नियुक्त करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले 17:40

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभाग, बाब क्र. 13 व पृ.क्र. 14, कारागृहांचा विकास करण्यासाठी यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी ही पुरवणी मागणी सभागृहासमोर आलेली आहे. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांच्या निदर्शनास मला आणून द्यावयाचे आहे की, "राज्यातील कारागृहांची स्थिती" या विषयावर सुप्रिम कोर्ट तसेच अन्य कोर्टांनी ताशेरे मारले असल्याचे आपणा सर्वांनाच ज्ञात आहे. कारागृहामध्ये असलेली कैद्यांची संख्या आणि त्यांची एकंदर परिस्थिती यामध्ये सुधारणा करण्यास कोर्टाने सांगितले होते परंतु अद्यापही त्यानुसार अंमलबजावणी का झालेली नाही हे या निमित्ताने मी विचारु इच्छितो.

यानंतर शालेय शिक्षण मंत्री, बाब क्र. 28, पृ.क्र. 29 मागास भागातील सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. परंतु दहावीच्या परीक्षा सध्या सुरु आहेत, राज्यात विजेचा तुटवडा आहे. ही गोष्ट खरीच आहे आणि त्यात मी जाणार नाही, कारण या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. तरी देखील एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या गोष्टीचा विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होऊन आज आत्महत्त्यांचे प्रमाण वाढलेले आहे व यावर आपल्याला उपाययोजना शोधून काढणे आवश्यक आहे. कारण आज परीक्षांच्या अगोदर आत्महत्त्या होत आहेत, कदाचित उद्या रिझल्टच्या अगोदर देखील हे प्रमाण वाढेल म्हणून आजचा जो शिक्षण अभ्यासक्रम आहे त्यात आमुलाग्र बदल होण्याची गरज आहे आणि जोपर्यंत हा बदल आपण करीत नाही तोपर्यंत पाठीवरती दफ्तराचे ओझे आणि अंगावर परीक्षेचे टेन्शन यामुळे आत्महत्त्या होतच राहणार, याला काही प्रमाणात पालक देखील जबाबदारी आहेत. म्हणून माननीय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी शिक्षण अभ्यासक्रमामध्ये बदल कधी करणार आहात, याचा खुलासा करावा. आजच्या वर्तमानपत्रात देखील दोन आत्महत्त्या झाल्याचे म्हटले आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्त्या अशा प्रकारे राज्यात आत्महत्त्यांचे सत्रच सुरु झालेले आहे. म्हणून शिक्षण अभ्यासक्रमात बदल करण्यासंबंधीची पावले शासनाने उचलावीत व त्यासंबंधी सभागृहाला माहिती द्यावी.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

महोदय, विधि व न्याय विभागाच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर मदरशांचे आधुनिकीकरण करणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बरीच विस्तृतपणे माहिती दिलेली आहे. ज्यावेळी उर्दुमध्ये सी.ई.टी. ची परीक्षा घेतली गेली त्यावेळी मी सभागृहात आवाज उठविला होता. उर्दुमध्ये ज्या परीक्षा झाल्या त्या परीक्षेसाठी किती विद्यार्थी बसले होते ? याचा खुलासा करावा. दुसरे म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी सीबीएसई आणि आयसीएसई अभ्यासक्रम राज्यात आणण्याचे ठरविले होते. ज्यावेळी कर्नाटक राज्यात तीन भाषा शिकविल्या जात होत्या आणि त्या राज्याची भाषा ही मूळ भाषाच राहिल असे सांगण्यात आले होते. आपण येथे उर्दुविषयी बोलतो पण या राज्याची भाषा मराठीच असावी असे कंपल्सरी होण्यासाठी सीबीएसई आणि आयसीएसईच्या अभ्यासक्रमात एक विषय मातृभाषेचा ठेवण्याबाबत सांगितले होते. तसेच यासंबंधी कर्नाटक राज्यात जाऊन अभ्यास करण्यात येईल असेही सांगितले होते, त्याचे पुढे काय झाले याचाही खुलासा करावा. गेल्या दोन अधिवेशनांपासून आपल्याला वेळ मिळत नाही की काय ? तसेच सभागृहात दिलेल्या आश्वासनांच्या बाबतीत काय झाले याचेही उत्तर मिळणे आवश्यक आहे.

यानंतर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या बाबतीत बोलत असताना जे.जे. हॉस्पिटलचे नुतनीकरण करणार आहात व त्यासाठी बरेच पैसे दिलेले आहेत. 100 कोटी रुपये त्यासाठी आपण आणणार होता त्याबाबत नेमके काय झाले ? याचाही खुलासा करावा. त्याचप्रमाणे जे.जे. हॉस्पिटलला एम्सचा दर्जा देणार होता त्याचे काय झाले त्यासंबंधीचा खुलासा करण्याची गरज आहे. आपण देखील जे.जे. हॉस्पिटलमध्ये पाहणी करण्यासाठी गेला होता. त्या ठिकाणी 40 लाख रुपये खर्च करुन ऑर्थोपेडिक ओ.टी. आपण बनविले परंतु ते ओ.टी. तीन वर्षापासून बंद आहे, या ओ.टी.चे काम संपलेले आहे पण तेथे आपण गेलात तर कोठल्याही प्रकारे ऑपरेशन करु शकणार नाहीत, कारण ऑपरेशन करणाऱ्या व्यक्तिच्या डोक्याला थिएटरमधील दिवा लागतो.....

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

40 लक्ष रुपये खर्च करुन जे ऑपरेशन थिएटर बनवले आहे त्याची चौकशी करावी तसेच याबाबतीत नक्की काय झाले याची माहिती सभागृहाला देण्यात यावी अशी विनंती आहे.

सुप्रिम कोर्टाने शासनाला सांगितले होते की, जे.जे. हॉस्पीटलमध्ये इनव्हेंटरी किती आहे याची माहिती द्या परंतु आपण ही माहिती कोर्टाला आणि या सभागृहाला सुध्दा दिलेली नाही. जे.जे.हॉस्पीटलमध्ये किती इक्वीपमेंट आहे, कोणकोणती इक्वीपमेंट नवीन घेतली या विषयावर सुध्दा प्रकाश टाकण्यात यावा ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 95 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील राज्यातील आयुर्वेदिक आणि युनांनी संस्था व जिल्हा परिषदाअंतर्गत काम करणा-या विविध दवाखान्यांना चालना देण्यासाठी वित्तीय सहाय्य 2,08,06,000 उपलब्ध करुन दिलेले आहे. आयुर्वेदिक महाविद्यालये, युनानी महाविद्यालये, होमिओपॅथी महाविद्यालये आपल्याकडून पैसे घेऊन आपल्याच तिजोरित टाकतात. खान साहेब सचिव असतांना मी यासंदर्भात माहिती मागवली होती. या कामासाठी केंद्रसरकारतर्फे पैसे मिळत असतात परंतु ही महाविद्यालये वेगळयाच कारणासाठी पैसे वापरतात. विद्यार्थ्यांसाठी किंवा लायब्ररी अपडेट करण्यासाठी, इक्वीपमेंट घेण्यासाठी या पैशाचा उपयोग करीत नाही अशी माहिती मला खान साहेबांनी पत्राने दिलेली आहे. त्यामुळे या सर्व महाविद्यालयांची आपण चौकशी करावी व यासंदर्भात महाविद्यालयांना जो निधी दिला जातो त्याचे योग्य विनियोग होतो की, नाही ते पहावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, पान क्रमांक 21 बाब क्रमांक 22,महसूल व वन विभगावर विचार व्यक्त करणार आहे. सन 2007 मध्ये अचलपूर दंगल आणि कुर्ला आग प्रकरणाच्या संदर्भात मला फक्त एकच मुद्दा मांडावयाचा आहे. ज्या पध्दतीने पोलिसांच्या भिवंडीत हत्या झाल्या त्या भिवंडी पोलीस ठाण्याचे काय झाले आहे? भिवंडी येथील पोलीस ठाणे आपण कधी बांधणार आहात? भिवंडी पोलीस ठाण्यासाठी त्या प्रकरणानंतर आजपर्यंत काहीही तरतूद करण्यात आलेली नाही. भिवंडी पोलीस ठाण्यासाठी माननीय उपसभापती श्री. वसंतजी डावखरे यांनी स्वत:चा निधी दिला होता. भिवंडीमध्ये पोलीस ठाण्याची आवश्यकता असतांना आजतागायत आपण पोलीस ठाणे का बांधू शकला नाही यासंदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्व ठिकाणी पोलिसांच्या निवासस्थांनाची दुरावस्था आहे. वरळी-बीडीडी चाळीतील पोलीस निवासस्थांनासाठी आपण मागील वर्षी 5 कोटी रुपयांची तरतूद केली होती. या 5 कोटी रुपयांमध्ये वरळी-बीडीडी चाळीतील पोलीस वसाहतींची दुरुस्ती होऊ शकत नाही. नव्या मुंबईत सुध्दा पोलिसांच्या वसाहती आहेत. या ठिकाणची घरे 100 चौ.फु. ची असल्यामुळे या ठिकाणी पोलीस राहण्यास तयार नाहीत. पोलीस निवासस्थाने पोलीस स्टेशनजवळ बांधण्याचे कारण एवढेच असते की, जेव्हा पोलिसांची इमरजन्सी सेवा पाहिजे असते तेव्हा ती लवकर मिळावी यासाठीच पोलीस स्टेशन जवळ पोलिसांच्या निवासस्थानाची घरे असतात. परंतु आज 50 टक्क्याहून अधिक पोलीस, पोलिसांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थांनामध्ये राहत नाहीत. पोलीस निवासस्थाने पोलिसांच्या राहण्याच्या लायकी नसल्यामुळे पोलीस निवासात पोलीस राहत नाहीत त्यामुळे यासंदर्भात शासनाने तातडीने लक्ष घालावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 29 वर माझे विचार मांडणार आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मदरशाच्या विषयावर विचार मांडलेले आहेत त्यामुळे मी या विषयावर बोलणार नाही. आपण उर्दूसाठी जी काही तरतूद करतात त्याबद्दल काहीही दु:ख नाही,खंत नाही किंबहूना स्वागतच आहे. उर्दू भाषा शिकवल्याबद्दल दु:ख नाही परंतु या महाराष्ट्रात मराठी भाषेचे प्राधान्य राखले पाहिजे यासाठी आपण नवीन कायदा पास केलेला आहे. एक अतिशय गंभीर निर्णय शासनाने घेतलेला आहे. 3 भाषेत पास होण्यासाठी 105 गुण असले की, तो विद्यार्थी पास होईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

प्रत्येक भाषेत विद्यार्थ्याला पास होण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारचा निर्णय राज्यसरकारने घेतला. हा निर्णय घेतांना त्यातील 20 मार्क्स तोंडी परीक्षेसाठी दिले. मुले जर इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिक्षण घेत असतील व त्यांना मराठी भाषा येत नसेल तर शाळेकडे तोंडी मार्कांचे 20 गुण दिलेले आहे. आहे. कंडोनेशनचे पुन्हा 2 मार्क्स मिळतील. पासिंगला किमान 25 मार्क्स पाहिजे त्यामुळे 3 गुण विद्यार्थ्याला परीक्षेत कसेही मिळू शकतील. शासनाने हा जो निर्णय घेतलेला आहे तो निषेधार्ह आहे. शासनाने घेतलेला निर्णय मराठी भाषेवर अन्याय करणारा आहे. काही वेळेला फायदा होऊ शकतो. इंग्रजी येत नाही परंतु मराठी चांगले आहे म्हणून त्या विद्यार्थ्याला मराठीत चांगले गुण मिळू शकतील. त्यामुळे तोंडी मार्क्स देण्याच्या संदर्भात जी पध्दत आणलेली आहे ती महाराष्ट्राला घातक आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 17=50

श्री.अरविंद सावंत..

मराठी भाषा मॅन्डेटरी न ठेवता कंपलसरी ठेवण्यात आली पाहिजे. मराठी भाषेतून पास होणे सक्तीचे करण्यात आले पाहिजे. कोकणात जेवढे मुसलमान आहेत ते अतिशय सुंदर मराठी भाषा बोलतात

**तालिका सभापती** :सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण संपवावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, मी तीन मुद्दे एक मिनिटामध्ये मांडतो. कोकणातील मुसलमान आणि वसईतील ख्रिश्चन आणि मुसलमान अतिशय सुंदर मराठी बोलतात किंबहुना आमच्या पेक्षासुध्दा अधिक चांगल्या प्रकारे मराठी लिहितात. आपणच त्यांच्यामध्ये एक प्रकारचे भूत निर्माण करीत आहोत. तेव्हा अशा प्रकारचे भूत त्यांच्यामध्ये निर्माण करु नये असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे

.सभापती महोदया, शेवटी मला एक महत्वाचा मुद्दा येथे मांडावयाचा आहे बाब क्रमांक 48 ते 52 संबंधी तो मुद्दा आहे.उर्जा मंत्री या ठिकाणी उपस्थित आहे परतु जलसंपदा विभागाचे मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत किंवा नाही हे मला माहीत नाही. कृष्णा पाणी वाटप लवादाने धरणाच्या पाण्याचे नियोजन 98.78 टी.एम.सी पाणी गृहित धरुन कृष्णा पाणी वाटप लवादाने धरणाच्या पाण्याचे नियोजन केलेले असल्यामुळे आता आपल्याकडे 12.31 टी.एम.सी. पाणी वीज निर्मितीसाठी शिल्लक आहे.अशा प्रकारची माहिती आहे. कृष्णा पाणी वाटप लवादाच्या निर्णयामुळे वीज निर्मिती कमी होणार आहे हे खरे आहे काय ? असल्यास या लवादाच्या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे ? प्रत्यक्षात तेथे 106 टी.एम.सी.पेक्षा अधिक पाणी उपलब्ध आहे त्याला धरुन जर पाण्याचे नियोजन केले तर अधिक वीज निर्मिती होऊ शकेल तेव्हा या संदर्भात शासन कोणती पावले उचलणार आहे याबाबतीत खुलासा करण्यात यावा अशी विनती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4K2

श्री.परशुराम उपरकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदया, 2007-2008 सालच्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया,गृह विभागाची बाब क्रमांक 6, पान नंबर 12 संबंधी मला बोलावयाचे आहे.गुप्त सेवा खर्चासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे.या संबंधी मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण येथे 2005 सालच्या पोट निवडणुकीच्या वेळी श्री.रमेश गोवेकर बेपत्ता झाले होते आणि स्थानिक पोलिसांना, सी.आय.डी.ला आणि सी.बी.आय.ला ते अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी त्या बाबतीत वारंवार खुलासा केलेला होता तसेच उच्च न्यायालयाने असे आदेश दिले होते की, श्री.रमेश गोवेकर यांच्या कुटुबियांना चार महिन्यात त्यांच्या बद्दलची माहिती द्यावी. परंतु त्यांना अद्यापी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या संदर्भात अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित केला असतांना त्याबाबतीत खुलासा करण्याचे माननीय मंत्री महोदयांनी अनेक वेळा कबूल केले होते परंतु अजूनही त्यांनी काहीही खुलासा केलेला नाही. तेव्हा या विषयाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची गरज आहे हा खुलासा त्यांनी करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर मला महसूल आणि वन विभागाची बाब क्रमांक 14 पान नंबर 18 संबंधी बोलावयाचे आहे.मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान देण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे.या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदूर्ग जिल्हयात वन संज्ञेखाली 42 हजार हेक्टर्स जमीन असून ही जमीन या संज्ञेमधून वगळण्यात यावी यासाठी अनेकवेळा मोर्चे काढण्यात आले होते व आंदोलने करण्यात आली होती. तसेच सभागृहात अनेकदा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. लक्षवेधी सूचना देखील मांडण्यात आली होती. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, 42 हजार हेक्टर्स जमीन वन संज्ञेखाली असून ही 18 हजार हेक्टर इतकी खाली आणण्याबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये माननीय मुख्य सचिव दोन महिन्यात प्रतिज्ञापत्र दाखल करतील. परंतु अशा प्रकारे त्यांनी सांगितल्यानंतर सुध्दा अद्यापी कोणतेही प्रतिज्ञा पत्र सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी वन संज्ञेखाली अडकल्यामुळे विकास होण्यापासून त्या जमिनी वंचित राहिल्या आहेत तेव्हा या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केव्हा दाखल करण्यात येणार आहे आणि कॅबिनेट समोर हा प्रस्ताव केव्हा पाठविण्यात येणार आहे यासबंधी खुलासा करावा.

सभापती महोदया, यानंतर मला जल संपदा विभागाची बाब क्रमांक 47 पान नंबर 53 सबंधी बोलावयाचे आहे.अकोला जिल्हयात नवीन पाटबंधारे प्रकल्पाचे काम करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदूर्ग जिल्हयातील मोठया आणि मध्यम पाटबंधाऱ्याचे प्रकल्प या आर्थिक वर्षात बंद आहेत. त्या प्रकल्पाचे 225 कोटी रुपयांची देयके देणे अजूनही शिल्लक असतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी 40 कोटी रुपये देण्याची घोषणा केली आहे पंरतु हे पैसे अजूनही जमा न झाल्यामुळे तेथील कामे अत्यंत धिम्या गतीने सुरु आहेत. त्यामुळे भविष्य काळात या प्रकल्पाची किंमत अंदाजपत्रकापेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे.तेव्हा या प्रकल्पासाठी अधिकचा निधी देण्यात यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर मला उद्योग विभागाची बाब क्रमांक 64 पान नंबर 69 संबंधी बोलावयाचे आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात कोकण विकास महामंडळा मार्फत तेल गिरणी प्रकल्प सुरु करण्याचा प्रयत्न केला आहे आणि ताडतेल प्रकल्पाअंतर्गत 1 हजार हेक्टर्स जमिनीवर ताड लावण्यात आले होते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर ....

त्या प्रकल्पाची झाडे वाढल्यानंतर, त्याला फळे आल्यानंतर, उद्‌घाटन केल्यानंतर दोन दिवसातच तो बंद केला. त्यामुळे कोकण विकास महामंडळाकडून त्यावर खर्च करण्यात आलेले लाखो रूपये वाया गेलले आहेत. त्याबाबत आपण कोणत्या उपाय योजना करणार आहात याचा खुलासा या निमित्ताने मंत्री महोदयांनी करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदया, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे त्यामुळे त्या ठिकाणी आपण पैसा खर्च करीत असताना गोव्याचा आदर्श आपण घेतला पाहिजे. गोवा राज्या ज्याप्रमाणे तेथे पर्यटक यावेत यादृष्टीने प्रयत्न करीत आहे, तेथील सौंदर्यस्थळे विकसित करीत आहे तसे आपण केले पाहिजे. परंतु कोकणातील निसर्गदत्त सौंदर्यस्थळे आपण तेथील पर्यावरण बिघडविणारे प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प असे, मायनिंग प्रकल्प असेल, असे प्रकल्प आणून तेथील पर्यटन एक प्रकारे नष्ट करण्याचाच प्रयत्न शासनाकडून केला जात आहे. म्हणून या बाबत शासनाकडून खुलासा होणे अगत्याचे आहे. आपल्याकडे पर्यटन स्थळांचा विकास होणे आवश्यक आहे. आज गोव्या सारख्या राज्याने तेथील पर्यटनास चालना देऊन आर्थिक सुबत्ता आणली आहे त्याप्रमाणे आपणही कोकणातील निसर्गसंपन्नतेचा फायदा घेऊन तेथे पर्यटनाला अधिकाधिक वाव देऊन आपल्याही राज्याला आर्थिक सुबत्ता येण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याकडे जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करून निधी देण्याची गरज आहे., एवढे बोलून सभापती महोदया, आपण मला या चर्चेत भाग घेऊन बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देतो आणि माननीय मंत्री महोदयांनी मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत खुलासा अवश्य करावा अशी विनंती करतो.

****

..... 4एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला,वाशिम, बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी केवळ एकाच बाबीवर येथे बोलणार आहे तरी त्यासाठी आपण मला परवानगी द्यावी. सभापती महोदय, ऊर्जा खात्याची बाब क्रमांक 62, पृष्ठ क्र.69 यावर मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. आता या ठिकाणी माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील तसेच वित्त मंत्री श्री.जयंत पाटील हे दोघेही उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण दोघेही अकोला येथे आले असताना तेथे आम्ही एक्स्प्रेस फीडरची मागणी केलेली होत, त्याची व्यवस्था कृपया आपण करावी एवढीच एक मागणी मी येथे करू इच्छितो.

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदया, मी सन्माननीय सदस्यांच्या मुद्यावर आपल्यामार्फत लगेचच उत्तर देऊ इच्छितो, अन्यथा नंतर त्यांचा मुद्दा राहून जाण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण उपस्थित केलेल्या बाबीची जेव्हा चर्चा झाली त्यावेळी डायरेक्ट फीडर देण्याविषयी झालेल्या बैठकीमध्येच त्यासाठी तरतूद करण्याचा निर्णय झाला होता. तेव्हा आपण उद्या तेथे गेल्यानंतर ते उघडून पहावे, म्हणजे आपल्याला ती दिली आहे की नाही हे समजून येईल.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : आता यानंतर मी केवळ नवीन सदस्य म्हणून सन्माननीय सदस्य श्री.नवले यांना बोलण्याची परवानगी देते. श्री. नवले यांनी भाषण सुरू करावे.

...... 4एल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. प्रथमत: मी या ठिकाणी गृह विभागाच्या पुरवणी मागणीतील बाब क्रमांक 6, 7, 12 व 13, पृष्ठ क्रमांक 12 ते 14 यावर माझे विचार मांडणार आहे. यामध्ये पोलीस संचालक, प्रशासन, जिल्हा पोलीसदल तसेच कारागृह यासाठी तरतूद केलेली आहे. सभापती महोदया, पोलीस खात्यात सुधारणा करण्यासाठी पोलिसांवरील जो मानसिक ताण आहे तो प्रथमत: कमी करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. पोलिसांचे शारीरिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी आरोग्य खात्याने काही करारी निर्णय घेण्याची गरज आहे. त्यामध्ये छातीच्या खाली पोट आणि पोटाच्या वर छाती अशी शारीरिक स्थिती व अवस्था पोलिसाची असेल तर मला वाटते पोलिसांच्या हातून कोणताही गुन्हेगार, चोर पळून जाणार नाही. सभापती महोदया, या ठिकाणी गुप्तचर खात्याविषयी मागणी केलेली आहे. माझे मत असे आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांचे गुप्तहेर खाते सुरतेमध्ये किती रोकड आहे याची माहिती देत होते. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 4एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपली असल्यामुळे सभागृहाची वेळ अर्धा तास वाढविण्यात येत आहे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, आपण उद्या सकाळी 10 वाजता सभागृह घ्यावे. तोपर्यंत माननीय सदस्यांचे भाषण ऑन लेग ठेवावे...

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

**तालिका सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी शांत रहावे. सभागृहाची वेळ अर्धा तास वाढविण्यात आलेली आहे....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, सभागृहाची वेळ वाढविण्याकरिता सभागृहाची अनुमती घ्यावी लागते...

(गोंधळ)

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदयांनी पुरवणी मागण्यांवरील उत्तराचे भाषण सुरु करावे...

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदया, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 116, 117, 118, 119 व 120 वरील मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

(गोंधळ)

**तालिका सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे अशी माझी आपणाला विनंती आहे...

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, आम्ही आज सकाळी 10 वाजल्यापासून बसलेलो आहोत. त्यामुळे आता यापुढे सभागृहाचे कामकाज घेऊ नये....

**तालिका सभापती** : माझी सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, सभागृहाची वेळ वाढविण्याबाबत आपले जे काही म्हणणे असेल ते आपण थोडक्यात मांडावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपल्यानंतर ती पुन्हा वाढविण्यापूर्वी सभागृहाची अनुमती घेणे गरजेचे आहे. अशाप्रकारे सभागृहाची अनुमती घेऊनच वेळ वाढविली पाहिजे. आपण सभागृहाची वेळ 5 वाजल्यानंतर वाढविली, त्यानंतर पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

डॉ. दीपक सावंत...

आता 6 वाजता वेळ वाढवित आहात. सहाच्या पुढे कामकाज चालवू नये असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले आहे. काल आपण सभागृह सहा वाजता संपविले होते त्याप्रमाणे आज देखील सहा वाजले असल्यामुळे हे सभागृह स्थगित करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांच्या भावना मला समजल्या आहेत. आपल्या सर्वांच्या भावनांचा आदर करुन आज सकाळी 10 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेण्यात आली. काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये आपण अशाप्रकारे निर्णय घेत असतो. आपण सर्वजण या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहात, समजूतदार सभासद आहात. आपणा सर्वांच्या सहकार्याने या सभागृहाचे कामकाज चालते. आपण बऱ्याच वेळा सहकार्य केले आहे. तेव्हा आजचे कामकाज पुढे चालू ठेवण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे आणि हे सभागृह पुढे चालू द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे. तेव्हा आता सभागृहाच्या अनुमतीने सभागृहाची वेळ अर्धा तास वाढविण्यात येत आहे.

(गोंधळ)

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, मला आपण दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी...

**तालिका सभापती** : मघाशी माननीय सदस्यांची नावे पुकारल्यानंतर त्यापैकी काही सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. परंतु आता ते माननीय सदस्य उपस्थित झाले आहेत. त्यामुळे त्यांचे पूरक मागण्यांवरील विचार आपल्याला ऐकून घ्यावे लागतील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. सुरेश नवले हे नवीन सभासद असल्यामुळे त्यांचे अपूर्ण असलेले भाषण त्यांना पूर्ण करु द्यावे अशी माझी विनंती आहे.

(गोंधळ)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:05

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, मी एवढीच भूमिका मांडू इच्छितो की, जर सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवावयाची असेल तर अजून ज्या सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहेत, तेवढया सन्माननीय सदस्यांना भाषण करु द्यावे आणि जर सभागृहाची वेळ वाढवावयाची नसेल तर मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, उद्या सभागृहापुढील इतर कामकाज आणि अर्थसंकल्प सादर करावयाचा असल्यामुळे पूरक मागण्यांचा विषय आजच्या आज संपला तर बरे होईल. आपल्याला अजून एक विधेयक देखील पास करावयाचे आहे. त्यासंदर्भात आपण चर्चा करु. परंतु ही जी चर्चा सुरु आहे, तेवढया वेळामध्ये मागण्यांवरील चर्चा देखील संपली असती. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आता नव्याने सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी परवानगी न देता माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्याबाबत सांगावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सन्माननीय सदस्यांनी आपसात बोलू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया,माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही जेव्हा माननीय सभापतींकडे गेलो होतो. त्यावेळी सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात चर्चा झाली. त्यांनी असे सांगितले की, याठिकाणी बेळगाव-कारवारच्या संदर्भातील विषय उपस्थित करावयाचा आहे आणि त्याबाबत सर्वांनी बोलावयाचे नाही. त्यामुळे आम्हाला सर्वांना त्या विषयाच्या बाबतीत आमच्या भावना व्यक्त करावयाच्या असताना सुध्दा त्यावरील मर्यादेमध्ये ठेवली. त्यानंतर असे सांगितले की, आज ज्या पुरवणी मागण्या आहेत, त्या संपवावयाच्या आहेत. कारण नंतर एक बिल आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब असे म्हणाले की, मला या बिलाच्या संदर्भात घटनात्मक मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत आणि त्यासंदर्भात त्यांनी पत्र देखील दिलेले आहे. त्यावर माननीय सभापती म्हणाले की, ठीक आहे. मग आपण आज बिलाचा विषय घेणार नाही. आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करु या. अशा प्रकारे माननीय सभापती महोदयांकडे चर्चा झ ाली आणि त्यावेळी आम्ही सर्वजण होतो. मग आता तुम्ही विधेयकावरील चर्चेचा विषय कुठून काढत आहात ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया,आज दालनामध्ये जी चर्चा झालेली आहे, ती काही

. . . .4 एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील . . . .

आम्हाला माहिती नाही. शेवटी सभागृह हे . . . .

श्री.दिवाकर रावते : तो आपला विषय नाही.

श्री.जयंत पाटील : म्हणूनच मी त्यामध्ये हस्तक्षेपही करीत नाही. पण रेकॉर्डवर जी बिले दाखविलेली आहेत आणि हे बिल सतत रेकॉर्डवर येत आहे.

**तालिका सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, पुरवणी मागण्यांचा जो विषय आहे, तो अगोदर संपविण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, असे नाही. आज निर्णय द्यावा. हा विषय असा कसा संपविता येईल ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया, माझी अशी विनंती आहे की, आज हे विधेयक पास करणे महत्वाचे आहे आणि ते विधेयक मंजूर करण्यासाठी सर्वांनी सहकार्य द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, अशा प्रकारे कसे रेटून नेता येईल ?

**सभापतीस्थानी -माननीय सभापती**

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.मधुकर चव्हाण (खाली बसून) : सन्माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील हे सभापती नाहीत. माननीय सभापतींनी निर्णय द्यावयाचा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : याठिकाणी पुरवणी मागण्यांवरील सन्माननीय सदस्यांची भाषणे संपली असून आता विविध विभागांच्या मागण्यावरील चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज बिलाचा विषय चर्चेसाठी नाही. कारण मघाशी आपल्याकडे जी चर्चा झाली, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब देखील तेथे उपस्थित होते.

**सभापती** : याठिकाणी विविध विभागांच्या संदर्भात ज्या पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत, त्यावरील माननीय मंत्री महोदयांची उत्तराची भाषणे संपल्यानंतर, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले विधेयक आणि अर्धा तास चर्चेच्या सूचनाही घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी आपल्याला सांगितले होते . . . .





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या मागणी क्र.44 ते 52 अशा नऊ मागण्या आहेत. त्याची एकूण किंमत 102 कोटी 98 लाख रुपये आहे. मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यातील भारित मागण्या 71 कोटी 48 लाख आणि दत्तमत्त मागण्या 31 कोटी 50 लाख रुपयांच्या आहेत. कृपया सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 28, 29, 30 या 8 कोटी 66 लाख 36 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, कामगार विभागाशी संबंधित सन 2007-08 च्या बाब क्रमांक 61 व 62 या पुरवणी मागण्यांना सदनाने मान्यता द्यावी अशी मी आपल्या माध्यमातून सदनाला विनंती करतो.

----

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 6, 7, 8, 9, 10, 12 आणि 39 या ज्या पुरवणी मागण्या आहे त्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

-----

.....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. रविशेठ पाटील ( सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण व आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांमध्ये पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 106 या पुरवणी मागणीचा समावेश असून एकूण 5 लाख रुपये इतक्या रकमेची पुरवणी मागणी सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर केली आहे. तसेच वन विभागाच्या बाब क्रमांक 23 या पुरवणी मागणीचा यामध्ये समावेश असून एकूण 1 कोटी 77 लाख रुपये इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. आपल्या माध्यमातून सभागृहास विनंती आहे की, या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात.

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, महसूल विभागाच्या 15 कोटी 45 लाख 95 हजार रुपयांच्या आणि पुनर्वसन विभागाच्या 6 कोटी 28 लाख 96 हजार रुपयांच्या अशा एकूण 21 कोटी 74 लाख 91 हजार रुपये रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या आहेत. सभागृहाने या मागण्या मान्य कराव्यात अशी माझी विनंती आहे.

-----

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक बाब क्रमांक 65 आणि 66 आणि सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 122 या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, बेलापूर किल्ल्याच्या बाबतीत या ठिकाणी एक महत्वाचा विषय उपस्थित करण्यात आला होता. त्याच्या संदर्भात बैठक घेण्याच्या बाबतीत मी या ठिकाणी आश्वासन देत आहे.

-----

....7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा (अपारंपारिक ऊजा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 63, 64 त्याचप्रमाणे वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 92, 93, 94 आणि 95 त्याचबरोबर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 109, 110, 111, आणि 112 तसेच बाब क्रमांक 112 मधील आणखी एक बाब आहे अशा या सर्व मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजेत. राज्य सरकारने यंत्रमाग धारकांना वीज बिलामध्ये सवलत देण्याच्या संदर्भामध्ये निर्णय घेतलेला होता. त्यापोटी 2005-06 मध्ये 79 कोटी रुपये आणि 2006-07 साठी 178 कोटी असे 257 कोटी रुपये यंत्रमाग धारकांना देऊन त्यामध्ये त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. दुसरी एक 827 कोटी रुपयांची ऊर्जा विभागाची मागणी यामध्ये सादर केलेली आहे. राज्य सरकारने ज्यावेळी वीज मंडळाचे विभाजन केले त्यावेळेला राज्य सरकारचे वीज मंडळाकडे दायित्व 4090 कोटी रुपयांचे होते. त्यातील 3178 कोटी रुपये निर्लेखित करुन 912 कोटी रुपये भागभांडवलात रुपांतरित करण्याचा निर्णय झालेला होता. परंतु दरम्यानच्या काळामध्ये वीज मंडळाकडून वेगवेगळ्या खात्यांच्या येणेदेणे असलेल्या रकमांच्या पोटी जे समायोजन करण्यात आलेले होते त्यापैकी वीज वितरण कंपनीकडून 2213 कोटी रुपये वित्त विभागाने समायोजित करुन घेतलेले होते. त्यामध्ये चर्चा झाल्यानंतर 1746 कोटी रुपये पुन्हा वीज वितरण कंपनीला देण्याचे मान्य केलेले असल्यामुळे त्यापैकी पार्ट पेमेंट म्हणून हे 827 कोटी रुपये वीज वितरण कंपनीला देण्याच्या संदर्भामध्ये भूमिका घेतलेली आहे आणि ही नवीन बाब असल्याने सभागृहाच्या निदर्शनास आणणे गरजेचे असल्यामुळे या मागण्या सादर केलेल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण या विभागाच्या बहुतेक मागण्या मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित असलेला जास्त खर्च किंवा झालेला अधिक खर्च किंवा व्याज प्रदानासाठी असलेल्या खर्चाबाबत असल्यामुळे या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. या सर्व मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**सभापती** : सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

-----

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई मोटार वाहन कर; मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी); महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर); विजेच्या विक्रीवरील कर; राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर; कर अधिनियम (सुधारणा) आणि रोजगार हमी (सुधारणा); आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी (निरसन) विधेयक

**L.A. BILL NO. V OF 2008**

**( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958; THE BOMBAY MOTOR VEHICLES (TAXATION OF PASSENGERS) ACT, 1958; THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962; THE MAHARASHTRA TAX ON SALE OF ELECTRICITY ACT, 1963; THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975; THE MAHARASHTRA TAX ACT (AMENDMENT) ACT, 1975 AND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977; AND TO REPEAL THE BOMBAY STATE SCARCITY RELIEF FUND ACT, 1958.)**

**सभापती** : विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, विचार खंडश, विचार व संमत करण्यासाठी सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 5 हे विधेयक कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 213 अन्वये या विधेयकाबाबत काही आक्षेप मांडण्यासाठी माझी परवानगी मागितली होती. परंतु त्यापैकी कोणीही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी माननीय वित्त मंत्र्यांना विधेयक मांडण्याची अनुमती देत आहे.

श्री.जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 5, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958; मुंबई मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी) अधिनियम, 1958; महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962; महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, 1963; महाराष्ट्र राज्य

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, 1975; महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, 1975 आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी अधिनियम, 1958 निरसित करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 5 मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958; मुंबई मोटार वाहने (उतारुंवर कर आकारणी) अधिनियम, 1958; महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962; महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, 1963; महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, 1975; महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, 1975 आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी आणि मुंबई राज्य टंचाई निवारण निधी अधिनियम, 1958 निरसित करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मला याठिकाणी नम्रपणे कबूल केले पाहिजे की, राज्य सरकारची या विधेयकावर अधिक चांगली चर्चा व्हावी अशी इच्छा होती. या राज्यात एक वेगळी व्यवस्था गेली अनेक वर्षे अस्तित्वात होती. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचा समावेश आहे. म्हणजे मागेल त्याला काम हे रोजगार हमी योजनेचे मूळ सूत्र आहे. महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजना राज्यात यशस्वीपणे राबविली आहे. आज केंद्र सरकारने देखील या योजनेपासून काही अनुभव घेऊन या राज्यातील सर्व जिल्हयात केंद्राची योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. रोजगार हमी योजनेवर आजपर्यंत सरासरीने 700 कोटी रुपये खर्च आलेला आहे. म्हणून महाराष्ट्र सरकारने यावर एकत्रितपणे विचार करुन 2000 कोटी रुपयांपेक्षा कमी नसेल अशा स्वरुपाचा निधी रोजगार हमी योजनेसाठी निश्चित करण्याचे ठरविले आहे, त्याप्रमाणे तो उद्देश साध्य व्हावा यासाठी हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. राज्य सरकारने यासंबंधी काही दिवसांपूर्वी अध्यादेश जारी

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केला होता.  राज्याच्या हितासाठी या राज्यातील रोजगार हमी योजनेला आवश्यक असणारा पूर्ण पैसा देण्याची व्यवस्था या विधेयकात केलेली आहे.  2000 कोटी रुपयापेक्षा कधीही हा निधी कमी होणार नाही, याची काळजी घेणारी व्यवस्था अर्थसंकल्पात दरवर्षी करण्यात येईल. असे करीत असताना जर कोणत्याही वर्षी तरतुदीपेक्षा जास्त निधी खर्च होत असेल तर आवश्यक तेवढा निधी देण्याची बांधिलकी सरकारने या विधेयकात स्वीकारलेली आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये वेगवेगळया चर्चा होत आहेत. सरकारबद्दल वेगळे इम्प्रेशन निर्माण करण्याचा प्रयत्न काही लोक करीत आहेत.  रोजगार हमी योजना आता सरकार बंद करणार आहे असे बोलले जात आहे.  पण मला नम्रपणे सांगितले पाहिजे की, रोजगार हमी योजना एक कायदा आहे. महाराष्ट्र सरकारने पारित केलेली आणि अतिशय यशस्वीपणे राबविलेली ही योजना आहे. या योजनेसाठी जो निधी लागतो त्यासाठी जी तरतूद आहे तेवढाच बदल शासन करीत आहे.  महाराष्ट्राच्या सुरुवातीला म्हणजे 1977 सालापासूनची आपण आकडेवारी पाहिली तर 30-35 कोटी कोटी रुपये व्यवसाय कर गोळा होत असे.  तेवढयाच निधीचे अनुदान या निधीला जोडून अर्थसंकल्पामध्ये तेवढी तरतूद केली जात होती.  सध्या राज्यात प्रोफेशन करणा-यांची संख्या वाढली आहे.  रोजगार हमी योजना आणि व्यवसाय कर यामध्ये अंतर आहे.  1975 सालीदेशाच्या घटनेत बदल करुन हा व्यवसाय कर लागू करण्यात आला होता.  हा व्यवसाय कर देशातील सर्व राज्यात लागू आहे.  देशातील सर्व राज्यातून व्यवसाय करगोळा केला जातो, हा कर म्हणजे त्या त्या राज्यांचे महत्वाचे उत्पन्न आहे.  आपल्या राज्यात 1972 च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निर्णय घेण्यात आला. जेवढा व्यवसाय कर गोळा होईल तेवढाच निधी सरकारमार्फत अनुदान म्हणून देण्याचा निर्णय घेतला आहे.  हा जो निधी आहे तो दरवर्षी गोळा करीत आवश्यक तेवढा पैसा या रोजगार हमी योजनेसाठी दिला जातो.  मधल्या काळातील 1-2 वर्षे रोजगार हमी योजनेसाठी गोळा होत असलेल्या निधीपेक्षा जास्त खर्च झाला होता. त्यावेळीही सरकारने पूरक अनुदानाची रक्कम उपलब्ध करुन दिली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील...)

राज्यातील सन 2003-2004च्या दुष्काळी परिस्थितीच्या वेळी 1300 कोटी रु.पर्यन्त रोजगार हमी योजनेवर खर्च केलेला आहे. आता राज्यात प्रोफेशन्स वाढलेले आहेत. आय.टी.पासून अनेक वेगवेगळे कारखाने निघालेले आहेत आणि प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून राज्य सरकारला उत्पन्न मिळायला लागले आहे. केन्द्र सरकारच्या नवीन ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे जलसंधारणाची कामे होण्याची व्यवस्था झाली आहे. राज्य सरकारच्या रोजगार हमी योजनेतून सरासरी 700 कोटी पर्यन्त खर्च झालेला आहे. ही रक्कम 1500 कोटी असेल किंवा 2000 कोटी असेल किंवा लागेल तेवढी रक्कम देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. 1977ची अर्थ व्यवस्था आणि एकूणच रोजगार हमी योजनेसाठी दिला जाणारा निधी यांचा तुलनात्मकदृष्टया विचार केला तर आज राज्य सरकारचे उत्पन्न वाढलेले आहे. जवळ जवळ 90-95 हजार कोटीचा अर्थसंकल्पीय पसारा असून 25 हजार कोटीपर्यन्तच्या आपल्या योजना जात आहेत. असे असताना रोजगार हमी योजनेसाठी 700 ते 800 कोटी रुपये लागत असतील तर ते देण्याचे सामर्थ्य अर्थसंकल्पामध्ये निर्माण झालेले आहे. म्हणून हा निधी 2000 कोटी पेक्षा कमी होणार नाही असा निर्णय घेतलेला आहे. रोजगार हमीचा निधी हा रद्द केलेला नाही. परंतु उर्वरित चार-पाच छोटे छोटे निधी रद्द केलेले आहेत. रोजगार हमीच्या निधीला धक्का लावलेला नाही. हा निधी कधीही 2000 कोटी पेक्षा कमी होणार नाही याची राज्य सरकारने काळजी घेतलेली आहे. म्हणून या सभागृहाच्या माध्यमातून मी महाराष्ट्रातील जनतेला विश्वास देऊ इच्छितो की, महाराष्ट्रातील कष्टकरी वर्गाला, मागेल त्याला काम देण्याची व्यवस्था जी महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजना कायद्यात आहे त्याला भक्कम पाठबळ देणारी अशी महाराष्ट्राची अर्थ व्यवस्था आहे. तळागाळातील शेवटच्या माणसासाठी 2000 कोटीची तरतूद करुन त्याला आपण अधिक आश्वासित करीत आहोत. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या कामासाठी येणा-या भविष्यकाळात कधीही पैसा कमी पडणार नाही. परिस्थितीनुरुप आपल्यालाही बदलले पाहिजे. 1977साली ज्या प्रोव्हिजन्स आवश्यक होत्या त्यांचा अतिशय विचारपूर्वक अभ्यास करुन आणि माननीय राज्यपालांची संमती घेऊन राज्य सरकारने बिलाच्या माध्यमातून हा प्रस्ताव येथे आणलेला आहे. विधानसभेमध्ये या बिलाच्या माध्यमातून काही घटनात्मक मुद्दे निर्माण झालेले होते. तशाच प्रकारच्या मुद्यांबाबत माननीय सभापतींना पत्र देण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ 18:20

(श्री. जयंत पाटील....)

आलेले आहे. जर मुळात संपूर्ण बिल विसंगत असेल तर त्याबाबतीत माननीय राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांना निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. माननीय राज्यपालांनी पूर्ण विचारांती निर्णय घेऊन शासनाने काढलेल्या अध्यादेशाला मान्यता दिलेली आहे आणि त्यासंबंधीचे बिल सभागृहापुढे मांडलेले आहे. सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.00च्या पुढे वाढवू नये अशी विरोधी पक्षाची मागणी होती. या विधेयकावर चर्चा व्हावी अशी माझी इच्छा होती. या रोजगार हमी योजनेसंदर्भातील महाराष्ट्रातील एन.जी.ओ.ना बोलावून त्यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनी रोजगार हमी योजनेसंदर्भात अतिशय मौलिक सूचना केल्या. त्या सूचनांबाबत माननीय रोजगार हमी योजना मंत्री विचार करीत आहोत. राज्याची एक अत्यंत महत्वाची आणि राज्यातील सर्वसामान्य माणसाच्या हिताची योजना म्हणून रोजगार हमी योजनेकडे राज्य सरकार पाहते. राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत 2000 कोटी ही रक्कम कमी असल्यामुळे हा 2000 कोटीचा निधी कायम ठेवण्याचा निर्धार आपण करीत आहोत. त्यामुळे भविष्यकाळात महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवर जाणा-या माणसासाठी निधी कमी पडणार नाही असा विश्वास मी या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला देऊ इच्छितो. महाराष्ट्राच्या वाढीला आवश्यक असणारे हे बिल आहे. या बिलाला मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 16 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 5 संमत झाले आहे.

सभागृहापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या बुधवार, दि□□ 19 मार्च, 2008 रोजी स□ळी 11.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□हाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□ 28 मि□टां□, बुधवार, दि□□ 19 मार्च,2008

रोजीच्या स□ळी 11.00 वाजेपर्य□ स्थगि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही